प्रकरण - पहिले

# संशोधन समस्या

## १.१ प्रास्ताविक:

यशस्वी अध्यापनासाठी पूर्वी विषयज्ञान असावे अशी अपेक्षा होती त्याकाळी अध्यापनास आवश्यक कौशल्याचा विचार केला जात नव्हता. आज शिक्षणशास्त्राचा विकास व विविध अध्यापनपद्धती, अध्यपन पद्धती, अध्यापन साहित्याची निर्मिती झाली. गेल्या पाच दशकांत सर्व जगभर ज्ञान, लोकसंख्या व अपेक्षांचा प्रस्फोट झाला आहे. भारतासारख्या विकसनशील देशांत सामाजिक बदल घडवू शकणाऱ्या शालेय संस्थांकडून समाज परिवर्तनाची अपेक्षा केली जात आहे. याचा परिणाम शिक्षक प्रशिक्षणावर झाला. आजचा विद्यार्थी बहुश्रूत असल्याने शिक्षकही अध्यापन कौशल्यात परिपूर्ण असण्याची आवश्यकता आहे. कोणत्याही राष्ट्राचा दर्जा तेथील नागरिकांना दिलेल्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो, शिक्षणाची गुणवत्ता शिक्षण प्रक्रियेतील शिक्षकांच्या गुणवत्तेवर व शिक्षकांची गुणवत्ता शिक्षक-प्रशिक्षणावर अवलंबून असते.

अध्यायन-अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. शिक्षक समाजाचा महत्वाचा घटक असून देशाच्या भावी पिढीचे भवितव्य शिक्षकांवर अवलंबून असते. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षक प्रशिक्षणाला परिपक्वता आली, काळानुसार शिक्षकांच्या भूमिका बदलत आहेत. शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञानासोबत अध्यापन कौशल्यांची आवश्यकता, भाषाप्रभुत्व, स्पष्टीकरणशैली, नवनीवन अध्यापन पद्धती व तंत्रांचा परिचय व त्यांचा वापर करण्याची क्षमता, विद्यार्थ्यांना प्रभावित करणारे व्यक्तिमत्व, अध्यापनविषयक अभियोग्यता, अभिरुची, शिक्षक व्यवसायावर निष्ठा, विद्यार्थ्यांबद्दल प्रेम व त्यांच्या सर्वांगिण विकासाची तळमळ,

भावी पिढी घडविण्याच्या राष्ट्रीय जबाबदारीचे भान व नैतिक मूल्यांचे अधिष्ठान इ. गोष्टी महत्वाच्या आहेत. आज शिक्षणशास्त्राचा आवाकाही वाढला आहे. म्हणून शिक्षकी व्यवसायामध्ये प्रवेश घेणाऱ्यांनी दर्जेदार प्रशिक्षण घेतले पाहिजे.

ज्या अभ्यासक्रमाद्वारे आणि अनुभवांच्या माध्यमाने एखाद्या व्यक्तीला अध्यापकीय व्यवसायासाठी व कार्यासाठी घडवले जाते त्या शिक्षणाला व अभ्यासक्रमाला शिक्षक-प्रशिक्षण असे म्हणतात.

प्रशिक्षणातून शिक्षणशास्त्राचा परिचय, शिक्षणाचा अर्थ, ध्येये व उद्दिष्टे, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, त्यांचे स्वरुप, नियम, सिद्धांत, विविध अध्यापन प्रक्रिया, मूल्यमापन पद्धती, शालेय व्यवहार यांचा शास्त्रशुद्ध परिचय यांची यथार्थ जाणीव दिली जाते. चांगल्या अध्यापनाला आवश्यक असलेली शास्त्रीय बैठक निर्माण करणे, अध्यापन कौशल्ये विकसित करणे, अध्यापन विषयक योग्य दृष्टीकोन बिंबवणे अश्या प्रकारे चांगला शिक्षक होण्यासाठी आवश्यक पूर्वतयारी करुन घेणे हे शिक्षक प्रशिक्षणाचे उद्दिष्ट्य आहे.

''डॉ. मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण आयोगाने महत्वाची शिफारस केली. संकल्पित शैक्षणिक पुनर्रचनेत जर कोणता बदल असेत तर तो शिक्षक, त्याचे वैयक्तिक गुण, त्याची शैक्षणिक पात्रता, त्याचे व्यवसायिक प्रशिक्षण आणि त्याचा शाळेतील व समाजातील दर्जा आणि तो दर्जा, ती पात्रता, ते व्यावसायिक शिक्षण शिक्षकाला प्राप्त करुन देण्याची जबाबदारी प्रशिक्षण संस्थांनी पाळली पाहिजे''-१

''कोठारी शिक्षण आयोगाच्या अहवालात यासंबंधी म्हटले आहे की, लाखो लोकांच्या शिक्षणात होणारी सुधारणा लक्षात घेतली तर शिक्षक-प्रशिक्षणात केलेली

१. न.रा.पारसणीस - ''शिक्षकांचे प्रशिक्षण''

(पुणे : नूतन प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९९३) पान क्र.१०

गुंतवणूक किफायतशीर ठरु शकेल. शिक्षणाच्या विकासात प्रथम दर्जाच्या शिक्षक-प्रशिक्षण संस्था महत्वाचे कार्य करु शकतील असाही विश्वास कोठारी शिक्षण आयोगाने प्रकट केला आहे " - २

भारतात माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाला शंभर वर्षे होवून गेली. नवनवीन आव्हानांना तोंड देण्याची विचार पद्धती, नवीन ज्ञान, वाढत्या गरजा, माहितीचे संकलन इ. ची दखल घेवून भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ या तिन्हीतून एकसंघ समाजनिर्मितीसाठी शिक्षक- प्रशिक्षणाची भूमिका बदलत आहे. बदलणाऱ्या परिस्थितीच्या परिणामांची जाणीव ठेवून सुयोग्य शिक्षक- प्रशिक्षण अभ्यासक्रम परिणामकारक रित्या राबवणे अगत्याचे आहे.

एकविसाव्या शतकाच्या आरंभी भारतीय समाजात लोकसंख्या वाढ, उत्पादन संरचना, दारिद्र्यरेषा, रोजगार संधी इ. समस्या भेडसावणाऱ्या आहेत या संदर्भात डॉ.एस्.आर. शुक्ल म्हणतात :

" एकविसाव्या शतकात व्यवसायिक शिक्षक - शिक्षणाचा सर्वेसर्वा निरीक्षक (Sole surveyor) होणार नाही. शिक्षकाने विद्यार्थ्यांमध्ये उपक्रमशीलता (Initiative), शोधक वृत्ती (Inventiveness), निर्णयशक्ती (Decision making) मानवी संबंध इत्यादीचा विकास करावयास पाहिजे. तांत्रिक ज्ञान देण्याचे कार्य Firm, Factory or office यांनी करावे, त्यामुळे शिक्षक तयार करण्याच्या कार्यक्रमावर मोठी जबाबदारी येवून पडली आहे जर शब्दाचे मुख्य कार्य गुणी शिक्षक तयार करावयाचे असेल तर शिक्षक तयार करण्याच्याकार्यक्रमाला अधिक महत्व प्राप्त होते." - ३

---

२. लीला पाटील, विश्वंभर कुलकर्णी- "आजचे शिक्षण आजच्या समस्या"
( पुणे: श्री विद्या प्रकाशन, द्वितीय आवृत्ती १९७४) पान क्र. १६३

३. न.रा. पारसनीस - "शिक्षकांचे प्रशिक्षण"
(पुणे: नूतन प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९३) पान क्र.१८

१९७३ साली भारत शासनाने राष्ट्रीय शिक्षण परिषद नेमली. शिक्षक-शिक्षणाच्या सुविधा वाढवून विकासित करण्याचे कार्य या परिषदेकडे सोपवण्यात आले. त्याचप्रमाणे यू.जी.सी, एन्.सी.ई. आर.टी व एन्.सी.टी.ई. या राष्ट्रीय संस्थांनी शिक्षकांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षक-शिक्षणाचा कार्यक्रम सुधारण्यासाठी अनेक परिषद भरविल्या व एन्.सी.ई.आर.टी. ने शिक्षक-प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाची रुपरेषा तयार केली त्याची तीन क्षेत्रे पुढील प्रमाणे

१) शिक्षणाचे तत्वज्ञान (भर २०%)

२) समाजलक्षी कार्य (भार २०%)

३) आशययुक्त पद्धतीमीमांसा, सराव अध्यापन संबंधित प्रत्यक्ष कार्य (भार ६०%)

शिक्षक-शिक्षणाच्या तात्विक व कृतियुक्त अंगात समतोल राखला तरच शिक्षक-शिक्षण परिणामकारक होईल. कारण तात्विक अंगामूळे शिक्षणाची सैध्दांतिक बैठक कळते व कृतियुक्त अंगामुळे अमूर्त सिद्धांताला मूर्त स्वरूप देता येते. सद्य परिस्थितीत महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाचे अवलोकन केल्यास वर सांगितलेल्या तीन गटाप्रमाणे अभ्यासक्रमाची मांडणी केलेली आहे.

शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रमात तात्विक भागाचे अधिष्ठान आणि अध्यापन कौशल्याच्या विकासाबरोबरच प्रशिक्षणार्थ्याला अभ्यासानुवर्ती, अभ्यासपूरक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे संघटन व सहभाग इ. घटकांविषयी जाणीव करुन देवून त्याचे प्रशिक्षण देणे क्रमप्राप्त आहे.

<u>एन्.सी.टी.ई.ने methodology of teacher Education या सदराखाली पूढील बाबी सूचविल्या.</u>

1) Institutional Planning

2) Organisation of theory courses

3) Self learning

4) Problem solving

5) Objective based instruction

6) Content analysis & methods

7) Working with the community

8) Organisation of (work shop) content cum methodology & proctice teaching including related practical work.

अध्यापनाची कला प्रशिक्षणाद्वारे संपादित करता येते. म्हणून प्रशिक्षणाद्वारे दर्जेदार शिक्षक घडवायचे असतील तर अभ्यासक्रम संपृक्त व सर्व उदिष्ट्चे पूर्ण करण्याच्या दृष्टीने समर्थ हवा म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रमात शिक्षणाचे तत्वज्ञान, शिक्षकांचे कार्य, मूल्यमापन, संख्याशास्त्र, शैक्षणिक नवीन विचार प्रवाह, शैक्षणिक तंत्रविज्ञान, नवनवीन अध्यापन तंत्रे यांची सैद्धांतिक माहिती यांचा समावेश आहे. याशिवाय अध्यापन कौशल्यप्राप्तीसाठी सूक्ष्मपाठ, शालेय सरावपाठ, सैद्धांतिक भागावर आधारित कार्य, आशययुक्त अध्यापन पद्धती कृतिसत्र, प्रवाह, अंतर्गत परीक्षा, मूल्यमापन कृतिसत्र, वार्षिक पाठ परीक्षा, समाजसेवा, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम इ. चा समावेश प्रात्यक्षिक कार्यात करण्यात आला आहे. अशा प्रकारे २० जून ते मार्च अखेरी नऊ महिन्याच्या कालखंडात हा अभ्यासक्रम पूर्ण करुन घेतला जातो. परंतू या कालावधीत प्रात्यक्षिक कार्यांचे नियोजन व कार्यवाही करताना

अनेक समस्या येतात.

संशोधक गेल्या पाच वर्षापासून शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित शिक्षणाशास्त्र महाविद्यालयात अध्यापनाचे काम करीत आहे. विद्यार्थी शिक्षकांचे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करुन घेताना अनेक समस्या आल्या म्हणून शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित इतर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राचार्य व प्राध्यापकांना प्रात्यक्षिक कार्याची कार्यवाही करताना कोणत्या समस्या येतात? त्या समस्येवर कोणत्या उपाययोजना करता येतील? याचा अभ्यास करंण्याची गरज वाटल्याने मुद्दाम या समस्येची निवड केली आहे.

## १.२ संशोधन अभ्यासाची गरज :

संशोधक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकलूज या विनाअनुदानित शिक्षणाशास्त्र महाविद्यालयात सन १९९३ ते १९९६ पर्यंत अध्यापन करीत होते. तसेच १९९६ पासून डी.पी.बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्यूकेशन, सोलापूर येथे अध्यापनाचे काम करीत आहेत. बी.एड्. चा अभ्यासक्रम एकाच शैक्षणिक वर्षाच्या कालावधीत पूर्ण करुन घ्यावा लागतो. अभ्यासक्रमातील सैद्धांतिक (तात्विक विषय) विषय व त्याच्याशी निगडीत प्रात्यक्षिके, प्रपाठ, आशययुक्त अध्यापन कृतिसत्र, मूल्यमापन कृतिसत्र, कार्यानुभव, समाजसेवा, सांस्कृतिक कार्यक्रम, शारीरिक शिक्षण, वार्षिक पाठ व प्रत्येक विद्यार्थी-शिक्षकाचे वीस सराव पाठ यांची कार्यवाही करण्यात अनेक समस्या असतात.

संशोधकाला अनुदानित व विनाअनुदानित शिक्षणयास्त्र महाविद्यालयात प्रात्यक्षिक कार्याची कार्यवाही करत असताना सरावपाठ, सूक्ष्म अध्यापन, आशययुक्त अध्यापन पद्धती, कृतिसत्र, मूल्यमापन कृतिसत्र इ. कार्यात विविध समस्या जाणवल्या म्हणून संशोधकाने शिक्षणशास्त्र महाविदयालयात प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीत येणाऱ्या समस्यांची माहिती करुन घेण्यासाठी सदरहु समस्येची निवड केली आहे.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची खालील प्रमाणे सामान्य उद्दिष्ट्ये आहेत.

१) बालकाच्या वाढीसाठी आणि विकासासाठी आवश्यक असणारी कौशल्ये, दृष्टीकोण, समजूतदार छात्राध्यापकाच्या अंगी बाणवणे.

२) माध्यमिक व उच्च माध्यमिक अभ्यासक्रमाच्या अंतर्गत छात्राध्यापकाने निवडलेल्या विषयांच्या अध्यापनासंबंधी आत्मविश्वास आणि अध्ययनविषयक तत्वे अंगिकारण्यास समर्थ करणे.

३) बालकाच्या वैयक्तिक आणि अभ्यासविषयक समस्या सोडविण्यास समर्थ करणे.

४) सामाजिक बदलाचे साधन म्हणून शाळेची आणि शिक्षकाची भूमिका समजून घेण्यास छात्राध्यापकास समर्थ करणे.

५) छात्राध्यापकास शालेय संचालनात आणि शालेय व्यवस्थापनात सहभागी होण्यास त्याचप्रमाणे अध्यापन साधने आणि शैक्षकि प्रकल्प राबवण्यास समर्थ करणे.

६) अभ्यासपूरक शालेय कार्यक्रम राबवण्यास आवश्यक कौशल्ये अंगी बाणवण्यास छात्राध्यापकास मदत करणे.

७) नवीन शैक्षणिक विचारांचा स्वीकार करण्याची वृत्ती विकसित करणे.

वरील उद्दिष्ट्ये साध्य होण्यासाठी बी.एड्. अभ्यासक्रमातील सैद्धांतिक विषय व त्यावर आधारित प्रात्यक्षिक कार्य यांचा समावेश केला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यसक्रमात १९९७-९८ पासून प्रात्यक्षिक कामाची गटामध्ये विभागणी केली आहे. प्रात्यक्षिक कामाचे पाच गट खालील प्रमाणे केले आहेत.

अ) महाविद्यालय कार्य :-

१) अध्यापन क्षमता १. सूक्ष्म अध्यपन - २० गूण

२. वर्ग अध्यापन - ८० गूण

२) पाच तात्विक पेपर्सशी संबंधित प्रात्यक्षिक - १०० गूण

३) १. आशययुक्त अध्यापन पद्धती कृतिसत्र - ८० गूण

२. अंतर्गत परीक्षा - २० गूण

४) समाजसेवा, विविध उपक्रमातील सहभाग, शैक्षणिक निबंध/प्रपाठ, शारीरिक शिक्षण, कार्यानुभव - १०० गूण

ब) प्रात्यक्षिक परीक्षा - १०० गूण

प्रत्येक गटात विद्यार्थी - शिक्षकांना कमीत कमी पन्नास गुण मिळाले तरच ते उत्तीर्ण होतील व प्रत्येक तात्विक विषयांचे प्रत्येकी एक प्रात्यक्षिक करावयाचे आहे. म्हणूनच बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक कार्याच्या स्वरुपातील बदलानुसार कार्यवाही करताना बी.एड्. महाविद्यालयाचे प्राचार्य, संबंधित प्रात्यक्षिक कार्याचे विभाग प्रमुख व प्राध्यापक यांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करण्याची गरज वाटल्याने संशोधकाने या समस्येची निवड केली आहे.

## १.३ संशोधन अभ्यासाचे महत्व :-

बी.एड्. अभ्यासक्रम शिक्षक व्यवसायात पदार्पण करणाऱ्यांना व्यवसायातील वाटचालीस सक्षम बनवण्याच्या दृष्टीकोनातून तयार केलेला आहे. विद्यार्थी शिक्षकांना अध्ययन-अध्यापन प्रक्रियेविषयक मर्मदृष्टी प्राप्त व्हावी यासाठी प्रात्यक्षिक आहे.

म्हणून बी.ए्. महाविद्यालयातील प्रात्यक्षिक कार्याचे नियोजन करणाऱ्या विभागप्रमुखांना सदरहू संशोधनाचा उपयोग होणार आहे. तसेच बी.एड्. प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीसाठी कामाच्या विभागणीबाबत शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राचार्यांना व प्राध्यापकांना सदरहू संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

१९७३ पासून देशातील शिक्षक-शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी एन्.सी.ई.आर.टी. कार्य करीत आहे. ही राष्ट्रीय शिक्षक-शिक्षण परिषद शिक्षक-शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी व शैक्षणिक समस्यांविषयी केंद्र व राज्य शासनाला सल्ला देण्याचे कार्य करते. सदर परिषदेने सर्व पातळीवर शिक्षक-शिक्षणाचा अभ्यासक्रम सुधारण्यासाठी आदर्श पाठ्यक्रमाची रुपरेषा आखली आहे. त्या आधारे राज्य शासन आपल्या राज्यातील शिक्षक-शिक्षणाचा अभ्यासक्रम सुधारण्यासाठी आदर्श पाठ्यक्रमाची रुपरेषा आखली आहे. त्या आधारे राज्य शासन आपल्या राज्यातील शिक्षक-शिक्षण अभ्यासक्रमात सुधारणा करतात. म्हणून बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीत येणाऱ्या अडचणींचा विचार करुन पुनर्रचित अभ्याक्रम तयार करण्यासाठी व प्रात्यक्षिक कार्यवाहीसाठी आवश्यक बदल करण्यासाठी विद्यापीठ, एन्.सी.ई.आर.टी., एन्.सी.टी.ई., एस्.सी.ई.आर.टी या संस्थांना संशोधनाचा उपयोग होईल.

अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये प्रात्यक्षिक कार्याची कार्यवाही करण्यासाठी लागणाऱ्या सुविधांची पूर्तता करण्यासाठी प्राचार्य व विना अनुदानित शिक्षणाशास्त्र महाविद्यालयात प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी व्यवस्थापक मंडळांना सदरहू संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

## १.४ संशोधन समस्येचे शीर्षक :-

"शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित बी.एड्. महाविद्यालयातील प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीत येणाऱ्या समस्यांचा अभ्यास"

" A study of the problems of B.ED. practical-work while implimenting in the colleges of Education affiliated to shivaji university"

## १.५ महत्वाच्या शब्दांच्या व्याख्या :-

अ) बी.एड्. महाविद्यालय - माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी आवश्यक प्रशिक्षंण देणारे महाविद्यालय.

ब) प्रात्यक्षिक कार्य - प्रशिक्षणाच्या काळात विद्यापीठाच्या नियमानुसार बी.एड्. भाग दोनचे सर्व प्रात्यक्षिक कार्य.

## १.६ संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

संशोधकाने या संशोधन समस्येची खालीलप्रमाणे उद्दिष्ट्ये निश्चित केलेली आहेत.

१) सराव पाठ व सूक्ष्म अध्यापन यांच्या कार्यवाहीत येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

२) तात्विक विषयांच्या प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीत येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

३) आशययुक्त अध्यापन पद्धती व अंतर्गत परीक्षा या संबंधी येणाऱ्या समस्यांचा

अभ्यास करणे.

४) समाज सेवा, कार्यानुभव, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रपाठ व शारीरिक शिक्षण यातील प्रात्यक्षिकाच्या संदर्भात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

५) वार्षिक पाठ परीक्षेच्या संदर्भात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

६) या समसयांवर उपाययोजना सूचविणे.

## १.७ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

**व्याप्ती :**

संशोधनात शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित बी.एड्. महाविद्यालयांना प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीत येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित आठ अनुदानित व सतरा विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राचार्य व सर्व प्राध्यापकांकडून या संदर्भात माहिती मिळवण्यात आली आहे.

सदरहू संशोधनात बी.एड्. प्रात्यक्षिक कार्याची कार्यवाही करताना प्राचार्य. संबंधित प्रात्यक्षिक कार्याचे विभाग प्रमुख व प्राध्यापकांना येणाऱ्या समस्यांचा विचार करण्यात आला आहे.

**मर्यादा :**

या संशोधनात बी.एड्. अभ्यासक्रमातील तात्विक विषयासंबंधी विचार केला जाणार नाही.

सदरहू संशोधनात फक्त शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित शिक्षणशास्त्र

महाविद्यालयांना प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीसंबंधी येणाऱ्या समस्यांचाच विचार करण्यात आला आहे. इतर विद्यापीठाच्या प्रात्यक्षिक कामाचा विचार करण्यात आला नाही. तसेच शिवाजी विद्यापीठा मार्फत सुट्टीतील बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना येणाऱ्या समस्यांचा विचार करण्यात आलेला नाही.

प्रकरण - दुसरे

# संबंधित साहित्याचे समीक्षण

## २.१ प्रास्ताविक :

संशोधकाने संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर विषय नेमक्या शब्दात लिहिण्याअगोदर त्या विषयाची सखोल माहिती संशोधकास असावी, त्या विषयाशी संबंधित सर्व बाबी माहित असावयास पाहिजेत. संशोधन विषावर प्रभूत्व प्राप्त केल्याशिवाय संशोधन प्रक्रिया सुरु करता येत नाही म्हणून संशोधकाने संबंधित साहित्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

" A summary of the writings of recognized authorities & a previous research, provides evidence that the researcher is familiar with what is already known & what is still unknown & untested. Further a survey of related literature helps the researcher with clues to the solution off the problem undertaken. Next the researcher may also be helped in reviewing the related literature to formulate the hypotheses get new ideas for procedure.

While going through the related literature, the investigator should make note of the following four important elements. 1) design of the study. 2) populations that were sampled. 3) variables that were defined & 4) recommendations for further research." -1

1. Usha Rao. (Conducting Educational Research Pune : Dastane Ramchandra & (O) Pun-30 First edition 1994) Page No.83

" संशोधकाने संशोधनासाठी जो विषय घेतला आहे त्या विशिष्ट विषयावर तत्पूर्वी संशोधन झालेले नसते, झाले असल्यास ते वेगळ्या परिस्थितीत, वेगळ्या काळात, वेगळ्या दृष्टिकोनातून झालेले असते. त्यामुळे संशोधकास त्या विषयाची माहिती अत्यंत व्यवस्थित हवी, परिपूर्ण हवी, इतकेच नव्हे तर इतरापेक्षा थोडी अधिक हवी. यासाठी संबंधित साहित्याचे परिशीलन करण्याची आवश्यकता आहे."-२

"संशोधकाने आपलया विषयाबाबतचे तत्वज्ञान, मानस शास्त्र, अध्यापनपद्धती, समाजशास्त्र या चार महत्वाच्या क्षेत्रातील ग्रंथाच्या अभ्यासाबरोबर संदर्भ पुस्तक, त्याचे मूलभूत अभ्यासक्रम, मूल्यमापन तंत्र याचाही अभ्यास संशोधकाने करावयास पाहिजे." ३

संशोधकाने सर्व प्रकारच्या साहित्याच्या समीक्षणास पूरक स्वत:चा अनुभवही जमेस धरावयास पाहिजेत. संबंधित साहित्याचा अभ्यास करतानासंशोधकाने योग्य उतारे किंवा उताऱ्यांच्या सारांशाची टिपणे करावयास पाहिजे.

संशोधकाने संशोधन करण्यापूर्वी समस्येची संबंधित साहित्य वाचले आहे त्यावर पुढील संशोधन प्रक्रिया आधारित असते. आपल्या संशोधनासाठी कोणते साहित्य आवश्यक आहे हे संशोधकाने ठरवावे. आपलया विषयाशी संबंधित सर्व साहित्य वाचावे, त्याचे मनन करावे व नोंदी करव्यात त्यामूळे संशोधन अहवाल लेखन करण्यास अडचणी येत नाहीत.

संबंधित साहित्याच्या अभ्यासाद्वारे संशोधन विषयाच्या संदर्भात जे महत्वपूर्ण

---

२. वि.रा. भिंताडे. "शैक्षणिक संशोधन पध्दती "
(पुणे: नूतन प्रकाशन, पुणे - ३० प्रथमावृत्ती १९८९) पान नं. ४०

३. भा.गो. बापट. "शैक्षणिक संशोधन "
(पुणे : नूतन प्रकाशन पुणे ३० द्वितीय आवृत्ती, १९७७) पान नं. १८७०

ज्ञान उपलब्ध आहे त्याचा सारांश घेवून त्या विषयातील उपलब्ध असणाऱ्या ज्ञानाचा आधार घेवून त्यापुढील ज्ञानाचा शोध लावणे किंवा उपलब्ध ज्ञानाचा नवीन परिस्थितीमध्ये बदललेला संदर्भ/अर्थ स्पष्ट करण्यासाठी संबंधित साहित्याचे समीक्षण आवश्यक आहे. असे महत्वपूर्ण ज्ञान, संशोधन विषयाच्या संबंधातील विविध संदर्भ ग्रंथ, लेख, पुस्तिका, नियतकालिके यामध्ये उपलब्ध असते. त्यातील योग्य घटकांचे वाचन, चिंतन, मनन व उपयोजन म्हणजेच संबंधित साहित्याचे समीक्षण होय.

वरील सर्व गोष्टीमूळे संशोधकाला संशोधनाच्या अभ्यासामध्ये संबंधित साहित्याचा अभ्यास करणे आवश्यक असते. संबंधित साहित्याचे महत्व लक्षात येवून संशोधकाने विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, कार्यपुस्तिका, अभ्यासक्रम पुस्तिकांमधून संशोधन समस्येला संदर्भ म्हणून सराव पाठ, सूक्ष्म अध्यापन, तात्विक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य, आशययुक्त अध्यापन पद्धती, अंतर्गत परीक्षा, समाजसेवा, कार्यानुभव, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रपाठ (शै. निबंध) शारीरिक शिक्षण, वार्षिक पाठ परीक्षा (प्रात्यक्षिक परीक्षा)इ. घटकांची माहिती पुढील प्रमाणे अभ्यासली आहे.

## २.२ सराव पाठ :-

शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात सराव पाठ ही एक आवश्यक व महत्वाची आहे. सराव पाठ ही संकल्पना प्रत्यक्ष अध्यापनाशी निगडीत आहे. ती विद्यार्थीच्या अध्ययनाशी परस्परपूरक व अत्यावश्यक बाब आहे. शिक्षकांना केवळ विषयाचे पुरेसे ज्ञान असून, भागणार नाही तर त्यासाठी शिकविण्याचा सराव असला पाहिजे म्हणून प्रत्यक्ष अध्यापनास महत्व आहे. विद्यार्थी शिक्षकात इष्ट अध्यापन वर्तने निर्माण करणे व त्यातून सक्षम शिक्षक घडविणे हा त्यामागील तात्विक हेतू आहे.

"सराव पाठ प्रशिक्षणामागील उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत:

१) वर्ग अध्ययन कार्यासाठी अपेक्षित अध्यापन पद्धती, तंत्रे, कलृप्त्या या विषयी माहिती मिळवण्यास मदत करणे.

२) पाठ नियोजन तत्वानुसार विविध पाठांचे नियोजन करण्यास मदत करणे.

३) अध्यापनाचा सराव देवून अध्यापन पद्धती आत्मसात करण्यास मदत करणे.

४) वास्तव परिस्थितीत अध्यापन कार्याची संधी देवून त्याी परिणामाकरकता आजमविण्यास मदत करणे " ४

प्रत्यक्ष अध्यापन परिणामकारक व पद्धतशीर करण्याविषयी मार्गदर्शन प्रशिक्षण महाविद्यालयात दिले जाते त्यानुसार विद्यार्थी-शिक्षक पाठाचे नियोजन म्हणजे पाठाची रुपरेषा दर्शविण्यासाठी पाठ टाचण तयार करतो. पाठ टाचण पाठ निरीक्षिकांकडून मान्य करुन ध्यावे लागते व पाठाच्या संमत नियोजनाप्रमाणे पाठ निरीक्षकाच्यादेखरेखीखाली पाठ शिकवावा लागतो. पाठाच्या अध्यापन चालू असताना पाठ निरीक्षिक निरीक्षणा वरुन पाठाच्या उल्लेखनीय बावी व उपचारात्मक बाबी त्यांचा आभिप्राय लिहितात. पाठ चालू असताना सहाध्यायीही पाठ निरीक्षण करतात. पाठ निरीक्षक पाठाच्या शेवटी वि क्षिपाठाद्वारे विद्यार्थी शिक्षकांना वर्गातील वातावरणात विविध अनुभव मिळतात. सराव पाठासाठी वेगवेगळ्या शाळा घेतल्या जातात.

शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार सराव पाठ प्रत्येक अध्यापन पद्धतीने दहा, याप्रमाणे वीस सराव पाठ घ्यावे लागतात त्यापैकी पहिले बारा (६+६) सूटे सराव पाठ घेतले जातात. सूटे सराव पाठ वेगवेगळ्या सराव शाळेत, पूर्ण केले जातात.

---

४- न.रा. पारसनीस - "शिक्षकांचे प्रशिक्षण"

(पूणे : नूतनप्रकाशन, पुणे - ३० प्रथमावृत्ती मार्च १९९३ पान नं. ९३

पाठाच्या मूल्यमापनासाठी पाठाचे निरीक्षण वस्तुनिष्ठ करुन वर्णनात्मक व उपचारात्मक शेरे दिले जातात.

विद्यार्थी शिक्षकांचे उरलेले आठ सराव पाठ (४+४) सलग सराव पाठ म्हणून घेतले जातात. सहकार्य करणाऱ्या सराव शाळेत सलग दोन आठवडे सलग सराव पाठ लावले जातात. विद्यार्थी शिक्षकास त्याच्या अध्यापनपद्धतीनुसार दोन्ही विषयाच्या प्रत्येकी चार तासिका एकाच वर्गावर रोज एक पाठ याप्रमाणे सलग पाठ घ्यावे लागतात. चारही पाठाची टाचणे एकत्रितरित्या काढली जातात व पाठानंतर मूल्यमापनासाठी दिलेले स्वाध्याय तपासले जातात.

सलग सराव पाठा सोबतच्च शालेय अनुभव कार्यक्रम राबविता येतो. अध्यापनाव्यतिरिक्त शाळेत चालणाऱ्या अन्य कार्यक्रमाचा छात्राध्यापकास अनुभव मिळावा हा हेतू असतो. शालेय अनुभव कार्यक्रमात अभ्यासानुवर्ती उपक्रम योजना वर्ग शिक्षक म्हणून करावयाच्या कामाचा अनुभव, प्रयोगशाळेत प्रयोग घेणे, वर्गव्यवस्थापन, विविध रजिस्टरे व नोंदपत्रकांची माहिती घेणे, गुणतक्ते भरणे, निकाल तयार करणे इ. कामाचा समावेश होतो.

सराव पाठ टाचणांची फाईल तयार करुन त्यात अध्यापन पद्धती विषयाची पक्की व कच्ची टाचणे लावली जातात. निरीक्षण नोंद तक्त्यांचा अवलंब करुन सराव पाठांचे मूल्यमापन केले जाते. निरीक्षण नोंदीतील घटकांना दिलेल्या पदनिश्चयन श्रेणीचा उपयोग करुन ८०पैकी गुण दिले जातात.

### २.३ सूक्ष्म अध्यापन :-

सूक्ष्म अध्यापन हे शिक्षक प्रशिक्षणाचे एक आधुनिक तंत्र आहे. अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठात १९६१ मध्ये प्रा. ॲलन व त्यांच्या सहकार्यांनी टीचिंग एड कार्यक्रमातून सुरुवात केली व १९६३ मध्ये हे तंत्र सूक्ष्म अध्यापन म्हणून ओळखले

जावू लागले.

"प्रा. ॲलन यांच्या मते, 'विशिष्ट अध्यापन वर्तनावर लक्ष केंद्रित करुन नियंत्रित वातावरणावर लक्ष केंद्रित करुन नियंत्रित वातावरणात केलेला अध्यापन सराव म्हणजे सूक्ष्म अध्यापन होय'

'Microteaching is a system of controlled practice that makes it possible to concentrate on specific teaching behaviour & to practice teaching under controlled conditions.

वेळ, वर्गाचा आकार, पाठाची लांबी आणि अध्यापनातील गुंतागुंत यांच्या संदर्भात छोट्या प्रमाणाचा अवलंब करणारा अध्यापन प्रसंग म्हणजे सूक्ष्म अध्यापन.

Microteaching is a scaled down teaching encounter in terms of time, class-size, lesson length & teaching complexilty" -M.C. Aleese & unwin'. 5

"सूक्ष्म अध्यापन ही शिक्षक प्रशिक्षणाची एक पद्धती आहे. तिचे उद्दिष्ट अध्यापनाची नवीन कौशल्ये विकसित करणे व जून्यांना अधिक सफाई व परिणाकारकता प्राप्त करुन देणे हे आहे यासाठी पाठाचा वेळ, वर्गाचा आकार (विद्यार्थी संख्या) आशयाची लांबी, अध्यापनाची गुंतागुंत याचे प्रमाण मर्यादित केले जाते. या पद्धतीत प्रशिक्षणार्थीला अध्यापन कौशल्ये सादर करण्याची व आपल्या वर्गवर्तनाचे पृथक्करण करण्याची संधी मिळते. या पृथक्करणातून मिळालेल्या मार्गदर्शनाच्या आधारे प्रशिक्षणार्थीला आपल्या वर्तनात अपेक्षित बदल करता येतो." - ६

५- सूक्ष्म अध्यापन - "संकल्पना सूक्ष्म अध्यापन"

(शिक्षणशास्त्र संस्था, पुणे प्रकाशन विभाग १९८१) पान नं. ५

६- वसंत देशपांडे व डॉ. सुमन करंदीकर - "सूक्ष्माध्यापन"

(पुणे: नूतन प्रकाशन, पुणे- ३० प्रथमावृत्ती १९८३) पान नं १४

## २.३.१"सूक्ष्म अध्यापनातील गृहीततत्वे:-

१) अध्यापन एक संकीर्ण स्परुपाचे कौशल्ये आहे. यांचे विश्लेषण करुन त्याचे रुपांतर अनेक विध उपकौशलयामध्ये करता येते.

२) सुकर व सुलभ वातावरणात एकेका अध्यापन कौशल्याचा सराव करुन त्यावर प्रभुत्व मिळविता येते.


३) एखाद्या अध्यापन कौशल्यावर प्रभुत्व संपादन करण्यासाठी प्रत्याभरण हे अयंत उपयुक्त ठरते.

४) एकेका अध्यापन कौशल्यावर प्रभुत्व मि ळवून नंतर त्यांचे एकात्मीकरण करता येते व त्याचा दैनंदिन अध्यापनात उपयोग होतो.

५) अध्यापन कौललयाचे प्रशिक्षण घेऊन नंतर हे समग्र कौशल्य प्रत्यक्ष अध्यापनात संक्रमित करता येते.

सूक्ष्माध्यापनाची ही सर्व गृहीततत्वे विचारात शेऊन भारतामध्ये पासी सिंग व जंजिरा यांनी भारतीय परिस्थितीला अनुसरुन सूक्ष्माध्यापनाचे प्रतिमान विकसित केले."-७

**सूक्ष्म अध्यापन चक्र :**




७. ह.ना. जगताप - "शैक्षणिक तंत्रज्ञान"

(पुणे : नूतन प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती - १५ जानेवारी १९८७) पान नं ११७

### २.३.२ सूक्ष्माध्यापन प्रशिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये :

१) छात्राध्यापकास महत्वाच्या सामान्य अध्यापन कौशल्य क्षमता साध्य करण्यास मदत करणे.

२) विविध अध्यापन कौशल्यांचे एकात्मीकरण करण्यास मदत करणे.

सूक्ष्माध्यापन प्रशिक्षण कार्यक्रम महाविद्यालयाच्या आरंभीच्या १५ दिवसाचे प्रत्येकी सहा तास राबवता येतो. सूक्ष्माध्यापनाचा संबोध, इतिहास, महत्व कार्यपद्धती, कौशल्यांचे वर्गीकरण यावर दोन व्याख्याने आयोजित करता येतात बी.एड्. अभ्यसक्रमात दिलेल्या ५ गटांपैकी शक्यतो एक याप्रमांणे ५ अध्यापन कौशल्यांची निवड करता येते. सूक्ष्म अध्यापनाच्या पूर्वावश्यक तात्विक भागात निवडलेल्या कौशल्यांचे घटक, पाठ नियोजन, पाठ निरीक्षण पद्धती इ. वर आधारित व्याख्याने दिल जातात. सूक्ष्मअध्यापनाच्या प्राथमिक कामासाठी विद्यार्थी शिक्षकांचे गट तयार केले जातात व प्रत्येक गटाचे प्रात्यक्षिक संबंधित गटाचे प्राध्यापक पूर्ण करुन घेतात. सूक्ष्म अध्यापनाचे पाठ अभिरुप परिस्थितीत घेतले जातात. एक विद्यार्थी शिक्षक सूक्ष्मपाठ घेत असताना पाठ निरीक्षक प्राध्यापक व दोन छात्राध्यापक पाठाचे निरीक्षण करतात एक छात्राध्यापक समय निरीक्षक असून उरलेले छात्रध्यापक विद्यार्थ्यांच्या भूमिकेचे पालन करतात. सूक्ष्म पाठ झालाकी निरीक्षक अचूक, नेमके व वस्तुनिष्ठ मते सांगतात, लक्षणीय चुकांची नोंद करतात. ज्या कौशल्याचा सराव करावयचा आहे त्यावर चर्चा होते. छात्राध्यापकास त्या-त्या कौशल्य संपादनातील अपेक्षित पातळी प्राप्त होण्यासाठी प्रत्याभरण दिले जाते नंतर पुनर्नियोजन, पुनर्अध्यापन होते. अश्या रितीने एका कौशल्याच्या प्रशिक्षणाचे सरावचक्र पूर्ण णाल्यावर दुसऱ्या पाठ कौशल्यांचाही सराव केला जातो.

विद्यार्थी - शिक्षकांचा प्रत्यक्ष सहभाग, कौशल्य संपादनासाठी प्रत्येक घटकाचा अधिकतम केलेला वापर, प्रयत्न, पाठटाचण व अहवाल यांचा विचार करुन २० पैकी

गुण दिले जातात.

## २.४ तात्विक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य :-

बी.एड्. अभ्यासक्रमात पाच सैद्धांतिक विषय समाविष्ट केलेले आहेत. त्यापैकी पहिले तीनविषय व पेपर चार विभाग १ शिक्षणातील विचारप्रवाह हे अनिवार्य असून पेपर चार विभाग २ आणि अध्यापन पद्धती हे वैकल्पिक विषय आहेत.

सैद्धांतिक विषयांशी निगडीत प्रात्यक्षिक कामाची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

१) छात्राध्यापकास प्रत्यक सैद्धांतिक विषयांशी निगडीत प्रात्यक्षिक कामाची तात्विक माहिती मिळविण्यास मदत करणे.

२) प्रत्येक सैद्धांतिक विषयांशी निगडीत प्रात्यक्षिक काम पूर्ण करण्यास मदत करणे.

या प्रात्यक्षिक कार्यासाठी ५० तासाचा कालावधी दिला जातो. सैद्धांतिक विषयाच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक घटकाशी संबंधित असून प्रत्येक प्रात्यक्षिकासाठी पूर्वावश्यक व तात्विक भाग शिकवावा लागतो. प्रत्येक पेपरशी संबंधित प्रात्यक्षिकांची यादी अभ्यासक्रमात दिलेली असते. त्यापैकी एक प्रात्यक्षिक विद्यार्थी शिक्षकांना करावे लागते. प्रात्यक्षिकाच्यास्वरुपानुसार विद्यार्थी शिक्षकांना मार्गदर्शन दिले जाते. पेपर क्र.१ साठी पाच प्रात्यक्षिकांची यादी अभ्यासक्रमात दिलेली आहे.

पेपर क्र. दोन साठी १० मानसशास्त्रीय प्रयोग करुन घेतले जातात. प्रयोग प्रात्यक्षिकांसाठी स्वतंत्र तासिकांची योजना केली जाते. काही मानसशास्त्रीय प्रयोग सामूहिक तर वैयक्तिक स्वरुपाचे प्रायोग गटवार घेतले जातात. मानसशास्त्रीय प्रयोगासाठी स्वतंत्र मानसशास्त्रीय प्रयोगशाळा आवश्यक असते. मानसशास्त्रीय प्रयोगशाळेत प्रयोग करण्यासाठी लागणारे साहित्य व फर्निचर पूरेसे असावे. विद्यार्थी शिक्षक मानसशास्त्रीय प्रयोगवहीत लिहितात यासाठी वीस गुण आहेत.

पेपर क्र. ३ साठी दहा प्रात्यक्षिकांची यादी दिलेली आहे प्रत्येक प्रात्यक्षिकाची कार्यपद्धती स्पष्ट करुनअहवालाची रुपरेषा विद्यार्थी-शिक्षकांना सांगितली जाते. विद्यार्थी-शिक्षक निवडलेलया प्रात्यक्षिकाच्या स्वरुपानुसार प्रात्यक्षिक शालेय अनुभव कार्यक्रमाच्या कालखंडात अथवा उपलब्ध वेळात पूर्ण करतात.

पेपरक्र. ४ च्या विभाग एक साठी प्रात्यक्षिक नाही परंतू विभाग२ मधील विविध ऐच्छिक पाठ्यक्रमासाठी विद्यार्थी- शिक्षकांना दिलेल्या प्रात्यक्षिक यादीतील एका प्रात्यक्षिकाची निवड करुन पूर्ण करावे लागते.

प्रत्येक सैद्धांतिक विषयाच्या प्रात्यक्षिकास वीस गूण द्यावयाचे असून एकूण १०० गुणांचे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करुन घेतले जाते. यासाठी अहवाल आवश्यक असतो.

## २.५ आशययुक्त अध्यापन पद्धती :-

शिक्षणक्षेत्रात अलिकडच्या काळात उदयास आलेली एकसंकल्पना म्हणजे आशययुक्त अध्यापन होय. आशययुक्त अध्यापन पद्धतीची संकल्पना नॅशनल कौन्सिल फॉर टिचर एज्युकेशनने (एन्.सी.टी.ई.) प्रथम १९७८ च्या शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या चौकटीत मांडली महाराष्ट्रतील अनेक विद्यापीठांनी आशययुक्त पद्धती चा अभ्यासक्रमामध्ये समावेश केलेला आहे. शिवाजी विद्यापीठातील बी.एड्. कॉलेजमध्ये १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून प्रात्यक्षिक कार्यामध्ये आशययुक्त अध्यापन कृतिसत्र घेतले जाते.

आशययुक्त अध्यापन पद्धतीची व्याख्या अशी करता येते ''विद्यार्थी वर्तनाचे निरीक्षणक्षम कौशल्यो परिभाषेत आशय आणि पद्धती यांचे अर्थपूर्णरित्या केलेले एकत्मिकरण.''

शिक्षक- प्रशिक्षणात अध्यापनाचा सखोल विचार केला जातो. विविध अध्यापनपद्धतीने पाठ्यवस्तूचे सादरीकरण करण्यासाठी विशिष्ट क्रम, हर्बार्टची पंचपदी म्हणून ओळखण्यात आली. परंतू यामूळे आशय व त्याचे स्वरूप कसेही असले तरी आशयापेक्षा पद्धतीला अवास्तव महत्व प्राप्त झाले. म्हणून आशय व अध्यापन यांचा स्वतंत्रपणे विचार न करता संयुक्त व एकात्मिक विचार करणे आवश्यक ठरते.

## २.५.१ आशययुक्त अध्यापन पद्धती-महत्व

" विषयज्ञान व अध्यापन पद्धती हे अध्यापन प्रक्रियेचे दोन महत्वाचे घटक आहेत. शिक्षक प्रशिक्षणाच्य सुरुवातीच्या काळात विषयज्ञानावरील प्रभुत्व या घटकाला महत्व दिले पुढील काळात अध्यापनशास्त्राचा जसजसा विकास होत गेला तसतसे त्या पद्धतीमध्ये प्रशिक्षण देणे या घटकाला महत्व प्राप्त होत गेले. शालेय स्तरावरती शिकवण्यासाठी आवश्यक असणारे विषयज्ञान छात्रअध्यापकाने पदवीपर्यंत च्या शिक्षणातून प्राप्त केलेले असते परिणामी सेवापूर्व प्रशिक्षणात अध्यापन पद्धतीला अधिक महत्व दिले गेले " ८

## २.५.२ आशययुक्त अध्यापन पद्धतीची उद्दिष्ट्चे :

१) विशेष अध्यापन पद्धतीसाठी घेतलेल्या विषयाच्या अभ्यासक्रमाविषयी व त्याच्या विश्लेषणाविषयी परिचय देणे.

२) पाठ्यक्रमातील आशय, पाठ्यपुस्तकातील आशय यातील संबंध जागृत करणे.

३) पाठ्यपुस्तकातील आशय विशलेषण पद्धतीविषयी जागृत करणे, आशय विश्लेषण करणे.

---

८ भा. रा. जाधव (शिक्षण शिक्षणातील एक नवीन विचार प्रवाह - आशयुक्त अध्यापन पद्धती. भारतीय शिक्षण, फेब्रुवारी) पान नं. ५३

४) काही संबोधांच्या आधारे वरच्या वर्गात झालेली पुनरावृत्ती, त्यांचे आंतरसंबंध, तत्वे व उत्पत्ती या रीतीने असलेले पद्धतशीर व्यवस्थापन लक्षात आणून देणे व शोधण्याच्या कामी प्रवृत्त करणे.

५) प्रत्येक वर्गाच्या भिन्न अध्ययन गरजाविषयी परिचित करणे एक संबोध त्याच वर्गात तसेच भिन्न वर्गात शिकविताना विभिन्न अध्यापन पद्धतींची गरज आहे हे जाणण्यास मदत करणे.

६) आशय व अध्यापनपद्धत यांचे सहेतूक एकात्मीककरण करण्याच्या तत्वाचे आचरण व निरीक्षणक्षम अध्यापन कौशल्ये विकसित करण्यास मदत करणे.

७) शालेय स्तरावर शिकविल्या जाणाऱ्या संबोधांचे खोलवर आकलन करण्यास मदत करणे'' - ९

<u>आशययुक्त अध्यापनाचे घटक पुढील प्रमाणे आहेत.</u>

१) विषय संरचना

२) अभ्यासक्रम विश्लेषण

३) अभ्यासक्रमानुसार पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तकाचे चिकित्सक परीक्षण.

४) घटकाचे विश्लेषण करणे

५) आशय विश्लेषण करणे

६) आशय विश्लेषण व अध्यापनाची सांगड घालणे - संबोध आशय निवड

७) समर्पक अध्यापन पद्धतीची निवड करणे

---

९ कित्ता - पान नं. ५४

८) पाठ नियोजन व प्रत्यक्ष पाठ घेणे.

आशययुक्त अध्यापन पद्धतीनुसार पाठ निवडलेला आशय अथवा संबोधाविषयी करुन प्रत्यक्ष अध्यापनाचा सराव समवयस्क गटावर अभिरुप परिस्थितीत करावयाचा असतो. गटामध्ये अध्यापनाचा सराव करताना विविध अध्यापन पदध्तीने एकच आशय शिकवून त्याची परिणामकारकता अजमावता येते. तसेच सरावपाठानंतर शेवटी चर्चा व त्यातून प्रत्याभरण दिले जाते. यामूळे विद्यार्थी शिक्षकांना आशय व पद्धतीतील अतूट संबंध समजतो. संबंधित विषयाची संरचना समजावून घेताना विषयाची व्याप्ती कळते. अभ्यासक्रम, पाठ्यक्रमातील फरक कळतो. संबोध, संकल्पना, नियम, तत्व, सिद्धांत चे विश्लेषण करता येते. व परिणामकारक अध्यापनासाठी संबोधानुसार योग्य अध्यापन पद्धतीचा अवलंब करण्यास विद्यार्थी शिक्षकाला मदत होते. तसेच विद्यार्थी शिक्षकाची आशय चाचणी घेवून आशयावरील प्रभुत्व समजण्यास मदत होते.

## २.६ अंतर्गत परीक्षा :-

बी.एड्. भाग-२ च्या अभ्यासक्रमात अंतर्गत परीक्षेचाही समावेश केला आहे.

### अंतर्गत परीक्षेची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

१) छात्राध्यापकाने बी.एड्. अभ्यासक्रमातील सैद्धांतिक विषयात प्राप्त केलेले प्राविण्य मोजणे.

२) छात्राध्यापकास वार्षिक लेखी परीक्षेच्या दृष्टीने लेखनाची सवय लावणे.

३) छात्राध्यापकांतील विशेष प्राविण्य असलेल्या छात्राध्यापकांचा शोध घेणे.

यासाठी तीस तासांचा कालावधी असून प्रथम सत्र समाप्तीपूर्वी ५ दिवस योग्य कालखंड आहे.

प्रत्येक विषयाच्या परीक्षा घटकांची यादी काचपेटीत १५ दिवस अगोदरलावली जाते व शिकलेल्या घटकांवर आधारित प्रश्नपत्रिका तयार केली जाते प्रत्येक पेपरसाठी प्रत्येकी ६० गुणांची परीक्षा असून त्यासाठी दोन तासांचा कालावधी द्यावा.

उत्तर पत्रिका तपासून त्यावर चर्चा केली जाते. एकूण ३०० गुणांची अंतर्गत परीक्षा घेवून छात्राध्यापकाने मिळवलेल्या गुणांवरुन २० पैकी गुण काढले जातात.

## २.७ समाजसेवा :-

''समाज म्हणजे विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या लोकांचा समुदाय होय'' विशिष्ट हेतूंनी किंवा उद्देशाने एकत्र आलेल्या व्यक्ती समुहाला समाज म्हणतात. स्वार्थविरहीत किंवा मनात कोणतीही इच्छा न बाळगता लोकांनी सेवा केली असता आपण त्यास समाजसेवा म्हणतो.

समाजामध्ये व्यक्तीने आपुलकीने, उत्साहाने, निरपेक्ष भावनेने समाजाच्या गरजेनुसार केलेले कार्य म्हणजे समाजसेवा होय.

भारतीय राज्यघटनेनुसार धर्मनिरपेक्ष, समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी सहकार्याचे महत्व पटलेले, श्रमाची कदर करणारे, काम करण्याची तयारी असलेले तरुण निर्माण करणे ही समाजाची गरज आहे म्हणूनच बी.एड्. अभ्यासक्रमात समाजसेवा या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

### २.७.१ उद्दिष्ट्ये : छात्राध्यापकास

१) समाजासमवेत काम/समाजसेवा यासंबंधाचे आकलनहोण्यास मदत करणे.

२) 'समाज' ही संकल्पना व समाजाचे, समाजातील संस्थांचे समाजविकासातील

योगदानयाविषयीचे ज्ञान मिळविण्यास मदत करणे.

३) समाजविकासासाठी असणाऱ्या विविध कार्यक्रमांचा व सेवांचा परिचय करुन देणे.

४) समाज व शैक्षणिक संस्था यातील आंतरक्रियेची गरज आकलन करण्यास मदत करणे.

५) समाजविकासातील समाजासमवेत काम करण्याची प्रेरणा निर्माण करणे.

६) श्रमप्रतिष्ठा, समाजिक बांधिलकी, सहकार्य, सहानुभूती या विषयीचे महत्व समजण्यास मदत करणे व अशा गुणांचा विकास करणे.

७) समाजाचा घटक म्हणून शिक्षकाने पार पाडावयाची जबाबदारी व भूमिका अवगत होण्यास मदत करणे.

८) सामाजिक समस्यांचे आकलनहोण्यास व त्या सोडविताना शिक्षकाचे करावयाच्या कार्यांचे आकलनहोण्यास मदत करणे.

९) राष्ट्रीय उभारणी व राष्ट्रीय विकासाच्या कार्यक्रमात सहभागी होण्यास मदत करणे.

समाजसेवा प्रात्यक्षिक कार्याची सुरुवात करण्यापूर्वी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमातील आवश्यक माहिती ५ व्याख्यानाद्वारे दिली जाते. समाजसेवा प्रात्यक्षिकाचे नियोजनकेले जाते. या कार्यक्रमाचे नियोजनमहाविद्यालयीनस्तर, शालेय स्तर,सामाजिक स्तरावरकरता येते.

शालेय स्तरावतील समाजसेवांतर्गत कामे शालेय अनुभव कार्यक्रमाचे वेळी करता येते. महाविद्यालयीन स्तरावर परिसर सफाई, श्रमदान, वृक्षसंवर्धन, भित्तीपत्रके इ, कामे महाविद्यालयातच वेळोवेळी करता येतात. सामाजिक स्तरावर समाजसेवा

करण्यासाठी शिबीराची योजना केली जाते.

समाजसेवेविषयी अहवाल लेखन लिहून घेतला जातो समाजसेवा प्रात्यक्षिकासाठी २० गूण आहेत, यासाठी विद्यार्थी शिक्षकांचे गट तयार करुन कामाची विभागणी केली जाते व वर्षभर सातत्याने समाजसेवांतर्गत विविध उपक्रम राबवले जातात.

## २.७.२ कार्यानुभव :-

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ कार्यानुभव संकल्पनेचा पुनरूच्चार केला. विद्यार्थ्याची अभिरुची, क्षमता आणि गरजा यांच्याशी सुसंगत ज्ञानआणि कौशल्य यांचा स्तर शिक्षणाच्या टप्प्यानुसार उंचावलेला असेल अशा उपक्रमांचा समावेश करुन हा अनुभव त्याच्या व्यवसायिक क्षेत्रात प्रवेश करताना सहाय्यभूत ठरावा म्हणून कार्यानुभव विषय अभ्यासक्रमात अंतर्भूत आहे. व्यवसाय पूर्व उद्‌बोधन, समस्या सोडविण्याच्या पद्धतीचा वापर, हत्यारे, कच्चामाल, आवश्यक उपकरणे यांची ओळख आणि उपयोग वैज्ञानिक पद्धतीनेकरण्यास पात्र करणे, निरीक्षण, कुशल व्यवस्थापन व कार्याचा सराव करण्यासाठी कार्यानुभवाचे प्रात्यक्षिक घेतले जाते.

कार्यानुभवाकडे सहेतुक, अर्थपूर्ण आणि हाताने करावयाचे काम या दृष्टीने पाहिले जावे. त्याचे संघटन अध्ययन प्रक्रियेचा एकात्मिक घटक म्हणून व्हावे आणि त्याची परिणती माल किंवा समाजोपयोगी सेवांमध्ये व्हावी, त्याचा विचार शिक्षणाच्या सर्व टप्प्यांवरील आवश्यक घटक म्हणून व्हावा आणि त्याची तरतूद चांगली संरचना आणि श्रेणीबद्ध कार्यक्रमातून व्हावी. म्हणून बी.एड्. च्या अभ्यासक्रमातही कार्यानुभव प्रात्यक्षिकाचासमावेश केला आहे.

कार्यानुभव हा विषय असा आहे की ज्यात शाळेतील प्रत्येक शिक्षक सहभागी होवून शकतो. प्रत्येक विषय शिक्षक स्वत:च्या विषयात कार्यानुभावातील उपक्रमांचा विचार आणि नियोजन करु शकतो.

२.७.३ "कार्यानुभव प्रात्यक्षिकाची उद्दिष्ट्ये :- छात्राध्यापकास

१) कार्यानुभव संबोधाचे आकलनहोण्यास मदत करणे

२) कार्यानुभवाच्या विविध क्षेत्राशी, साधनांशी व प्रक्रियांशी परिचित करणे.

३) कार्यानुभवाचा अनुभव मिळेल अशा कार्यक्रमांची योजना करणे.

४) कार्यानुभव कौशल्ये प्राप्त करण्यास मदत करणे.

५) कार्यानुभव कृती द्वारे आवड आणि कल निर्माण होण्यास मदत करणे.

६) सहजसाध्य व टाकाऊ वस्तूंचा उपयोग करुन निर्मितीक्षमता निर्माण करण्यास मदत करणे.

७) विविध क्षेत्रातील कामगारांबद्दल उदार दृष्टीकोन प्राप्त होण्यास मदत करणे.

८) शाळांमधून कार्यानुभव कार्यक्रम आयोजित करण्यास मदत करणे" -१०

म्हणून कार्यानुभव हे हेतुपूर्ण आणि अर्थपूर्ण श्रममूलक कार्य आहे याद्वारे कार्यस्थितीचे निरीक्षण आणि समस्यांची निश्चिती करता येते. कार्यघटनेत सहभाग आणि टाकाऊ साहित्यातून उपयुक्त/सुंदर वस्तु तयार करणे. इ. कार्यानुभव विषयातील उपक्रमातून साध्य करता येते. यातून विद्यार्थ्यात विधायक वर्तन बदला बरोबर उपयोगी कारक कौशल्ये विकसित करणे हा विषयाचा उद्देश आहे. सांघिक कार्याचा विधायक दृष्टिकोन, आत्मनिर्भरता, श्रमनिष्ठा, सहनशीलता, सहकार्य इ. समाजोपयोगी सामाजिक मूल्ये यातून रुजविता येतात.

---

10- B.Ed. course ordinances, regulations, syllabi & list of books prescribed, published by shivaji university kolhapur. Page No 125.

बी.एड्. महाविद्यालयाच्या सोयीने एक आठवड्याच्या कालावधीत हे प्रात्यक्षिक पूर्ण करता येते यासाठी १० तासाचा कालावधी वापरता येतो. कार्यानुभवाची तात्विक माहिती देण्यासाठी किमान पाच व्याख्याने आयोजित करावीत व विद्यार्थी-शिक्षकांकडूनगटवारप्रात्यक्षिक करुन घेता येते. कार्यानुभवांतर्गत अभ्यासक्रमात दिलेल्या उपक्रमांपैकी एक उपक्रम पूर्ण करुन घेतल जाते व वीस पैकी गूण दिले जातात.

## २.८ संस्कृतिक कार्यक्रम संघटन :-

प्राचीन काळापासूनच सर्व संस्कृतीमधून शिक्षण पद्धतीत सहशालेय/ सांस्कृतिक उपक्रमांचा समावेश केलेला दिसून येतो.

प्रसिद्ध तत्ववेते प्लेटो म्हणतात - States are made not from rocks & trees but from the characters of their citizens, म्हणजेच character training वर भर देणे आवश्यक आहे आणि ते सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारेच ते शक्य आहे. ॲरिस्टॉटलच्या मते - The end of the state is not mere life, it is rather good quality of life. आणि उत्तम दर्जाचे जीवन या सांस्कृतिक कार्यक्रमातून देता येते. रुसोच्या Emile ग्रंथात रुसोनी असे म्हटले आहे की To live is the trade I want to teach him. या उक्तीमधून जगणे, शिकविणे हेच शिक्षणाचे ध्येय आहे 'जगायला शिकणे' हे या अभ्यासानुवर्ती कार्यक्रमातूनशिकायला मिळते. रुसो पूढे म्हणतात The object of education is not to give him knolwledge but the taste & capacity for acquiring it ही अभिरुची निर्माण करणे या कार्यक्रमातून सहज साध्य आहे. White Lead च्या मते Art has an immense potency for the fertilization of the soul कलाशिक्षणातून आत्म्याच्या उन्नती शक्य आहे.

सांस्कृतिक/सहशालेय कार्यक्रमांना अत्यंत महत्वाचे स्थान देणारा महान शैक्षणिक

शिक्षणतज्ञ जॉन ड्यूईच्या शिक्षणाच्या व्याख्येतच या उपक्रमाचे महत्व अभिप्रेत आहे. Education is not preparation for life, but life it self.

All education proceeds by the participation of the individual in the social consciocusness of the race आणि म्हणून मानवी समूहामध्ये विविध प्रकारे व्यक्ती सामील होणे, सहभागी होणे महत्वाचे आहे आणि हे सहशालेय उपक्रमातून शक्य आहे. विवेकानंदाच्या शिक्षणाच्या व्याख्येतील 'Manifestation of perfection already in man' हा भाग हेच सूचित करतो की 'पूर्णत्वाचा अविष्किार' करणे हेच शिक्षणाचे ध्येय आहे आणि अशा अविष्कारासाठी संधी देणे म्हणजेच हे उपक्रम आयोजित करणे.

रसेल या थोर विचारवंताच्या मते Education aims at the broad cultivation of the mind मग या मनाच्या मशागतीसाठी, जडणघडणीसाठी सांस्कृतिक उपक्रम प्रभावी ठरतात.

रविंद्रनाथ टागोरांच्या मते - "Senses are the gateways of knowledge" म्हणजेच ज्ञानेंद्रियाचा विकास म्हणजे शिक्षण ही सर्व ज्ञानेंद्रिये संवेदनशील बनविण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आवश्यकच आहे"- ११

सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे व्यक्तीच्या अंगी नेतृत्वगुण, समायोजन, सहकार्य वृत्ती, नियोजनबद्धता, सभाधीटपणा, सांघिक वृत्ती, जबाबदारपणा, सौंदर्यदृष्टी, समाजभिमुखता, आयोजन कौशल्य, नागरिकत्व, स्वयंशिस्त, आत्मविश्वास हे गुण बाणविले जातात.

---

११ बी.एम्. हिर्डेकर - शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम बी.एड्. प्रात्यक्षिक कामकाज उद्बोधन (कोल्हापूर - शिक्षणशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९९७) पान नं. ६०

"The International Dictionary of Education (1977) या शब्दकोशात सांस्कृतिक कार्यक्रम/सहशालेय उपक्रमांची व्याख्या केलेली आहे शाळेने अथवा महाविद्यालयाने आयोजित केलेल्या / मान्य केलेल्या पण अभ्यासक्रमाचा भाग नसलेल्या पण शैक्षणिक संस्थेच्या जीवनाशी अविभाज्यपणे निगडीत असलेल्या सर्व उपक्रमांना सहशालेय कार्यक्रम म्हणून संबोधले जाते"- १२

२.८.१ सांस्कृतिक कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये :-

१) छात्राध्यापकाच्या सुप्त कलागुणांचा विकास होण्यास संधी मिळवून देणे.

२) छात्राध्यापकात समायोजन, नियोजनबद्धता, सहकार्यवृत्ती समाधीटपणा, सांघिक वृत्ती, जबाबदारीची जाणीव इ. गुणांचा परिपोष करणे.

३) छात्राध्यापकाच्या नेतृत्व गुणांचा विकास करणे.

४) छात्राध्यापकात सौंदर्य दृष्टीची जोपासना करणे.

५) छात्राध्यापकास विविध उपक्रमांचे व त्याच्या आयोजन पद्धतीचे ज्ञान मिळविण्यास मदत करणे.

६) छात्राध्यापकात उपक्रम आयोजन कौशल्य निर्माण करणे

७) छात्राध्यापकास काही उपक्रमात सहभागी होण्याचा अनुभव मिळवून देणे.

बी.एड्. महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत वर्षभर उपक्रम घेतले जातात. या प्रात्यक्षिकाचे काम सातत्याने होणारे उपक्रम, प्रासंगिक उपक्रम, गटवार उपक्रम स्पर्धा, स्नेहसंमेलन अशा पातळीवर आयोजित केले जातात. कुलपद्धतीचा

---

१२ कित्ता - पान नं. ६१

अवलंब करुनही उपक्रमांची विभागणी कुलांमध्ये करता येते. प्रासंगिक उपक्रमात विविध सण, उत्सव, विशेष दिनसाजरे करणे, परिसंवाद, चर्चा, वादविवाद आयोजित करणे. गटवार उपक्रमात प्रदर्शन, विविध मंडळाचे उपक्रम, विविध स्थळांना भेटी सांस्कृतिक कार्यक्रम, भित्तिपत्रिका इ. गोष्टीचा समावेश करतो येतो. स्पर्धा विषयक उपक्रमात वक्तृत्व, निबंधलेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, हस्ताक्षर, चित्रकला, गायन, अभिनय, नाटक, एकांकिका, पथनाट्य इ. सांधिक स्पर्धा ही आयोजित करता यतात. छात्राध्यपकाने वर्षभरातील उपक्रम सहभागी च्या वेळोवेळी नोंद ठेवून वीस पैकी गूण दिले जातात.

## २.९ प्रपाठ / शै. निबंध :-

बी.एड्. भाग - २ प्रात्यक्षिक कार्यात प्रपाठ लेखनाचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याची उद्दिष्ट्ये पूढील प्रमाणे

१) छात्राध्यापकास सतत अभ्यासाची संवय लावणे.

२) छात्राध्यापकास वार्षिक परीक्षेच्या दृष्टीने लेखनाची सवय लावणे.

३) छात्राध्यापकाने शिकविलेल्या भागापैकीकिती आत्मसात केले याचा शोध घेणे.

४) छात्राध्यापकास स्वयंमूल्यमापनाची सवय लावणे.

अभ्यासक्रमातील जे घटक पूर्ण शिकवून झाले असतील त्यावर आधारित प्रपाठ घेतायेतात यासाठी ३० तास म्हणजे प्रत्येकी तीन तास प्रत्येक सैद्धांतिक पेपरच्या प्रत्येक विभागास देता येतात. प्रत्येक पेपरसाठी दोन याप्रमाणे एकूण १० प्रपाठ छात्राध्यापकाकडून परीक्षा पद्धती वातावरणात पूर्ण करुन घेतले जातात. ज्या घटकांवरप्रपाठ द्यावयाचा तो घटक शिकवल्यानंतरप्राध्यापक छात्राध्यापकांनी तीनही

प्रश्नांची उत्तरे लिहूनप्राध्यापकांना दाखवावी व त्यात सुधारणा करुन घ्याव्यात. प्रपाठ लिहिण्याचा दिवस निश्चित करुन त्या दिवशी लिहून घेतले जाते. प्रपाठ तपासून छात्राध्यापकांना परत केले जातात. चांगल्या व निकृष्ट उत्तरावर चर्चा करुन विद्यार्थी शिक्षकांना प्रत्याभरण दिले जाते.

प्रत्येक विषयाच्या प्रत्येक विभागास एक प्रपाठ असून प्रत्येक प्रपाठ वीस गूणांपैकी घेतला जातो. सर्व प्रपाठाच्या एकूण २०० गुणांपेकी मिळालेल्या गुणांवरुन २० पैकी गूण दिले जातात.

## २.१० शारीरिक शिक्षण :-

मा. शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना तात्विक विषयाबरोबरच शारीरिक शिक्षण, समाजसेवा व कार्यानुभव विषय भावनिक व कौशल्यात्मक क्षेत्रातील विकास घडविण्यासाठी अनिवार्य करण्यात आले आहेत. शारीरिक व मानसिक विकास योग्य रीतीने झाल्याशिवाय सर्वांगिण विकास होणे शक्य नाही म्हणून शारीरिक विकासासाठी शारीरिक शिक्षण दिले जाते. नैसर्गिक विकासक्रमाप्रमाणे शरीराची वाढ व विकास होतात व नंतर बुद्धीविकास होतो. शरीराच्या वाढीसाठी शिस्तबद्ध कवायत, व्यायात, आसने, सामुदायिक खेळ यांना शिक्षणात स्थान दिले आहे. सामुदायिक खेळ व क्रीडा यांतून व्यायामाबरोबरच मनोरंजनही होते तसेच नागरिकत्वाचे व चारित्र्याचेही संवर्धन होते.

''चार्लस ए बुचन या विचारवंताने शारीरिक शिक्षणाचे स्परुप पुढील प्रमाणे वर्णिले आहे.

समग्र शैक्षणिक प्रक्रियेचे शारीरिक शिक्षण हे अविभाज्य अंग आहे. व्यक्तीचा शारीरिक, बौद्धिक, भावनिक व सामाजिक विकास साधून तिला समर्थ नागरिक बनविणे हे शारीरिक शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. शारीरिक हालचालीच्या माध्यामातून हे

उद्दिष्ट साधावयाचे असते. या हालचालींची निवड त्याच दृष्टिकोणातून केलेली असते''-१३

भारतात १९३७ सालापासून शारीरिक शिक्षणाबाबतची परिस्थिती हळूहळू सुधारु लागली. महाराष्ट्रातही शारीरिक शिक्षण व मनोरंजन यासाठी शिक्षण संचालनालयात स्वतंत्र संचालकाची जागा निर्माण करण्यात आली आहे. इ. १ ली पासून ते इ. १० वी पर्यंत शारीरिक शिक्षण ा सक्तीचा विषय झाला आहे.

२.१०.१ '' <u>शारीरिक शिक्षणाची राष्ट्रीय उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे</u> :

१) प्रत्येक तरुणात शारीरिक कार्यक्षमता कणखरपणा, धैर्य, साशिकपणा, शिस्त व राष्ट्रीय वृत्ती या गुणांचा विकास होवून तो शरीराने सुदृढ व राष्ट्ररक्षणास समर्थ व्हावा.

२) प्रत्येक तरुणात लोकशाही मूल्यांबद्दल वजीवनपद्धतीबद्दल आस्था निर्माण व्हावी व राष्ट्रभक्तीचे महत्व त्यास कळावे-'' १४

शारीरिक शिक्षणाचे आरोग्यसंवर्धन व शरीर संवर्धन असे दोन भाग पडतात. शरीर विकासाबरोबरच शीलविकास व मनोविकास होतो हे लक्षात ठेवून शारीरिक विकासाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच बी.एड्. अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षण या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. वर्षभरात सातत्याने विद्यार्थी शिक्षकांचा विविध खेळात सहभाग आवश्यक आहे. विद्यार्थी शिक्षकांनी शारीरिक शिक्षणाची पुस्तिका (Journal) स्वतंत्र करुन त्यात कबड्डी, खो-खो, बॅडमिंटन, टेनिकॉट, व्हॉली बॉल या खेळांसाठी आवश्यक मैदान मोजमापासहीत (Lqy out of

---

१३ ज.वि. अकोलकर व ना.वि. पाटणकर- <u>''शालेय व्यवस्था व प्रशासन''</u>
(पुणे: नीलकंठ प्रकाशन पुणे तृतीय आवृत्ती १९७३) पान नं. ३४४

१४ कित्ता - पान नं. ३४५

play grounds) याची नोंद करावी तसेच खेळांचे नियमही लिहावेत.

शारीरिक क्षमता चाचणीसाठी स्त्री व पुरुष विद्यार्थ्यी शिक्षकांना दिलेल्या सात प्रकारांपैकी पाच खेळ प्रकार निवडावे ागतात व २० गुणापैकी गूण देवून मूल्यमापन केले जाते.

## २.११ वार्षिक पाठ परीक्षा (प्रात्यक्षिक परीक्षा) :-

''बी.एड्. अभ्यासक्रमात वार्षिक पाठ परीक्षा (प्रात्यक्षिक परीक्षा) याचा समावेश करण्यात आला आहे त्याची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत -

१) छात्राध्यापकांनी केलेल्या प्रत्येक विषयातील व अनुषांगिक प्रात्यक्षिक कार्यांचे मूल्यमापन करणे.

२) छात्रध्यापकांच्या अध्यापन क्षमतेचे साकारिक मूल्यमापन करणे.

३) छात्राध्यापकाची बी.एड्. भाग २ मधील गुणवत्ता ठरवून त्यास दर्जा देणे'' - १५

यासाठी ३६ तासाचा कालावधी आवश्यक आहे. वार्षिक पाठ परीक्षेसाठी कमीत कमी तीनसराव पाठशाळा, सराव पाठशाळेतील आठ शिक्षक, बाह्य परीक्षक म्हणून महाविद्यालयातील आठ शिक्षक प्रशिक्षक अंतर्गत परीक्षक म्हणून आवश्यक असतात. प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन दोन टप्प्यात केले जाते. पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या प्रात्यक्षिक कार्यांचे मूल्यमापन व दुसऱ्या टप्प्यात वार्षिक पाठाचा समावेश असतो.

---

१५- B.Ed course ordinances, regulations syllabi & list of books prescribed, pubushed by shivaji university, Kolhapur. Page No.-

बाह्य परीक्षक म्हणून गुणवत्ता व पात्रता असणाऱ्या व्यक्तीची निवड करुन त्यांना नेमणूक पत्र देवून त्याची प्रत विद्यापीठाकडे पाठवली जाते.

छात्रशिक्षकांनी वर्षभर केलेल्या प्रात्यक्षिक कामाचे मूल्यमापन करण्यासाठी एक दिवस देण्यात येतो त्या दिवशी मुलाखती व तोंडी परीक्षा घेतल्या जातात. ज्याशाळेत जया विद्यार्थी-शिक्षकाचे पाठ ज्या परीक्षकांनी पाहावयाचे आहेत त्या परीक्षकांनी त्या छात्राशिक्षकांची मुलाखत घ्यावी. वार्षिक पाठ परीक्षा झाले व वातावरणात घेतली जाणे अपेक्षित असते.

पाठपरीक्षेचे मूल्यमापन करताना प्रत्येक पाठात १०० पैकी गुण देवून अंतर्गत व बाह्य परीक्षकांनी दिलेल्या गुणांचे एकत्रीकरण करुन दोन पाठांच्या ४०० पैकी मिळालेले गुण विचारात घेऊन १०० पैकी गुण काढले जातात.

प्रकरण - तिसरे

# संबंधित संशोधनाचे समीक्षण

## ३.१ प्रास्ताविक

संशोधकाने आपल्या संशोधनाच्या संकल्पित विषयाशी जवळपास येणाऱ्या विषयावरील पूर्वीच्या संशोधकाच्या अहवालांचा विचार करणे आवश्क असते. संबंधित संशोधनाच्या अभ्यासप्रमाणेच संशोधकाने त्याच किंवा संबंधित विषयावर पूर्वी कोणी संशोधन केले आहे काय याचा शोध घेवून त्या संशोधनाचा अभ्यास केला पाहिजे. पूर्वीच्या संशोधनाचा विषय पुन्हा संशोधनासाठी घेण्यात अर्थ नसतो, कारण नाविन्य हे संशोधन विषयाचे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. पूर्वी झालेल्या संशोधनातून शिललक राहिलेला किंवा त्या संशोधकाने सूचविलेला पूरवणी विषय आहे का ते पाहता येते.

संबंधित संशोधकाचे क्षेत्र कोणते, साधने कोणती वापरली होती, माहिती व तिचे विशदीकरण, निष्कर्ष व सूचना कोणत्या केल्या आहेत याची दखल घेवूनच त्या गोष्टींची पुनरावृत्ती न होईल या दृष्टीने आपला विषय व संशोधन कार्यक्रम इत्यादी गोष्टींची निश्चिती करावयाची असते. त्यासाठी पूर्वीच्या संशोधकाच्या अहवालातील आवश्यक बाबी संशोधकाने आपल्या अहवालात सादर करणे ज़रुरीचे असते. संशोधन समीक्षणामुळे संशोधकास आपल्या विषयातील नाविन्य काय आहे हे मांडता येते. तसेच पूर्वीच्या संशोधनाचा उपयोग पायाभूत मानता येतो. संशोधकाने प्रस्तुत समस्येबाबतच्या संबंधित संशोधनाचा अभ्यास करुन त्यांचा घोषवारापुढील प्रमाणे दिलेला आहे.

## ३.२ संबंधित संशोधनाचा गोषवारा -

अ) श्री. जे. सी. गोयल, आर.के.चोप्रा - एज्युकेशन १९७९

" A study of problems bearing on Teacher Education in context of 10 +2 pattern" (Dept of Teacher-Education NCERT New Delhi 1979) - 1

श्री. जे.सी. गोयल व आर.के. चोप्रा यांनी अशा प्रकारची समस्या घेवून हा प्रबंध १९७९ मध्ये एन्.सी.ई. आर.टी. नवी दिल्ली यांना सादर केला आहे या संशोधनाचा प्रमुख हेतू पुढील प्रमाणे आहे.

१० + २ आकृतिबंध संदर्भात शिक्षक - शिक्षणात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे. कोठारी आयोगाचा अहवाल प्रकाशित झाल्यानंतर महाराष्ट्रात १०+२ आकृतिबंधाची त्वरीत अंमलबजावणी केल्याने हे संशोधन महाराष्ट्रापूरते मर्यादित आहे.

<u>या संशोधनाची उद्दिष्ट्ये पूढील प्रमाणे आहेत.</u>

१) एन्.सी.ई. आर.टी व शिक्षण आयोगाच्या शिफारसीप्रमाणे नवीन शालेय अभ्यासक्रमातील बदल व त्याची ठळक वैशिष्ट्ये अभ्यासणे.

२) नवीन पद्धतीनुसार, शिक्षकांच्या गरजा लक्षात घेवून शिक्षक-शिक्षणात विद्यापीठाने केलेले बदल तपासणे व राज्यात शिक्षक-प्रशिक्षण संस्थांना देण्यात येणारा

---

1. M.B. Buch - Third survey of Research in Education volume II (1978-83) (New Delhi : Publish at the publication Department by the secretary National council of Educational Research & Training 1987 P.No - 805)

दर्जा तपासणे.

३) नवीन प्रणालीसाठी शिक्षक तयार करणाऱ्या माध्यमांना/संस्थंना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

४) १०+२ आकृतिबंधासाठी आवश्यक शिक्षक तयार करण्यासाठी येणाऱ्या समस्यांविषयी इतर राज्यांनाही सूचना सूचविणे.

या संशोधनासाठी शिक्षक-प्रशिक्षण संस्थांना प्रश्नावली देवून, शिक्षण विभागाचे अधिकारी व तांत्रिक शिक्षण व राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचे संचालक यांच्या मुलाखतीद्वारे व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचा अभ्यासक्रम व बी.एड्. कामाकाजाचा अभ्यास करुन माहिती गोळा केली.

या संशोधनाचे मुख्य निष्कर्ष पुढील प्रमाणे :-

१) माहिती गोळा करत असेपर्यंत नवीन शालेय अभ्यासक्रमात उपयुक्त गरजांनुसार महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांचा बी.एड्. अभ्यासक्रम पुनर्रचित नव्हता.

२) नवीन शालेय अभ्यासक्रमात विविध विषयांचा अभ्यासक्रम सघन केला आहे व अनेक उपक्रमांची भर घातल्याने नवीन अभ्यासक्रम राबवणाऱ्या शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाची पर्यावरण अभ्यास,कला, संगीत, गुणग्राहक उपक्रम, नैतिक मूल्यांचा विकाय, समाजोपयोगी उत्पादक कार्य इ. क्षेत्रासाठी तातडीने गरज आहे.

३) काही शिक्षक- प्रशिक्षण संस्था कार्यानुभव उपक्रम किंवा समाजोपयोगी उत्पादक कार्य राबवत नाहीत.

४) नवीन योजनेनुसार आरोग्य व शारीरिक शिक्षणविषयीचे प्रशिक्षण शिक्षकांना दिले नाही. कलाक्षेत्रातही व्यापकता नाही ते थोड्या-फार पारंपारिक प्रमाणात तक्ते,

प्रतिकृती, दृक्-श्राव्य साधन निर्मितीसाठी राबवले जाते. शिक्षक-प्रशिक्षणार्थ्यांना सौंदर्यदृष्टी, सृजनशीलता व विद्यार्थ्यांमध्ये संस्कृती विषयी आवड निर्माण करण्याचे प्रशिक्षण दिले जात नाही.

५) विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये विकसित करण्याचे योग्य प्रशिक्षण विद्यार्थी शिक्षकांना दिले जात नाही.

६) शिक्षक - प्रशिक्षण संस्था विद्यार्थी शिक्षकांची विषयातील आशयासाठी तयारी करुन घेत नाहीत.

७) अनेक शिक्षक-प्रशिक्षण संस्थांमध्ये इंग्रजी, भूगोल, गणित, सायन्स, कॉमर्स, अर्थशास्त्र इ. विषयात पदव्युत्तर प्राध्यापक वर्ग नसल्याची नोंद आहे.

८) प्रत्येक शैक्षणिक शाखेत व्यवसायाभिमुख विषय अंतभूर्त केले आहे. १०+२ आकृतिबंधात व्यवसायिक शिक्षण ही स्वतंत्र शाखा नाही. म्हणून विद्यार्थ्यांना व्यवसाय पात्रतेसाठी व्यवसायिक अभ्यासक्रमाचे प्राविण्य प्रशस्तीपत्रक मिळत नाही.

ब) देव डी.एस्. - पी.एच्. डी. एज्युकेशन १९८७.

" To study the practicl programme other than practice teaching in Teacher - Education Institutions" - 2 (Ph.D. Education, 1985)

प्रा. देव डी.एस्. यांनी अशा प्रकारची समस्या घेवून पीएच्. डी. साठी हा प्रबंध १९८५ मध्ये दिल्ली विद्यापीठास सादर केला. या संशोधनाचा प्रमुख हेतू पुढील

2 - M.B. Buch - Fourth Survey of Research in Education Volume III (1983-88) [New Delhi : Publish at the publication Department by the secretory National Council of Education Research & training 1991] P. No. 931



13577

प्रमाणे

"शिक्षक - प्रशिक्षण संस्थामंधील सरावपाठव्यतिरिक्त प्रात्यक्षिक कार्यक्रमाची अभ्यास करणे."

उद्दिष्ट्ये :-

<u>या संशोधनाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे -</u>

१) माध्यमिक शिक्षक-शिक्षण कार्यक्रमातील सराव पाठाव्यतिरिक्त इतर प्रात्यक्षिक कार्याची भूमिका अभ्यासणे.

२) दिल्लीमधील माध्यमिक शिक्षक-शिक्षण संस्थांमधून विद्यार्थी-शिक्षकांना देण्यात येणाऱ्या प्रात्यक्षिक कामाचे स्वरूप व प्रकार यांचे सर्वेक्षण करणे.

३) प्रात्यक्षिक कार्याची अंमलबजावणी कशी केली जाते याचा अभ्यास करणे.

४) विद्यार्थी-शिक्षकांना प्रात्यक्षिकांच्या उद्दिष्ट्यांच्या ज्ञानाविषयी सर्वेक्षण करणे.

५) उद्दिष्ट्ये किती प्रमाणात साध्य झाली व इष्ट पातळीपर्यंत पूर्ण झाली नसतील तर त्याची कारणे शोधणे.

६) प्रात्यक्षिक कार्याविषयी परिणामकारक योजना सूचविणे.

<u>संशोधन पद्धतीची निवड :</u>

दिल्ली येथील तीन शिक्षक-प्रशिक्षण संस्थांमधील ३५० विद्यार्थी-शिक्षण व ५५ शिक्षक-प्रशिक्षक यादृच्छिक पद्धतीने निवडले. या संशोधनात प्रश्नावली या साधनाचा वापर करुन माहिती गोळा केली आहे.

<u>संशोधन साधनाची निवड:</u>

संशोधकानेसदरहू संशोधनासाठी संशोधन समस्येच्या स्वरूपानुसार प्रश्नावली या संशोधन साधनांचा वापर केला आहे.

## निष्कर्ष :

१) बऱ्याच विद्यार्थी-शिक्षकांना प्रात्यक्षिक कार्याची उद्दिष्ट्ये साध्य न होण्यामागे वेळेची कमतरता हा महत्वाचा घटक आहे असे वाटते.

२) शिक्षक-प्रशिक्षकांच्या मते उद्दिष्ट्ये साध्य न होण्यामागे पूरेशी संधी व वेळेची कमतरता ही कारणे आहेत.

३) विद्यार्थी-शिक्षकांना शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बरीच प्रात्यक्षिक कार्ये वेळेचा अभाव, योग्य मार्गदर्शन, पुरेशी संधी व प्रत्याभरणाच्या अभावामुळे उद्दिष्ट्ये साध्य होवू शकत नाही असे वाटते.

४) कार्यानुभव व समाजोपयोगी उत्पादक कार्यासाठी पूरेसा वेळ व मार्गदर्शन विद्यार्थी-शिक्षकांना दिले जात नाही व यासाठी वेळापत्रकात तरतूद नाही.

५) विद्यार्थी-शिक्षकांना दृक् व श्राव्य साधने तयार करण्यासाठी प्रशिक्षणात सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत.

६) विद्यार्थी-शिक्षक शारीरिक शिक्षणात व खेळात प्रासंगिक भाग घेतात.

७) विद्यार्थी-शिक्षकांसाठी संस्थामार्फत शैक्षणिक सहली आयोजित केल्या जात नाहीत.

८) शिक्षक-प्रशिक्षणात सजाजसेवा एकात्मिक घेतली जात नाही.

९) विद्यार्थ्यांच्या गरजा व आवडीनुसार सांस्कृतिक कार्यक्रमांचे संघटन केले जात नाही.

१०) प्रतिभावंत विद्यार्थ्यांना कला, नाट्यीकरण व इतर सांस्कृतिक क्षेत्रामध्ये संधी दिल्या जात नाहीत.

११) विद्यार्थी-शिक्षकांना मानसशास्त्रीय प्रयोगांचे अध्ययन-उपपत्तीचे उपयोजन करण्यासाठी संधी दिली जात नाही.

प्रकरण ४ थे

# संशोधन कार्यपद्धती

## ४.१ प्रस्तावना :

संशोधकाने संशोधन समस्या निश्चित केल्यानंतर कोणत्या पद्धतीनुसार संशोधन केले आहे याचा उल्लेख करणे आवश्यक असते. संशोधन समस्या सोडविण्यासाठी आवश्क माहिती विविध ठिकाणाहून व विविध व्यक्तींकडून गोळा करावी लागते. संशोधनाच्या माहिती गोळा करण्याच्या विविध पद्धती आहेत. संशोधकाने निवडलेल्या संशोधनाचे स्वरूप, त्याची उद्दिष्ट्ये व व्याप्ती लक्षात घेऊन संशोधन पद्धती व त्यानुसार साधनांचा व तंत्रांचा वापर करावा लागतो.

शैक्षणिक संशोधन वैज्ञानिक किंवा शास्त्रीय पद्धतीने करण्यात येते. संशोधनाची उद्दिष्ट्ये, माहिती संकलनाचे तंत्र, नियंत्रण तंत्र, साधने, क्षेत्र इ. अनेक प्रकारच्या आधारावर शैक्षणिक संशोधनपद्धतीने वर्गीकरण ऐतिहासिक संशोधन पद्धती, सर्वेक्षण संशोधन पद्धती, प्रायोगिक संशोधन पद्धती या तीन गटात केले आहे. संशोधनाचा विषय निवडताना त्या विषयाबाबतची सद्य:स्थिती सुधारणे हाच निकष असतो.

## ४.२ वर्णनात्मक संशोधन पद्धती :

शैक्षणिक संशोधनाच्या तीन पद्धती आहेत १) ऐतिहासिक संशोधन पद्धती २) सर्वेक्षण संशोधन पद्धती ३) प्रायोगिक संशोधन पद्धती.

वरील तीन पद्धतीपैकी निवडलेल्या विषयाचे स्वरुप, दृष्टीकोन व उद्दिष्ट्ये लक्षात घेवून सदरहू समस्येसाठी संशोधकाने वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

सर्वेक्षण पद्धतीत वर्तमानावर भर असतो. अभ्यासवस्तूची वर्तमान स्थिती कशी आहे हे पाहण्यासाठी ही पद्धती वापरली जाते. विशिष्ट बाबतीत असलेली सद्य:स्थिती

जाणून घेण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या संशोधन पद्धतीला सर्वेक्षण पद्धती असे म्हणतात. या प्रकारचे संशोधन सद्य:स्थितीचे वर्णन करते आणि सद्य:स्थिती स्पष्ट करते. वर्तमान असलेले संबंध, प्रचलित परिपाठ दिसून येणाऱ्या निष्ठा, दृष्टीकोन आणि अभिवृत्ती, सुरु असलेल्या प्रक्रिया, जाणवणारे परिणाम विकसित होत असलेले विचारप्रवाह यांच्याशी ते संबंधित असते, वर्णनात्मक सर्वेक्षणात मापन, वर्गीकरण, अर्थनिर्वचन आणि मूल्यांकनांच्या आधारे वर्णित विषयाचे स्पष्टीकरण, तुलना व सार्थकता असते.

वर्णनात्मक संशोधनप्रकारातील अभ्यासाचे उद्दिष्ट्य, क्षेत्र, साधनतंत्र, विषय इत्यादीनुसार सर्वेक्षणाचे खालील प्रकार पडतात.

१) शालेय/विद्यालय सर्वेक्षण (School survey)

२) सर्वेक्षण परीक्षण (Survey testing)

३) सर्वेक्षण वारंवारिता अभ्यास (Documentary-frequency studies)

४) सर्वेक्षण मूल्यांकन (survey appraisal)

५) पाठपूरावा अभ्यास (Follow up studies)

६) न्यादर्श सर्वेक्षण (sample survey)

७) लोकमत सर्वेक्षण

८) सामाजिक सर्वेक्षण

९) समाज अभ्यास

१०) व्यक्ती अभ्यास

वरील सर्वेक्षण प्रकारात संशोधकाचे सूत्र समान असते व समस्येवर प्रभावीउपाय योजना शोधणे व संशोधनाचे मुख्य कार्य असते.

शालेय सर्वेक्षण :-

"विद्यालय सर्वेक्षणात सर्वेक्षण पद्धतीची सर्व वैशिष्ट्ये स्पष्ट व ठळक स्वरुपात आढळतात. त्यात विद्यालयाशी संबंधित असलेल्या विविध बाबींची सद्य:स्थिती त्यातील आवश्यक बदल आणि त्याकरिता इष्ट असलेले अपाय यांच्या सर्वेक्षणात्मक संशोधनाचा अंतर्भाव होतो. विद्यालयाशी संबंधित असलेले सर्वेक्षण विविध प्रकारचे असते. गाव, शहर, जिल्हा, राज्य, राष्ट्र, ग्रामीण वा नागरी विभाग अशा भिन्न भौगोलिक क्षेत्रांशी ते संबंधित असते. शिक्षणाच्या भिन्न स्तरांनुसार पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक किंवा महाविद्यालयीनस्तरावर ते राहू शकेल. ज्या शैक्षणिक कार्यानुसार ते केले जाते त्यानुसार ते वास्तू, अध्यायनपद्धती, प्रशासन, प्रयोगशाळा, अर्थव्यवस्था, विद्यार्थ्यांची प्रगती, त्यांच्या अभिवृत्ती, बौद्धिक क्षमता, आवडीनिवडी इ. स्वरुपाचे राहू शकेल. सामान्यत: विद्यालय सर्वेक्षणात स्तर, क्षेत्र आणि कार्य या तिन्ही बाबी एकत्रित विचारात घेतल्या जातात. कोणत्या स्तरावर, कोणत्या क्षेत्रात, कशाकरिता सर्वेक्षण करावयाचे याचा विचार त्यात असतो. कधी कधी अनेक कार्यांचा एकत्रित विचार करण्याकरिता व्यापक स्वरुपाचे सर्वेक्षण केले जाते". १

## ४.३ संशोधन साधने व तंत्रे :-

संशोधकाने संशोधनासाठी ज्या समस्येची निवड केली आहे त्याचे अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी विविध प्रकारची माहिती व आकडेवारी आवश्यक असते. त्याला संशोधनाची अधारसामग्री म्हणतात. तिचे विश्लेषण व निर्वचन करुन संशोधनाचे

१ रा.शं.मुळे, वि.तु. उमाठे - "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे"
(नागपूर : महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, तिसरी आवृत्ती, १९९८) पान नं. ११४

निष्कर्ष मांडता येतात. त्यासाठी गुणात्मकव परणिमात्मक माहिती जमा करण्यासाठी विविध प्रकारची तंत्रे व पद्धती वापरल्या जातात त्यांना संशोधनाची साधने म्हणतात. संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली, निरीक्षण, मुलाखती शोधिका, अभिवृत्तीमापिका, पडताळासूची, पदनिश्यनश्रेणी, प्रमाणित चाचण्या, समाजमिती, प्रक्षेपणशील तंत्रे इ. साधनांचा वापर करण्यात येतो.

## ४.४. संशोधन साधनाची निवड

संशोधन साधनांची निवड करताना संशोधन पद्धती, स्वरूप व्याप्ती, पर्यादा व संशोधनाची उद्दिष्ट्ये यांचा विचार करावा लागतो. दसरहू संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण या साधनांचा व तंत्राचा वापर केला आहे. संशोधनाच्या उद्दिष्टांनुसार माहिती जमा करण्यासाठी प्रश्नावली या साधनाची निवड केली आहे. प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीच्या निश्चितीसाठी मुलाखत आणि निरीक्षण तंत्राचा वापर केला आहे. प्रश्नावली, मुलाखत आणि निरीक्षण तंत्र कशा प्रकारे तयार केले व त्यांचा वापर कसा केला आहे याबाबत तपशील पुढील प्रमाणे आहे.

## ४.५ संशोधन अभ्यासासाठी नमुनागटाची निवड :

संशोधनामध्ये समस्येचे उत्तर शोधून संशोधन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जी माहिती विविध व्यक्ती, संस्थांकडून मिळवावी लागते त्यंना प्रतिसादक म्हणतात.

शैक्षणिक समस्यांच्या अभ्यासात संपूर्ण जनसंख्या दृष्टीसमोर असली तरी त्याचा अभ्यासकरणे शक्य नसते. यासाठी खर्च व वेळ फार लागतो. संपूर्ण जनसंख्येच्या प्रवृत्तीबाबत पूर्वानुमान काढणे श्रेयस्कर असल्याने श्रम, खर्च व वेळ यांच्या बचतीसाठी न्यादर्शाची निवड करावी लागते.

संशोधकाने जर संशोधन प्रक्रियेत संपूर्ण जनसंख्याचा समावेश केला तर त्यास

जनसंख्या निवड पद्धती म्हणतात. संशोधकाने जर त्या जनसंख्याचा प्रतिनिधिक नमुना निवडला तर नमुना निवड पद्धती म्हणतात.

''जनसंख्या तथ्याविषयी पूर्वानुमान करण्याकरिता जनसंख्येतून निवडलेल्या व्यक्ती किंवा वस्तू यांच्या लहान संचाला न्यादर्श म्हणतात'' - २

''संपूर्ण राशीऐवजी जर राशीतील काही निवडक घटकांकडून व घटकांबाबत माहिती जमा केली तर त्या पदध्तीस नमुना पदध्ती म्हणतात व ज्या घटकांकडून माहिती जमा केली असेत त्य घटकांच्या समूहाला नमुना (Sample) म्हणतात.'' - ३

" Sampling, thus is the selection of same part of an aggregate or totality on the basis of which a judgement or inference about the aggregate or. totality is made. In other words, it i the proces of obtaining information about on centire population by examining only part of it. In most of research work survey, the usual approach happens to be making generalization or to draw inferences based on samples about the parameters of population from which the samples are taken" - 4

---

२ - कित्ता - पान नं. ३२१

३ - ग.वि. कुंभोजकर - <u>''संशोधन पद्धती व संख्याशास्त्र''</u>

(कोल्हापूर : फडके प्रकाशन, कोल्हापूर, तिसरी आवृत्ती, १९८९) पान नं. ३२७

4 - Usha Rao - <u>"Conducting Educational Research"</u>

(Pune : Dastane publication pune, 1994) page no 87.

संशोधकाने सदरहू अभ्यासात शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित मिळून एकूण पंचवीस शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सर्व प्राचार्य व प्राध्यापकांचा समावेश केला आहे. त्यामुळे नमुना गट निवडण्याचा व नमुना गट तयार करण्याचा प्रश्नच आला नाही. संशोधकाने शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित एकूण २५ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ११ प्राचार्य ११४ प्राध्यापकांकडून प्रश्नावलीद्वारे माहिती गोळा केली आहे. प्रश्नावली या साधनाद्वारे प्राप्त केलेली माहिती संकलित करुन पुढील प्रकरणात त्याचे विशदीकरण व विश्लेषण केले आहे.

## ४.६ प्रश्नावली :

शैक्षणिक संशोधनात विशिष्ट समस्यांचा अभ्यास करण्यासाठी संबंधित व्यक्तींना प्रश्न विचारुन त्यांच्याकडून माहिती जमा करावी लागते.

"विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी संबंधितांकडून त्या समस्येबाबत प्रश्न मिळविण्याच्या हेतूने तयार केलेल्या प्रश्नांच्या मालिकेस प्रश्नावली म्हणतात" - ५

" Good & Hatt say that in general the word 'questionaire' refers to a device for securing answers to a series of questions by using a form which the respondent tills himself/ herelf.

Bar, Daris & Fohrison detine 'Questionaire' as a systematic compilation of questions that are submitted to a sampling of population from which information is desire.

---

५ - ग.वि. कुंभोजकर - "संशोधन पद्धती व संख्याशास्त्र"

(कोल्हापूर : फडके प्रकाशन, कोल्हापूर, तिसरी आवृत्ती, १९८९) पान नं. १६९

Miledred Parton has defined questionaire as a form distributed through mail or filled out by the respondent under the supervision of the investigator or interviewer". - 6

प्रश्नावली नमुना गटास, प्रतिसादकास दिली जाते. प्रश्नावलीद्वारे संशोधन समस्येच्या संदर्भात संख्यात्मक व गुणात्मक माहिती मिळते. शैक्षणिक संशोधनात प्रश्नावलीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. प्रश्नावली तयार करण्यापूर्वी संशोधकाने पूर्वीच्या संशोधकाच्या प्रश्नावलींचा अभ्यास करणे आवश्यक असते.

प्रश्नावली तयार करताना संशोधकाने परिश्रमपूर्वक, काळजीपूर्वक काम करावे म्हणजे प्रश्नावलीत एकाच बाबींसंबंधी व एकाचप्रकारचे प्रश्न एकत्रित देवून त्यांचे निरनिराळे गट तयार करावेत. संशोधनाच्या उद्दिष्टानुसार प्रश्नावलीत प्रश्नांचा क्रम असावा. प्रश्नाचं योग्य गट तयार केल्याने प्रतिसादक एकावेळी एका विशिष्ट प्रश्नांबाबत विचार करीत असल्यामूळे उत्तरे अधिक योग्य मिळतात. असा सातत्याचा फायदा सर्व प्रश्न प्रकारांबाबत होत असतो. सारख्या प्रकारचे प्रश्न एकाचठिकाणी दिल्यास प्रश्नावलीची गुणवत्ता वाढते. प्रश्नावलीत विविध प्रश्नांचा संच अंतर्भूत केलेला असतो. संशोधन प्रक्रियेस व संख्याशास्त्रीय प्रक्रियंसाठी बंदिस्त प्रश्नप्रकार अधिक योग्य ठरतात. बंदिस्त प्रश्नात प्रश्नांची संभाव्य पर्यायी उत्तरे देवून प्रतिसादकास त्यापैकी एकाची निवड करण्यास सांगितली असते. त्यामूळे प्रश्न समजण्याबाबत व उत्तर देण्याबाबत प्रतिसादकाच्या मनात शंका राहत नाही. परंतू काही प्रश्नांबाबत सूचविलेल्या उत्तरांऐवजी संशोधकाने अपेक्षिलेल्या परंतू प्रतिसादकास महत्वाच्या वाटणाऱ्या उत्तरांसाठी जागा ठेवलेली असते.

प्रश्नावली तयार झाल्यानंतर प्रतिसादकाकडून प्रतिसाद कसा मिळवावा याचा

---

6 - Usha Rao - "Conducting Eductional Research"

(Pune : Dastane publication, pune 1994) Page No. 124

विचारकरावा लागतो. याचे तीन भाग करता येतील.

१) प्रश्नावली सोबत विनंती करणारे आवाहन.

२) प्रश्नावलीची प्रत.

३) प्रतिसादाबाबतचे धोरण.

४.६.१ <u>प्रश्नावली तयार करणे</u> :-

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित आठ अनुदानित व सतरा विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राचार्य प्राध्यापकांची वैयक्तिक माहिती, बी.एड्. भाग - २ शी संबंधित प्रात्यक्षिक कार्यामध्ये अंतर्भूत असणारे सरावपाठ व सूक्ष्म अध्यापन, तात्विक विषयाचे प्रातक्षिक कार्य, आशययुक्त अध्यापन पदध्ती व अंतर्गत परीक्षा, समाजसेवा, कार्यानुभव, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक निबंध (प्रपाठ), शारीरिक शिक्षण, वार्षिक पाठ परीक्षा इ. प्रात्यक्षिकांबाबत सविस्तर माहिती संकलित करण्यासाठी वरील सर्व बाबींचा समावेश असणारी प्राथमिक स्वरुपाची प्रश्नावली संशोधकाने तयार केली.

संशोधकाने सर्वेक्षणाचा उद्देश समोर ठेवून प्राथमिक स्वरुपाची प्रश्नावली शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अध्यापन करणाऱ्या अनुभवी प्राध्यापकांना दाखवून त्या प्रश्नावलीवर चार्चा केली. चर्चा करुन सूचविलेल्या दुरुस्ती व त्रुटी लक्षात घेवूनपुन्हा नवीन सुधारित प्रश्नावली तयार केली.

पथदर्शक स्वरुपाची प्रश्नावली शहरातील तीनशिक्षणशास्त्र महाविद्यालयातील काही प्राध्यापकांना सदरहू प्रश्नावली भरण्यासाठी देण्यात आली. प्रश्नावली भरुन घेतल्यानतर त्यांच्याशी चर्चा करुन कोणत्या प्रश्नांबाबत दुरुस्ती आवश्यक आहे, कोणता भाग आवश्यक आहे, कोणत्यानवीन प्रश्नांचा समावेश करणे आवश्यक आहे,

प्रश्नांची रचना, उत्तरातील विविधता, संदिग्धता इत्यादीबद्दल उपयुक्त माहिती पथदर्शक अभ्यासातून प्राप्त झाली. सदरहू प्राध्यापकांशी चर्चा करुन प्रश्नावलीत सुधारणा करण्यात आली.

सुधारित प्रश्नावली निर्दोष करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन, तज्ञ व सहकार्यांशी चर्चा करुन प्रश्नावलीत समाविष्ट न झालेल्या बाबी, संदिग्धता, पूर्वग्रहाची शक्यता इत्यादीबाबत विचारविनिमय करुन प्रश्नावलीस अंतिम स्वरुप देण्यात आले.

<u>विभाग १</u> :- अंतिम प्रश्नावलीत संशोधन समस्येची उद्दिष्ट्ये विचारात घेवून एकाच बाबीसंबंधीचे व एकाच प्रकारचे प्रश्न एकत्रित करुन प्रश्नवलीची पाच गटात विभागणी करण्यात आली. अंमिम स्वरुपाच्या प्रश्नावलीतील पहिल्या विभागात बी.एड्. अभ्यासक्रातील भाग-२ शी संबंधित सराव पाठ व सूक्ष्म अध्यापन या संबंधी सविस्तर व मूद्देसूद माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावलीच्या या विभागात बंदिस्त स्वरुपाचे ३१ प्रश्न तयार करण्यात आले.

<u>विभाग - २ :-</u> बी.एड्. अभ्यासक्रमातील पाच तात्विक विषय व त्यातील विभागांशी संबंधित प्रात्यक्षिक कार्यांचा समावेश बी.एड्. भाग - २ मध्ये केला आहे व या प्रात्यक्षिक कार्याचे मूल्यमापन १०० गुणांपैकी केले जाते. या संबंधीची माहिती मिळवण्यासाठी प्रश्नावली दुसऱ्या विभागात तात्विक विषयाच्या प्रात्यक्षिक कार्याच्या संबंधित माहिती मिळविण्यासाठी १५ प्रश्न तयार करण्यात आले आहेत.

<u>विभाग - ३</u> :- विद्यार्थी शिखकांना आशय व पद्धती यांची सांगड घालूनप्रभावी अध्यापन करता यावे यासाठी आशययुक्त अध्यापन पद्धती कृतिसत्र राबवले जाते. तसेच विद्यार्थी-शिक्षकांचे मूल्यमापन व लेखनाचा सराव होण्यासाठी अंतर्गत परीक्षा महाविद्यालयाकडून घेतली जाते.आशययुक्त अध्यापन पद्धती कृतिसत्राची व अंतर्गत परीक्षेची अंमलबजावणीची पद्धती व त्यातील अडचणी जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीच्या

तिसऱ्या विभागत १० प्रश्न तयार करण्यात आले आहेत.

**विभाग - ४ :-** विद्यार्थी-शिक्षकांना तात्विक विषयांच्या अध्यापन पद्धती, नियोजन, मूल्यमापन या प्रमाणेच अभ्यासेतर कार्यानुभव, समाजसेवा, सांस्कृतिक कार्यक्रम, शारीरिक शिक्षण या अनिवार्य विषयांची उद्दिष्ट्ये, विषयाचे स्वरूप, त्यातील उपक्रमांचे नियोजन, मूल्यमापन याबाबतची माहिती असणे आवश्यक आहे म्हणून या विषयांच्या प्रात्यक्षिकांचा समावेश बी.एड्. भाग-२ मध्ये केला आहे. तसेच विद्यार्थी-शिक्षकांना वर्षभर सातत्याने लेखनाचा सराव व्हावा व त्यांनाप्रत्याभरणाच्या दृष्टीकोनातून शैक्षणिक निबंध (प्रपाठ) लेखन करुन घेतले जाते. वरील प्रात्यक्षिकांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी व प्रपाठ लेखनाच्या संदर्भातील अडचणी जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीच्या चौथ्या विभागात ३१ प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

**विभाग - ५ :-** विद्यार्थी-शिक्षकांनी प्रत्येक विषयात केलेल्या प्रात्यक्षिक कार्य व त्यांच्या अध्यापन क्षमतेचे मूल्यमापन करण्यासाठी वार्षिक पाठ परीक्षा (प्रात्यक्षिक परीक्षा) घेतली जाते. वार्षिक पाठ परीक्षेसंबंधी येणाऱ्या समस्याजाणून घेण्यासाठी प्रश्नावलीच्या पाचव्या विभागात ३ प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

या संशोधनासाठी आवश्यक माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावलीच्या पाच विभागात एकूण ८९ प्रश्न तयार करण्यात आले. या संशोधनाची सहा उद्दिष्ट्ये ठरविली होती. सर्व उद्दिष्टांची माहिती संकलित करण्यासाठी या प्रश्नावलीचाउपयोग करण्यात आला आहे.

अंतिम स्वरुपामध्ये तयार केलेली प्रश्नावली परिशिष्ट 'अ' मध्ये दिली आहे.

### ४.६.२ प्रश्नावली पाठवणे व भरुन घेणे :-

संशोधकाने शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सर्व अनुदानित व विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची यादी तयार केली. शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित एकूण २५ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील २५ प्राचार्य २०० प्राध्यापकांची संख्या निश्चित करण्यात आली. शिक्षणशास्त्र महाविद्यालय व तेथील प्राचार्य व प्राध्यापकांची संख्या निश्चित मिळाल्यानंतर अंतिम स्वरुपाची तयार केलेल्या प्रश्नावलीची छपाई करण्यात आली. एकूण २५० प्रश्नावली छापण्यात आल्या.

अंतिम स्वरुपाची प्रश्नावली चार जिल्हे सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूरयेथील अनुदानित व विनाअनुदानित २५ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील २५ प्राचार्य व २०० प्राध्यापकांना ५ जानेवारी १९९९ रोजी प्रश्नावली पाठवण्यात आल्या. या प्राध्यापकांना प्रश्नावली पाठवताना पूरेसे पोस्टेज लावून पत्ता असलेले पाकिट प्रश्नावली परत पाठवण्यासाठी देण्यात आले. अशाप्रकारे शिवाजी विद्यापीठाशी संलग्नितआठ अनुदानित वसतरा विनाअुनदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील २२५ प्राचार्य व प्राध्यापकांपैकी ११ प्राचार्य व १४४ प्राध्यापकांनी ३१ मार्च १९९९ अखेर प्रश्नावली भरुन पाठवल्या.

### मुलाखत तंत्र :-

" एखाद्या प्रश्नाबाबत माहिती मिळविण्याच्या हेतूने सहकार्य देणाऱ्या व जाणकार निवेदकाबरोबर मुलाखतकाराने केलेला संवाद म्हणजे मुलाखत होय" - ७

" According to Bingham & Moore, a serious conversation direected to a definite purpose other than satisfaction in the con-

---

७ ग.वि. कुंभोजकर - "संशोधन पद्धती व संख्याशास्त्र"
(कोल्हापूर : फडके प्रकाशन, कोल्हापूर, तिसरी आवृत्ती, १९८९) पान नं. १५३.

versation itself is on interview.

Blum & Balinsky are of the view that, the interview allows the client & counseller to exchange the ideas & attitudes through conversation. Its purpose is to lead to a solution of the client's problems or at least to some change in attitude or behavior" - 8

संशोधकाकास आपल्या संशोधनाच्या उद्दिष्टांविषयी माहिती अनेक साधनांनी मिळवावी लागते. संशोधन साधनांपैकी मुलाखत हे उपयुक्त तंत्र आहे. प्रश्नावली व निरीक्षण या साधनाद्वारे न मिळालेली माहिती मुलाखतीद्वारे मिळू शकते. मुलाखतीद्वारे मुलाखतकार व निवेदक यांमधील परस्पर क्रियेतून, विचारमंथनातून समस्येची उकल होत असते म्हणून संशोधनात जी मुलाखत अभिप्रेत आहे, तिची भूमिका, योग्य प्रतिसादकांकडून संशोधन विषयाबाबतची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करणे आवश्यक आहे.

मुलाखत म्हणजे प्रतिसादकांकडून माहिती काढून घेण्याचे व नोंद करण्याचे साधन नव्हे. किंवा त्या प्रतिसादकांकडून माहिती काढून घेग्याचे व नोंद करण्याचे साधन नव्हे. किंवा त्या प्रतिसादकाच्या ज्ञानाची परीक्षा नसते. मुलाखत म्हणजे दोन व्यक्तीतील संवाद. मुलाखतीत क्वचित चर्चाही होते.

मुलाखतीसाठी संशोधकाने प्रशासन व संबंधित विषयातील जाणकार व्यक्ती निवडून त्यांच्याकडून संशोधनास आवश्यक अशी विशेष माहिती काढून घ्यायची असते. मुलाखतीच्या वेळी प्रतिसादकास अभ्यास विषयाशी संबंधित सातत्याने प्रश्न विचारुन माहिती मिळवली जाते किंवा मिळालेल्या माहितीला निश्चित रुपदेता येते.

---

8 - Usha Rao - "CONDUCTING EDUCATIONAL RESEARCH"

(Pune : Dastane Publication, Pune, 1994) Page No. 154

मुलाखत हा एकमार्गी रस्ता नसून यात विचारांची देवाणघेवाण संशोधकाला संशोधन करण्यासाठी उपयोगी पडते. म्हणून मुलाखतीस सुरुवात करण्यापूर्वी प्रतिसादकाशी चांगले भावबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे मुलाखतीच्या सुरुवातीस औपचारिक बाबी पार पाडाव्यात. त्यानंतर मुलाखतीचा हेतू साध्य करण्याच्या दृष्टीने संभाषण, चर्चा, प्रश्न इ. द्वारे प्रतिसादकांकडून माहिती मिळवली जाते. ही माहिती मिळवताना प्रतिसादकाचा दृष्टीकोन, त्याची मानसशास्त्रीय बैठक, अचूक माहिती इ. गोष्टी विचारात घ्याव्या लागतात.

मुलाखत घेताना संशोधकाला मुलाखत तंत्राची माहिती असावी. मुलाखतीद्वारे पूरेशी, योग्य माहिती मिळवण्यासाठी संशोधक वस्तुनिष्ठ, समंजस, दुसऱ्यांची मते ऐकून घेणारा व आदर करणारा असला पाहिजे. संशोधकाने संशोधन समस्येच्या विषयात विशेष आवड असणाऱ्या व्यक्तींचीच मुलाखतीसाठी निवड करावी. निवडलेल्या प्रतिसादकांचे नांव, शैक्षणिक पात्रता, लेखन, संशोधन विषयातील अनुभव या विषयाची माहिती संशोधकाने अगोदर मिळवावी. त्यानुसार प्रतिसादकाकडून कोणती माहिती मिळवावयाची या बाबी संशोधकास मुलाखतीपूर्वी निश्चित करता येतील.

मुलाखतीच्या प्रश्नावरुन मुलाखतीचे दोन प्रकार पडतात. पहिल्या प्रकारात प्रतिसादकास केवळ विषय सांगून त्याची मते, अनुभव, सूचना ऐकावयाच्या असतात. तर दूसऱ्या प्रकारात विषयात खोलवर जाऊन विशिष्ट बाबींची विचारणा केली जाते. मुलाखतीची प्रक्रिया निर्दोष व निष्कर्षाच्या दृष्टीने अचूक असावी.

" <u>Skillful execution of Interview</u> - The rules are

1) The interviewer should ask only question at a time.

2) The interviewer must make himself/herself clear that the sub-

ject understands the question.

3) The interviewer should maintain a neutral attitude with respect to controversial issues during the interview

4) The interviewer must also listen tothe respondent's answer very carefully.

5) He / she should have a knock to ask the questions in such a manner wherein the respondent will narrate the problem on his/her own.

6) Selection of proper time & proper place for the interview is also a thing which the interviewer must note" - 9

मुलाखत तंत्राविषयी हे निकष पाहून संशोधकाने मुलाखतीसाठी आराखडे तयार केले. त्याबाबतचे विवेचन पुढे केले आहे.

४.७.१ मुलाखत आराखडा :-

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित एकूण आठ अनुदानित व सतरा विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये आहेत. महाविद्यालयात बी.एड्. भाग दोनचे प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीसंबंधी प्राचार्य व प्रात्याक्षिकानिहाय विभाग प्रमुखांचे मनोगत जाणून घेणे आवश्यक असल्यामुळे संशोधकाने मुलाखत तंत्राचा वापरकरण्याचे ठरविले.

---

९ कित्ता - पान नं. १५९

मुलाखतीसाठी कोणकोणत्या व्यक्तींची निवड करावी, कोणकोणत्या बाबींवर चर्चा करावी यासंबंधी कच्चा आराखडा तयार केला. मुलाखत पूर्व चाचणी तयार केल्यावर सहकारी, तज्ञ व मार्गदर्शक यांच्याशी चर्चा करुन कोणत्या बाबींचा समावेश करावा. कोणत्या बाबींवर चर्चा करु नये, कोणत्या व्यक्तीचीनिवड करावी व करुन नये यासंबंधी चर्चा करुन मुलाखतांचा अंतिम आराखडा तयार करण्यात आला.

मुलाखतीच्या अंतिम आराखडयामध्ये शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित चार जिल्ह्यातील अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयाचे अनुक्रमे चार व सहा अशा एकूण दहा प्राचार्यांना बी.एड्. भाग दोनच्या प्रात्यक्षिक कार्याची कार्यवाही करताना कोणकोणत्या अडचणी येतात, यावर त्यांची मते व अभिप्राय याविषयी चर्चा करता येईल, अशा प्रश्नांचा समावेश करुन प्राचार्यांसाठी मुलाखतीचा आराखडा तयार करण्यात आला.

संशोधन करण्यापूर्वी संशोधन समस्येची सहाउद्दिष्ट्ये ठरविली होती त्यापैकी सराव पाठ व सूक्ष्म अध्यापनाच्या कार्यवाहीत येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे, तात्विक विषयांच्या प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीत येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे, आशययुक्त अध्यापन पद्धती व अंतर्गत परीक्षा यासंबंधी येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे, समाजसेवा, कार्यानुभव, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रपाठ व शारीरिक शिक्षणप्रात्यक्षिकाच्या संदर्भात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे, वार्षिक पाठ परीक्षेच्या संदर्भात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे ही पाच उद्दिष्ट्ये मुलाखत तंत्राच्या सहारूयाने माहिती गोळा करण्यास उपयुक्त झाली.

प्राचार्यांच्या मुलाखतीसाठी मुलाखत आराखडा तयार करण्यात आला आहे. तो आराखडा परिशिष्ट 'क' मध्ये दिला आहे.

### ४.७.२ मुलाखतीसाठी प्राचार्य व विभागप्रमुखांची निवड :

संशोधकाने मुलाखीसाठी महाविद्यालयांची निवड बहुस्तरीय या यादृच्छिक नमुनानिवड पद्धतीने केली आहे.

शिवाजी विद्यापीठांतर्गत अनुदानित व विनाअनुदानित अशा दोन्ही प्रकारची शिक्षणशास्त्र महाविद्यालये आहेत.

#### अनुदानित महाविद्यालयाची निवड :-

अनुदानित महाविद्यालयाची निवड करताना प्रत्येक जिल्हयातून एका महाविद्यालयाची निवड करावयाचे निश्चित करण्यात आले होते. ज्या जिल्ह्यात एकच अनुदानित महाविद्यालय आहे त्याच महाविद्यालयाची निवड करण्यात आली. ज्या जिल्हयामध्ये एकापेक्षा अधिक अनुदानित महाविद्यालये आहेत अशा जिल्ह्यातील महाविद्यालयांना क्रमांक देवून लॉटरी पद्धतीने एकेक महाविद्यालयाची निवड करण्यात आली. अशा निवड केलेल्या महाविद्यालयाची यादी परिशिष्ट 'क' मध्ये दिलेली आहे.

#### विना अनुदानित महाविद्यालयाची निवड :-

जिल्ह्यानिहाय विना अनुदानित महाविद्यालयाची संख्या विचारात घेवून हे महाविद्यालये निश्चित करण्यात आली. जिल्हा निहाय विनाअनुदानित महाविद्यालयांची यादी करुन त्यांना क्रमांक देण्यात आले. लॉटरी पद्धतीने प्रत्येक जिल्ह्यानिहाय महाविद्यालयांची निवड करण्यात आली. त्यानुसार सोलापूर, सातारा व सांगली जिल्ह्यातून एकेक महाविद्यालय निवडण्यात आले. कोल्हापूर जिल्ह्यातील ९ महाविद्यालयातून ३ महाविद्यालयांची निवड करण्यात आली. याप्रमाणे १७ विनाअनुदानित महाविद्यालयांपैकी ६ महाविद्यालयांची निवड करण्यात आली. निवड केलेल्या महाविद्यालयांची यादी परिशिष्ट 'क' मध्ये दिलेली आहे.

याप्रमाणे निवड केलेल्या अनुदानित ४ महाविद्यालये व विनाअनुदानित ६ महाविद्यालयांतील प्राचार्य, पाठ विभाग प्रमुख, मानस शास्त्र विभाग प्रमुख, सांस्कृतिक कार्यक्रम विभाग प्रमुख, समाजसेवा विभाग प्रमुख, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख, कार्यानुभव विभाग प्रमुख परीक्षा विभाग प्रमुख यांच्या मुलाखती घेण्यात आल्या या प्रतिसादकांच्या डिसेंर १९९८ ते मार्च १९९९ या काळात संशोधकाला सोयीनुसार व प्रसिादकांनी दिलेल्या वेळात मुलाखती घेण्यात आल्या आहेत. मुलाखतीमधून आलेल्या प्रतिक्रियांची प्रकरण पाच मधील कोष्टकाला अनुसरुनमाहिती देण्यात आली आहे.

## ४.८ निरीक्षण तंत्र :-

निरीक्षण ही एक क्रियाशील बा आहे. निरीक्षण हे ज्ञान प्राप्तीचे साधन आहे. व्यक्ती वा व्यक्तिसमूहाला प्रत्यक्ष पाहून त्यांच्या वर्तनाचे विश्लेषण व नोंदी करण्याची व्यवस्थित पदध्ती म्हणजे निरीक्षण होय.

"प्रश्नावली किंवा मुलाखतीप्रमाणे हे साधनप्रयोगावर अवलंबून नसते. प्रश्नावलीत प्रयोज्य माहिती पूरवितो तर निरीक्षणाद्वारे त्याच्या प्रत्यक्ष कृती वा वैशिष्टयातून ही माहिती गोळा केली जाते"- १०

संशोधकाने निरीक्षण कशासाठी, कोणाचे, कोणत्या पद्धतीने, केव्हा व कोठे करायचे याची योजना आखली पाहिजे. संशोधकास निरीक्षण कसे करायचे याचे ज्ञानपाहिजे. निरीक्षणाच्या स्वरुपानुसार निरीक्षणातील नोंदी ताबडतोब करावयाच्या की नंतर करावयच्या हे ठरवता येते. अचूक निरीक्षण होण्यासाठी पदनिश्चयन, मुलाखती, आंतरक्रिया विश्लेषण अभिप्रेरण, पडताळा सूची, अंकपत्र, छायाचित्रण, ध्वनीमुद्रण इ. साधनांचा उपयोग केला जातो. निरीक्षणाच्या उद्दिष्टानुसार आवश्यक

---

१० कित्ता पान नं. २५८

साधनाचा वापर करावा लागतो किंवा वस्तुस्थितीची पाहणी करुन निरीक्षण करता येते.

संशोधकाने आपल्या संशोधन विषयात कोणत्या उद्दिष्टानेकोणत्या गोष्टीचे, कोणत्या कलमाखाली निरीक्षण करावयाचे याची स्पष्ट व विस्तृत योजना सुरुवातीस आखली पाहिजे.

संशोधन समस्येचे स्वरुप व उद्दिष्टे यांचा विचार करुन सदरहू अभ्यासासाठी प्रात्यक्षिक कार्याचे अहवाल, मानसशास्त्रीय प्रयोगशाळा, मानसशास्त्रीय प्रयोगाचे साहित्य, क्रिडांगण, खेळाचे साहित्य, कार्यानुभवांतर्गत उपक्रम, सूक्ष्म पाठ, सराव पाठ इ. बाबीचे संशोधनात निरीक्षण आवश्यक होते. म्हणून संशोधकाने निरीक्षण तंत्राचा वापर करण्याचे निश्चित केले.

वरील बाबीसंबंध प्रश्नावलीतून गोळा झालेली माहिती बरोबर आहे का याची खात्री व्हावी यासाठी संशोधकाने पूर्वनियोजन करुन निरीक्षण करण्याचे ठरवले संशोधकाने निरीक्षणाच्या बाबी निश्चित केल्यावर सहकारी प्राध्यापक व मार्गदर्शन यांच्याशी चर्चा करुन निरीक्षण हे तंत्र तयार केले.

निरीक्षण तंत्रामूळे प्रश्नावलीद्वारे ज्या बाबींची माहिती संकलित झाली. त्याची सत्यासत्यता पडताळून पहता येते. प्रश्नावलीतील माहितीच्या बाबी, मुलाखत आराखड्यातील मुलाखतीचे मूद्दे विचारात घेवूनतज्ञ व मार्गदर्शकांशी चर्चा करुन निरीक्षणासाठी आवश्यक बाबींची सूची तयार करण्यात आली. ही सूची परिशिष्ट'इ' मध्ये दिली आहे.

## <u>४.८.१</u> <u>निरीक्षण तंत्राचा आराखडा :-</u>

सदरहू संशोधन अीयासात प्रात्यक्षिक कार्यांचे अहवाल, मानसशास्त्रीय प्रयोगशाळा, प्रयोगशाळा साहित्य, क्रिडांगण, खेळाचे साहित्य इ. बाबींचे निरीक्षण

करणे आवश्यक होते. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील वरील बाबींची सद्यस्थिती पाहण्यासाठी निरीक्षण या तंत्राचा वापरकरण्यात आला आहे.

निरीक्षणात कोणकोणत्या बाबींचे निरीक्षण करण्यात आले हे परिशिष्ट 'ड्' मध्ये निरीक्षणाची यादी मध्ये देण्यात आले आहे.

## ४.८.२ निरीक्षणासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची निवड :-

मुलाखतीसाठी ज्या पद्धतीने अनुदानित व विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यांची निवड केली, त्याच पद्धतीने निरीक्षणासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची निवड केली, त्याच पद्धतीने निरीक्षणासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यांची निवड करण्यात आली. त्यामुळे मुलाखत आणि निरीक्षणासाठी तीच शिक्षणशास्त्र महाविद्यालय असल्यामुळे मुलाखतीचे वेळीच संशोधकास निरीक्षण ही करता आले.

## ४.९ प्राप्त झालेली माहिती :-

संशोधकाने प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण या साधनांचा व तंत्राचा वार करुन सहरहू अभ्यासासाठी लागणारी आवश्यक माहिती गोळा केली आहे. गोळा केलेल्या माहितीचे संकलन विशदीकरण आणि विश्लेषण प्रकरण क्रमांक पाच मध्ये दिलेले आहे.

प्रकरण पाचवे

# माहितीचे संकलन, विशदीकरण आणि विश्लेषण

संशोधनाच्या संदर्भात कोणती माहिती मिळवायची, केव्हा मिळवायची व कशी मिळवायची याचे नियोजन संशोधनाच्या सुरुवातीस हवे असते. मिळालेल्या माहितीच्या अर्थनिर्वचनासाठी कोणते संख्याशास्त्र वापरायचे हे सुद्धा आधीच ठरवावे लागते त्यामुळे संशोधन प्रक्रियेला एक दिशा मिळते. अनावश्यक माहिती गोळा केली जात नाही. माहितीच्या दर्जावर संशोधनाचा दर्जा अवलंबून असतो. ही माहिती संशोधनाच्या विविध साधनाद्वारे जमा करण्यात येते. सदरहू माहिती संख्यात्मक व गुणात्मक अशा स्वरुपाची असते.

संशोधकाने विविध साधनांच्या द्वारे जी माहिती संकलित केलेली असते. त्यावर पूर्ण लक्ष केंद्रित करुन त्या माहितीची फेररचना करावी लागते. तसे केले नाही तर माहितीच्या ढिगातून काहीही निष्पन्न होणार नाही त्या माहितीतून योग्य अर्थ काढण्यासाठी पुनर्रचना, फेररचना व पुनर्मांडणी करणे आवश्यक असते. या प्रक्रियेलाच संकलित माहितीवर विविध प्रक्रिया करणे असे म्हणतात.

या संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना प्रात्यक्षिक कामाच्या कार्यवाहीत येणाऱ्या समस्यांची माहिती प्रश्नावली, मुलाखत, व निरीक्षण या संशोधन साधनाद्वारे व तंत्राद्वारे मिळवण्यात आलेली आहे. प्रश्नावली, मुलाखत आणि निरीक्षणाद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचे या प्रकरणात संकलनआणि विश्लेषण करण्यात आले आहे. ही माहिती मांडताना प्रथम प्रश्नावली व योग्य त्या ठिकाणी मुलाखत आणि निरीक्षणाद्वारे जमा करुन ती या प्रकरणात क्रमवार कोष्टकात मांडून विश्लेषण करण्यात आले आहे.

## अ) सराव पाठ व सूक्ष्म अध्यापन :

### ५.१ सराव पाठ वेळापत्रक नियोजन :

सराव अध्यापन किंवा सराव पाठ घेणे हा शिक्षण प्रशिक्षणाचा गाभा आहे. यामुळे विद्यार्थी शिक्षकांना प्रत्यक्ष वर्ग अध्यापनाचे विविध अनुभव मिळतात. उत्तम शिक्षक होण्यासाठी विद्यार्थी शिक्षकांना वर्गात यशस्वीपणे शिकविता आले पाहिजे यासाठी केवळ विषयाचे ज्ञान असून चालणार नाही तर ते ज्ञान परिणामकारकरित्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता आले पाहिजे. यासाठी वर्गाध्यापनाचा पद्धतशीर सराव विद्यार्थी शिक्षकांना मिळावा म्हणून महाविद्यालयाकडून प्रात्यक्षिक कामांतर्गत सराव पाठाचे नियोजन केले जाते. प्रत्यक्ष अध्यापन परिणामकारक व पद्धतीशीर कसे करायचे याचे मार्गदर्शन शिक्षणशास्त्र महाविद्यालयात दिले जाते. संबंधित प्राध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थी शिक्षक नियोजित पाठाची रुपरेषा तयार करतो, विद्यार्थी शिक्षकांनी शाळेत जाऊन पाठ घेण्यासाठी सराव पाठशाळांच्या वेळापत्रकानुसार सराव पाठाचे नियोजन केले जाते. सराव पाठाचे नियोजन संबंधित सराव पाठ शाळा, मार्गदर्शक प्राध्यापक, पाठ निरीक्षक, पाठ घेणारे विद्यार्थी शिक्षक व पाठ निरीक्षण करणारे विद्यार्थी-शिक्षक यांच्यासाठी केले जाते. यामुळे सराव पाठशाळा, मार्गदर्शक प्राध्यापक, विद्यार्थी शिक्षक यांना सरावपाठाची रुपरेषा ठरविण्यास मदत होते. सराव पाठाच्या नियोजनामुळे विद्यार्थ्यांना पाठाचे घटक, संबंधित पाठशाळा, पाठाची तासिका, वेळ, विषय या विषयी माहिती मिळते. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सरावपाठाचे नियोजन सराव पाठ विभाग प्रमुख अथवा प्राध्यापक गटवार करतात.

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित बी. एड्. महाविद्यालयांतील सराव पाठाच्या वेळापत्रकाचे नियोजन या विषयी माहिती गोळा करण्यात आले आहे ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. १

### सराव पाठ वेळापत्रक नियोजन

| अ.क्र. | सराव पाठवेळापत्रक नियोजन | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सराव पाठ विभाग प्रमुख करतात. | ९८ | ७८.४ |
| २. | प्राध्यापक गटवार करतात | २७ | २१.६ |
| | एकूण | १२५ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सराव पाठाचे विभाग प्रमुख नियोजन करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७८.४ आहे. प्राध्यापक गटवार सराव पाठाचे नियोजन करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २१.६ आहे.

सराव पाठाचे नियोजन विभाग प्रमुखाने केल्यामुळे महाविद्यालयातील सर्व प्रध्यापक व पाठ असणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकांमध्ये वेळेची समानता राहील तसेच सर्व विद्यार्थी-शिक्षकांना पाठाचे मार्गदर्शन घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे. विभाग प्रमुखाने पाठाचे नियोजन केल्यामुळे एखादा प्राध्यापक रजेवर गेल्यास महाविद्यालयातील ज्या प्राध्यापकास पाठ निरीक्षण नसेल असा प्राध्यापक संबंधित शाळेत जाऊन पाठाचे निरीक्षण करेल त्यामुळे महाविद्यालयाच्या व शाळेच्या नियोजनावर अनिष्ट परिणाम होणार नाही. गटवार पाठाचे नियोजन करताना प्राध्यापक स्वत:च्या सोयीनुसार सराव पाठ शाळांची निवड करुन वेळापत्रक तयार करतात. त्यामुळे त्या गटातील विद्यार्थी शिक्षकांना विविध सराव पाठशाळातून पाठ घेऊन अध्यापक अनुभवातील विविधता व परिणामकारकता अजमावता येणार नाही.

प्राचार्य व सराव पाठ विभागप्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, सराव पाठाचे नियोजन विभाग प्रमुखाने केल्यास विद्यार्थी-शिक्षक, महाविद्यालय व संबंधित शाळा यांच्या सोयीचे होते, तसेच प्राध्यापकाच्या रजेमुळे निर्माण होणारी समस्याही दूर करता येते.

प्राध्यापक गटवार नियोजनामुळे मार्गदर्शन व प्रत्यक्ष पाठ यामध्ये समानता न राहता विविधता निर्माण होते. गटवार प्राध्यापक प्रथम आपली सोय विचारात घेतो व नंतर विद्यार्थी-शिक्षकांचा विचार करतो म्हणून सराव पाठाचे नियोजन विभाग प्रमुखाने करणे अधिक चांगले आहे.

## सराव पाठ वेळापत्रक कालावधी :

विद्यार्थी- शिक्षकांना प्रत्यक्ष वर्गाध्यापनाचा सराव मिळण्यासाठी अध्यापन पद्धतीनुसार दोन विषयाचे प्रत्येकी दहा पाठ. बी.एड्. शैक्षणिक वर्षात घेतले जातात. सरावपाठ होण्यापूर्वी सराव पाठ शाळा, विद्यार्थी शिक्षक,मार्गदर्शक वपाठ निरीक्षक प्राध्यापक यांना सराव पाठ वेळापत्रकाची माहिती नियोजित वेळेपूर्वी दिली जाते. त्यामुळे सराव पाठ वेळापत्रकानुसार सरावशाळांना कामाचे नियोजन, विद्यार्थी-शिक्षकांना पाठाची रुपरेषा, टाचण लेखन व मार्गदर्शक प्राध्यापकांना पाठ मार्गदर्शनासाठी वेळेचे नियोजन करता येते. म्हणून सराव पाठ वेळापत्रक ठराविक दिवस आधी तयार करुन संबांधितांना कळविले जाते.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सराव पाठ वेळापत्रक किती दिवस आधी जाते याची माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. २

## सराव पाठ वेळापत्रक कालावधी

| अ.नं. | सराव पाठ वेळापत्रक कालावधी | प्रतिसादकांचे प्रमाण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | चार दिवस अगोदर | ९ | ७.२ |
| २ | एक आठवडा अगोदर | ९२ | ७३.६ |
| ३ | दोन आठवडा अगोदर | २४ | १९.२ |
| | एकूण | १२५ | १००.० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सराव पाठाचे वेळापत्रक सराव पाठ होण्यापूर्वी चार दिवस आधी लावले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७.२ आहे. सराव पाठाचे वेळापत्रक एक आठवडा अगोदर लावले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७३.६ आहे तर साराव पाठाचे वेळापत्रक दोन आठवडे अगोदर लावले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १९.२ आहे.

सराव पाठाचे वेळापत्रक दोन आठवडे अगोदर लावल्यामुळे सराव पाठ शाळांना सराव पाठाचे वेळापत्रक लक्षात घेवून शाळेतील कार्यक्रमांचे नियोजन करता येते. विद्यार्थी शिक्षकांना शाळेमधून घटक आणणे, पाठाची कच्ची रुपरेषा तयार करुन मार्गदर्शक प्राध्यापकांकडून पाठाची रुपरेषा सम्मत करुन घेणे व पक्के टाचण लिहिणे, पाठाला आवश्यक शैक्षणिक साहित्य जमा करणे शैक्षणिक साहित्य निर्मिती करणे, नमूने गोळा करणे, प्रयोग दिग्दर्शनापूर्वी प्रयोग करुन पहाणे इ. गोष्टींसाठी पूरेसा वेळ मिळतो विद्यार्थी शिक्षकांना पाठाच्या तयारीसाठी पूरेसा वेळ मिळाल्यामूळे सराव पाठातील कृत्रिमता नाहिशी होते. विद्यार्थी शिक्षक पाठास आवश्यक संदर्भ ग्रंथाचे

वाचन करतात. प्रत्येक विद्यार्थी शिक्षकांनी शै. वर्षात वीसपाठ घ्यायचे असतात म्हणून एका आठवड्यात एका विद्यार्थी शिक्षकांना दोनसराव पाठ घ्यावे लागतात त्यामूळे दोनपाठाच्या पूर्व तयारीस चार दिवसकिंवा एक आठवडा अपूरा पडतो व मार्गदर्शक प्राध्यापकांनाही विद्यार्थी शिक्षकांना मार्गदर्शन देण्यास पूरेसा वेळ मिळत नाही. म्हणून पाठ होण्यापूर्वी दोन आठवडे अगोदर वेळापत्रक लावल्याने विद्यार्थी शिक्षक, मार्गदर्शक प्राध्यापकांना पूरेसा वेळ मिळतो.

प्राचार्य व सरावपाठ प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, सराव पाठाचे वेळापत्रक वेळापत्रक नियोजित पाठापूर्वी दोन आठवडे अगोदर लावल्यास विद्यार्थी शिक्षक, सरावपाठ शाळा, मार्गदर्शक प्राध्यापक यांच्या सोयीचे होते. पाठाच्या तयारीस विद्यार्थी शिक्षकांना व पाठ मार्गदर्शनासाठी प्राध्यापकांना पूरेसा वेळ मिळाल्याने पाठ घेण्यातील कृत्रिमता नाहिशी होते व विद्यार्थी शिक्षकांना वर्गाध्यापनाची कौशल्ये आत्मसात करता येतात.

## सराव पाठाची वेळ

विद्यार्थी शिक्षकांना प्रत्यक्ष अध्यापनाचा सराव देण्यासाठी सराव देण्यासाठी अध्यापनपद्धतीची प्रत्येकी दहा आठ शाळांमधून घेतले जातात त्यानुसार सरावपाठाचे वेळापत्रक महाविद्यालयाकडून तयार केले जाते.

"सराव पाठासाठी ३६० तास म्हणजे बी.एड्. शैक्षणिक वर्षातील १२० दिवस प्रत्येकी ३ तास वेळ द्यावा असे शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रम पुस्तिकेत सूचित केले आहे" - १

---

1 - B.Ed. Course [Kolhapur : Shivaji University Kolhapur]

Ordinonces, Regulations, syllabi & list of books prescribed.

P.No. 112

त्यानुसार महाविद्यालयातील वेळापत्रक सराव पाठ कोणत्या वेळात लावले जातात या विषयी गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्र.३

सराव पाठाची वेळ

| अ.नं. | सराव पाठाची वेळ | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | तात्विक विषयाच्या तासिकापूर्वी | २२ | १७.६ |
| २ | तात्विक विषयाच्या तासिकानंतर | ७८ | ६२.४ |
| ३ | आठवड्यातील पूर्ण दोन दिवस | २५ | २०.० |
| | एकूण | १२५ | १००.० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की शिक्षणशास्त्र महाविद्यालयास सराव पाठ तात्विक विषयाच्या तासिकेपूर्वी घेतले जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १७.६ आहे. सराव पाठ तात्विक विषयाच्या तासिकानंतर घेतले जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ६२.४ आहे. तर आठवड्यातील पूर्ण दोन दिवस सरावपाठच घेतले जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २०.० आहे.

सराव पाठ तात्विक विषयाच्या तासिकानंतर लावल्याने विद्यार्थी शिक्षकांना पाठासंबंधी शंका असल्यास त्याचे निरसन करण्यास मार्गदर्शन प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळते. सराव पाठ तात्विक विषयाच्या तासिकापूर्वी असल्यास प्राध्यापक सरावशाळेत निरीक्षणासाठी जातात त्यामुळ इतर विद्यार्थी शिक्षकांनाही मार्गदर्शन व पाठासंबंधी

शंका अडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन मिळत नाही. तसेच तात्विक विषयाच्या तासिकांनाही विद्यार्थी शिक्षक पाठासंबंधी प्रत्याभरण, निरीक्षण याविषयी विचार करतात. त्यामुळे तात्विक विषयाच्या तासिकांना विद्यार्थी - शिक्षकांचे अवधान नसते. काही महाविद्यालयांना परिसरातील माध्यमिक व प्राथमिक शाळा सराव पाठ लावण्यासाठी अपूऱ्या पडतात म्हणून आठवड्यातील दोन दिवस सराव पाठासाठी वापरले जातात त्यावेळी तात्विक विषयाच्या तासिका होत नाहीत. त्यामुळे निरीक्षक प्राध्यापकांना एकाच दिवशी अधिक पाठांचे निरीक्षण करावे लागते याचा निरीक्षण कामावर परिणाम होतो. सराव पाठघेण्यात व निरीक्षण करण्यात कृत्रिमता येते. म्हणून तात्विक विषयाच्या तासिकांपूर्वी पाठ लावणे किंवा आठवड्यातील दोन दिवस सराव पाठ लावणे यापेक्षा तात्विक तासिकानंतर सराव पाठ लावणे अधिक सोयीचे ठरते.

प्राचार्य व सराव पाठ प्रमुख व मुलाखतीवरुन असे दिसून आले की, सराव पाठ महाविद्यालयाच्या तात्विक विषयांच्या तासिकानंतर लावल्याने पाठापूर्वी विद्यार्थी - शिक्षक, मार्गदर्शक प्राध्यापकांच्या अडचणी, शंका दूर करता येतात. पाठ नसलेल्या विद्यार्थ्यांना रिकामा वेळ ग्रंथालयीन कामासाठी व इतर वाचनलेखनासाठी देता येतो. परंतू ज्या महाविद्यालयांना सराव पाठासाठी परिसरातील माध्यमिक वप्राथमिक शाळा पूरेश्या प्रमाणात उपलब्ध होवू शकत नाही ती महाविद्यालये आठवड्यातील दोन दिवस सराव पाठच घेतात. त्यामुळे तात्विक विषयांच्या तासिका होत नाहीत.

## सराव पाठशाळांची उपलब्धता :-

शिक्षक प्रशिक्षण घेताना विद्यार्थी-शिक्षकांना प्रत्यक्ष शाळेत जावून वर्गाध्यापनाचा अनुभव मिळण्यासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या परिसरातील माध्यमिक शाळांमध्ये शाळेच्या पूर्वपरवानगीने सरावपाठ लावले जातात. सराव पाठामूळे विद्यार्थी शिक्षकांना शालेय विषयांच्या विविध अध्यापन पद्धती आत्मसात करुन त्याचा प्रत्यक्षात वापरकरुन परिणामकारकता अभ्यासता येते व वास्तव परिस्थितीत अध्यापनकार्याची

संधी मिळते म्हणून बी.एड्. अभ्यासक्रमाच्या पूस्तिकेत सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कार्यकमानंतर सराव पाठ लावण्यात येतात. सराव पाठासाठी सराव शाळांची उपलब्धता पूरेशा प्रमाणात असणे गरजेचे असते.

शिक्षणशास्त्र विमहाविद्यालयांना सरावपाठ लावण्यासाठी पूरेशा माध्यमिक सराव शाळांची उपलब्धता किती प्रमाणात होते याविषयीची माहिती गोळा केली आहे ती खालील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र.४

माध्यमिक सराव पाशाळांची उपलब्धता

| अ.नं. | माध्यमिक सराव पाठशाळांची उपलब्धता | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ६८ | ५४.४ |
| २ | नाही | ५७ | ४५.६ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, शिक्षण शास्त्र महाविद्यालयांना सराव पाठ प्रात्यक्षिकांतर्गत प्रत्येक विद्यार्थी-शिक्षकाचे प्रत्येकी वीस सराव पाठ घेण्यासाठी पूरेशा माध्यमिक शाळा उपलब्ध होतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५४.४ आहे तर सराव पाठासाठी पूरेशा माध्यमिक शाळा उपलब्ध होत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४५.६ आहे.

सराव पाठ लावण्यासाठी पूरेशा माध्यमिक शाळा उपलब्ध होण्याचे प्रमाण ५४.४ आहे याचा अर्थ जवळ जवळ ५० टक्के शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना सरावपाठ

लावण्यासाठी पूरेशा प्रमाणात माध्यमिक शाळा उपलब्ध आहे. अशा महाविद्यालयातील विद्यार्थी-शिक्षकांना विविध इयत्ता व विविध शाळांमधील अध्यापनाचा अनुभव मिळतो व शाळांमधील विविध उपक्रम, शालेय प्रशासन इ. बाबींचे प्रशिक्षण मिळते.

सरावपाठ शाळांची उपलब्धता होत नाही असा प्रतिसादकांचे प्रमाण ४५.६ आहे अशा महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांना ठराविक इयत्ता, ठराविक शाळा व त्या शाळांचे उपक्रम व प्रशासनाचा अनुभव मिळतो.

महाविद्यालयातील प्राचार्य व सराव पाठ विभागप्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, ग्रामीण भागातील व् तालुका पातळीवरील महाविद्यालयांना पुरेशा प्रमाणात सराव पाठ शाळा उपलब्ध होत नाहीत.कारण अशा महाविद्यालयाच्या परिसरात प्राथमिक व माध्यमिक शाळांची संख्या मर्यादित असल्याने त्याच शाळांमध्ये सरावपाठ लावावे लागतात. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांना विविध शाळांमधील अध्यापन, प्रशासन व उपक्रम यांच्याअनुभवाची संधी मिळत नाही म्हणून प्रशिक्षण महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी देण्यापूर्वी त्या गावातील व शहरातील माध्यमिक शाळांची संख्या विचारात घेण्यात यावी. शाळांची संख्या पुरेशा प्रमाणात असेल तरच महाविद्यालय सुरु करावे कारण सरावपाठांसाठी म ाध्यमिक शाळांची संख्या महत्वाची आहे.

## सराव पाठासाठी अन्य मार्ग :-

शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना प्रत्येक विद्यार्थी शिक्षकांचे वीस सराव पाठ घेण्यासाठी परिसरातील माध्यमिक शाळा पूरेशा प्रमाणात उपलब्ध होवू शकत नसतील तर इतर मार्गाचा अवलंब करावा लागतो. प्राथमिक शाळांना जोडलेल्या ५ वी ते ७वी च्या वर्गावर पाठ लावले जातात.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना सराव पाठासाठी पूरेशा प्रमाणात माध्यमिक शाळा उपलब्ध न झाल्यास अन्य कोणत्या मार्गाचा अवलंब केलाजातो या विषयी माहिती

गोळा केली ती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ५

## सराव पाठासाठी अन्य मार्ग

| अ.नं. | सराव पाठासाठी अन्य मार्ग | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शाळेत पाठ लावले जातात | २६ | ४५.६३ |
| २ | उपलब्ध माध्यमिक शाळेत अधिक पाठ लावले जातात | ६ | १०.५२ |
| ३ | पूर्ण दिवस पाठ सप्ताह घेतली जाते | २५ | ४३.८५ |
| | एकूण | ५७ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनाविद्यार्थी शिक्षकांचे सराव पाठ पूर्ण करुन घेण्यासाठी माध्यमिक शाळा पूरेशा प्रमाणात उपलब्ध न झालेले प्राथमिक शाळेत पाठ लावले जातात अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४५.६३ आहे, उपलब्ध माध्यमिक शाळेत अधिक पाठ लावले जातात अशा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १०.५२ आहे तर पूर्ण दिवस पाठ सप्ताह घेतला जातो अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४३.८५ आहे.

पूरेशा माध्यमिक शाळा उपलब्ध न झाल्याने ४५.६३ टक्के सराव पाठ प्राथमिक शाळेत लावले जातात. बी.एड्. प्रशिक्षण माध्यमिक शिक्षकांसाठी असून माध्यमिक स्तरावर सराव पाठ घेणे गरजेचे आहे. प्राथमिक शाळेत सराव पाठ घेतल्याने माध्यमिक स्तरावरील पाठाचा अनुभव तुलनात्मक कमी मिळतो.

सराव पाठ पूर्ण करुन घेण्यासाठी परिसरातील उपलब्ध माध्यमिक शाळांमध्ये

अधिक पाठ लावल्याने त्याच त्या शाळेत सराव पाठ घेतल्याने विद्यार्थी शिक्षकांना विविध माध्यमिक शाळांतील अध्यापनाचा सराव मिळत नाही व उपलब्ध माध्यमिक शाळांच्या शालेय नियोजनावर ही परिणाम होतो. उपलब्ध तासिकांपैकीच सराव पाठासाठी अधिक तासिका दिल्याने त्या शाळेतील शिक्षक नाखूष असतात.

सराव पाठ पूर्ततेसाठी पूर्ण दिवस पाठ सप्ताह घेतल्याने शाळेच्या दैनंदिनकामकाजात अडथळे येतात व महाविद्यालयाच्या वेळापत्रकानुसार तात्विक विषयाच्या तासिका होत नाही, तात्विक विषयाकडे दुर्लक्ष होते.

प्राचार्य व सराव पाठ विभाग प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसू येते की, महाविद्यालयाच्या परिसरात पूरेशा माध्यमिक शाळा उपलब्ध नसल्याने प्राथमिक शाळांमध्ये पाठ लावावे लागतात त्यामुळे प्रशिक्षार्थींना माध्यमिक ज्ञानांमधील शैक्षणिक अनुभव पुरेसा मिळत नाही. तसेच काही महाविद्यालयांच्या परिसरात दोन्ही स्तरावरील शाळांची संख्या अतिशय मर्यादित असल्यामुळे पाठ पूर्ण करण्यासाठी पूर्ण दिवस पाठ सप्ताह घ्यावा लागतो. पूर्ण दिवस पाठ घेतल्यामुळे महाविद्यालयाच्या दैनंदिन प्रशासनावर परिणाम होतो.

## सराव पाठासाठी शाळांचे सहकार्य :

विद्यार्थी शिक्षकांचे सराव पाठ माध्यमिक शाळांमध्ये लावले जातात. महाविद्यालयाला शालेय वेळापत्रक देणे, पाठ लावण्यास संमती देणे, विद्यार्थी शिक्षकांना वेळेत पाठाचे पाठ्यांश देणे, शाळांच्या सुट्टयांची यादी देणे इ. बाबीसाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालये शाळांवर अवलंबून असतात म्हणून सराव पाठ व शालेय अनुभव कार्यक्रमासाठी शाळांचे सहकार्य आवश्यक आहे.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना सराव पाठासाठी शाळांचे सहकार्य देतात का याविषयी माहिती गोळा केले ती खाली प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ६

## सराव पाठासाठी शाळांचे सहकार्य

| अ.नं. | सराव पाठासाठी शाळांचेसहकार्य मिळते का? | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १२५ | १००.०० |
| २ | नाही | - | - |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना सराव पाठासाठी शाळांचे सहकार्य मिळते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १००.०० आहे.

महाविद्यालयांना परिसरातील शाळा सराव पाठ लावण्या परवानगी देवून सहकार्य देतात, परंतू पाठ घेण्यासाठी पाठ्यांश वेळेत देणे, शाळाच्या सूट्टयांची यादी देणे, शाळेच्या पूर्ववेळेत व पूर्व वेळापत्रकात झालेला बदल न कळवणे याबाबत सहकार्य देत नाही, त्यामुळे सरावपाठ नियोजित वेळेत पूर्ण होण्यास अडचणी येतात. यासाठी सरावशाळा व शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्यामध्ये सुसंवाद असणे आवश्यक आहे. महाविद्यालयांनी शाळांनी संपर्क ठेवून शालेय वेळापत्रकातील बदल, वेळेतील बदल, याबाबत माहिती घेणे आवश्यक आहे.

प्राचार्य व सराव पाठ विभाग प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, परिसरातील शाळा सराव पाठ लावण्याबाबत १०० टक्के सहकार्य देतात परंतू पाठाच्या कार्यवाहीसाठी पाठ्यांश वेळेत देत नाहीत शाळेच्या वेळेत व वेळापत्रकात झालेले बदल कळवत नाहीत. याचा पाठपूर्तिच्या नियोजनावर परिणाम होतो.

## सरावशाळांकडून सहकार्य मिळणाऱ्या बाबी :-

सरावपाठांच्या कार्यवाहीसाठी महाविद्यालयांना सराव शाळांकडन सहकार्य मिळते. परंतू सरावशाळा शालेय वेळाप्रकातील बदल, अचानक जाहिर झालेल्या सुट्या शालेय परीक्षा याबाबत महाविद्यालयांना पूर्वसूचना देत नाहीत त्याचा परिणाम पाठ नियोजन व सराव पाठाच्या पूर्ततेवर होतो.

सरावशाळा महाविदयालयांनाकोणकोणत्या बाबतीय सहकार्य करत नाहीत याबाबत माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे आहे.

### कोष्टक क्र.७

### सराव शाळांकडून सहकार्य न मिळणाऱ्या बाबी

| अ.नं. | सरावशाळा खालीलबाबत सहकार्य देत नाहीत | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शाळेच्या वेळापत्रकातील बदल कळवत नाहीत. | १९ | ३९.३८ |
| २ | शाळेच्यासुट्ट्यां व वेळांमध्ये झालेल्या बदलांची पूर्वसूचना देत नाहीत | १५ | ३१.२६ |
| ३ | विद्यार्थी शिक्षकांना वेळेवर पाठ्यांश दिला जात नाही. | १४ | २९.१६ |
| | एकूण | ४८ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की सरावशाळा शाळेच्या वेळाप्रकातील बदल कळवत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३९.५८ आहे, सराव शाळा महाविद्यालयांना शाळेच्या सूट्ट्या व वेळामध्ये झालेल्या बदलांची पूर्वसूचना देत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३१.२६ आहे तर विद्यार्थी शिक्षकांना वेळेवर पाठ्यांश दिला जात नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २९.१६ आहे.

सराव शाळांच्या वेळाप्रकानुसार सराव पाठ लावले जातात, शाळेच्या वेळापत्रकातील बदल जर सराव शाळेने कळवले नाही तर महाविद्यालयापूर्वीच शाळेच्या वेळापत्रकाप्रमाणे विषयवार तास लावता येत नाहीत. पूर्वीच्याच वेळापत्रकाप्रमाणे तास लावल्याने प्रत्यक्षात वेगळ्याच विषयांचे असल्याने काही शिक्षक वेळापत्रकातील बदल करण्यास तयार होत नाहीत त्यामूळे पाठ रद्द करावे लागतात. त्यामुळे महाविद्यालयाचे सराव पाठाचे नियोजन विद्यार्थी शिक्षकांची पाठाची तयारी पाठ मार्गदर्शन वाया जाते म्हणून सरावशाळांनी वेळापत्रकातील बदल कळविल्यास वरील अडचणी दूर होतील.

सराव शाळांनी शाळेच्या सुट्ट्या व वेळांमध्ये झालेल्या बदलाची पूर्वसूचना दिली नाही तर महाविद्यालये पूर्वीच्या वेळातच पाठ लावतात. व प्रत्यक्षात शाळेच्या वेळात बदल झाल्याने विद्यार्थी शिक्षक पाठाच्या वेळेत उपस्थित राहू शकत नाही, काही वेळा पूर्वीच्याचवेळेनुसार विद्यार्थी शिक्षक पाठ घेण्यास जातात तेव्हा शाळा सूटलेली असतात किंवा शाळेच्या वेळेपूर्वी विद्यार्थी शिक्षक शाळेत जातात त्यामूळे त्यांचा वेळ वाया जातो. म्हणून शाळांनी सुट्ट्या व वेळांमध्ये झालेल्या बदलांची पूर्वसूचना महाविद्यालयांना द्यावी.

सराव शाळेकडून विद्यार्थी-शिक्षकांना शिक्षक भेटत नाहीत त्यामुळे पाठ्यांश वेळेवर मिळत नाही म्हणून पाठ नियोजन, पाठमार्ग दर्शन याबाबत वेळ अपूरा मिळतो

व अपूऱ्या वेळेमूळे पाठ मार्गदर्शनासाठी रद्द करावा लागतो यामुळे रद्द झालेले पाठ पुन्हा लावण्यासाठी महाविद्यालयाच्या सराव पाठनियोजनावर ताण पडतो. म्हणून सरावशाळांनी विद्यार्थी शिक्षकांना वेळेवर पाठ्यांश द्यावेत.

प्राचार्य व सराव पाठ विभाग प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, सराव शाळांनी वेळापत्रकातील बदल न कळवल्याने पूर्वीच्याच वेळापत्रका प्रमाणे पाठ लावले जातात. प्रत्यक्षात वेगळ्याच विषयांचे तास असल्याने पाठ घेण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांची परवानगी घ्यावी लागते.

सराव शाळांना सुट्ट्या व वेळेतील बदल यांची पूर्वसूचना न दिल्याने विद्यार्थी शिक्षक शाळेच्या पूर्ववेळेनुसार पाठ घेण्यास जातात परंतू वेळेतील बदलामुळे त्या विषयाची तासिका झालेली असते व पुन्हा पाठ घेण्यासाठी मुख्याध्यापक किंवा पर्यवेक्षकांची परवानगी घ्यावी लागते. व परवानगी न मिळाल्यास पाठ रद्द होतात.

विद्यार्थी शिक्षकांना सराव शाळांकडून वेळेवर पाठ्यांश मिळाला नाही पाठ नियोजन पाठ मार्गदर्शन या बाबीसाठी पूरेसा वेळ मिळाला नाही तर पाठ रद्द होतात, रद्द झालेले पाठांचे पुन्हा नियोजन करावे लागते यामुळे अतिरिक्त काम वाढते म्हणून सराव शाळांनी विद्यार्थी शिक्षकांना वेळेवर पाठ्यांश देण्याची व्यवस्था करावी.

## <u>सराव पाठांचे पाठ्यांश :</u>

सराव पाठ घेण्यासाठी विद्यार्थी-शिक्षक पाठ्यांश सराव शाळांकडून घेतात व त्यानुसार पाठाचे नियोजन करतात. काही सरावशाळांमधून पाठ्यांश आणण्याची व्यवस्था महाविद्यालयांना करावी लागते. तसेच विद्यार्थी शिक्षक शाळांमध्ये जावून स्वत: पाठ्यांश आणतात.

महाविद्यालयात सराव पाठाचे पाठ्यांश कोण आणतात याबाबत माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ८

## सराव पाठाचे पाठ्यांश

| अ.नं. | महाविद्यालयात सराव पाठांचे पाठ्यांश कोण आणतात? | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थी शिक्षक पाठ्यांश स्वत: जावून आणतात | ७२ | ५७.६ |
| २ | काही शाळांमधून महाविद्यालया मार्फत पाठ्यांश घेतले जातात. | २१ | १६.८ |
| ३ | पहिला व दूसरा पर्याय | ३२ | २५.६ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सराव पाठासाठी विद्यार्थी शिक्षक पाठ्यांश स्वत: जावून आणतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५७.६ आहे, काही शाळांमधून महाविद्यालयांमार्फत पाठ्यांश घेतले जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १६.८ आहे तर विद्यार्थी शिक्षक पाठ्यांश आणतात व प्रशासकीय नियमामुळे काही शाळा पाठ्यांश पाठवून देतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २५.६ आहे.

विद्यार्थी शिक्षकांनी सराव पाठाचे पाठ्यांश स्वत: जावून आणल्यास, त्या शाळेतील विषय शिक्षकांशी पाठ्यांश निवड, वर्गातील विद्यार्थी रचना व स्तर, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद, शैक्षणिक साहित्य उपलब्धता, शै. साधनदिग्दर्शनसाठी आवश्यक बाबी व साहित्य याबाबत चर्चा करता येते. बाबींचा विचार पाठनियोजनात करता येतो.

काही शाळांच्याप्रशासकीय नियमांमुळे विशेषत: मुलींच्या माध्यमिक शाळांमधून महाविद्यालयामार्फत पाठ्यांश घेतले जातात, त्यामुळे विद्यार्थी-शिक्षकांना पाठ नियोजनापूर्वी वर्गरचना विद्यार्थी प्रतिसाद, विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, शै. साहित्य उपलब्धता याबाबींवर संबंधित विषयशिक्षकांनी चर्चा करता येत नाही.

म्हणून सराव पाठांचे पाठ्यांश महाविद्यालयामार्फत शाळांकडून घेण्याऐवजी, विद्यार्थी शिक्षकांनी स्वत: शाळेमध्ये जावून पाठांचे पाठ्यांश आणणे अधिक योग्य आहे.

प्राचार्य व सराव पाठ विभागप्रमुख यांच्या मुलाखती वरुन असे दिसून आले की, विद्यार्थी शिक्षकांनी शाळेत जावून पाठ्यांश आणल्यास संबंधित शाळेतील वर्ग माहित होतो तासिकांची वेळ समजते व विषय शिक्षकांशी विद्यार्थी रचना, विद्यार्थी सहभाग, प्रतिसाद साहित्य उपलब्धता याबाबत चर्चा करता येते.

काही विद्यार्थी शिक्षकांनी स्वत: शाळेत जावून पाठ्यांश आणणे आवश्यक आहे अशा शाळांनी प्रशिक्षार्थींना पाठ्यांश घेण्यास येण्याची परवानगी द्यावी.

<u>सराव पाठांचे पाठ्यांश आणण्याबाबत अडचणी :</u>

विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठ घेण्यासाठी शाळांमधून पाठ्यांश आणावे लागतात. शाळेतील संबंधित विषय शिक्षक पाठाचा पाठ्यांश देतात त्यानुसार पाठ नियोजन करुन पाठ घेतला जातो. विद्यार्थी शिक्षकांना पाठ्यांश वेळेत मिळालयास कार्यवाही करणे सुलभ जाते.

महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांना सरावशाळांमधून सराव पाठांचे पाठ्यांश आणण्यात अडचणी येतात की नाही याबाबत माहिती गोळा केली. ती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ९

### सरावपाठांचे पाठ्यांश आणण्याबाबत अडचणी

| अ.नं. | सरावपाठाचे पाठ्यांश आणण्याबाबत अडचणी येतात का? | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ७४ | ६१.२ |
| २ | नाही | ५१ | ३८.८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून आले की, सराव विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठाचे पाठ्यांश आणण्यस अडचणी येतात असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ६१.२ आहे तर सराव पाठाचे पाठ्यांश आणल्यास अडचणी येत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्याचं प्रमाण ३८.८ आहे.

विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठांचे पाठ्यांश आणण्याबाबत अडचणी येतात याचे प्रमाण ६१.२ आहे. हे प्रॅमाण विचारात घेण्यासारखे आहे. विद्यार्थी शिक्षक पाठ्यांश आणण्यास शाळेत जातात तेव्हा शिक्षक वर्गाध्यापन करताना पाठ्यांश देत नाहीत, काहीवेळा माधल्या सुट्टीत शिक्षक भेटत नाहीत किंवा शाळा सुटल्यावर पाठ्यांश घेण्यासाठी यावयास सांगतात वरील अडचणीमुळे विद्यार्थी शिक्षकांना काही वेळेत २-३ वेळा आणण्यासाठी शाळेमध्ये जावे लागते. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांचा वेळ वाया जातो, व पाठ्यांश वेळेत न मिळाल्यास मार्गदर्शनासाठी पूरेस अवधी नसेल तर पाठ रद्द होतो. रद्द पाठाचे पुनर्नियोजनासाठी पुन्हा वेळ द्यावा लागतो. त्यामुळे सराव पाठ नियोजित वेळेत पूर्ण होत नाहीत. म्हणून शाळेतील संबंधित शिक्षकांनी विद्यार्थी शिक्षकांना पाठांचे पाठ्यांश वेळेत द्यावेत.

ज्या विद्यार्थी शिक्षकांना शाळेतून पाठांचे पाठ्यांश आणण्यास अडचणी येत नाहीत अशा महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांचे पाठ नियोजनानुसार वेळेत पूर्ण होतात. त्यामुळे शैक्षणिक कामकाजात सुलभता येते.

प्राचार्य व सराव पाठ विभाग प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, शाळा सराव पाठ लावण्याबाबत सहकार्य करतात परंतू पाठांचे पाठ्यांश आणण्याबाबत विद्यार्थी शिक्षकांना अडचणी येतात. संबंधित विषय शिक्षक रजेवरअसतील किंवा मधल्या सुट्टीत भेटले नाहीत तर विद्यार्थी शिक्षकांना एका पाठाचे पाठ्यांश आणणयासाठी २ ते ३ वेळा जावे लागते. काही वेळा मार्गदर्शनात वेळ अपूरा असेल तर विद्यार्थी शिक्षकांचे पाठ रद्द केल्याने ते पाठ पुन्हा लावावे लागतात त्यामुळे पाठनियोजनावर अतिरिक्त ताण येतो.

काही महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांना शाळेतून पाठ्यांश आणण्यात अडचणी येत नाहीत त्यामूळे पाठयांश आणण्यात अडचणी येत नाहीत त्यामळे पाठ नियोजित वेळेत पूर्ण होतात. म्हणून विद्यार्थी शिक्षकांना पाठ्यांश वेळेत मिळण्याची व्यवस्था करावी.

## पाठ मार्गदर्शन :

विद्यार्थी शिक्षक पाठ घेण्यापूर्वी पाठटाचण मार्गदर्शक प्राध्यापकांकडून तपासून घेतात व पाठाचे मार्गदर्शन घेतात. पाठटाचण लेखन, शैक्षणिक उद्दिष्ट्ये पूर्ततेसाठी आवश्यक आशय, त्यासाठी योग्य अध्यापन पद्धतीची निवड, अध्यापन तंत्रे क्लृप्त्यांचा वापर, शैक्षणिक अनुभूती कृतिक्रम, शैक्षणिक साहित्याचा वापर मूल्यमापन इ. बाबींचे मार्गदर्शन घ्यावे लागते.

महाविद्यालयातील मार्गदर्शक प्राध्यापकांना विद्यार्थी शिक्षकांना पूरेसा वेळ मिळतो की नाही याबाबत माहिती गाळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. १०

## पाठ मार्गदर्शनासाठी वेळ

| अ.नं. | पाठ मार्गदर्शनास पूरेसा वेळ मिळतो का? | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ६० | ४८ |
| २ | नाही | ६५ | ५२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, प्राध्यापकांना पाठ मार्गदर्शनास पूरेसा वेळ मिळतो असा प्रतिसाद देणाऱ्याचे प्रमाण ४८.०० आहे तर पाठ मार्गदर्शनास पूरेसा वेळ मिळत नाही असा प्रतिसाद देणाऱ्याचे प्रमाण ५२.० आहे.

पाठ मार्गदर्शनास प्राध्यापकांना पूरेसा वेळ मिळाल्यामुळे विद्यार्थी शिक्षकांबरोबर पाठ नियोजन व अध्यापन याविषयी चर्चा होते त्यामुळे पाठ यशस्वी होतात व नियोजित वेळेत पाठ घेतल्याने महाविद्यालयाचे सरावपाठाचे काम सुरळीत होते.

पाठ मार्गदर्शनास प्राध्यापकांना पूरेसा वेळ मिळत नाही याचे प्रमाण ५२.०० असते हे प्रमाण विचार करण्यासारखे आहे. पाठ मार्गदर्शनास वेळापत्रकात दिलेलया तासिका पूरतनसल्याने प्राध्यापकांना महाविद्यालयीन वेळेपूर्वी किंवा महाविद्लयालयीन वेळेनंतर मार्गदर्शन द्यावे लागते तसेच या तासिका व्यतिरिक्त प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षकांना असणाऱ्या रिकाम्या तासिकेला मार्गदर्शन द्यावे लागते. म्हणून प्रत्येक अध्यापनपद्धतीच्या प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षक यांच्या प्रमाणात बदल करावा.

प्राध्यापकांकडे विद्यार्थी शिक्षकांची संख्या सध्याच्या प्रमाणापेक्षा कमी केल्यास प्राध्यापकांना पाठ मार्गदर्शनासाठी दिलेला कालावधी पूरेसा होईल.

प्राचार्य व सराव विभाग प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, ज्या महाविद्यालयात मार्गदर्शक प्राध्यापकांना मार्गदर्शनास पूरेसा वेळ मिळतो त्यांचे सराव पाठ वेळेत पूर्ण होतात. काही महाविद्यालयात अध्यापन पद्धतीनुसार प्राध्यापकांची नेमणूक न केलयाने इतर प्राध्यपकांवर पाठ मार्गदर्शनाचे अतिरिक्त काम पडते. तसेच विद्यार्थी संख्येचेप्रमाण अधिक असल्याने उपलब्ध वेळ मार्गदर्शनासाठी पूरेसा होत नाही. म्हणूनमहाविद्यालयात अध्यापनपद्धती नुसार प्राध्यापक नेमणूक करावी.

## पाठ मार्गदर्शनासाठी अन्य व्यवस्था :-

विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठ घेण्यापूर्वी प्राध्यापकांच्यामार्गदर्शनाची गरज असते. सराव पाठाचा घटक, शैक्षणिक उद्दिष्ये व त्याची स्पष्टीकरणे, शैक्षणिक अनुभूती, मूल्यमापन इ. गोष्टी लक्षात घेवून पाठटाचण लिहून पाठ घेण्याबाबत मार्गदर्शनासाठी प्राध्यापकानी पूरेसा वेळ देणे आवश्यक असते. एका आठवड्यातील सराव पाठाविषयी मार्गदर्शन देण्यसाठी पूरेसा वेळ न मिळाल्यास प्राध्यापकांना पर्यायी व्यवस्था करावी लागते.

महाविद्यालयात पाठ मार्गदर्शनास प्राध्यापकांना पूरेसा वेळ न मिळाल्यास कोणती व्यवस्था करतात याविषयी माहिती गोळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ११

## पाठ मार्गदर्शनासाठी अन्य व्यवस्था

| अ.नं. | पाठ मार्गदर्शनासाठी अन्य | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | महाविद्यालयीन वेळेपूर्वी पाठ मार्गदर्शन | १ | १.५४ |
| २ | महाविद्यालयीन वेळेनंतर पाठ मार्गदर्शन | १० | १५.४८ |
| ३ | पाठमार्गदर्शनाच्यातसेच प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षकांच्या रिकाम्या तासिकेत | ५४ | ८२.९८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून आले की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठाच्या मार्गदर्शनासाठी पूरेसा वेळ न मिळाल्या महाविद्यालय सुरु होण्यापूर्वी मार्गदर्शन देतात असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण १.५४ आहे. महाविद्यालयीन वेळेनंतर पाठाचे मार्गदर्शन करतात असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण १५.४८ आहे. पाठमार्गदर्शनासाठी व प्राध्यापक, विद्यार्थी शिक्षकांच्या रिकाम्या तासिकेत मार्गदर्शन दिले जाते असा प्रतिसाद देणाऱ्याचे प्रमाण ८२.९८ आहे.

पाठ मार्गदर्शनासाठी दिलेलया तासिका तसेच मार्गदर्शक व विद्यार्थी शिक्षकांना महाविद्यालयाच्या रिकाम्या तासिकेत पाठाचे मार्गदर्शन दिल्यास अधिक वेळ मिळते असा प्रतिसाद देणाऱ्याचे प्रमाण ८२.९८ आहे यावरुन पाठ मार्गदर्शन या काळात

घेतल्यास सर्वांना व्यवस्थित मार्गदर्शन मिळते.

महाविद्यालय वेळेपूर्वी व महाविद्यालयाची वेळ संपलयानंतर पाठ मार्गदर्शन दिले जाते त्याचे प्रमाण (१.५४ + १५.४८) १७.०२ आहे हे प्रमाण अत्यल्प आहे.

प्राचार्य व सराव पाठ विभाग प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, पाठमार्गदर्शन तासिका तसेच र्मादर्शक व विद्यार्थी शिक्षकांना महाविद्यालयीन वेळेत मिळणाऱ्या रिकाम्या तासिका यांचा वापर केलयास मार्गदर्शनास पूरेसा वेळ मिळतो. महाविद्यालयाच्या वेळेपूर्वी व महाविद्यालय सूटल्यांनंतर मार्गदर्शन करण्यास व मार्गदर्शन घेण्यास दोघेही उत्सूक नसतात त्यामुळे या पद्धतीचा मार्गदर्शन घेण्यास दोघांचाविरोध दिसून येतो.

## सराव पाठ मार्गदर्शन कालावधी :

महाविद्यालयात सरावपाठाचे वेळापत्रक लागल्यानंतर विद्यार्थी शिक्षक संबंधित सरावशाळांमधून घटक आणतात व कच्चे पाठटाचण तयार करतात. विद्यार्थी शिक्षकांची कच्च्ये पाठटाचणे तपासून पाठाविषयी मार्गदर्शन तज्ञ प्राध्यापक देतात व त्यानंतर पक्के टाचण लिहून विद्यार्थी-शिक्षक सराव पाठ घेतात. मार्गदर्शक प्राध्यापक सराव पाठापूर्वी मार्गदर्शन किती दिवस अगोदर घ्यायचे याविषयी सूचना विद्यार्थी शिक्षकांना देतात. पाठ्टाचण लेखन व पाठमार्गदर्शनास पूरेसा वेळ मिळाल्याने विद्यार्थी शिक्षकांच्या त्रूटी त्यांच्या लक्षात आणून देता येतात.

महाविद्यालयात सराव पाठ घेण्यासाठी पाठाचे मार्गदर्शन किती दिवस आधी दिले जाते या विषयी गोळा केलेली माहिती खालीप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. १२

## सराव पाठ मार्गदर्शनासाठी कालावधी

| अ.नं. | सराव पाठ मार्गदर्शनाचा कालावधी | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कमीत कमी एक दिवस अगोदर | २६ | २०.८ |
| २ | तीन दिवस अगोदर | ७८ | ६२.४ |
| ३ | एक आठवडा अगोदर | २१ | १६.८ |
| | एकूण | १२.५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सराव पाठ मार्गदर्शन सराव पाठ घेण्यापूर्वी कमीत कमी एक दिवस अगोदर देण्यात येतो अस प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २०.८ आहे, पाठाचे मार्गदर्शन तीन दिवस अगोदर देण्यात येतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ६२.४ आहे, एक आठवडा अगोदर पाठाचे मार्गदर्शन करण्यात येते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रसिादकांचे प्रमाण १६.८ आहे.

विद्यार्थी शिक्षकांना २० सराव पाठ करण्यासाठी प्रत्येक आठवड्यात एक किंवा दोन पाठ घ्यावे लागातात. सेवापूर्व प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी शिक्षकांना वर्ग अध्यापनाचा अनुभव सराव पाठा द्वारे दिला जातो. पाठ घेण्यापूर्वी एका तासिकेसाठी पाठ्यघटक किती निवडावा, उद्दिष्ट्ये निश्चिती, पाठ टाचण लेखन, शैक्षणिक अनुभूती व शै. साहित्य निर्मिती इ. बाबतच्या मार्गदर्शनासाठी प्राध्यापकांना पूरेसा वेळ द्यावा लागतो. एक आठवडा अगोदर पाठाचे मार्गदर्शन मिळाल्यास वरील बाबींचा सखोल विचार करुन पाठटाचण सूचवलेला बदल लक्षात घेवून पाठाची तयारी करण्यासाठी विद्यार्थी शिक्षकांना पूरेसा वेळ मिळतो. कमीत कमी एक दिवस अगोदर किंवा पाठापूर्वी तीन दिवस अगोदर पाठ मार्गदर्शन घेतल्यास पाठासाठी सूचवलेले बदल, शैक्षणिक

साहित्य निर्मिती, घटकास आवश्यक संदर्भ वाचन इ. बाबीसाठी विद्यार्थी शिक्षकांनापूरेसा वेळ मिळत नाही म्हणून पाठ मार्गदर्शनासाठी तीन दिवस किंवा कमीत कमी एक आठवडा अगोदर पाठ मार्गदर्शनाची व्यवस्था करावी एक दिवस अगोदर पाठ पार्गदर्शन देण्याची व्यवस्था नसावी·कारण एका दिवसात पाठ घेण्यासाठी लागणारी तयारी होत नाही व त्याच्या अनिष्ट परिणाम प्रत्यक्ष पाठावर होतो.

प्राचार्य व सराव पाठ प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, नियोजित पाठापूर्वी तीन दिवस अगोदर व एक आठवडाअगोदर मार्गदर्शन केल्यास पाठ घेण्यासाठी लागणारी सर्व प्रकारची पूर्वतयारी करणे शक्य होते. एक दिवस अगोदर पाठाचे मार्गदर्शन देण्यास येवू नये त्यामुळे पाठाचीपूर्व तयारी होत नाही व त्याचा परिणाम प्रत्यक्ष वर्ग अध्यापनावर अनिष्ट होतो म्हणून सराव पाठ मार्गदर्शनाचा कालावधी एक दिवस अगोदर ठेवण्यात येवू नये.

## सराव पाठ घेताना विद्यार्थी शिक्षकांना येणाऱ्या अडचणी :

विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठाद्वारे वर्गाध्यापनाचा अनुभव मिळतो. सराव पाठाची यशस्वीता विद्यार्थी शिक्षकांनी केलेले अध्यापन विद्यार्थ्यांचा सहभाग व प्रतिसाद वर्गव्यवस्था पन, आशयमांडणी, वातावरण निर्मिती, शैक्षणिक अनुभूती इ. वर अवलंबून असते. विद्यार्थी शिक्षक पाठ घेताना शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग, प्रतिसाद यावर पाठाची परिणामकारकता अवलंबून असतात. दरवर्षी शाळांमध्ये सराव पाठ होत असल्याने विद्यार्थ्यांना पाठाचे गांभिर्य नसते. म्हणून विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठ घेताना शोतील विद्यार्थ्याबाबत अडचणी येतात.

शाळेत सराव पाठ घेताना विद्यार्थी शिक्षकांना कोणकोणत्या अडचणी येतात याबाबत माहिती गोळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

**कोष्टक क्र. १३**

**सराव पाठ घेताना विद्यार्थी शिक्षकांना येणाऱ्या अडचणी**

| अ.नं. | सराव पाठ घेताना वि.शि. ना येणाऱ्या अडचणी | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वर्ग नियंत्रण बाबत | ३६ | २८.८ |
| २ | शालेय विद्यार्थी सराव पाठास प्रतिसाद देत नाहीत | १३ | १०.४ |
| ३ | सराव पाठ चालू असताना अन्य कृती करतात | ०८ | ६.४ |
| ४ | पाठाच्या अपेक्षित पूर्वज्ञानाचा अभाव असतो. | ०९ | ७.२ |
| ५ | झालेला घटक शिकवल्यासपाठाकडे देत नाहीत | १५ | १२.० |
| ६ | पर्याय १,२,३,४,५ सर्व | ४४ | ३५.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सराव पाठ घेताना विद्यार्थी शिक्षकांना वर्ग नियंत्रणाबाबत अडचण येते असा प्रतिसादं देणाऱ्याचे प्रमाण २८.८ आहे, शालेय विद्यार्थी सराव पाठास प्रतिसाद देत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण १०.४ आहे, सराव पाठ चालू असताना विद्यार्थी अन्य कृती करतात असाप्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ६.४ आहे, पाठाच्या अपेक्षित पूर्वज्ञानाचा अभाव असतो असा प्रतिसाद देणाऱ्या

प्रतिसादकांचे प्रमाण ७.२ आहे, झालेला घटक शिकवल्यास पाठाकडे लक्ष देत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण १२.० आहे, वरील सर्व पर्यायबाबत प्रतिसाद देणाऱ्याचं प्रमाण ३५.२ आहे.

विद्यार्थी शिक्षक सराव पाठ घेताना वर्ग नियंत्रणाबाबत अडचणी येतात असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण २८.८ आहे व हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे कारण बहुसंख्य शाळांमध्ये वर्गनियंत्रणाची समस्या जाणवते. वर्गनियंत्रणाबाबत वर्गातील वाढती विद्यार्थी संख्या हे एकमेव कारण दिसून येते.

वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे शाळा शिस्त ही समस्या जाणवते विद्यार्थी सराव पाठास प्रतिसाद देत नाहीत. पाठाकडे जाणून बूजून दूर्लक्ष करतात, चूकीची उत्तरे देतात.

सराव पाठास दिलला पाठ्यांश पुन्हा शाळेतील शिक्षक शिकवितात त्यामुळे सराव पाठ चालू असताना विद्यार्थी इतर विषयांचे स्वाध्याय, गृहपाठ लेखन इ. अन्य कृती करतात.

विद्यार्थी शिक्षक पाठाचे नियोजन करताना वर्गाचे अपेक्षित पूर्वज्ञान गृहीत धरतात. व त्यानुसार प्रस्तावना करतात. काही वेळा विद्यार्थ्यांमध्ये पाठाच्या अपेक्षित पूर्वज्ञानाचा अभाव असतो त्यामूळे पाठ नियोजनानुसार घेता येत नाही. व पाठपायऱ्या वेळेत पूर्ण होत नाहीत.

काही शाळांमधून झालेला घटक सरावपाठासाठी विद्यार्थी शिक्षकांना दिला जातो, त्याच घटकावर आधारित घेतल्यास विद्यार्थी पाठाकडे लक्ष देत नाही यामुळे वर्गव्यवस्थापन व विद्यार्थी प्रतिसादाचा अभाव या समस्या जाणवतात.

वरील १,२,३,४,५ सर्व पर्यायाबाबत प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ३५.२ आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे. विद्यार्थी शिक्षकांना वर्गनियंत्रणाची समस्या येते, विद्यार्थी पाठाकडे पाठाकडे दुर्लक्ष करतात व पाठाच्या वेळी अन्य कृती करतात, काही

वेळा पूर्वज्ञानाचा अभावही असतो. व झालेला घटक शिकवल्यास पाठाकडे लक्ष देत नाही.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, विद्यार्थी शिक्षक सराव पाठ घेतात तेव्हा वर्गनियंत्रण व शालेय शिस्तीबाबत अडचणी येतात, त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांचा पाठाचा नियोजित वेळ वर्गनियंत्रण करण्यावर खर्च होतो व पाठपायऱ्या वेळेत पूर्ण होत नाहीत. झालेला घटक शिकविल्याने तसेच पाठाचा घटक शिक्षक पुन्हा शिकवत असेल्याने विद्यार्थी सराव पाठास प्रतिसाद देत नाहीत तसेच पाठ चालू असताना अन्य कृती करतात. शाळेतील शिक्षकांनी वर्गनियत्रंण व शालेय शिस्त या बाबत सहकार्य करावे.

## सराव पाठाचे निरीक्षण :-

विद्यार्थी शिक्षक वेगवेगळ्या शाळांमध्ये जावून सराव पाठ घेतात. तेव्हा विद्यार्थी शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण प्राध्यापक करतात. जे प्राध्यापक मार्गदर्शन करतात त्यांनीच पाठ पहावा असे नियोजन केले जाते. सराव पाठाचे वस्तुनिष्ठ निरीक्षण करुन वर्णनात्मक व उपचारात्मक शेरे पाठटाचणावर लिहिले जातात. प्रत्येक पाठ निरीक्षणकरुन मूल्य मापन केले जाते यासाठी पदनिश्चयन श्रेणीचा वापरकेला जातो. प्राध्यापकांनी दिलेल शेरे व पदनिश्चयनश्रेणी यांचा परस्पर संबंध प्रस्थापित केला जातो. व त्यावरुन पाठाच्या संकलित पाठाची नोंद करुन विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठाचे गूण दिले जातात.

महाविद्यालयात सराव पाठाचे निरीक्षण तज्ञ प्राध्यापक करतात. एका दिवशी प्राध्यापक जास्तीत जास्त किती पाठांचे निरीक्षण करतात याविषयी गोळा केलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र.१३

## सराव पाठ निरीक्षण

| अ.नं. | एकादिवशी सराव पाठ निरीक्षण संख्या | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ३ | २८ | २२.४ |
| २ | ४ | २८ | २२.४ |
| ३ | ५ | ३२ | २५.६ |
| ४ | ६ | ३७ | २९.६ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असेदिसून येते की प्राध्यापक एका दिवशी तीन सराव पाठांचे निरीक्षण करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २२.४ आहे. एका दिवशी चार सराव पाठांचे निरीक्षण करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २२.४ आहे. एका दिवशी पाच पाठांचे निरीक्षण करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २५.६ आहे. एका दिवशी सहा सराव पाठांचे निरीक्षण करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २९.६ आहे.

प्राध्यापकांनी दररोज तीन व चार पाठांचे निरीक्षण केल्यास मार्गदर्शन व पाठनिरीक्षण याबाबत सूलभता येते. रोज तीन पाठ लावल्यामुळे अधिक शाळांमध्ये पाठ घेण्याची विद्यार्थी शिक्षकांना संधी मिळते, अधिक शाळांशी संपर्क ठेवता येतो व त्यामुळे शालेय अनुभवाच्या दृष्टीतून विद्यार्थी शिक्षकांना फायदा होतो.

ज्या महाविद्यालयामध्ये रोज पाच व सहा पाठांचे निरीक्षण केले जाते त्याचें

प्रमाण (२५.६ + २९.६) ५५.२ आहे अशा महाविद्यालयांच्या परिसरात शाळांची संख्या मर्यादित असल्यामुळे व पाठासाठी ठराविक दिवस शाळांनी नेमून दिल्यामळे राज पाच व सहा तास निरीक्षण केले जाते. अशा महाविद्यालातील प्राध्यापकांना आठवड्यातून दोन ते तीन दिवसच पाठ निरीक्षण करावे लागते व इतर दिवशी रिकामा वेळ मिळतो हे शैक्षणिक दृष्ट्या अयोग्य आहे.

प्राचार्य वसराव पाठ विभाग प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, ज्या महाविद्यालयाच्या परिसरात शाळांची संख्या पूरेशी आहे ती महाविद्यालये रोज व चार पाठांचे निरीक्षण करतात ज्या महाविद्यालयांच्या परिसरात शाळांची संख्या मर्यादित आहे अशी महाविद्यालये सराव पाठांची पूर्तता करण्यासाठी रोज पाच किंवा सहा पाठांचे निरीक्षण करतात. दररोज तीन किंवा चार पाठांचे निरीक्षण करणे योग्य आहे.

## सराव पाठाचे प्रत्याभरण

''प्रत्येक सराव पाठानंतर प्राध्यापकांनी कमीत कमी पाचमिनिटे प्रत्याभरण दिले पाहिजे. प्रत्याभरण शक्यतो पाठ झाल्यावर व दुसऱ्या दिवशी महाविद्यालयातद्यावे''  -२

निरीक्षक प्राध्यापक पाठ निरीक्षण नोंद तक्त्याचा वापर करुन पाठ टाचण लेखन, वातावरणनिर्मिती, पाठ हेतू निवेदन, स्पष्टीकरण, प्रश्नपद्धती, फलक कार्य, चेतक विविधता, आशय प्रभुत्व, वर्ग व्यवस्थापन, अध्ययन अनुभवांची विविधता, समारोप, स्वाध्याय, मूल्यमापन विद्यार्थी प्रतिसाद, संकलित प्रभाव इ. विषयी उल्लेखनीय बाबी व त्रूटी याविषयी पाठ झाल्यावर प्रत्याभरण देतात.

---

*२ कित्ता - पान नं. ११३

महाविद्यालयात निरीक्षक प्राध्यापक विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठाबाबत प्रत्याभरण केव्हा देतात या विषयी माहिती गोळा केली. ती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. १५

## सराव पाठांचे प्रत्याभरण

| अ.नं. | सराव पाठाचे प्रत्याभरण | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पाठ झाल्यावर त्वरित | ७४ | ५९.२ |
| २ | सर्व पाठ निरीक्षणानंतर शाळेतच | २४ | १९.२ |
| ३ | महाविद्यालयाच्या तासाला | २७ | २१.६ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असेदिसून आले की, मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी शिक्षकांना पाठ झाल्यावर त्वरित प्रत्याभरण देतात असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ५९.२ आहे, सर्व पाठांचे निरीक्षणानंतर शाळेतच प्रत्याभरण देतात असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण १९.२ आहे तर महाविद्यालयात अध्यापन पदध्यतीच्या तासाला प्रत्याभरण देतात असा प्रतिसाद देणाऱ्याचे प्रमाण २१.६ आहे.

पाठांचे प्रत्याभरण सराव पाठानंतर त्वरितदिल्यास पुढील पाठ घेणाऱ्या विद्यार्थी शिक्षकाच्या प्रस्तावना व हेतुकथन या पाठपायऱ्यांचे निरीक्षण करता येत नाही. पाठ घेणाऱ्या विद्यार्थ्यालाच वैयक्तिक प्रत्याभरण दिल्याने इतर विद्यार्थ्यांनी केलेल्या पाठ निरीक्षणावरून चर्चा करता येत नाही. त्यामुळे सर्व पाठ संपल्यावर शाळेतच झालेल्या पाठांबाबत प्रत्याभरण देणे उपयुक्त ठरते.

तसेच साधारणपणे आढळणाऱ्या त्रूटी, कमतरता यांची चर्चा अध्यापनपद्धतीच्या तासिकेला केल्यास सर्व विद्यार्थी शिक्षकांना सामान्यत: होणाऱ्या त्रूटी टाळता येतात.

सर्व पाठ झाल्यानंतर सामुदायिक रित्या प्रत्याभरण दिल्याने पाठात झालेल्या चूका पाठ घेणारे व निरीक्षण करणारे विद्यार्थी शिक्षकांच्या लक्षात येतात म्हणून सर्व पाठ निरीक्षणानंतर शाळेतच सामुदायिक रित्या प्रत्याभरण देणे उपयुक्त असते. म्हणून पाठ झाल्यावर त्वरित प्रत्याभरण न करता सर्व पाठ झाल्यानंतर प्रत्याभरण द्यावे.

प्राचार्य व सराव पाठ विभाग प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, प्रत्येक सरावपाठानंतर वैयक्तिक प्रत्याभरण देण्यापेक्षा सर्व पाठ निरीक्षणानंतर शाळेतचपाठाविषयी प्रत्याभरण दिले जाते. तसेच साधारणपणे विद्यार्थी शिक्षकांच्या होणाऱ्या चूका, त्रूटीयांचा उल्लेख अध्यापनपद्धतीच्या तासिकांना केला जातो.

## सूक्ष्म अध्यापन

वर्गाध्यापन हे संमिश्र, गुंतागुंतीचे, सर्वसमावेशक कौशल्य आहे. अध्यपनाचे कार्य प्रथमत: समग्रतेने घेण्याऐवजी अध्यापनाचे विश्लेषण करुन एकेका घटक कौशल्याचा आरंभी सराव करुन प्रभुत्व मिळवणे हे अध्यापनाचा दर्जा वाढविण्यासाठी लाभदायक आहे हे प्रयोगाने सिद्ध झाले. त्यातून सूक्ष्म अध्यापन तंत्र विकसित झाले.

सेवापूर्व प्रशिक्षणार्थींना सूक्ष्म अध्यापन तंत्राचा वापर करुन अध्यापनाच्या प्रमुख कौशल्यांचा परिचय करुन देण्यासाठी बी.एड्. अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक कार्यास सूक्ष्म अध्यापन कृतिसत्राचा समावेश करण्यात आलेला आहे. सूक्ष्म अध्यापन पाठाच्या सरावामुळे विद्यार्थी शिक्षकांची सरावपाठाची पूर्वतयारी होते. म्हणून सरावपाठ घेण्यापूर्वी सूक्ष्म अध्यापन प्रात्यक्षिकाची कार्यवाही शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी केली जाते.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही शैक्षणिक वर्षात

केव्हापासून होते याविषयी माहिती गोळा केली आहे ती खालील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र. १६

सूक्ष्म अध्यापन कार्यवाही

| अ.नं. | सूक्ष्म अध्यापन कार्यवाही | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | दूसऱ्या दिवसापासून | ६ | ४.८ |
| २ | चार दिवसानंतर | १ | ०.८ |
| ३ | एका आठवड्याच्या उद्बोधनानंतर | ९२ | ७३.६ |
| ४ | दोन आठवड्यानंतर | २६ | २०.८० |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सूक्ष्मअध्यापनाची कार्यवाही दूसऱ्या दिवसापासून होते असाप्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४.८ आहे. चार दिवसानंतर सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ०.८ आहे. एका आठवड्याच्या उद्बोधनानंतर सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७३.६तर दोन आठवड्यानंतर सूक्ष्म अध्यापन कार्यवाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २०.८ आहे.

बी.एड्. च्या शैक्षणिक वर्षातील प्रात्यक्षिक कार्यापैकी सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कार्यक्रम शै. वर्षाच्यासुरुवातीला घेतला जातो. सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही एक आठवड्याच्या उद्बोधनानंतर केल्यामुळे विद्यार्थी शिक्षकांची शारीरिक व मानसिक

तयारी होते. विद्यार्थी शिक्षक बी.एड्. अभ्यासक्रमाचे स्वरूप, घटक, प्रात्यक्षिक कार्य, गूणदान व मूल्यमापन पद्धती यांची तोंडओळख करुन देण्यासाठी आठवड्याचे उद्‌बोधन घेणे योग्य ठरते. उद्‌बोधनामुळे महाविद्यालयात प्राध्यापकांची ओळख होते, अभ्यासक्रमाची व्यापकता व आवाका उद्दिष्ट्ये लक्षात येतात व एक आठवड्याच्या उद्‌बोधनानंतर प्रत्यक्ष सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही केल्याने प्रात्यक्षिकाची परिणामकारकता व यशस्वीता दिसून येते. शै. वर्षाच्या महाविद्यालय सुरु झाल्यानंतर लगेचच दोन दिवस किंवा चार दिवसानंतर सूक्ष्म अध्यापनाचीकार्यवाही केल्यास गटातील गैरहजर असणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होते. नवीन अभ्यासक्रमाची पूरेशी ओळख न झाल्याने त्वरीत प्रात्यक्षिक कार्यास सुरुवात केल्याने विद्यार्थी शिक्षकांचे मानसिक दडपण येण्याची शक्यता असते. विनाकारण अभ्यासक्रम व प्रात्यक्षिकाविषयी भीती वाटते. दोन आठवड्यानंतर सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही केल्यास प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यास अधिक दिवस द्यावे लागतील त्यामुळे सराव पाठाच्या नियोजनास विलंब होतो. म्हणून सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही शैक्षणिक वर्षात एक आठवड्याच्या उद्‌बोधनानंतर करणे अधिक योग्य आहे असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ७३.६ आहे हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य, सराव पाठ विभाग प्रमुख व प्राध्यापकांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस एक आठवड्याच्या उद्‌बोधनामुळे विद्यार्थी शिक्षकांना महाविद्यालयाचा परिसर, बी.एड्. अभ्यासक्रम, नवीन सहाध्ययी, प्राध्यापक यांची ओळख करुन घेण्यास पूरेसा वेळ मिळतो. त्यामुळे त्यांची शारीरिक व मानसिक तयारी होते. म्हणून एका आठवड्यात उद्बोधनानंतर सूक्ष्म अध्यापन कार्यवाही करावी.

## सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कालावधी :

" महाविद्यालयात सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षणाचा कालावधी एकून ९० तास म्हणजे १५ दिवस दररोज ६ तास याप्रमाणे महाविद्यालयाच्या आरंभीचे २ ते २ १/२ आठवडे

असावाअसे बी.एड्. अभ्यासक्रमाच्या पुस्तिकेत नमूद केले आहे. " - ३

सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षणासाठी पूर्वावश्यक तात्विक भाग निवडलेल्या पाच कौशल्याची तात्विक माहिती, कौशल्याचे घटक, निरीक्षण पद्धती, पाठनियोजन यावर व्याख्याने आयोजित केली जातात. एका कौशल्याच्या प्रशिक्षणाचे सरावचक्र पूर्ण झाल्यावर कोणत्याची दुसऱ्या कौशल्यांचे व्याख्यान दिले जाते. अश्या प्रकारे ५ अध्यापन कौशल्यांची निवड करुन विद्यार्थी शिक्षकांना सूक्ष्म पाठ घेतले जातात. सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षणाचा कालावधी किती असावा याबाबत महाविद्यालय वर्षारंभीच नियोजन करते.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षणाची कालावधी किती आहे या विषयी माहिती गोळा केली ती खालील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र. १७

सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कालावधी

| अ.नं. | सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कालावधी | प्रतिसादकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १२ दिवस | १५ | १२ |
| २ | १५ दिवस | ५० | ४० |
| ३ | १५ दिवसापेक्षा जास्त | ६० | ४८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कालावधी १२ दिवसांचा असतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १२ आहे सूक्ष्म अध्यापन

---

३ कित्ता - पान नं. १०९

प्रशिक्षण कालावधी १५ दिवसांचा असतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचा प्रमाण ४०.०० आहे तर १५ दिवसापेक्षा जास्त सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कालावधी असतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४८.०० आहे.

विद्यापीठाच्या अभ्यासक्रम पुस्तिकेतील नियमानुसार सूक्ष्म अध्यपन कृतिसत्राची कार्यवाही १५ दिवस होणे आवश्यक आहे. पण काही महाविद्यालये बारा दिवसांचे सूक्ष्म अध्यापन कृतिसत्र आयोजित करतात. त्यासाठी कृतिसत्राच्या कामकाजाच्यातासिका वाढवून दिवसांची संख्या कमी केली जाते व १२ दिवसांचे कृतिसत्र घेतले जाते.

काही महाविद्यालयांमध्ये १५ दिवसापेक्षा अधिक कालावधीचे सूक्ष्म अध्यापन कृतिसत्र घेतले जाते. अश्या महाविद्यालयात कृतिसत्रासाठी कामकाजाच्या तासिका कमी करुन १५ दिवसांपेक्षा अधिक दिवस वापरले जातात त्यामुळे सराव पाठ व इतर उपक्रमांची कार्यवाही करण्यात विलंब होतो.

जी महाविद्यालये विद्यापीठाने ठरवून दिलेल्या १५ दिवसांच्या कालावधीत सूक्ष्म अध्यापन कृतिसत्राची कार्यवाही करतात ते शैक्षणिक दृष्ट्या योग्य आहे म्हणून सर्वच महाविद्यालयांनी १२ दिवस व १५ दिवसापेक्षा अधिक कालावधी सूक्ष्म अध्यापन कृतिसत्रासाठी न देता १५ दिवसात दररोज ६ तास या प्रमाणे कृतिसत्राचा कालावधी ठेवला पाहिजे.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, सूक्ष्म अध्यापनासाठी दररोज ६ तास या प्रमाणे वेळ दिल्यास १५ दिवसात कृतिसत्र पूर्ण होते. सूक्ष्म अध्यापनाच्या कार्यवाहीसाठी १२ दिवस व १५ दिवसांपेक्षा अधिक कालावधी शैक्षणिक दृष्ट्या अयोग्य आहे म्हणून सर्वच महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ नियमानुसार सूक्ष्म अध्यापनाचे कृतिसत्र १५ दिवसाचे घेण्यात यावे.

## सूक्ष्म अध्यापन कौशल्य निवड :-

अध्यापन करत असताना विद्यार्थ्यांच्या अध्ययनास प्रेरणा मिळावी व मदत व्हावी यासाठी विविध कृतींचा वापर केला जातो. त्यापैकी काही कृतींचे उद्दिष्टांच्या दृष्टीने परस्परांशी साम्य असते तर काही कृती भिन्न असतात अशा कृतिगटांना अध्यापन कौशल्य म्हणतात. सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षणासाठी समान्य अध्यापनाच्या १४ कौशल्यापैकी पाच अध्यापन कौशल्यांची निवड केली जाते.

शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रम पूस्तिकेत नमूद केलेल्या सूक्ष्म अध्यापन कौशल्यांच्या यादीनुसार महाविद्यालयात कोणकोणत्या सूक्ष्म अध्यापन कौशल्यांची निवड केली जाते याबाबत माहिती गोळा केली. ती खालील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र. १८

सूक्ष्म अध्यापन कौशल्य निवड

| अ.नं. | सूक्ष्म अध्यापन कौशल्ये | प्रतिसादकांची संख्या | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | सज्जता प्रवर्तन | १२५ | ५३ | ४२.४ |
| २ | स्पष्टीकरण | १२५ | १२२ | ९७.६ |
| ३ | प्रश्न कौशल्य | १२५ | १०५ | ८४.०० |
| ४ | प्रबलन | १२५ | १०५ | ८४.०० |
| ५ | चेतक बदल | १२५ | ९८ | ७८.४ |
| ६ | फलकाचा वापर | १२५ | ९३ | ७४.४ |
| ७ | समारोप | १२५ | ३१ | २४.८ |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सजता प्रवर्तनकौशल्य निवडणाऱ्या

प्रतिसादकांचे प्रमाण ४२.४ आहे. स्पष्टीकरण कौशल्य निवडणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ९७.६ आहे. प्रश्न कौशल्य वप्रबलन निवडणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ८४.०० आहे चेतक बदल कौशल्य निवडणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७८.४ आहे. फलकाचा वापर कौशल्य निवडणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७४.४ आहे. समारोप कौशल्य निवडणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २४.८ आहे.

अध्यापन करताना सज्जता प्रवर्तन महत्वाचे कौशल्य आहे. नवीन पाठ्यांश शिकण्यापूर्वी विद्यार्थ्यांची मानसिक व शारीरिक तयारीकरण्यासाठी सज्जता प्रवर्तन कौशल्य वापरले जाते. म्हणून अध्यापन कौशल्यामध्ये सज्जता प्रवर्तन महत्वाचे कौशल्य आहे. सज्जता प्रवर्तन कौशल्य निवडण्याचे प्रमाण ४२.४ आहे.

आशंय मांडणी करण्यासाठी सर्व विषयांसाठी स्पष्टीकरण कौशल्य वापरले जाते. घाटकातील संवोध, संकल्पना, नियम, तत्वे यासाठी स्पष्टीकरण द्यावेलागते. माध्यमिक स्तरावर ८०% आशय स्पष्टीकरण कौशल्याद्वारे शिकवला जातो. म्हणून विद्यार्थी शिक्षकांना स्पष्टोकरण कौशल्याचा वार प्रभावी पणे करता यावे यासाठी या कौशल्याची निवड केली जाते. स्पष्टीकरण कौशल्य निवडण्याचे प्रमाण ९७.६ आहे. हे प्रमाण अतिशय चांगले आहे.

विद्यार्थ्यांना ज्ञान मिळविण्यासाठी व आशय किती समजला आहे यासाठी प्रश्न कौशल्य उपयुक्त आहे शिक्षक वर्गात विद्यार्थ्यांना प्रश्न विचारुन त्यांचा सहभाग घेतात. प्रश्न कौशल्याचा प्रभावीपणे वापर करण्यासाठी सूक्ष्म अध्यापनात निवड केली जाते प्रश्न कौशल्य निवडण्याचे प्रमाण ८४.०० आहे हे प्रमाण चांगले आहे.

प्रश्न कौशल्याप्रमाणेच विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळण्यासाठी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद स्विकारण्यासाठी प्रबलन कौशल्य वापरले जाते. या कौशल्य निवडण्याचे प्रमाण ८४.०० आहे. हे प्रमाण चांगले आहे.

अध्यापनात विद्यार्थ्यांचा सहभाग मिळविण्यासाठी व विद्यार्थ्यांचे अवधात केंद्रीत करण्यासाठी चेतक बदल कौशल्य वापरतात. चेतक बदल कौशल्य निवडण्याचे प्रमाण ७८.४ आहे.

फलक हा शिक्षकांचा मित्र आहे. आशय शिकताना त्यातील महत्वाच्या नोंदी फलकावर केल्या जातात. शिक्षक्रांना फलकाचा वापरपरिणामकारक रित्या करता यावा म्हणून फलक लेखन कौशल्याचीनिवड केली जाते.

जसे पाठाची सुरुवात प्रभावी होणे आवश्यक आहे तसेचसमारोप कौशल्यही महत्वाचे आहे. समारोपास आशयातील मूद्द्यांची पुनरावृत्ती केली जाते व मिळवलेल्या ज्ञानाचा पुढील ज्ञानाशी संबंध प्रस्थापित केला जातो. समारोप कौशल्य निवडण्याचे प्रमाण २४.८ आहे हे प्रमाण अतिशय कमी आहे.

## सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रमासाठी विद्यार्थी शिक्षक गट :

सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रत्येकी दहा विद्यार्थी शिक्षकांचे गट तयार करुन गटवार सूक्ष्मपाठ घेतले जातात. विद्यार्थी शिक्षकांचे गट हजेरी क्रमांकानुसार किंवा विद्यार्थी शिक्षकांनी निवडलेल्या प्रथम अध्यापन पद्धतीनुसार तयार केले जातात. व अध्यापनकौशल्यांचे सरावचक्र पूर्ण करुन घेतले जाते.

महाविद्यालयात सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रमासाठी विद्यार्थी शिक्षकांचे गट कसे तयार केले जातात याविषयी माहिती गोळा केली, ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र १९

### सूक्ष्म पाठ प्रशिक्षणासाठी विद्यार्थी - शिक्षक गट

| अ.नं. | सूक्ष्म पाठ प्रशिक्षणासाठी विद्यार्थी शिक्षक गट | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | हजेरी क्रमांकानुसार | ५१ | ३९.२ |
| २ | प्रथम अध्यापन पद्धतीनुसार | ७४ | ६०.८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून आले की, पाठ प्रशिक्षणासाठी विद्यार्थी शिक्षकांचे गट हजेरी क्रमांकानुसार तयार केले जातात असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ३९.२ आहे तर विद्यार्थी शिक्षकांचे गट प्रथम अध्यापन पद्धतीनुसार तयार केले जातात असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ६०.८ आहे.

सूक्ष्म अध्यापनाच्या गटकार्यासाठी विद्यार्थी शिक्षकांचे गट हजेरी क्रमांकानुसार केल्याने गटातील सर्व विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन पद्धती समान नसतात त्यामुळे मार्गदर्शक प्राध्यापकांना त्यांच्या अध्यापन पद्धतीनुसार शास्त्रशुद्ध मार्गदर्शन देता येत नाही. विद्यार्थी शिक्षकांच्या भिन्न अध्यापन पद्धतीमुळे इतर विद्यार्थी शिक्षक पाठात समरस होत नाही व आशयातील त्रूटी लक्षात येत नाही. म्हणून हजेरी क्रमांकानुसार सूक्ष्म अध्यापनासाठी गट तयार करणे शैक्षणिक दृष्ट्या अयोग्य आहे.

सूक्ष्म अध्यापनाच्या गटकार्यासाठी विद्यार्थी शिक्षकांचे गट प्रथम अध्यापन पद्धतीनुसार केले जातात यांचे प्रमाण ६०.८ आहे, प्रमाण लक्षात घेण्यासारखे आहे. विद्यार्थी शिक्षकांच्या प्रथम अध्यापन पद्धतीनुसार गट केल्याने सर्वांना मार्गदर्शन

देणेसुलभ जाते. गटातील सर्व विद्यार्थी-शिक्षक पाठात सहभागी होतात, पाठ नियोजन करताना चर्चा करतात, म्हणून सूक्ष्म अध्यापनासाठी विद्यार्थी शिक्षकांचे गट प्रथम अध्यापन पद्धतीनुसारच करावी.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे आढळून आले की, हजेरी क्रमांकानुसार विद्यार्थी शिक्षकांचे गट केल्यास सर्व विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन पद्धती सारख्या नसतात त्यामुळे शास्त्रशुद्ध मार्गदर्शन देता येत नाही, इतर विद्यार्थी शिक्षक पाठात समरस होत नाहीत. विद्यार्थी शिक्षकांचे गट प्रथम पद्धतीनुसार केल्यास गटातील सर्व विद्यार्थ्यांची अध्यापन पद्धती समान असल्याने मार्गदर्शक प्राध्यापकांना मार्गदर्शन देणे सोयीस्कर होते. गटातील सर्व विद्यार्थी शिक्षकही पाठात समरस व सहभागी होतात हे शैक्षणिक दृष्ट्या योग्य आहे म्हणून सूक्ष्म अध्यापनासाठी हजेरी क्रमांकानुसार विद्यार्थी शिक्षकांचे गट न करता प्रथम अध्यापन पद्धतीनुसारच विद्यार्थ्यांचे गट करण्यात यावेत.

## सूक्ष्म अध्यापन कौशल्याचा तात्विक भाग :-

''सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी पूर्वावश्यक तात्विक भागात सूक्ष्माध्यापनाचा संबोध, इतिहास, महत्व, कार्यपद्धती, कौशल्यांचे वर्गीकरण यावर दोन ते तीन व्याख्याने आयोजित करावी, तसेच सूक्ष्माध्यापनासाठी निवडलेल्या पाच कौशल्यांचे घटक, निरीक्षण पद्धती, पाठनियोजन यावर व्याख्याने आयोजित करुन सूक्ष्म अध्यापन कौशल्याचा तात्विक भाग घेण्यात यावा ''-४

असे शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रम पूस्तिकेत सूचित केले आहे.

महाविद्यालयात सूक्ष्म अध्यापन कौशल्याच्या तात्विक भागवार आधारित व्याख्यानाचे नियोजन कसे केले जाते या विषयी माहिती गोळा केली. ती खालील

---

*४ कित्ता - पान नं. ११०

प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. २०

## सूक्ष्म अध्यापनकौशल्याचा तात्विक भाग

| अ.नं. | सूक्ष्म अध्यापन कौशल्याचा तात्विक | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| | भाग कसा शिकवला जातो? | | |
| १ | गटवार अध्यापन | ९ | ७.२ |
| २ | वर्गात एकत्रित अध्यापन | ११६ | ९२.८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सूक्ष्माध्यापन कौशल्याचा तात्विक भाग गटवार अध्यापनाद्वारे घेतला जातो अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७.२ आहे. सूक्ष्माध्यापना कौशल्याचा तात्विक भाग वर्गात एकत्रित अध्यापनाद्वारे घेता जातो अशा प्रतिसादकांचे प्रमाण ९२.८ आहे.

सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कार्यक्रमात सूक्ष्म अध्यापन एक संकल्पना, कार्यवाही, निवडलेल्या सूक्ष्म कौशल्यांविषयी तात्विक माहिती त्याबाबत गटवार अध्यापन करण्याचे प्रमाण ७.२ आहे. हे प्रमाण अल्प आहे.

सूक्ष्म अध्यापन कौशल्याचा तात्विक भाग वर्गात एकत्रित शिकवला जातो याचे प्रमाण ९२.८ आहे हे प्रमाण चांगले आहे. सूक्ष्म अध्यापनात विशिष्ट कौशल्यातील उपकौशल्यांची तात्विक माहिती सांगण्यासाठी पद्धतीनुसार गट करुन व्याख्यान देण्याची

आवश्यकता नसते. म्हणून महाविद्यालयाकडून सूक्ष्म अध्यापनाची तात्विक माहिती देण्याविषयी नियोजनकेले जाते व वर्गात एकत्रितरित्या अध्यापन केले जाते. त्यामुळे प्रत्येक गटातील गटमार्गदर्शकाने द्यावयाच्या तात्विक माहितीची अनावश्यक पुनरावृत्ती टाळता येते.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, महाविद्यालयात सूक्ष्म अध्यापनाच्या आवश्यक तात्विक भागाचे अध्यापन कोणी करायचे याचे नियोजन केले जाते. त्यानुसार प्राध्यापक अध्यापन कौशल्यासंबंधी तात्विक माहिती सांगातात व वेगवेगळे पाठ्यांश निवडून पाठाचे दिग्दर्शन करतात. नंतर विद्यार्थी अध्यापन पद्धतीनुसार गटात जातात व गटमार्गदर्शक प्राध्यापक अध्यापनपद्धतीला अनुसरुन सारांशरुपाने माहिती सांगातात.

## सूक्ष्म पाठासांठी पाठ्यांश निवड :-

सूक्ष्म अध्यापनासाठी पाच मिनिटाच्या कालावधीत निवडलेल्या अध्यापन कौशल्यावर अधारित सूक्ष्म पाठ घेतला जातो. सूक्ष्म पाठासाठी अध्यापनकौशल्यानुरुप पाठ्यांश निवडावा लागतो पाठ्यांश निवडताना विषय वङ्यत्ता यांचे बंधन नसले तरीनिवडलेल्या अध्यापन कौशल्यांतील उपकौशल्यांचा अधिक वापर होईल, सराव होईल असा पाठ्यांश निवडावा लागतो. विद्यार्थी शिक्षकांना अध्यापनाचा पूर्वानुभव नसल्याने पाच मिनिटाच्या कालावधीयसाठी किती पाठ्यांश द्यावा किंवा कौशल्य व त्यातील उपकौशल्यांचा अधिक उपयोग करता येईल असा पाठ्यांश निवडण्याबाबत अडचणी येतात.

महाविद्यालयात सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रमात विद्यार्थी शिक्षकांना सूक्ष्म पाठासाठी कौशल्यानुसार पाठ्यांश निवड करताना अडचणी येतात की नाही याबाबत गोळा केलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. २१

### सूक्ष्म पाठासाठी पाठ्यांश निवड

| अ.नं. | सूक्ष्म पाठासाठी पाठ्यांश निवडताना अडचणी | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ९५ | ७६.० |
| २ | नाही | ३० | २४.० |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून यते की, विद्यार्थी शिक्षकांना सूक्ष्म पाठासाठी कौशल्यानुसार पाठ्यांश निवड करताना अडचणी येतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७६.० आहे. विद्यार्थी शिखकांना सूक्ष्म पाठासाठी कौशल्यानुसार पाठ्यांशनिवड करताना अडचणीयेत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २४.० आहे.

बी.एड्. प्रशिक्षणात सूक्ष्म अध्यापनाने कृतिसत्रामध्ये विद्यार्थी शिक्षक अध्यापन करण्यासाठी आवश्यक कौशल्ये संपादित करतात. त्यापूर्वी सर्वच विद्यार्थी शिक्षकांना अध्यापनाचा अनुभव नसतो. त्यामूळे विशिष्ट कौशल्यासाठी पाठ्यांश निवडावा व पाच मिनिटात कालावधी साठी किती पाठ्यांश निवडावा याबाबत अडचणी येतात याचे प्रमाण ७६.०० असून विचारात घेण्यासारखे आहे.

सूक्ष्म पाठासाठी पाठ्यांश निवडताना विद्यार्थी शिक्षकांना अडचणी येत नाहीत कारण काही विद्यार्थी-शिक्षकांना अध्यापनाचा अनुभव असतो, त्यामुळे पाठ्यांश किती निवडावा व कसा निवडावा याबाबत अडचणी येत नाही पण अश्या विद्यार्थी

शिक्षकांचे प्रमाण कमी आहे.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, सूक्ष्म पाठासाठी पाठ्यांश निवड करताना विशिष्ट अध्यापन कौशल्यातील सर्व उपकौशल्यांचा समावेश होईल असा पाठ्शांश निवडणे, पाच मिनिटासाठी पूरेसा पाठ्यांश निवडणे याबाबत अडचणी येतात. काही विद्यार्थी शिक्षकांनी खासगी शिकवणी किंवा अप्रशिक्षित शिक्षक म्हणून काम केले असलयाने त्यांना पाठ्यांश निवडताना अडचणी येत नाही.

## सूक्ष्म पाठासाठी पाठ्यांश निवडताना येणाऱ्या अडचणी :

सूक्ष्म पाठासाठी अध्यापनकौशल्यानुसार पाच मिनिटाच्या कालावधीसाठी पूरेसा पाठ्यांश निवडावा लागतो. व त्यानुसार सूक्ष्मपाठाचे नियोजन केले जाते. सूक्ष्म पाठासाठी अध्यापन कौशल्याच्या उपकौशल्यांचा अधिक वापर करता येईल असा पाठ्यांश निवडावा लागतो. जर पाठ्यांश निवड चूकली तर अध्यापन कौशल्याच्या उपकौशल्यांचा वापर करता येत नाही. म्हणून कौशल्यानुसार निवड सहेतुक करावी लागते. जर विद्यार्थी शिक्षक सूक्ष्म पाठासाठी पाठ्यांश निवड चूकल्यास अडचणी निर्माण होतात.

महाविद्यालयात सूक्ष्मपाठ प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सूक्ष्म पाठ घेण्यासाठी कौशल्यानुसार पाठ्यांश निवड करतानाकोणत्या अडचणी येतात याविषयीची गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. २२

## सूक्ष्म पाठासाठी पाठ्यांश निवड करताना येणाऱ्या अडचणी

| अ.नं. | सूक्ष्म पाठसाठी पाठ्यांश निवड करताना येणाऱ्या अडचणी | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कौशल्यानुसार पाठ्यांश निवडता येत नाही | २१ | २३.१६ |
| २ | पाच मिनिटाच्या अध्यापनासाठी कमी किंवा अधिक पाठ्यांश निवडला जातो | १८ | १८.९४ |
| ३ | दोन्ही पर्याय | ५५ | ५८.९० |
| | एकूण | ९५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की सूक्ष्म पाठासाठी पाठ्यांश निवडताना येणाऱ्या अडचणीपैकी विद्यार्थी-शिक्षकांना कौशल्यानुसार पाठ्यांश निवडता येत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २३.१६ आहे. पाच मिनिटाच्या अध्यापनासाठी कमी किंवा अधिक पाठ्यांश निवडला जातो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १८.९४ आहे. वरील दोन्ही पर्याय असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५८.९० आहे.

विद्यार्थी शिक्षकांना अध्यापनाचा पूर्वानुभव नसल्यामुळे सूक्ष्म पाठसाठी विशिष्ट कौशल्यानुसार पाठ्यांश निवडता येत नाही. विशिष्ट कौशल्याच्या सर्व उपकौशल्यांचा वापर करता येईल असा पाठ्यांश निवडला जात नाही. त्यामुळे कौशल्यातील सर्व

उपकौशल्यापैकी काहींचा वापर होत नाही.

सूक्ष्म पाठाचा कालावधी पाच मिनिटे असतो. पाच मिनिटात विशिष्ट कौशल्याला अनुसरुननिवडलेला पाठ्यांश कमी पडतो, त्यामध्ये कौशल्यातील सर्व उपकौशल्यांचा विचार केला जात नाही, वेळेपूर्वीच पाठ्यांश संपतो, काही वेळा पाच मिनिटात अध्यापनासाठी अधिक पाठ्यांश निवडला जातो त्यामुळे ठराविक पाच मिनिटाच्या अध्यापनात कौशल्याच्या सर्व उपकौशल्यांचा समावेश होत नाही.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, बी.एड्. अभ्यासक्रमासाठी आलेलया विद्यार्थी शिक्षकांना अध्यापनाचा अनुभव नसतो त्यामुळे सूक्ष्म पाठासाठी पाठ्यांश निवडताना कौशल्यानुसार पाठ्यांश निवडता येत नाही.

सूक्ष्म पाठासाठी पाच मिनिटाच्या अध्यापनासाठी लागणारा पाठ्यांश निवडतानाही अनुभव नसल्याने पाठ पाच मिनिटापूर्वी संपतो किंवा पाच मिनिटापेक्षा अधिक वेळ सूक्ष्म अध्यापन होते.

## सूक्ष्म पाठ प्रत्याभरणाची साधने :-

सूक्ष्म पाठाचे निरीक्षण मार्गदर्शक प्राध्यापक व गटातील दोन छात्राध्यापक करतात. पाठाच्या निरीक्षणासाठी पाठटाचणींतील नोंदतक्ता, टेपरेकॉर्डर, व्हिडिओ कॅमेरा इ. साधनांचा वापर करतात. नोंदीवरुन व पाठ रेकॉर्डिंग करुनपाठा विषयी प्रत्याभरण दिले जाते.

महाविद्यालयात सूक्ष्म पाठाचे प्रत्याभरण देण्यासाठी कोणकोणत्या साधनांचा वापर करतात याविषयी माहिती गोळा केली. ती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. २३

## सूक्ष्म पाठ प्रत्याभरणाची साधने

| अ.नं. | सूक्ष्म पाठप्रत्याभरणाची साधने | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्राध्यापकांनी पाठ निरीक्षणाबाबत केलेल्या नोंदी | ५१ | ४१.२ |
| २ | प्राध्यापक वविद्यार्थी शिक्षकांनी पाठ निरीक्षणाच्या केलेल्या नोंदी | ७१ | ५६.२ |
| ३ | पाठाचे टेपरेकॉर्डरच्या सहाय्याने रेकॉर्डिंग करुन | ३ | ०२.६ |
| ४ | व्हिडिओ कॅसेटच्या आधारे | - | - |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सूक्ष्म पाठाच्या प्रत्याभरणासाठी प्राध्यापकांनी पाठ निरीक्षणाबाबत केलेल्या नोंदीचा वापर करतात असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ४१.२ आहे. प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षकांनी पाठ निरीक्षणाच्या केलेल्या नोंदीचा वापर करतात असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ५६.२ आहे तर पाठाचे टेपरेकॉर्डरच्या सहाय्याने रेकॉडिंग करुन प्रत्याभरण देण्याचे प्रमाण २.६ आहे. हे प्रमाण अत्यल्प आहे.

सूक्ष्म पाठाच्या प्रत्याभरणासाठी प्राध्यापकांनीपाठ निरीक्षणाबाबत केलेल्या नोंदीचा वापर केल्यास प्रत्याभरणनेमक्या स्वरुपाचे असते प्राध्यापकांना सूक्ष्म पाठाच्या निरीक्षणाचा अनुभव असलयाने चूका किंवा त्रूटींची योग्य व अचूक नोंद केली जाते,

याचा उपयोग प्रत्याभरणासाठी होतो.

सूक्ष्म पाठाचे निरीक्षणप्राध्यापक व दोन विद्यार्थी शिक्षक करुन त्रूटी, चूका नोंदवतात पाठ निरीक्षणाचा अनुभव प्राध्यापकांना असतो तसेच विद्यार्थी शिक्षकांनाही पाठाच्यानिरीक्षणाचासराव व्हावा म्हणून ते ही पाठ निरीक्षणाच्या तक्त्यात नोंदी करतात. प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षकांनी पाठ निरीक्षणाच्या केलेल्या नोंदीवरुन प्रत्याभरण दिले जाते याचे प्रमाण ५६.२ आहे. प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षकांच्या नोंदीवरुन चर्चात्मक प्रत्याभरण दिले जाते प्राध्यापकांनी केलेल्या निरीक्षण नोंदीवरुन विद्यार्थी शिक्षकांनी केलेल्या नोंदीचा पडताळा पाहता येतो.

सूक्ष्म पाठ कौशल्यापैकी चेतक बदल, कथन, स्पष्टीकरण, प्रश्न कौशल्य कौशल्यांवर आधारित सूक्ष्म पाठाचे टेपरेकॉडेरच्या सहाय्याने रेकॉर्डिंग करुन पाठाचे प्रत्याभरण देता येते. कॅसेट पुन्हा पुन्हा ऐकून प्रत्याभरण देता येते. त्यामूळे प्रत्याभरणात अचूकता येते.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, सूक्ष्म पाठ प्रत्याभरण नेमके, अचूक वस्तु निष्ठ देता येते. विद्यार्थी शिक्षक व प्राध्यापक यांनी केलेल्या पाठ निरीक्षण नोंदीवरुनप्रत्याभरण देताना चर्चा होते त्यमुळे विद्यार्थी शिक्षकांची पाठ निरीक्षणाचा सराव होतो तसेच पाठ निरीक्षण कसे करायचे, नोंदी कशा करायच्या हे ही समजते. म्हणून विद्यार्थी शिक्षक व प्राध्यापकांनी केलेल्या निरीक्षणावरुन प्रत्याभरण अधिक सोयीचे ठरते.

पाठाचे टेपरेकॉर्डरच्या सहाय्याने रेकॉडिंग करणे सर्व अध्यापनकौशल्यास उपयुक्त नसते म्हणून चेतक बदल, स्पष्टीकरण, प्रश्न विचारणे, कथन इ. कौशल्याच्या प्रत्याभरणासाठी टेपरेकॉर्डरच्या उपयोग केला जातो. प्राध्यापकांचे दिग्दर्शित पाठ व काही विद्यार्थी शिक्षकांच्या सूक्ष्म पाठांचे व्हिडिओ कॅमेराच्या सहाय्याने रेकॉडिंग करुन प्रत्याभरण दिले जाते.

## सूक्ष्म पाठ निरीक्षण :-

सूक्ष्म पाठ घेताना अध्यापन कौशल्यांच्या विविध घटकांची संख्या निश्चित केली जाते व सूक्ष्म पाठ घेताना पाठ निरीक्षक प्राध्यापकांबरोबर दोन छात्राध्यापक निरीक्षक म्हणून काम करतात. सूक्ष्म पाठटाचणात नोंद तक्ता असतो. नोंदतक्त्यात कौशल्यातील उपकौशल्यांची यादी दिली जाते. विद्यार्थी शिक्षक सूक्ष्म पाठ घेताना कौशल्याच्या उपकौशल्यांचा वापर कसा व किती प्रमाणात करतो यासाठी पदनिश्चयन श्रेणीचा, tallies यांचा वापर केला जातो. त्याचबरोबर विद्यार्थी शिक्षकांच्या पाठात झालेल्या चूका, त्रूटी, कमतरता, अभावांची व चांगल्या बाबींची निरीक्षणांत नोंद केली जाते. म्हणून सूक्ष्म पाठ घेताना विद्यार्थी शिक्षक पाठाविषयक नोंदी कशा घेतो व नोंदी घेताना त्याला अडचणी येतात का याचविषयीची गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

### कोष्टक क्र. २४

### सूक्ष्म पाठ निरिक्षणात विद्यार्थी शिक्षकांना अडचण

| अ.नं. | सूक्ष्मपाठ निरीक्षणात विद्यार्थी शिक्षकांना अडचणी | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८८ | ७०.४ |
| २ | नाही | ३७ | २९.६ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की सूक्ष्म पाठ निरीक्षण करताना विद्यार्थी शिक्षकांना अडचणी येतात असा प्रतिसाद नोंदवणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७०.४ आहे तर सूक्ष्म पाठ निरीक्षणात विद्यार्थी शिक्षकांना अडचणी येत नाही असा प्रतिसाद नोंदवणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २९.६ आहे.

विद्यार्थी शिक्षकांना सूक्ष्म पाठ निरीक्षणाचा अनुभव नसतो त्यामुळे सूक्ष्म पाठ निरीक्षण करताना कौशल्याच्या उपकौशल्यांच्या नोंदीकरता येत नाही, बऱ्याच नोंदी अंदाजे केल्या जातात त्यामूळे चूकीच्या नोंदी असतात. निरीक्षण तक्त्यात tallies व पदनिश्चयनश्रेणीचा वापर करता येत नाही.

सूक्ष्म पाठ निरीक्षणात विद्यार्थी शिक्षकांना अडचणी येतात याचे प्रमाण ७०.४ असून विचारात घेण्यासारखे आहे.

ज्या विद्यार्थी शिक्षकांना अध्यापनाचा अनुभव असतो त्यांना निरीक्षण करताना चूका किंवा उणिवा लक्षात येतात. तसेच कौशल्याच्या उपकौशल्यांचीही नोंद करता येतात.

## सूक्ष्म पाठ निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी :-

सूक्ष्म पाठाचे निरीक्षण करताना विशिष्ट अध्यापन कौशल्याच्या उपकौशल्यांबाबत नोंदी, उपकारक व त्याच बाबी यांची माहिती नोंदतक्त्यात लिहावी लागते. विद्यार्थी शिक्षकाना पाठ निरीक्षणाचा पूर्वानुभव नसतो. त्यामुळे सूक्ष्म पाठ कौशल्याच्या उपकौशल्याची नोंद करता येत नाही, त्यामुळे सूक्ष्म पाठ निरीक्षण करताना अडचणी येतात.

सूक्ष्म पाठाचे निरीक्षण करताना विद्यार्थी शिक्षकांना कोणकोणत्या अडचणी येतात त्याबाबत माहिती गोळा केली ती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. २५

## सूक्ष्म पाठ निरीक्षणात येणाऱ्या अडचणी

| अ.नं. | सूक्ष्म पाठ निरीक्षणात येणाऱ्या अडचणी | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सूक्ष्म पाठ कौशल्यांच्या उपकौशल्यांची बारकाईने नोंद करता येत नाही. | ४० | ३२.०० |
| २ | पदनिश्चयनश्रेणीचा वापर करता येत नाही | ७ | ५.६० |
| ३ | पाठ घेणाऱ्या विद्यार्थी शिक्षकाच्या अध्यापनातील उणिवा/दोष नोंदवता येत नाहीत | १७ | १३.६० |
| ४ | १,२,३ सर्व पर्याय | ६१ | ४८.८० |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून आले की, विद्यार्थी शिक्षकांत सूक्ष्म पाठ कौशल्यांच्या उपकौशल्यांची बारकाईने नोंद करता येत नाही असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ३२.०० आहे, पदनिश्चयन श्रेणीचा वापर करता येत नाही असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ५.६० आहे, पाठ घेणाऱ्या विद्यार्थी शिक्षकाच्या अध्यापनातील उणिवा/दोष नोंदवता येत नाही असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण १३.६० आहे तर वरील सर्व पर्याय असणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४८.८० आहे.

विद्यार्थी शिक्षक सूक्ष्म पाठ कौशल्याच्या उपकौशल्यांची बारकाईने नोंद करत नाही, कारण विद्यार्थी शिक्षकांना पाठ निरीक्षणाचा अनुभव नसतो, त्यामुळे

उपकौशल्यांबाबत चूकीच्या नोंदी करतात.

काही अध्यापन कौशल्याच्या नोंदी करताना पदनिश्चयन श्रेणीचा वापर केला जातो विद्यार्थी शिक्षकांना उपकौशल्यांचा वापर उपयुक्तता व आवश्यकतेनुसार कसा केला आहे याबाबत पदनिश्चयन श्रेणीचा वापर करता येत नाही. अंदाजे श्रेणी दिली जाते.

विद्यार्थी शिक्षकांना पाठ निरीक्षणाचा पूर्वानुभव नसतो त्यामुळे व पाठ निरीक्षणकरताना अध्यापनातील उणिवा किंवा दोष नोंदवत नाहीत.

विद्यार्थी शिक्षकांना पाठनिरीक्षणाचा अनुभव नसलयाने कौशल्याच्या उपकौशल्याची नोंद करता येत नाही तसेच उपकौशल्याच्या वापरानुसार पदनिश्चयन श्रेणी देता येत नाही व पाठ अध्यापनातील उणिवा व दोष नोंदवता येत नाहीत.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की सूक्ष्म पाठाच्या निरीक्षणाचा पूर्वानुभव विद्यार्थी शिक्षकांना नसल्याने सुरुवातीला एक दोन अध्यापन कौशल्यांच्या निरीक्षणात उपकौशल्यांची बारकाईने नोंद होत नाही उपकौशल्यानुसार पदनिश्चयन श्रेणी न देता अंदाजे दिली जाते व पाठातील उणिवाकिंवा दोष नोंदवता येत नाही. पण सरावाने निरीक्षणात सुधारणा होते.

## ५.२५ सूक्ष्म पाठ प्रत्याभरणासाठी वेळ :-

विद्यार्थी शिक्षकांच्या सूक्ष्म पाठाचे निरीक्षण करुन प्रत्याभरण दिले जाते. प्रत्याभरणात अध्यापन-कौशल्याच्या सरावावर चर्चा केंद्रित केली जाते. प्रत्येक विद्यार्थी शिक्षकास विशिष्ट अध्यापन कौशल्य संपादनतील अपेक्षित पातळी प्राप्त होण्यासाठी प्रत्याभरण दिले जाते. विद्यार्थी शिक्षकांना पाठ्यांश, कौशल्य व त्यातील उपकौशल्यांचा वापरानुसार प्रत्याभरण दिले जाते व त्यासाठी प्रत्येक विद्यार्थी शिक्षकांना प्रत्याभरणासाठी कमी अधिक वेळ द्यावा लागतो.

महाविद्यालयात सूक्ष्म पाठाच्या प्रत्याभरणासाठी किती वेळ दिला जातो. याविषयी माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. २६

## सूक्ष्म पाठ प्रत्याभरणासाठी वेळ

| अ.नं. | सूक्ष्म पाठ प्रत्याभरणासाठीवेळ | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येक पाच मिनिटापर्यंत | ४९ | ३९.२ |
| २ | पाच ते दहा मिनिटापर्यंत | ७६ | ६०.८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून आले की, सूक्ष्म पाठाच्या प्रत्याभरणासाठी पाच मिनिटापर्यंत वेळ दिला जातो अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३९.२ आहे, प्रत्याभरणासाठी ५ ते १० मिनिटापर्यंत प्रत्याभरणासाठी वेळ दिला जातो प्रतिसादकांचे प्रमाण ६०.८ आहे.

विद्यार्थी शिक्षकांना कृतिसत्रातील सुरुवातीच्या अध्यापन कौशल्य सरावासाठी अध्यापन व पुनराध्यापनानंतर याच मिनिटापेक्षाही अधिक वेळ प्रत्याभरण द्यावे लागते. जे विद्यार्थी अध्यापन कौशल्यानुसार पाठ्यांशावरुन उपकौशल्यांचा योग्य वापर करतात त्यांना पाच मिनिटापर्यंत प्रत्याभरणपूरेसे होते. अशा विद्यार्थ्यांचे प्रमाण ३९.२ आहे.

विद्यार्थी शिक्षक अध्यापन कौशल्यानुसार पाठ्यांश निवडला तरी उपकौशल्यांचा योग्य वापर करीत नाही व त्यांना पाच ते दहा मिनिटापर्यंत गरजेनुसार प्रत्याभरण द्यावे लागते सुरुवातीच्या अध्यापन कौशल्यसरावासाठी ५ ते १० मिनिटे प्रत्याभरण द्यावे लागते. ५ ते १० मिनिटे प्रत्याभरण दिले जाते असे प्रमाण ६०.८ असून ते विचारात घेण्यासारखे आहे. यामुळे सुरुवातीच्या अध्यापन कौशल्याच्या सराव चक्रास अधिक कालावधी लागतो.

'प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, जे विद्यार्थी शिक्षक अध्यापन कौशल्यानुसार पाठ्यांश निवडून पाठाची योग्य तयारी करुन उपकौशल्यांचा योग्य वापर करतात अशा विद्यार्थी शिक्षकांना पाच मिनिटापर्यंत प्रत्याभरण द्यावे लागते.

जे विद्यार्थी शिक्षक अध्यापन कौशल्यानुसार पाठ्यांश निवडूनही पाठाची योग्य तयारी करत नाहीत तसेच उपकौशल्यांचा पूरेशा प्रमाणात वापर करत नाहीत अशा विद्यार्थी शिक्षकांना ५ ते १० मिनिटापर्यंत प्रत्याभरण द्यावे लागते. म्हणजेच विद्यार्थ्यांच्यातयारी नुसार प्रत्याभरणसाठी वेळ द्यावा लागतो.

## ५.२७ सूक्ष्म पाठ अभिरुप परिस्थितीत घेताना येणाऱ्या अडचणी :-

अभिरुपता म्हणजे कृत्रिमरीत्या घडवून आणलेली पण हुबेहूब वाटणारी घटना सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षणासाठी अभिरूपता हे साधन असून त्याच्यासहाय्याने वि. शिक्षकांना अध्यापन कौशल्याचा सराव दिला जातो.

''एखादेच कौशल्य, एखादा संबोध असलेला पाठ्यविषय, पाच मिनिटाचा मर्यादित वेळ ७-८ विद्यार्थी संख्या या व्यवच्छेदक वैशिष्ट्यां व्यतिरिक्त अन्य गोष्टी जितक्या खऱ्या वर्गाशी मिळत्या जुळत्या ठेवता येतील तितकी अभिरुपता अधिक साधेल''-५

---

* ५ - सुमन करंदीकर - सूक्ष्माध्यापन एक प्रभावी प्रशिक्षण पद्धती (पूणे : नुतन प्रकाशन, पूणे ३०) प्रथमावृत्ती १९८३; पान क्र. २३.

अभिरुप परिस्थितीत सूक्ष्म पाठ घेताना प्रशिक्षणार्थ्यांनाच शालेय विद्यार्थ्यांच्या भूमिका पार पाडाव्या लागतात. ज्या वर्गाचा पाठ्यांश असेल त्या वर्गातील मूले बौद्धीकदृष्ट्या कोणत्या पातळीवर आहेत, त्यांचे विचार, भावना, कृती यांचा विचारप्रशिक्षणार्थीला करावा लागतो सूक्ष्म पाठ घेताना कृत्रिम प्रयोगशालेय अभिरुप परिस्थितीत अडचणी येतात.

महाविद्यालयात सूक्ष्म पाठ अभिरुप परिस्थितीत घेताना येणाऱ्या अडचणींबाबत गोळा केलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

**कोष्टक क्र. २६७**

**सूक्ष्म पाठ अभिरुप परिस्थितीत घेताना येणाऱ्या अडचणी**

| अ.नं. | सूक्ष्मपाठ अभिरुप परिस्थीतीत घेताना येणाऱ्या अडचणी | एकूण प्र. संख्या | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | विद्यार्थी शिक्षकांच्या भूमिकेचे पालन करत नाहीत | १२५ | २८ | २२.४ |
| २ | वि. शिक्षक विद्यार्थ्यांच्या भूमिकेचे पालन करत नाहीत | १२५ | ६० | ४८.० |
| ३ | सूक्ष्म पाठासाठी निवडलेल्या वर्गातील वातावरणनिर्मिती होत नाही | १२५ | ९४ | ७५.२ |
| ४ | पाठासाठी लागणारे आवश्यक शैक्षणिक साहित्य वापरत नाहीत | १२५ | ५.२० | १६.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सूक्ष्म पाठ भूमिकेचे पालन करत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २२.४ आहे. विद्यार्थी शिक्षक विद्यार्थ्यांच्या भूमिकेचे पालन करत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४८.० आहे, सूक्ष्म पाठासाठी निवडलेल्या इयत्तेनुसार वर्गातील वातावरण निर्मिती होत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७५.२ आहे तर पाठासाठी लागणारे आवश्यक शैक्षणिक साहित्य वापरत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १६.०० आहे.

सूक्ष्म पाठ घेताना अभिरुप परिस्थितीत गटातील विद्यार्थी शिक्षकांना शिक्षकांची भूमिका करावी लागते. विद्यार्थी शिक्षक शिक्षकांच्या भूमिकेचे पालन करत नाहीत अशांचे प्रमाण २२.४ आहे अध्यापन कौशल्यांचा सराव करण्यासाठी विद्यार्थी शिक्षकांना सूक्ष्म पाठ घ्यावा लागतो. जर विद्यार्थी शिक्षकांनी पाठ घेताना शिक्षकांच्या भूमिकेचे पालनकेले नाहीत तर प्रशिक्षणाचा हेतू साध्य होत नाही.

सूक्ष्म पाठ घेताना पाठ निरीक्षक विद्यार्थी शिक्षकाव्यतिरिक्त उरलेल्या विद्यार्थी शिक्षकांना विशिष्ट इयत्तेतील विद्यार्थ्यांची भूमिका करावी लागते. जर विद्यार्थी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भूमिकेचे पालन केले नाही तर वर्गाध्यापनासाठी आवश्यक वातावरणनिर्मिती होत नाही. त्यामुळे सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये साध्य होणार नाहीत.

सूक्ष्म पाठ घेताना पाठ्यांश निवडलेल्या इयत्तेनुसार वर्गातीलवातावरण निर्मिती झाल्यास अध्यापन कौशल्यांचा सराव होतो. सूक्ष्म पाठासाठी निवडलेल्या वर्गातील वातावरणनिर्मिती होत नाही असे प्रमाण ७५.२ आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे. वर्गातील वातावरण निर्मिती न झाल्यास अध्यापन कौशल्यांचा सराव व प्रभुत्व संपादन होणार नाही म्हणून वातावरणनिर्मिती होणे आवश्यक आहे.

विद्यार्थी शिक्षकांना सूक्ष्म पाठ घेताना आशयानुरुप आवश्यक शैक्षणिक साहित्य

वापरावे लागते. विद्यार्थी शिक्षक पाठास लागणारे शैक्षणिक साहित्य उपलब्ध नसेल तर निर्मिती करण्यास किंवा उपलब्ध करण्यास कंटाळा करतात त्यामुळे शै. साहित्याचे दिग्दर्शन करण्याचे कौशल्य व त्याची परिणामकारकता अजमावता येत नाही.

प्राचार्य व विभाग प्रमुखांच्या मुलाखती वरुन असे दिसून आले की, विद्यार्थी शिक्षकअभिरुप परिस्थितीत शिक्षकांच्या भूमिकांचे पालन न केल्यास अध्यापन कौशल्याचा सराव यशस्वी होत नाही. विशिष्ट इयत्तेचा आशय शिकविताना विद्यार्थी शिक्षक विद्यार्थ्यांच्या भूमिकेचे पालनकरत नाहीत त्यामुळे इयत्तेनुसार वर्गात वातावरण निर्मिती होत नाही. विद्यार्थी शिक्षक आवश्यक ठिकाणी शैक्षणिक साधनांचा वापर करीत नसल्यास शैक्षणिक साधनाचा पाठावर होणारापरिणाम व प्रभाव अजमावता येत नाही. म्हणून सूक्ष्म पाठ अभिरुप परिस्थितीत घेताना विद्यार्थी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या पाठ निरीक्षकाच्या भूमिकांचे पालन केले पाहिजे त्याशिवाय वर्गातील वातावरण निर्मिती होत नाही. यामुळे सूक्ष्म पाठ घेताना वरील अडचणींचा विचार करणे आवश्यक आहे.

## ५.२८ गैरहजर विद्यार्थी शिक्षकांचे सूक्ष्म पाठ :-

सूक्ष्म पाठ प्रशिक्षणांतर्गत अध्यापन कौशल्यांचा उपयोग कसा करावा याचा सराव केला जातो. विद्यार्थी शिक्षक अध्यापन कौशल्यावर प्रभुत्व संपादित करतात. अध्यापन कौशल्याचा उपयोग सराव पाठात केला जातो. विद्यार्थी शिक्षक जर सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रमास गैरहजर असेल तर त्याचे सूक्ष्म पाठ पुन्हा घेण्याबाबत महाविद्यालय निर्णय घेतात.

महाविद्यालयातील सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रमास गैरहजर विद्यार्थी शिक्षकाचे सूक्ष्म पाठ पुन्हा घेण्याबाबत कोणता निर्णय विद्यार्थी शिक्षकाचे सूक्ष्म पाठ पुन्हा घेण्याबाबत कोणता निर्णय होतो याविषयी माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे

आहे.

कोष्टक क्र. २८

गैरहजर विद्यार्थ्यांचे सूक्ष्म पाठ

| अ.नं. | सूक्ष्मपाठास गैरहजर विद्यार्थी शिक्षकाचे सूक्ष्म पाठ घेतले जाततका? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १२५ | १००.०० |
| २ | नाही | - | - |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रमास गैरहजर विद्यार्थी शिक्षकांचे सूक्ष्म पाठ पुन्हा घेतले जातात असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण १००.०० आहे हे प्रमाण अतिशय चांगले आहे.

सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रमानंतर सराव पाठ घेतले जातात. अध्यापन कौशल्यांवर प्रभुत्व संपादित करुन त्याचा प्रभावीपणे वापर सराव पाठात करता येतो. म्हणून जर विद्यार्थी शिक्षक सूक्ष्म पाठ प्रशिक्षणास गैरहजर असेल तर त्या विद्यार्थी शिक्षकांचे सूक्ष्म पाठ घेण्याची आवश्यकता आहे. सदरहू गैरहजर विद्यार्थी शिक्षकांचे सूक्ष्म पाठाचे पुन्हा नियोजन केले जाते हे शैक्षणिक दृष्ट्या अतिशय योग्य आहे. अश्यांचे प्रमाण १०० टक्के आहे ही चांगली बाब आहे.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की विद्यार्थी शिक्षक सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रमात पूर्णत: गैरहजर असेल किंवा काही अध्यापन कौशल्याच्या सराव कार्यक्रमास गैरहजर असल्यास त्यांच्या अडचणी लक्षात घेतल्या जातात. नंतर गैरहजर

विद्यार्थी शिक्षकांचे सूक्ष्म पाठ घेण्यासाठी स्वतंत्र नियोजन केले जाते. सूक्ष्मपाठ प्रशिक्षण प्रात्यक्षिकांतर्गत अध्यापन कौशल्याचे सरावचक्र पूर्ण करुन घेतले जाते.

## १.२९ गैरहजर विद्यार्थी शिक्षकांचे सूक्ष्म पाठाविषयी अडचणी :-

विद्यार्थी शिक्षक सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रमासाठी गैरहजर असेल किंवा काही अध्यापन कौशल्याच्या सरावासाठी गैरहजर असल्यास महाविद्यालयाकडूनपुन्हा सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रम नियोजित केला जातो. सूक्ष्म पाठ कार्यक्रम पुन्हा घेताना अडचणी येतात.

महाविद्यालयात गैरहजर विद्यार्थी शिक्षकांचे सूक्ष्म पाठ पुन्हा घेताना कोणकोणत्या अडचणी येतात याविषयी गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. २९

## गैरहजर वि.शिक्षकाचे सूक्ष्म पाठविषयी अडचणी

| अ.नं. | गैरहजर वि.शिक्षकोचे सूक्ष्मपाठ पुन्हा घेताना येणाऱ्या अडचणी | ए. प्र.संख्या | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | प्राध्यापकांना जादा वेळकाम करावे लागते | १२५ | ९१ | ७२.८ |
| २ | प्राध्यापकांना वेळ मिळेल तेव्हा सूक्ष्मपाठ घेतले जातात त्यामुळे प्रभाव कमी होतो | १२५ | ५६ | ४४.४ |
| ३ | गटातील इतर विद्यार्थी शिक्षकांचा वेळ वाया जातो. | १२५ | ४८ | ३८.४ |
| ४ | गैरहजर विद्यार्थी शिक्षकाच्या पाठास गटातील इतर विद्यार्थी शिक्षक प्रतिसाद देत नाहीत | १२५ | ४३ | ३४.४ |
| | एकूण | १२५ | १००.०० | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, गैरहजर विद्यार्थी शिक्षकांचे सूक्ष्म पाठ पुन्हा धेताना येणाऱ्या अडचणीपैकी प्राध्यापकांना जादा वेळ काम करावे लागते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७२.८ आहे, प्राध्यापकांना वेळ मिळेल तेव्हा सूक्ष्म पाठ घेतले जातात त्यामुळे प्रभाव कमी होतो असा प्रतिसाद नोंदवणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४४.४ आहे, गटातील इतर विद्यार्थी शिक्षकांचा वेळ वाया जातो असा प्रतिसाद नोंदवणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३८.४ आहे. गैरहजर विद्यार्थी

शिक्षकाच्या पाठास गटातील इतर विद्यार्थी शिक्षक प्रतिसाद देत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३४.४ आहे.

प्राध्यापकांना गैरहजर विद्यार्थी शिक्षकांचे पाठ महाविद्यालय सुरु होण्यापूर्वी किंवा महाविद्यालयाचे काम संपलयानंतर घ्यावे लागतात. त्यामुळे प्राध्यापकांना जादा वेळ काम करावे लागते. अशा प्रतिसादाकंचे प्रमाण ७२.८ आहे.

प्राध्यापकांच्या रिकाम्या तासिकानुसार पाठ घेतले जातात अशा वेळी सूक्ष्म अध्यापनासाठी लागणारे शैक्षणिक वातावरण तयार होत नाही त्यामुळे सूक्ष्म अध्यापनाचा प्रभाव कमी होतो. गैरहजर विद्यार्थ्यांमुळे इतर नियमित विद्यार्थ्यांना त्यांचे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यासाठी हजर रहावे लागते त्यामुळे त्यांचा वेळ वाया जातो. त्यामुळे ते विद्यार्थी शिक्षक सूक्ष्म पाठ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य प्रतिसाद देत नाहीत.

प्राचार्य व विभाग प्रमुख यांच्या मुलाखतीवरुनअसे दिसून आले की, गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थी शिक्षकांमुळे वरील सर्व अडचणींना तोंड द्यावे लागते ही वस्तुस्थिती आहे. परुतू प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करणे विद्यापीठाच्या नियमानुसार आवश्यक असल्याने वरील अडचणी लक्षात घेवून सुद्धा गैरहजर विद्यार्थी शिक्षकाचे पाठ घ्यावेच लागतात.

## ५.३० तात्विक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य :-

बी.एड्. अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक कामांतर्गत प्रत्येक तात्विक विषयाची संबंधित प्रात्यक्षिक कार्यासाठी विषयांची यादी दिली आहे विद्यार्थी शिक्षकांना त्या यादीतून एक विषय निवडून प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करावे लागते. प्रात्यक्षिक विषय निवडीबाबत विद्यार्थी शिक्षकांना स्वातंत्र्य देण्याबाबत प्रत्येक महाविद्यालयाचे धारेण वेगळे असते.

महाविद्यालयात प्रात्यक्षिक कार्य निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थी शिक्षकांना दिले जाते की नाही याबाबत गोळा केलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ३७

### तात्विक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य निवड

| अ.नं. | तात्विक निवडीचे स्वातंत्र्य वि.शिक्षकांना दिले जाते? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ७९ | ६३.२ |
| २ | नाही | ४६ | ३६.८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की महाविद्यालयात प्रात्यक्षिक कार्य निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थी शिक्षकांना दिले जातेअसा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ६३.२ आहे प्रात्यक्षिक कार्य निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थी शिक्षकांना दिले जात नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३६.८ आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक कार्यास प्रत्येक तात्विक विषयावर आधारित प्रात्यक्षिक कार्यासाठी विषय निवडीचे स्वातंत्र्य दिल्यास विद्यार्थी शिक्षक स्वत:च्या आवडीनुसार विषय निवडतो. त्यामुळे प्रात्यक्षिक काम विशेष आवडीने व समरस होवून करतो असा प्रतिसाद देणाऱ्याचे प्रमाण ६८.२ आहे हे प्रमाण चांगले आहे.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, प्रात्यक्षिक कार्य निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थी शिक्षकांना दिल्यास प्रात्यक्षिकांत विविधता येते. विद्यार्थी शिक्षक आपला आवडीप्रमाणे प्रात्यक्षिकाची निवड करतो त्यामुळे प्रात्यक्षिक दर्जेदार होते. म्हणून काही महाविद्यालयात विद्यार्थी शिक्षकांना तात्विक विषयचे प्रात्यक्षिक कार्य निवडीचे स्वातंत्र दिले जाते.

प्रात्यक्षिक कामाच्या निवडीत स्वातंत्र्य दिल्याने प्रात्यक्षिकाचे मूल्यमापन वेगवेगळ्या पद्धतीनेकरावे लागते. प्रात्यक्षिक मूल्यमापनास समानता यावी म्हणून काही महाविद्यालयात विद्यार्थी शिक्षकांना तात्विक विषयाचे प्रात्यक्षिक निवडीचे स्वातंत्र्य दिले जात नाही.

## ५.३१ तात्विक विषयाच्या प्रात्यक्षिक कार्याच्या निवडीचे स्वातंत्र्य दिल्याने येणाऱ्या अडचणी :-

तात्विक विषयाशी संबंधीत प्रत्येक पेपरचे एक याप्रमाणे पाचप्रात्यक्षिक कार्ये विद्यार्थी शिक्षकांना करावी लागतात. त्यापैकी पेपर क्र. १,३,४ व ५ यांच्या प्रात्यक्षिक कार्याच्या त्रिषयाची यादी शिवाजी विदयापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रम पूस्तिकेत दिली आहे. पेपर क्र.२ साठी मानसशास्त्रीय प्रयोग हे प्रात्यक्षिक कार्य आहे. चार पेपरच्या प्रात्यक्षिक कार्याच्या निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थी शिक्षकांना दिल्याने अडचणी निर्माण होतात.

महाविद्यालयात तात्विकविषयाच्या कार्याच्या निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थी शिक्षकांना दिल्यानेकोणकोणत्या अडचणी येतात याबाबत गोळा केलेली माहिति खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ३१

### तात्विक विषयाच्या प्रात्यक्षिक कार्य निवडीचे स्वातंत्र्य दिल्यास येणाऱ्या अडचणी :-

| अ.नं. | तात्विक विषय प्रात्यक्षिक कार्य निवडीचे स्वातंत्र्य दिल्याने येणाऱ्या अडचणी | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एका तात्विक विषयाच्या प्रात्यक्षिक कार्याविषयी स्वातंत्र्यरितत्या मार्गदर्शन करावे लागते | ३८ | ३०.४ |
| २ | अहवाल लेखन तपासताना मूल्यमापन पद्धती बदलावी लागते | २३ | १८.४ |
| ३ | दिलेल्या प्रात्यक्षिकापैकी सोपे प्रात्यक्षिक कार्य विद्यार्थी शिक्षक निवडतात | ४४ | ३५.२ |
| ४ | सर्वेक्षण व्यक्तीअभ्यास, प्रत्यक्षभेटी इ. वर आधारित प्रात्यक्षिक कार्यापेक्षा केवळ लेखनावर आधारित प्रात्यक्षिक निवडीवर भर देतात | ३० | २४.० |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, तात्विक विषयाच्या प्रात्यक्षिक कार्य निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थी शिक्षकांना दिल्यास येणाऱ्या अडचणीपैकी विषयाच्या प्रात्यक्षिक कार्याविषयी स्वतंत्ररित्या मार्गदर्शन करावे लागते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३०.४आहे, अहवाल लेखन तपासताना मूल्यामापन पद्धती

बदलावी लागते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १८.४ आहे. दिलेल्या प्रात्यक्षिकापैकी सोपे प्रात्यक्षिक कार्य विद्यार्थी शिक्षक निवडतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३५.२ आहे तर सर्वेक्षण, अभ्यास, प्रत्यक्षभेटी इ. वरआधारित प्रात्यक्षिक कार्यापेक्षा केवळ लेखनावर आधारित प्रात्यक्षिक निवडीवर भर देतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २४.० आहे. तात्विक विषयाच्या प्रात्यक्षिक निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना दिल्यास, विद्यार्थी शिक्षक स्वत:च्या आवडीनुसार प्रात्यक्षिकाची निवड करतात. यामुळे प्रात्यक्षिकात विविधता येते. वेगवेगळ्या प्रात्यक्षिकामुळे प्राध्यापकांना स्वतंत्ररित्या मार्गदर्शन करावे लागते. यासाठी अधिक वेळ द्यावा लागतो.

प्रत्येक तात्विक विषयाच्या प्राथमिक कामाची यादी अभ्यासक्रम पुस्तिकेत दिली आहे. परंतु प्रत्येक प्रात्यक्षिक कार्याची काठिण्य पातळी भिन्न आहे. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांनी निवडलेल्या प्रात्यक्षिकाचे अहवाल तपासताना मूल्यमापन पद्धती बदलावी लागते. सदरहू मूल्यमापनात सारखेपणा येत नाही.

दिलेल्या प्रात्यक्षिक यादीपैकी प्रात्यक्षिक कार्य निवडल्याचे स्वातंत्र्य दिल्याने, मानव स्वभावानुसार सोपे प्रात्यक्षिक कार्य निवडले जाते. अधिक काठिण्य स्तराच्या प्रात्यक्षिकाकडे दुर्लक्ष होते.

प्रात्यक्षिक कार्यासाठी सर्वेक्षण, व्यक्तिअभ्यास, प्रत्यक्ष भेटी इ. चा समावेश असतो. प्रात्यक्षिक निवडीच्या स्वातंत्र्यामुळे विद्यार्थी शिक्षक वरील प्रात्यक्षिक कार्यापेक्षा केवळ लेखनावर आधारित प्रात्यक्षिक निवडतात.

प्राचार्य व विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरून असे दिसून आले की, विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक कार्याच्या निवडीचे स्वातंत्र्य दिल्याने मार्गदर्शनासाठी अधिकवेळ द्यावा लागतो. अहवाल लेखन तपासताना मूल्यमापन पद्धत बदलावी लागते, विद्यार्थी शिक्षक सोप्या प्रात्यक्षिक कार्याची निवड करतात. म्हणून विद्यार्थी शिक्षकांना प्रात्यक्षिक

निवडीचे स्वातंत्र्य न देता प्रात्यक्षिकात व मूल्यमापनात समानता यावी, मार्गदर्शनास सोपे जावे म्हणून सामुहिकरित्या निर्णय घेवून विद्यार्थी शिक्षकांना प्रात्यक्षिक कार्याच्या निवडीचे स्वातंत्र्य दिले जात नाही. यामुळे वरील अडचणी टाळता येतात.

## ५.३२ पेपर क्र ३ चे प्रात्यक्षिक कार्य

पेपर क्र. ३ च्या तात्विक भागाशी संबंधित प्रात्यक्षिक कार्यासाठी शाळेचा अभ्यास, शालेय वातावरणाचा अभ्यास, शाळेतील अभ्यासानुवर्ती उपक्रमांचे संघटन, एका वर्गाच्या स्वाध्याय तपासणीचा अहवाल, शालेय वेळापत्रक तयार करणे, विद्यार्थ्यांचे संकलित नोंदपत्रक तयार करणे इ. विषय विद्यापीठाच्या अभ्यासक्रम पुस्तिकेत दिले आहेत. सलग सराव पाठाबरोबरच विद्यार्थी शिक्षकांना अध्यापनाव्यतिरिक्त शाळेत चालणाऱ्या अन्य कार्यक्रमाचा अनुभव मिळावा म्हणून शालेय अनुभव कार्यक्रमाचे नियोजन केले जाते. शालेय अनुभव कार्यक्रमात पेपर क्र. ३ मधील प्रात्यक्षिके विद्याथी शिक्षकांना पूर्ण करता येतात.

महाविद्यालयात पेपर क्र. ३ चे प्रात्यक्षिक कार्य शालेय अनुभव कार्यक्रमात पूर्ण करुन घेतले जाते का या विषायी गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ३२

पेपर क्र. ३ चे प्रात्यक्षिक कार्य

| अ.नं. | पेपर ३चे प्रात्यक्षिक कार्य शालेय अनुभव कार्यक्रमास पूर्ण करुन घेतले जाते का? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८८ | ७०.४ |
| २ | नाही | ३७ | २९.६ |
| | एकूण | १२५ | १००.० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, पेपर क्र. ३ चे प्रात्यक्षिक कार्य शालेय अनुभव कार्यक्रमात पूर्ण करुन घेतले जो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७०.४ आहे. पेपर क्र ३ चे प्रात्यक्षिक कार्य शालेय अनुव कार्यक्रमात पूर्ण करून घेतले जात नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसारकांचे प्रमाण २९.६ आहे.

शालेय अनुभव कार्यक्रमात अभ्यासानुवर्ती उपक्रम, वर्ग शिक्षकांची कामे, वर्गव्यवस्थापन, विविध रजिस्टरे व नोंदपत्रके यांची महिती, गुणतक्ते, निकालपत्रक तयार करणे इ. कामाचा समावेश होतो. शालेय अनुभव कार्यक्रमाबरोबर विद्यार्थी शिक्षकांना पेपर क्र. ३ शी संबंधित प्रात्यक्षिक कामासाठी आवश्यक माहिती घेता येते, एखाद्या वर्गात चाचणी घेवून त्याच्या तपासणीचा अहवाल तयार करता येतो. पेपर क्र ३ च्या प्रात्यक्षिकासाठी शालेय अनुभव कार्यक्रमाचाही उपयोग होतो व प्रात्यक्षिकासाठी स्वतंत्र वेळ द्यावा लागत नाही. वरील बाबी साध्य होण्यास ज्या महाविद्यालयामध्ये पेपर क्र. ३ चे प्रात्यक्षिक शालेय अनुभव कार्यक्रमात पूर्ण करुन घेतले जाते. अश्यांचे प्रमाण ७०.४ आहे हे शैक्षणिक दृष्ट्या योग्य आहे.

ज्या महाविद्यालयात पेपर क्र. ३ चे प्रात्यक्षिक शालेय अनुभव कार्यक्रमात घेतले जात नाही त्यांचे प्रमाण २९.६ आहे. शालेय अनुभव कार्यक्रमात विद्यार्थी शिक्षक पूर्ण आठवडा शालेय वेळेत उपस्थित असतात. त्यामुळे पेपर क्र. ३ शी संबंधित प्रात्यक्षिक या काळात पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतू काही महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार पेपर क्र. ३ चे प्रात्यक्षिक पूर्ण करण्यास सांगतात हे शैक्षणिक दृष्ट्या अयोग्य आहे. अश्या प्रतिसादकांचे प्रमाण २९.६ असले तरी हे प्रमाण विचारात घेणे आवश्यक आहे.

प्राचार्य व विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, पेपर क्र. ३ चे प्रात्यक्षिक शालेय अनुभव कार्यक्रमात पूर्ण केल्यास विद्यार्थी शिक्षकांना त्यांच्या सवडीनुसार प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्याची संधी दिल्यास प्रत्यक्ष अनुभव घेता प्रात्यक्षिक लेखनकार्य दुसऱ्यांचे उतरवून काढण्याची शक्यता असते. म्हणून पेपर क्र.

३ चे प्रात्यक्षिक शालेय अनुभव कार्यक्रमातच पूर्ण करून घ्यावे.

काही महाविद्यालयांच्या परिसरात शाळांची संख्या कमी असल्याने पेपर क्र.३ शी संबंधित प्रात्यक्षिक करण्यासाठी विद्यार्थी शिक्षकांना सुट्टीच्या काळात गावांजवळील शाळांची माहिती गोळा करण्याचे काम दिले जाते. कारण महाविद्यालयाच्या परिसरात कमी शाळा असल्याने त्याच त्या शाळेवर आधारित प्रात्यक्षिक केले जाते. म्हणून यातही दोष आहेत.

म्हणून पेपर क्र. ३ चे प्रात्यक्षिक काम शालेय अनुभव कार्यक्रमाच्या वेळी पूर्ण करणे अधिक सोयीस्कर ठरते.

## ५-33 पेपर क्र. ४ ऐच्छिक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य :

शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रमात पेपर क्र. ४ च्या पेपरचा पहिला विभाग शिक्षणातील नव विचार प्रवाह या तात्विक विषयाचा आहे. तर दुसरा विभाग ऐच्छिक विषय लोकसंख्या शिक्षण, ग्रामिण शिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञान, स्कूल लायब्ररी, पर्यावरणशास्त्र, कॉम्प्युटर शिक्षण इ. वर आधारित आहे. पेपर क्र. ४ च्या पहिल्या विभागाशी संबंधित प्रात्यक्षिक काम नाही परंतू विभाग दोन मधील ऐच्छिक विषयाच्या तात्विक भागावर आधारित प्रात्यक्षिक कार्य विद्यार्थी शिक्षकांना करावे लागते. प्रात्यक्षिक कार्याच्या स्वरुपावर निवडलेले प्रात्यक्षिक कार्य किंवा गटवार केले जाते.

महाविद्यालयात पेपर क्र. ४ च्या ऐच्छिक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य वैयक्तिक का गटवार पद्धतीने घेतले जाते या विषयी गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ३१

### पेपर क्र. ४ चे प्रात्यक्षिक कार्य

| अ.नं. | पेपर ४ चे ऐच्छिक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक | ८२ | ६५.६ |
| २ | गटवार | ४३ | ३४.४ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की पेपर क्र. ४ च्या ऐच्छिक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य वैयक्तिक घेतले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ६५.६ आहे. ऐच्छिक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य गटवार घेतले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३४.४ आहे.

पेपर क्र. ४ च्या ऐच्छिक विषयातील विषयातील प्रात्यक्षिकांची यादी अभ्यासक्रम पुस्तिकेत दिली आहे. त्यापैकी काही प्रात्यक्षिक कामे वैयक्तिकरित्या करता येतात. काही प्रात्यक्षिक कामे गटाने करता येतात. प्रात्यक्षिक विषयनिवडीवर वैयक्तिक किंवा गटवार प्रात्यक्षिक कार्य अवलंबून आहे.

पेपर क्र. ४ चे ऐच्छिक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य वैयक्तिक दिल्यामुळे विविधता येते. विद्यार्थी शिक्षकांना प्रात्यक्षिक निवडीचे स्वातंत्र्य मिळते. विद्यार्थ्यांकडून नवनिर्मिती केली जाते. त्यांना प्रात्यक्षिक करताना आपल्या कल्पना सादर करण्याची संधी मिळते. प्रमाण ६५.६ आहे.

पेपर क्र. ४ चे प्रात्यक्षिक कार्य गटवार घेतल्यास गटातील काही विद्यार्थी

प्रात्यक्षिकात सक्रिय सहभागी होतात, व काही विद्यार्थी निष्क्रीय असतात. परंतू जी प्रात्यक्षिके खार्चिक असतात किंवा त्या प्रात्यक्षिकासाठी मनुष्यबळ अधिक लागते अशी प्रात्यक्षिके गटवार घ्यावीत अश्यांचे प्रमाण ३४.४ आहे.

प्राचार्य व विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, पेपर क्र. ४ चे ऐच्छिक विषयाचे प्रात्यक्षिक वैयक्तिक दिल्यास, विद्यार्थी आपल्या आवडीप्रमाणे निवड करतो. स्वत:च्या कल्पना वापरून प्रात्यक्षिक करतो. परंतू गटवार प्रात्यक्षिक घेतल्यास उत्साही विद्यार्थी शिक्षक सहभागी होतात व निष्क्रिय असतात. परंतू जी प्रात्यक्षिके खार्चिक असतात किंवा त्या प्रात्यक्षिकासाठी मनुष्यबळ अधिक लागते अशी प्रात्यक्षिके गटवार घ्यावीत अशांचे प्रमाण ३४.४ आहे.

प्राचार्य व विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, पेपर क्र. ४ चे ऐच्छिक विषयाचे प्रात्यक्षिक वैयक्तिक दिल्यास, विद्यार्थी आपल्या आवडीप्रमाणे निवड करतो. स्वत:च्या कल्पना वापरुन प्रात्यक्षिक करतो. परंतू गटवार प्रात्यक्षिक घेतल्यास उत्साही विद्यार्थी शिक्षक सहभागी होत नाहत. तरीही जी प्रात्यक्षिके खर्चिक असतात किंवा त्यासाठी अधिक मनुष्यबळ लागते, अशी प्रात्यक्षिके गटवार घेतली जातात.

## ५.३४ मूल्यमापन कृतिसत्र :

''मूल्यमापनावर विशेष प्रशिक्षण कार्यक्रमात एका अध्यापन पद्धतीवर आधारित वार्षिक नियोजन, घटक नियोजन, पाठनियोजनाशी संबंधित बाबी समजण्यासाठी तात्विक भागाचो व्याख्याने देवून घटक चाचणी, नैरानिक कसोटी तयार करून घेतली जाते. यासाठी मूल्यमापन संकल्पना, उद्दिष्ट्ये, मूल्यमापन साधने त्याचा वापर-करुन घटक चाचणी तयार करण्यासाठी एकूण १० तासांचा कालावधी देण्यात यावा असे बी. एड् अभ्यासक्रम पुस्तिकेत सूचित केले आहे''. ६

महाविद्यालयात मूल्यमापन कृतिसत्र घेतले जाते की नाही याबाबत गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

---

६ कित्ता - पान नं. १२३

## कोष्टक क्र. ३४

## मूल्यमापन कृतिसत्र

| अ.नं. | मूल्यमापन कृतिसत्र घेतले जाते | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १२५ | १००.०० |
| २ | नाही | ० | - |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की महाविद्यालयात मूल्यमापन कृतिसत्र घेतले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १००.०० आहे.

विद्यार्थी शिक्षकांना शिक्षकी पेशात गेल्यानंतर विद्यार्थ्यांचे शै. मूल्यमापन करावे लागते. वस्तुनिष्ठ, अचूक, सातत्य पूर्ण मूल्यमापन कसे करायचे, मूल्यमापनाची साधने त्याचा वापर व उपयुक्तता, चाचणींचे प्रकार आवश्यकतेनुसार चाचणी तयार करुन त्याची कार्यवाही करणे इ. बाबींची तात्विक माहिती असावी व त्यावर आधारित प्रात्यक्षिक काम करावे लागते. त्यासाठी मूल्यमापनावर विशेष प्रशिक्षण कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित केला जातो.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, अध्ययन अध्यापन प्रक्रियेइतकीच मूल्यमापन प्रक्रिया शिक्षकांच्या दृष्टीने महत्वाची आहे. विद्यापीठाच्या अभ्यासक्रम पुस्तिकेत मूल्यमापन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन सूचित केले आहे. सदर प्रत्येक महाविद्यालयात आठ दिवसांच्या मूल्यमापन कृतिसत्राचे आयोजन केले जाते. विद्यार्थी शिक्षक सदर कृतिसत्रात घेतलेल्या अनुभवावरुन घटक चाचणी तयार करतात.

## ५.३५ मूल्यमापन कृतिसत्र कार्यवाहीतील अडचणी :

मूल्यमापन कृतिसत्रासाठी शालेय पाठ्यक्रम, शालेय पाठ्यपुस्तके, मूल्यमापनावरील संदर्भ पुस्तके, हस्तपुस्तिका, नियोजनाचे नमूने इ. आवश्यक सामुग्री लागते. मूल्यमापनाची संकल्पना, उद्दिष्ट्ये, स्पष्टीकरणे, अध्ययनअनुभव, मूल्यमापन साधने इ. तात्विक भाग पेपर क्र. ३ मधील घटकांशी संबंधित आहे. म्हणून मूल्यमापन कृतिस यापूर्वी पेपर क्र. ३ व पेपर क्र. ५ मधील तात्विक भागाची व्याख्याने होणे आवश्यक असते. मूल्यमापन कृतिसत्र होण्यापूर्वी त्याच्याशी संबंधित तात्विक भाग न झाल्यास अडचणी येतात.

महाविद्यालयात मूल्यमापन कृतिसत्र कार्यवाहीत येणाऱ्या अडचणींविषयी गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ३५

मूल्यमापन कृतिसत्र कार्यवाहीतील अडचणी

| अ.नं. | मूल्यमापन कृतिसत्र कार्यवाहीतील अडचणी | प्र.ए.सं. | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | कृतिसत्राच्या कालावधीत तात्विक भाग समजावून दिल्यास प्रात्यक्षिक कार्यास वेळ अपूरा पडतो. | १२५ | ४३ | ३४.४ |
| २ | मूल्यमापनावरील पूरेसे संदर्भ साहित्य उपलब्ध नाही | १२५ | २९ | २३.२ |
| ३ | घटकचाचणीची अंमलबजावणी न केल्याने प्रश्नावर पृथक्करणात प्रश्नाचा कठिण्य स्तरठरवता येत नाही | १२५ | २८ | २२.४ |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, कृतिसत्राच्या कालावधीत तात्विक भाग समजावून दिल्यास प्रात्यक्षिक कार्यास वेळ अपुरा पडतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ३४.४ आहे. मूल्यमापनावरील पूरेसे संदर्भ साहित्य उपलब्ध नाही असा प्रतिसाद नोंदवणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २३.२ आहे, घटक चाचणीची अंमलबजावणी न केल्याने प्रश्नवार पृथक्करणात प्रश्नाचा काठिण्य स्तर ठरवता येत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २२.४ आहे. मूल्यमापनावर विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करण्यापूर्वी पेपर क्र. ३ मधील शै. मूल्यमापन हा घटक विद्यार्थी शिक्षकांना शिकवल्यास मूल्यमापन कृतिसत्राच्या कालावधीत तात्विक भाग समजावून देण्यासाठी स्वतंत्र वेळ द्यावा लागत नाही. अन्यथा तात्विक भाग समजावून देण्यात वेळ गेल्याने प्रात्यक्षिकास पुरेसा वेळ मिळत नाही. प्रात्यक्षिक कार्य करताना प्राध्यापकांना मार्गदर्शनास व विद्यार्थ्यांनी केलेले प्रात्यक्षिक नोंदी पाहण्यास वेळ कमी मिळतो. तसेच प्रश्नवार पृथक्करण करताना चाचणीची अंमलबजावणी लहान गटावर केल्याशिवाय प्रश्नाचा काठिण्यस्तर ठरवता येत नाही.

प्राचार्य व विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, मूल्यमापन कृतिसत्रापूर्वी आवश्यक पेपर क्र. ३ व पेपर क्र. ५ मधील तात्विक भाग शिकवल्यास कृतिसत्रात प्रात्यक्षिकासाठी अधिक वेळ देता येतो म्हणून कृतिसत्रापूर्वी तात्विक भाग शिकवावा.

मूल्यमापनावरील सदंर्भ साहित्य महाविद्यालयातील ग्रंथालयात पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यास विद्यार्थी शिक्षकांना अहवाल लेखनात अडचणी येतात. घटकचाचणी अंमलबजावणी केल्याशिवाय काठिण्यस्तर ठरवता येत नाही. त्यामुळे प्रश्नवार पृथक्करण करता येत नाही.

## ५.३६ पेपर क्र.५ चे प्रात्यक्षिक कार्य

शिवाजी विद्यापीठाच्या बी. एड्. अभ्यासक्रमात भाग एक मधील पेपर क्र. ५

मध्ये विद्यार्थी शिक्षकांनी निवडलेल्या दोन अध्यापन पद्धतीचा तात्विक भाग आहे. पेपर क्र. ५ शी निगडीत प्रात्यक्षिक कार्य विद्यार्थी शिक्षकांना करावे लागते यासाठी अभ्यासक्रम पुस्तिकेत विषयाची यादी दिली आहे त्याप्रमाणे प्रात्यक्षिक कर्त्याचा विषय निवडून विद्यार्थी शिक्षक प्रात्यक्षिक पूर्ण करतो.

महाविद्यालयात विद्यार्थी शिक्षक पेपर क्र. ५ चे प्रात्यक्षिकासाठी अभ्यासक्रम पुस्तिकेत दिलेल्या विषयापैकी प्रात्यक्षिक कार्य कसे घेतले जाते याविषयी गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ३६

पेपर क्र. ५ चे प्रात्यक्षिक कार्य

| अ.नं. | पेपर ५ चे प्रात्यक्षिक कार्य | एकूण प्रतिसादक संख्या | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | मूल्यमापन कृतिसत्र | १२५ | १२५ | १००.०० |
| २ | शैक्षणिक प्रकल्प | १२५ | १४ | ११.२ |
| ३ | शैक्षणिक साहित्य निर्मिती | १२५ | ६३ | ५०.४ |
| ४ | क्षेत्रीय सहली | १२५ | १७ | १३.६ |
| ५ | भित्तिपत्रक तयार करणे | १२५ | २२ | १६.८ |
| ६ | कार्यक्रमाचे आयोजन करणे | १२५ | २१ | १६.८ |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, पेपर क्र. ५ चे प्रात्यक्षिक कार्यांतर्गत कृतिसत्र घेतले जाते असा प्रतिसाद देण्याचे प्रतिसादकांचे प्रमाण १०० आहे. शैक्षणिक प्रकल्प घेतले जात असा प्रतिसाद नोंदविणाऱ्या प्रतिसादकाचे प्रमाण ११.२ आहे, शैक्षणिक साहित्य निर्मिती केली जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५०.४ आहे. क्षेत्रीय सहलींचे आयोजन असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिंसादकांचे प्रमाण १३.६ आहे, अध्यापन पद्धतीशी संबंधित सहशालेय कार्यक्रमाचे आयोजन करणे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १७.६ आहे तर भित्तिपत्रक तयार करणे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १६.८ आहे.

बी.एड्. अभ्यासक्रमात मूल्यमापनावर विशेष प्रशिक्षण कार्यक्रम घ्यावा असे सूचित केल्याने पेपर क्र. ५ च्या दोन अध्यापन पद्धतींपैकी एका अध्यापन पद्धतीवर आधारित मूल्यमापन कृतिसत्र घेतले जाते. याव्यतिरिक्त शै. प्रकल्प, शै. साहित्य निर्मिती यावर आधारित प्रात्यक्षिक कार्य केले जाते. पेपर क्र.५ च्या प्रात्यक्षिक निवडीचे स्वातंत्र्य दिल्यास विविधता येते. शैक्षणिक प्रकल्प व शैक्षणिक साहित्य निर्मितीमुळे विद्यार्थी शिक्षकांच्या कल्पनांना व नवनिर्मितीस वाव मिळतो. याचे प्रमाण (११.२ + ५०.४) ६१.६ इतके आहे हे शैक्षणिकदृष्ट्या चांगले आहे.

प्राचार्य, विभागप्रमुख मूलाखतीवरुन असे दिसून आले की, पेपर क्र. ५ च्या तात्त्विक भागाशी निगडीत मूल्यमापन कृतिसत्र सर्व महाविद्यालयांमध्ये घेतले जाते.

विद्यार्थी शिक्षक, विषय निवडून त्यावर आधारित शैक्षणिक प्रकल्प करतात. यामध्ये उपकरणनिर्मिती, अहवाललेखन इ. चा समावेश होता. अध्यापन करताना लागणाऱ्या शैक्षणिक साहित्याची निर्मिती केली जाते. अध्यापन पद्धतीशी संबंधित विषय घेवून भित्तिपत्रक तयार केले जाते. तसेच अध्यापन पद्धतीशी संबंधित सहशालेय कार्यक्रमांचे आयोजन करता येते. वरील कार्यापैकी एका प्रात्यक्षिकाची निवड विद्यार्थी शिक्षक करतात.

## ५.३७ मानसशास्त्रीय प्रयोगशाळा

बी.एड्. अभ्यासक्रमातील पेपर क्र. २ अध्यापनाचे मानसशास्त्र व अध्यनकर्त्याचे मानसशास्त्र यावर आधारित शैक्षणिक मानसशास्त्रीय प्रयोग करून घेतले जातात. मानसशास्त्रीय प्रयोग करण्यासाठी स्वतंत्र प्रयोगशाळेची आवश्यकता असते. मानस शास्त्रीय प्रयोग विशिष्ट वातावरणात घेतल्यास वस्तुनिष्ठ व नेमके निष्कर्ष येतात. व त्याचा उपयोग अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील परिणामकारकता वाढविण्यासाठी होतो.

महाविद्यालयामध्ये मानसशास्त्रीय प्रयोगशाळा स्वतंत्र आहे की नाही याविषयी गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ३६७

स्वतंत्र मानसशास्त्रीय प्रयोगशाळा

| अ.नं. | स्वंतंत्र मानसशास्त्रीय प्रयोगशाळा | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ९४ | ७५.२ |
| २ | नाही | ३२ | २४.८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की महाविद्यालयात स्वतंत्र मानसशास्त्रीय प्रयोगशाळा आहे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७५.२ आहे तर महाविद्यालयात स्वतंत्र मानसशास्त्रीय प्रयोगशाळा नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २४.८ आहे.

मानसशास्त्रीय प्रयोगशाळा स्वतंत्र असल्यामुळे विद्यार्थी शिक्षकांना प्रयोगासाठी लागणारे साहित्य, वैयिक्तक किंवा गटवार प्रयोग करण्यासाठी पुरेशी जागा, विद्यार्थी शिक्षकांच्या प्रयोगवह्या ठेवण्यासाठी, कपाटे, मानसशास्त्रज्ञांचे फोटो, तक्ते इ. साहित्य व्यवस्थित ठेवता येते. त्यामुळे प्रयोगासाठी लागणारी वातावरणनिर्मिती होते. म्हणून मानसशास्त्र प्रयोगशाळा आवश्यक आहे असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ७५.२ आहे हे प्रमाण चांगले आहे.

प्राचार्य विभाग प्रमुख मुलाखतीवरुन असे दिसून येते की, मानसशास्त्रीय प्रयोगाच्या निष्कर्षाचे उपयोजन करण्यासाठी योग्य निरीक्षण करण्याची आवश्यकता आहे म्हणून मानसशास्त्रीय प्रयोग विशिष्ट अनुकूल वातावरणात होण्यासाठी स्वतंत्र मानसशास्त्रीय प्रयोगशाळा असाव्यात.

ज्या महाविद्यालयात स्वतंत्र प्रयोगशाळा उपलब्ध नाहीत तेथे वर्ग खोलीत मानसशास्त्रीय प्रयोग घेतले जाता. अनुकूल वातावरण निर्मितीसाठी ज्या महाविद्यालयात स्वतंत्र प्रयोगशाळा नाहीत, त्या महाविद्यालयांनी स्वतंत्र मानसशास्त्र प्रयोगशाळांची व्यवस्था करावी. व्याख्यान कक्षामध्ये मानसशास्त्रीय प्रयोग घेतल्यामुळे अडचणी येतात.

## ५.३८ गटवार प्रयोगासाठी फर्निचर उपलब्धता :

मानसशास्त्रीय प्रयोगासाठी वेळापत्रकात स्वतंत्र तासिका राखून ठेवल्या जातात. एकूण ८० विद्यार्थी शिक्षकांचे ३ ते ४ गट तयार केले जातत. व गटवार मानसशास्त्रीय प्रयोग घेतले जातत. मानसशास्त्रीय प्रयोगशाळेत प्रयोगाचे साहित्याबरोबरच आवश्यक फर्निचर उपलब्ध असणे आवश्यक असते.

महाविद्यालयात गटवार प्रयोग घेण्यासाठी आवश्यक फर्निचर उपलब्ध आहे की नाही याबाबत गोळा केलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ३८

### गटवार प्रयोगासाठी फर्निचर उपलब्धता :

| अ.नं. | गटवार प्रयोगासाठी फर्निचर उपलब्ध | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १०५ | ८४ |
| २ | नाही | २० | १६ |
| | एकूण | १२५ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसूनयेते की, मानसशास्त्राचे गटवार प्रयोग करण्यासाठी फर्निचर उपलब्ध आहे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ८४ आहे तर गटवार प्रयोगासाठी फर्निचर उपलब्ध नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे प्रमाण १६ आहे.

मानसशास्त्रीय प्रयोग करण्यासाठी २० विद्यार्थ्यांचे चार गट केल्याने एकावेळी एक गट मार्गदर्शक प्राध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार प्रयोग करतात. त्यामुळे एका गटातील विद्यार्थी शिक्षकांना प्रयोगासाठी लागणारे फर्निचर पुरेसे असते. एकावेळी ८० विद्यार्थी शिक्षकांनी प्रयोग करण्यासाठी फर्निचर अपुरे असल्या अडचणी येतात.

कोष्टक क्र. ३९ नुसार महाविद्यालयात स्वतंत्र मानसशास्त्र प्रयोगशाळा असण्याचे प्रमाण ७५.२ आहे. काही महाविद्यायात बैठकव्यवस्थेसाठी टेबल खुर्ची बेंच आहेत.

प्राचार्य, मानसशास्त्र विभाग प्रमुखाच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, विद्यार्थी शिक्षकांचे चार गट तयार करून गटवार मानशास्त्रीय प्रयोग घेतले जातात. त्यांमुळे प्रयोगशाळेत गटवार प्रयोग करण्यासाठी फर्निचर उपलब्ध होते.

काही महाविद्यालयात बैठक व्यवस्थेसाठी टेबलखुर्ची किंवा स्टूल ऐवजी बेंच आहेत.

## ५·४७ मानसशास्त्रीय प्रयोगासाठी बैठक व्यवस्था

मानसशास्त्रीय प्रयोगासाठी प्रयोगशाळेत गटवार प्रयोग करण्यासाठी बैठक व्यवस्था करणे महत्त्वाचे आहे. मानसशास्त्रीय प्रयोग करण्यासाठी ५० मिनिटाची तासिका किंवा काही प्रयोगांसाठी त्याहून अधिक वेळ लागतो. प्रयोग करताना नोंदवहीत प्रयोगाचा विषय, नांव, साहित्य, प्रकार, कृती, मानसशास्त्रीय निष्कर्ष, निरीक्षण, नोंदी, आकृत्या, निरीक्षण तक्ता, इ. ची नोंदवावे लागते म्हणून विद्यार्थी शिक्षकांसाठी बैठक व्यवस्था करावी लागते.

महाविद्यालयात मानसशास्त्रीय प्रयोगासाठी बैठकव्यवस्था कशी आहे याबाबत गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक. ३९

मानसशास्त्रीय प्रयोगासाठी बैठक व्यवस्था

| अ.नं. | मानसशास्त्रीय प्रयोगासाठी बैठक व्यवस्था | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बेंच | ५७ | ४५.६ |
| २ | टेबल व स्टूल / खूर्ची | ६८ | ५४.४ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, मानसशास्त्रीय प्रयोग घेण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी बेंच आहेत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४५.६ आहे तर मानशास्त्रीय प्रयोग घेण्यासाठी टेबल व स्टूल/खुर्ची आहेत असा प्रतिसाद देणाऱ्या

प्रतिसादकांचे प्रमाण ५४.४ आहे.

मानसशास्त्रीय प्रयोग करताना मनोव्यापाराचे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी प्रयोज्याने प्रयोगामध्ये आवडीने भाग घेवून आवश्यक तितके अवधान केंद्रित केले पाहिजे. जर विद्यार्थी शिक्षकांना मानसशास्त्रीय प्रयोगासाठी बैठक व्यवस्था योग्य नसेल, तर त्याचाही परिणाम मनोव्यापारावर होतो. प्रयोगासंबंधी लेखन करणे, नोंदी लिहिणे, आलेख काढणे, निरीक्षण तक्ता तयार करणे, प्रयोगाच्या साहित्य ठेवणे यासाठी आवश्यक बैठकव्यवस्था करण्यासाठी बेंच किंवा टेबल व स्टूल किंवा खुर्ची इ. साधनांची आवश्यकता असते. महाविद्यालयामध्ये टेबल व स्टूल किंवा खुर्ची असल्याचे प्रमाण ५४.४ आहे.

या महाविद्यालयात बैठक व्यवस्थेसाठी टेबल व स्टूल किंवा खुर्च्या नाहीत तेथे बेंचची व्यवस्था आहे. अश्यांचे प्रमाण ५४.६ आहे.

प्राचार्य व विभागप्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, महाविद्यालयात स्वतंत्र प्रयोगशाळेत मानशास्त्रीय प्रयोगासाठी टेबल व स्टूल किंवा खुर्ची उपलब्ध आहेत. काही महाविद्यालयात स्वतंत्र प्रयोगशाळा नाही. तेथे व्याख्यानकक्षामध्ये प्रयोग घेतले जातात. त्यामुळे टेबल व स्टूल किंवा खुर्ची ऐवजी बेंच वापरले जातात.

## ५·४० वैयक्तिक प्रयोग साहित्याची उपलब्धता :

महाविद्यालयात प्रत्येक प्रयोग करण्यासाठी प्रयोगाला लागणारे साहित्य उपलब्ध असणे आवश्यक आहे. मानसशास्त्रीय प्रयोगा मध्ये व्यक्तीच्या मनोव्यापारांचा अभ्यास करुन मानसशास्त्रीय निष्कर्षाची चाचणी केली जाते, व्यक्तीभेदामुळे व्यक्तिगत मनोव्यापारात भिन्नता आढळते म्हणून मानसशास्त्रीय प्रयोग वैयक्तिक केल्यास मानस शास्त्रीय निष्कर्ष स्वत: बाबत तपासून पाहता येतात. म्हणून वैयक्तिक प्रयोग करण्यासाठी पुरेसे साहित्य उपलब्ध असणे आवश्यक आहे.

महाविद्यालयात वैयक्तिक प्रयोगाचे पुरेसे साहित्य उपलब्ध आहे का याबाबत गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ४७

**वैयक्तिक प्रयोगाच्या साहित्याची उपलब्धता :**

| अ.नं. | वैयक्तिक प्रयोगाचे पुरेसे साहित्य उपलब्ध आहे काय? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५६ | ६८.८ |
| २ | नाही | ३९ | ३१.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की वैयक्तिक प्रयोगाचे पुरेस साहित्य उपलब्ध आहे. असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ६८.८ आहे तर वैयक्तिक प्रयोंगाच्या साहित्याची उपलब्धता नाही असा प्रतिसाददेणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३१.२ आहे.

म्हणून वैयक्तिक प्रयोगाचे पुरेस साहित्य उपलब्ध पाहिजे. मानशास्त्रीय प्रयोगांमध्ये अध्ययनवक्र, अध्ययन संक्रमण, अवधान कक्षा, स्मरण विस्मरण, अवबोध, प्रतिमा इ. प्रयोग वैयक्तिक केले जातात. सदर प्रयोगांसाठी चक्रमुद्रित कागद तसेच चेतक शब्द यादी इ. साहित्याची आवश्यकता असते. हे साहित्य उपलब्ध करणे खर्चिक नाही म्हणून वरील वैयक्तिक प्रयोगासाठी साहित्य उपलब्ध होते. अश्यांचे प्रमाण ६८.८ आहे. हे शैक्षणिक परंतू दृष्ट्या चांगले आहे. बुध्यांक काढण्यासाठी अलेक्झांडर पास अलॉग कसोटी, वैयक्तिक देता येत नाही. वैयक्तिक रित्या सदर कसोटी देणे खर्चिक आहे. असे प्रयोग वैयक्तिक केले जात नाहीत.

प्राचार्य व विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिन आले की, मानसशास्त्र प्रयोगापैकी अध्ययनवक्र, अध्ययन संक्रमण, स्मरण-विस्मरण, अवबोध, प्रतिमा, साहचर्य, सूचनाग्रहण क्षमता यासाठी लागणारे साहित्य खर्चिक नाही. म्हणून सदर प्रयोगाचे साहित्य उपलब्ध होते. बुद्धीमत्ता कसोटी साहित्य प्रत्येकास देणे खर्चिक आहे म्हणून असे प्रयोग वैयक्तिक केले जात नाहीत.

म्हणून मानशास्त्रीय प्रयोग करण्यासाठी पुरेसे साहित्य उपलब्ध करून विद्यार्थी शिक्षकांना मानसशास्त्रीय निष्कर्ष पडताळण्याची संधी द्यावी.

## पुरेसे साहित्य उपलब्ध नसल्यास मानशास्त्रीय प्रयोग आयोजन :

मानसशास्त्रीय प्रयोगासाठी विद्यार्थी शिक्षकांचे गट तयार केले जातत. महाविद्यालयात मानसशास्त्रीय प्रयोग वैयक्तिकरित्या करता येण्यासाठी पुरेसे साहित्य उपलब्ध नसल्यास प्रत्येक गटातील उपलब्ध प्रयोगाच्या साहित्याच्या संख्येनुसार गटवार प्रयोग घेता येतात. प्रत्येक गटात एकच प्रयोग करतो व त्यानुसार मानसशास्त्रीय निष्कर्ष काढले जातात.

महाविद्यालयात मानसशास्त्र वैयक्तिक प्रयोगासाठी पुरेसे साहित्य उपलब्ध नसल्यास प्रयोग कोणत्या पद्धतीने घेतले जातात याबाबत माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ४१

### पुरेस साहित्य उपलब्ध नसल्यास मानशास्त्रीय प्रयोगाचे आयोजन

| अ.नं. | पुरेसे साहित्य उपलब्ध नसल्यास मानसशास्त्रीय प्रयोगाचे आयोजन | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | गटवार | १९ | २४.८ |
| २ | एकच प्रयोज्य प्रयोग करतो. | ३० | ७५.२ |
| | एकूण | ३९ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, मानसशास्त्रीय प्रयोग वैयक्तिकरित्या करण्यास पुरेसे साहित्य नसल्यास प्रयोग गटवार केले जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २४.८ आहे तर एकच प्रयोग्य प्रयोग करतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७५.२ आहे.

मानसशास्त्रीय प्रयोग वैयक्तिक रित्या करण्यासाठी साहित्य पुरेसे नसल्यास गट केले जातात. प्रत्येक गटात एकच प्रयोग्य प्रयोग करतो यामुळे मानसशास्त्रीय प्रयोगाचा उद्देश, प्रयोगाचे साहित्य, कृती विद्यार्थी शिक्षकाना समजते. परंतू व्यक्तिभेदानुसार वैयक्तिक मानसशास्त्रीय निष्कर्ष काढता येत नाहीत.

प्रयोग कृतीकसोटीवर आधारित आहेत, ते प्रयोग एकच प्रयोग्य करतो. त्या प्रयोगावरुन येणारे निष्कर्षाची नोंद सर्व विद्यार्थी करतात. अश्यांचे प्रमाण ७५.२ आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे.

प्राचार्य व विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, मानसशास्त्र प्रयोगाचे पुरेसे साहित्य उपलब्ध नसल्यास, २० विद्यार्थी शिक्षकांचे पुन्हा गट केले

जातात. प्रत्येक गटास साहित्य देवून गटवार प्रयोग केले जातात. कृति कसोटीवर आधारित प्रयोग एकच प्रयोग्य करतो. विद्यार्थी शिक्षकांना मानसशास्त्रीय प्रयोग वैयक्तिकरित्या करता यावेत म्हणून महाविद्यालयांनी साहित्य उपलब्ध करण्याची व्यवस्था करावी.

## ५.४२ मानसशास्त्र प्रयोग तासिका :

मानसशास्त्र प्रयोगाच्या तासिका वेळापत्रकात नमूद केल्या जातात, त्यामुळे महाविद्यालयातील तासिकेनुसार प्रयोगासाठी पन्नास मिनिटाची तासिका दिली जाते. मानसशास्त्र प्रयोगाचा उद्देश, कृती, निरीक्षण, मानसशास्त्रीय निष्कर्ष दिली जाते. विद्यार्थी शिक्षक वैयक्तिक किंवा गटवार प्रयोग करतात त्यावरून मानसशास्त्रीय निष्कर्ष काढतात. काही प्रयोगांची कृती करण्यास विशिष्ट कालावधी लागतो. तसेच काही प्रयोगाच्या निरीक्षण नोंदीवरुन आलेख काढून त्यावरुन निष्कर्ष काढले जातत. म्हणून मानसशास्त्र प्रयोगासाठी दिलेली तासिका सर्व मानसशास्त्र प्रयोगासाठी पुरेशी नसते.

महाविद्यालयात मानसशास्त्र प्रयोगासाठी दिलेली तासिका पुरेशी आहे की नाही यबाात गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

### कोष्टक क्र. ४१
### मानसशास्त्र प्रयोग तासिका

| अ.नं. | मानसशास्त्र प्रयोगासाठी दिलेली तासिका पूरेशी आहे | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८० | ६४ |
| २ | नाही | ४५ | ३६ |
| | एकूण | १२५ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, मानसशास्त्र प्रयोगासाठी दिलेली तासिका पुरेशी आहे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ६४ आहे तर मानसशास्त्र प्रयोगासाठी दिलेली तासिक पुरेशी नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३६ आहे.

प्रत्येक मानसशास्त्रीय प्रयोगाची कृती, कृतीसाठी लागणारा कालावधी (कालखंड) भिन्न आहे. काही प्रयोग करण्यासाठी कमी वेळ लागते काही मानसशास्त्रीय प्रयोगासाठी अधिक वेळ लागतो. मानसशास्त्र प्रयोगासाठी तासिका पुरेशी होते अशांचे प्रमाण ६४ आहे.

काही मानसशास्त्र प्रयोगाची कृती करण्यासाठी जास्त वेळ लागतो त्यामुळे मानसशास्त्र प्रयोगासाठी दिलेल्या तासिकामध्ये पूर्ण होत नाही अश्यांचे प्रमाण ३६ आहे.

प्राचार्य व विभागप्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, काही मानसशास्त्र प्रयोगाची कृती सोपी असते व त्यासाठी लागणारा कालखंड कमी असतो. असे मानसशास्त्रीय प्रयोग दिलेल्या तासिकेत पूर्ण होतात. काही मानसशास्त्र प्रयोगामध्ये कृतीपायऱ्या अधिक असतात. व त्यासाठी अधिक वेळ लागतो. सदर मानसशास्त्रीय प्रयोग दिलेल्या तासिकेत पूर्ण होत नाहीत.

## ५.४४ मानसशास्त्र प्रयोगवही सादरीकरण :

मानसशास्त्र प्रयोगांपैकी दहा मानसशास्त्र प्रयोग वैयक्तिक किंवा गटवार प्रयोगशाळेत करून प्रयोग विषयक निरिक्षण तक्ता, मानसशास्त्रीय निष्कर्ष, शैक्षणिक महत्त्व व प्रयोगाच्या आवश्यकतेनुसार आलेख यांच्या नोंदी मानसशास्त्रीय प्रयोग वहीत कराव्या लागतात व मानसशास्त्र प्रयोग वही तपासण्यासाठी मार्गदर्शक प्राध्यापकांना सादर करावी लागते. विद्यार्थी शिक्षकाने केलेला प्रयोग, त्यावरुन केलेल्या

नोंदी यावरुन त्याचे पेपर क्र. दोन विषयक प्रात्यक्षिक कामाचे मूल्यमापन केले जात. म्हणून प्रयोग वही तपासण्यासाठी वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक प्रयोगवही तपासण्यासाठी प्राध्यापकांनी ठरवून दिलेल्या वेळेत वही सादर करतात का याबाबत गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ४३

मानसशास्त्र प्रयोगवही सादरीकरण

| अ.नं. | विद्यार्थी शिक्षक प्रयोग वही तपासण्यासाठी दिलेल्या वेळेत सादर करतात | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८८ | ७०.४ |
| २ | नाही | ३७ | २९.६ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, विद्यार्थी शिक्षक प्रयोगवही तपासण्यासाठी प्राध्यापकांनाही ठरवून दिलेल्या वेळेत वही सादर करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७०.४ आहे तर विद्यार्थी शिक्षक प्रयोग वही दिलेल्या वेळेत सादर करत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २९.६ आहे.

पेपर क्र. दोनसाठी दहा मानसशास्त्र प्रयोग करून त्याचे मूल्यमापन प्रयोगवहीतील नोंदीबाबत नीटनेटकेपणा, स्वच्छता, मांडणी, लेखनपूर्व परिश्रम इ. वरून केले जाते. म्हणून मार्गदर्शक प्राध्यापकांनी ठरवून दिलेल्या वेळेत प्रयोगवही तपासण्यासाठी सादर

करणे आवश्यक आहे. विद्यार्थी शिक्षक प्रयोग वही तपासण्यासाठी वेळेत सादर करतात असे प्रमाण ७०.४ आहे हे प्रमाण चांगले आहे.

विद्यार्थी शिक्षक प्रयोग वह्या वेळेत तपासण्यासाठी सादर करत नाहीत असे प्रमाण २९.६ आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे.

प्राचार्य, मानसशास्त्र विभाग प्रमुख व प्राध्यापकांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, मानसशास्त्र प्रयोग आयोजित करून पेपर क्र.२ चे प्रात्यक्षिक काम पूर्ण केले जाते प्रयोगवहीतील नोंदी, प्रयोग करण्यातील विद्यार्थी शिक्षकाचा सहभाग, वेळेत प्रयोग वही सादर करणे इ. बाबीवरून प्रात्यक्षिकाचे मूल्यमापन केले जाते. म्हणून विद्यार्थी शिक्षक दिलेल्या वेळेत प्रयोगवही सादर करतात.

काही कामचूकार विद्यार्थी शिक्षक दिलेल्या वेळेत प्रयोगवही सादर करत नाहीत. ही बाब लक्षात घेवून त्यानुसार मूल्यमापन केले जाते.

मानसशास्त्र प्रयोगाच्या निष्कर्षावरुन त्या प्रयोगाचे शैक्षणिक महत्त्व प्रयोगवहीत लिहावे लागते. अध्ययन अध्यापन प्रक्रिया परिणामकारक होण्यासाठी व्यक्तिभेद लक्षात घेवून मानसशास्त्रीय निष्कर्षाचा वापर दैनंदिन अध्यापनात करता येतो. म्हणून मानसशास्त्र प्रयोग झाल्यानंतर मानसशास्त्रीय निष्कर्षावरून प्रयोगाचे शैक्षणिक महत्त्व प्रयोग वहीत लिहावे लागते. शैक्षणिक महत्त्व मानसशास्त्र प्रयोग घेणारे प्राध्यापक सांगतात किंवा प्रयोग झाल्यानंतर चर्चा होते त्यावरुन विद्यार्थी शिक्षक प्रयोगवहीत प्रयोगाचे शैक्षणिक महत्व लिहितात.

महाविद्यालयात मानसशास्त्रीय प्रयोगाचे शैक्षणिक महत्त्व विद्यार्थी शिक्षक कोणत्या पद्धतीने लिहितात याविषयी गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ४६

## मानसशास्त्रीय प्रयोगाचे शैक्षणिक महत्व

| अ.नं. | मानसशास्त्र प्रयोगाचे शैक्षणिक महत्व कसे लिहितात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रयोगानंतर झालेल्या चर्चेवरुन | ७४ | ५९.२ |
| २ | संदर्भ पुस्तकावरुन | ३२ | २५.६ |
| ३ | स्वत:च्या अनुभवावरुन उदा. देवून | १९ | १५.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की विद्यार्थी शिक्षक प्रयोगवहीत मानसशास्त्रीय प्रयोगाचे शैक्षणिक महत्व प्रयोगानंतर झालेल्या चर्चेवरुन लिहितात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५९.२ आहे. प्रयोगाचे शैक्षणिक महत्व संदर्भ पुस्तकावरून लिहितात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २५.६ आहे तर प्रयोगाचे शैक्षणिक महत्त्व स्वत:च्या अनुभवावरून उदा. देवून लिहितात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे १५.२ आहे.

मानसशास्त्र प्रयोगाचे शैक्षणिक महत्व लिहिण्यासाठी प्रयोगानंतर मानसशास्त्र प्रयोग घेणारे प्राध्यापक चर्चा करतात. तसेच संदर्भ पुस्तकातही प्रयोगाचे शैक्षणिक महत्व दिलेले आहे. या दोन्हींचा वापर करून विद्यार्थी शिक्षकांना प्रयोगाचे शैक्षणिक महत्व लिहिता येतात त्या मानाने विद्यार्थी शिक्षकांना त्यांच्या स्वत:च्या अनुभवावरून उदा. देता येत नाहीत.

प्राचार्य, मानसशास्त्र विभाग प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की,

प्रयोग झाल्यानंतर प्रयोग मार्गदर्शक प्राध्यापक प्रयोगाच्या शैक्षणिक महत्वाची चर्चा करतात त्या चर्चेवरून व संदर्भ पुस्तकाच्या आधारे विद्यार्थी शिक्षक प्रयोगाचे शैक्षणिक महत्व लिहितात.

## ५.४५३) आशययुक्त अध्यापन पद्धती व अंतर्गत परीक्षा:

### आशययुक्त कृतिसत्र नियोजन-

बी.एड्. भाग दोनच्या प्रात्यक्षिक कार्यात आशययुक्त अध्यापन कृतिसत्राचा समावेश आहे. प्रत्येक अध्यापन पद्धतीसाठी प्रत्येकी पन्नास तासिका देवून प्रथम सत्र समाप्तीपूर्वी एक आठवडा व द्वितीय सत्रारंभानंतरचा एक आठवडा असे दोन भागात कृतिसत्र घ्यावे असे शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रम पुस्तिकेत नमूद केले आहे. परंतू आशययुक्त अध्यापन कृतिसत्र कार्यवाहीत विद्यापीठाने दोन वर्षापासून बदल केला आहे. विद्यापीठाने सुचविलेल्या बदलानुसार महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन कृतिसत्राचे नियोजन केले जाते.

महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन कृतिसत्र केव्हा आयोजित केले जाते याविषयी माहिती गोळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ४५

आशययुक्त अध्यापन कृतिसत्र नियोजन :

| अ.नं. | आशययुक्त अध्यापन कृतिसत्र केव्हा घेतले जाते? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रथम सत्राच्या शेवटी | ९६ | ७६.८ |
| २ | द्वितीय सत्राच्या सुरुवातीस | २९ | २३.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयात आशयुक्त अध्यापन कृतिसत्र प्रथम सत्राच्या शेवटी घेतले जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७६.८ आहे. महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन कृतिसत्र द्वितीय सत्राच्या सुरुवातीस घेतले जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण २३.२ आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. प्रात्यक्षिकातील आशययुक्त अध्यापन कृतिसत्राच्या कार्यवाही कालावधीत बदल केलेला आहे. या बदलापूर्वी आशययुक्त अध्यापन पद्धती कृतिसत्र १४ दिवस म्हणजे दोन आठवडा होत असे. परंतू नवीन बदलानुसार आशययुक्त अध्यापन कृतिसत्र १० दिवस घेतले जाते. हे कृतिसत्र सलग १० दिवस घेण्यात येते. महाविद्यालयांना कृतिसत्र नियोजनाचे स्वातंत्र्य आहे. प्रथम सत्राच्या शेवटी आशययुक्त अध्यापन कृतिसत्राचे नियोजन करणाऱ्यांचे प्रमाण ७६.८ आहे. हे प्रमाण चांगले आहे. आशययुक्त अध्यापन कृतिसत्रात जे प्रात्यक्षिक करून घेतले जाते त्यावर आधारित अहवाल लेखन, शैक्षणिक साहित्य निर्मिती करण्यासाठी विद्यार्थी शिक्षकांना प्रथमसत्र समाप्तीनंतरची सुट्टी उपयुक्त ठरते. विद्यार्थी शिक्षक वरील बाबींसाठी पुरेसा वेळ देतात याचा परिणाम अहवाललेखन व शैक्षणिक साहित्य निर्मितीवर होतो.

द्वितीय सत्राच्या सुरुवातीस आशययुक्त अध्यापन कृतिसत्र घेतल्यास सराव पाठांतर इतर प्रात्यक्षिकाची तयारी, लेखन यामुळे विद्यार्थी शिक्षकांना अहवाल लेखन, शैक्षणिक साहित्य निर्मिती, आशयावर आधारित पाठ घेणे. इ. साठी पुरेसा वेळ मिळत नाही याचा परिणाम आशययुक्त अध्यापन कृतिसत्राच्या उद्दिष्ट्ये व अहवाललेखनावर होतो.

## ५.४६ आशययुक्त अध्यापन कृतिसत्रासाठी कालावधी :

आशययुक्त अध्यापन कृतिसत्राचे आयोजन व कार्यवाही हा बी.एड्. प्रात्यक्षिकाचा एक भाग आहे. या कृतिसत्रात आशययुक्त अध्यापनाचा अर्थ, महत्त्व, आशय विश्लेषण, पाठनियोजन, यावर व्याख्याने दिली जातात. त्यावर आधारित प्रात्यक्षिक करून

घेतले जाते. संबोधाची निवड करून १५ ते २० मिनिटाचे प्रत्येकी तीन पाठ घेतले जातात. दुसऱ्या अध्यानपद्धतची विषय संरचना, अभ्यास क्रम विश्लेषण, आशयविश्लेषण याचे प्रात्यक्षिक करून घेतले जाते. प्रात्यक्षिकानंतर आशययुक्त अध्यापन चाचणी घेतली जाते.

महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन कृतिसत्रासाठी किती दिवस दिले जातात, याबाबत माहिती गोळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

### कोष्टक क्र. ४६

### आशययुक्त अध्यापन कृतिसत्रासाठी कालावधी

| अ.नं. | आशययुक्त अध्यापन कृतिसत्रासाठी किती दिवस दिले जातात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ७ | १७ | १३.६ |
| २ | ८ | ६ | ४.८ |
| ३ | १० | ७४ | ५९.२ |
| ४ | १२ | २८ | २६.४ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन कृतिसत्र सात दिवसाचें घेतले जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण १३.६ आहे, आठ दिवस कृतिसत्र घेतले जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४.८ आहे. महाविद्यालयात दहा दिवसांचे आशययुक्त अध्यापन कृतिसत्र घेतले जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५९.२

आहे. बारा दिवसांचे कृतिसत्र घेतले जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण २६.४ आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रमात आशययुक्त अध्यापन कृतिसत्र १० दिवसांचे घेण्यात यावे असा बदल करण्यात आली आहे. या बदलापूर्वी आशययुक्त अध्यापन कृतिसत्र चौदा दिवसांचे घेतले जात होते. तसेच विद्यार्थी शिक्षकांनी निवडलेल्या दोन्ही अध्यापन पद्धतीवर प्रात्यक्षिक व पाठ घेतले जात होते.

आशययुक्त अध्यापन कृतिसत्राची कार्यपद्धती, आशययुक्त अध्यापनाचा अर्थ महत्त्व, आशय विश्लेषण, पाठ नियोजन यावर आधारित तीन व्याख्याने दिली जातात. गटवार अध्यापन पद्धतीप्रमाणे गट प्रात्यक्षिक घेतले जाते. अध्यापन पद्धती नुसयार त्यातील संबोध निवडून १५ ते २० मिनिटाचे पाठ घेतले जातात. विद्यार्थी शिक्षक निवडलेल्या संबोधावर आधारित शैक्षणिक साहित्य तयार करतात. दुसऱ्या अध्यापन पद्धतीसाठी विषय संरचना, आशय विश्लेषण, पाठ्यक्रम, अभ्यासक्रम यावर आधारित प्रात्यक्षिक करावे लागते. दोन्ही अध्यापनपद्धतीच्या प्रात्यक्षिकानंतर आकलन चाचणी घेतात. वरील सर्व बाबीसाठी विद्यापीठाने दहा दिवसाचे कृतिसत्र ठेवावे असे नमूद केले आहे.

ज्या महाविद्यालयात सात व आठ दिवस कृतिसत्र घेतले जाते याचे प्रमाण १८.४ इतके आहे. प्रमाण अल्प असले तरी विचारात घेण्यासारखे आहे. ज्या महाविद्यालयात ७ किंवा ८ दिवस कृतिसत्र घेतले जाते. तेथे कृतिसत्रातील कामकाजासाठी अधिक तासिका दिल्या जाता. त्यामुळे दहा दिवसापेक्षा कमी दिवसात कृतिसत्र पूर्ण होते. यामुळे विद्यार्थी शिक्षक व मार्गदर्शक प्राध्यापकांवर कामाचा ताण येतो हे शैक्षणिक दृष्ट्या अयोग्य आहे.

ज्या महाविद्यालयात दहा दिवसांचे आशयुक्त अध्यापन कृतिसत्र घेतले जाते. त्यांचे प्रमाण ५९.२ आहे. सदरहू प्रमाणे योग्य आहे. या महाविद्यालयात विद्यापीठाच्या नियमानुसार दहा दिवसात कृतिसत्राचे नियोजन केले जाते हे शैक्षणिकदृष्ट्या अतिशय

योग्य आहे.

जया महाविद्यालयात १२ दिवस आशयुक्त अध्यापन कृतिसत्र घेतले जाते. त्याचे प्रमाण २६.४ असून विचार घेण्यासारखे आहे. बारा दिवसाच्या कृतिसत्रात दररोज कामकाजाच्या तासिका कमी करून दिवसांची संख्या वाढवली आहे. हे शैक्षणिक दृष्ट्या अयोग्य आहे.

म्हणून जी महाविद्यालये ७ किंवा ८ दिवसांत कृतिसत्र घेतात. तसेच ज्या महाविद्यालयात १२ दिवस कृतिसत्र घेतले जाते. अशा महाविद्यालयांनी विद्यापीठ नियमानुसार दहा दिवसातच आशययुक्त अध्यापन पद्धती कृतिसत्र घ्यावे.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, कृतिसत्राच्या कालावधीत दररोजच्या कामकाजाच्या तासिकांची संख्या वाढवणे व दिवसांची संख्या कमी करणे हे शैक्षणिक दृष्ट्या अयोग्य आहे. बारा दिवस कृतिसत्रासाठी देणे हे सुद्धा शैक्षणिक दृष्ट्या अयोग्य आहे. म्हणून सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार दहा दिवसांमध्ये आशययुक्त अध्यापन पद्धती कृतिसत्राचे नियोजन करावे.

## ५.४७ आशययुक्त अध्यापन कृतिसत्राविषयी चर्चा :-

आशययुक्त अध्यापनकृतिसत्रात आशययुक्त अध्यापनपद्धतीची कर्यवाही, तात्विक विषयाशी संबंधित व्याख्याने, पद्धतीची कार्यवाही, तात्विक विषयाशी संबंधित व्याख्याने, गटतयारकरणे, गटांची बैठक व्यवस्था, कृतिसत्राचा कालावधी व वेळापत्रक तयारकरणे इ. विषयी सर्व प्राध्यापकांशी चर्चा केल्यास कृतिसत्राची कार्यवाही करण्यास सुलभता येते. गटवार कामामध्ये एकतानता येते. म्हणूनआशययुक्त अध्यापनकृतिसत्रापूर्वी सर्व प्राध्यापकांशी चर्चा करणे आवश्यक आहे.

महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन कृतिसत्रापूर्वी सर्व प्राध्यापकांशी चर्चा

केली जाते की नाही याबाबत गोळा केलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ४७

आशययुक्त अध्यापन कृतिसत्राविषयी चर्चा

| अ.नं. | आशययुक्त अध्यापन कृतिसत्रापूर्वी प्राध्यापकांश चर्चा केलीजाते का? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १२५ | १००.०० |
| २ | नाही | - | - |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की आशययुक्त अध्यापन कृतिसत्रापूर्वी प्राध्यापकांशी चर्चा केली जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १००.०० आहे.

आशययुक्त अध्यापन कृतिसत्राची सर्वसामान्य व्याख्याने एकत्रित घेतली जातात व विशिष्ट अध्यापन पद्धतीनुसार तात्विक विषयाशी निगडित व्याख्याने गटवारघेतली जातात. आशययुक्त अध्यापन सर्वसामान्य व्याख्यानांचा क्रम ठरवून संबंधित प्राध्यापकांना व्याख्यानाचा घटक/विषय सांगणे, प्रात्यक्षिकासंबंधी नियोजन, गट तयारकरणे त्याबाबत प्राचार्यांशीसर्व प्राध्यापकांशी चर्चा केल्यानेसंभाव्य अडचणी शंका यांचे निरसन करता येते. गटवारकामात समानता येते, तज्ञ व अनुभवी प्राध्यापकांना चर्चेतूनकामाचे नेमके स्वरुपठरवून नियोजन करता येते.

चर्चेतून प्रात्यक्षिक कामाच्या कर्यवाहीत सुधारणा, बदल करता येतात म्हणून आशययुक्त अध्यापन कृतिसत्रापूर्वी सर्व प्राध्यापकांशी चर्चा होणे आवश्यक आहे.

प्राचार्य मुलाखतीवरुनअसे दिसून येते की, प्राचार्य आशययुक्त अध्यापन कृतिसत्रापूर्वी सर्व प्राध्यापकांशी चर्चा करुन कृतिसत्राचे नियोजन करतात.

## ५.४८ आशययुक्त अध्यापन कृतिसत्रातील बाबींवर चर्चा

आशययुक्त अध्यापन कृतिसत्रात काही व्याख्याने एकत्रित तर काही व्याख्याने अध्यापनपद्धतीच्या गटात दिली जातात. म्हणून सर्वसामान्य व्याख्याने व गटवार व्याख्यानांचे नियोजन व व्याख्यान देण्याची जबाबदारी कोणाला द्यावी याविषयी चर्चा केली जाते आयशयुक्त अध्यापनाची कार्यवाहीतील कृतिक्रम ठरविणे व नियोजनानुसार विद्यार्थी-शिक्षकांकडून प्रात्यक्षिक करवून घेणे त्याविषयक आवश्यक संदर्भ पुस्तक, शालेय अभ्यासक्रम, हस्तपुस्तिका इ. उपलब्धता तसेच आशययुक्त अध्यापन कृतिसत्र अहवाल तयारकरुन मूल्यमापन यंत्रणा याविषयी सर्व प्राध्यापकांची चर्चा होते.

महाविद्यालयात आशययुकत अध्यापन कृतिसत्रापूर्वी सर्व प्राध्यापकांशी कोणकोणत्या बाबीवर चर्चा होते याविषयी गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ४८

### आशययुक्त अध्यापन कृतिसत्रातील बाबींवर चर्चा

| अ.नं. | आशययुक्त अध्यापन कृतिसत्रापूर्वी कोणकोणत्या बाबीवर चर्चा होते? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आशययुक्त अध्यापनाचे नियोजन | १२५ | १००.०० |
| २ | आशययुक्त अध्यापनाची कार्यवाही | १२५ | १००.०० |
| ३ | आशययुक्त अध्यापन कृतिसत्रासाठी तात्विक भागाच्या व्याख्यानांचे नियोजन | १२५ | १००.०० |
| ४ | आशययुक्त अध्यापन कृतिसत्रा मूल्यमापन पद्धती | १२५ | १००.०० |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, आशयुक्त अध्यापन कृतिसत्रापूर्वी आशययुक्त अध्यापनाचे नियोजन, आशययुक्त अध्यापनाची कार्यवाही, आशययुक्त अध्यापन कृतिसत्रासाठी तात्विक भागाच्या व्याख्यानाचे नियोजन, आशययुक्त अध्यापन कृतिसत्र मूल्यमापन पद्धती इ. सर्व बाबींवर चर्चा होते असा प्रतिसादकांचे देणाऱ्या प्रतिसादाकंचे प्रमाण १००.०० आहे.

आशययुक्त अध्यापन कृतिसत्रापूर्वी आशययुक्त अध्यापनाची नियोजन कार्यवाही, व्याख्यानांचे नियोजन व मूल्यमापन याविषयी चर्चा केल्याने कृतिसत्राच्या अंमलबजावणीतील संभाव्य अडचणीचे निरसन होते व कृतिसत्र यशस्वी होवून विद्यार्थी शिक्षकांना अभ्यासक्रम, त्याचे निरीक्षण, पाठ्यपुस्तक आशय विश्लेषण एकच संबोध

शिकविताना विभिन्न अध्यापन पद्धतीची गरज इ. बाबत माहिती मिळते व त्याचा दैनंदिन अध्यापनात कसा वापर याविषयी मार्गदर्शन मिळते.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन कृतिसत्रापूर्वी सर्व प्राध्यापकांशी आशययुकत अध्यापनाचे नियोजन, कार्यवाही, व्याख्यानांचे नियोजन व मूल्यमापन याबाबत चर्चा होते त्यानुसार कृतिसत्राचे वेळापत्रक तयार केले जाते.

## ५.४९ आशययुक्त अध्यापन विषयी चाचणी :-

आशययुक्त अध्यापन कृतिसत्रात आशययुक्त अध्यापन संकल्पना, त्याची उद्दिष्ट्ये, कार्यवाही, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम पाठ्यपुस्तक यांचा परस्परसंबंध, आशय विश्लेषण, संबोध निवड व पाठ नियोजन, शै. साहित्य निर्मिती इ. घेतले जाते. कृतिसत्रातील प्रात्यक्षिक व अहवाल तयार झाल्यानंतर विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन पद्धतीच्या विषय ज्ञानाची तसेच आशययुक्त अध्यापन पद्धती विषयीच्या आकलनाची ३० गुणांची चाचणी घेतली जाते.

महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन पद्धतीवर आधारित विषय चाचणी केव्हा घेतली जाते याबात गोळा केलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ४९

## आशययुक्त अध्यापन विषयी चाचणी

| अ.नं. | आशययुक्त अध्यापन पद्धतीवर आधारित चाचणी केव्हा घेतली जाते? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आशययुक्त अध्यापन कृतिसत्राच्या शेवटच्या दिवशी | ११६ | ९२.८ |
| २ | आशययुक्त अध्यापन कृतिसत्रानंतर काही दिवसांनी | ९ | ७.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून आले की, आशययुक्त अध्यापन पद्धतीनुसार आधारित चाचणी आशययुक्त अध्यापन कृतिसत्राच्या शेवटच्या दिवशी घेतली जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ९२.८ आहे तर आशययुक्त अध्यापन पद्धतीवरआधारित चाचणी आशययुक्त अध्यापन कृतिसत्रानंतर काही दिवसांनी घेतली जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७.२ आहे.

आशययुक्त अध्यापन पद्धतीवर आधारित चाचणी आशययुक्त अध्यापन कृतिसत्राच्या शेवटच्या दिवशी घेतल्यास विद्यार्थी शिक्षकाचे आशययुक्त अध्यापन कृतिसत्राचे मूल्यमापनकरताना गूणविभागणी नुसार विषय संरचना तक्ते, पाठ शै. साहित्य निर्मिती व आशययुक्त अध्यापन चाचणीच्या गुणांची नोंद ठेवता येते. तसेच आशययुक्त अध्यापनकृतिसत्राची कार्यवाही व त्याचे उपयोजन किती झाले हे चाचणीवरुन पाहता येते व त्यातील त्रूटींचा पाठपूरावकरता येतो. म्हणून आशयुक्त

अध्यापन पद्धतीवर आधारित चाचणी कृतिसत्राचा शेवटच्या दिवशी घेणे शैक्षणिक दृष्ट्या योग्य आहे.

प्राचार्य व प्राध्यापकांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, आशययुक्त अध्यापन पद्धतीवर आधारित विषयचाचणी आशययुक्त अध्यापनकृतिसत्राच्या शेवटच्या दिवशी घेतल्यास प्रात्यक्षिकाचे मूल्यमापन व गुणांची नोंद एकत्रित करणे सोयीस्कर होते. म्हणून आशययुक्त अध्यापनावर आधारित चाचणी कृतिसत्रानंतर काही दिवसांनी न घेता शेवटच्या दिवशी घेण्यात यावी.

## ५·५० अंतर्गत परीक्षा

शिवाजी विद्यापीठाच्य बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक कार्यात अंतर्गत परीक्षा घेवून त्याचे मूल्यमापन केले जाते. अंतर्गत परीक्षेसाठी शैक्षणिक वर्षातील ३० तास राखून ठेवले आहेत. अंतर्गतपरीक्षेसाठी २० गूणांपैकी मूल्यमापन केले जाते. अंतर्गत परीक्षेसाठी सर्व तात्विक विषयांच्या घटकाची यादी काचपेटीच लावली जाते. त्यावर आधारित प्रश्नपत्रिका तयारकरुन परीक्षा घेतली जाते. अंतर्गत परीक्षेमुळे विद्यार्थी शिक्षकांना परीक्षेत वातावरणात लेखनाची सवय होते. तात्विक विषयाचे आकलन किती झाले हे समजते म्हणून महाविद्यालयात विद्यार्थी-शिक्षकांची अंतर्गत परीक्षा घेतली जाते.

महाविद्यालयात शैक्षणिक वर्षात किती अंतर्गत परीक्षा घेतल्या जातात याबाबत गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र ५०

## अंतर्गत परीक्षा

| अ.नं. | महाविद्यालयात अंतर्गत परीक्षा किती घेतल्या जातात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | दोन | ६९ | ५५.२ |
| २ | एक | ५६ | ४४.८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा घेतली जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४४.८ आहे तरमहाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा घेतल्या जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५२.२ आहे. तसेच वार्षिक परीक्षेपूर्वी विद्यार्थी शिक्षकांना उत्तरपत्रिका लेखनामुळे फायदा होतो. म्हणून द्वितीय सत्र समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर अंतर्गत परीक्षा घेणे शैक्षणिकदृष्ट्या योग्य आहे असे प्रमाण ५६.३४ आहे.

महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा वार्षिक पाठ परीक्षेनंतर लगेच घेतल्यास परीक्षेचा हेतू साध्य होत नाही. वार्षिक पाठ परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थी शिक्षकांना वेळ द्यावा लागतो. वार्षिक पाठानंतर लगेचअंतर्गत परीक्षा घेतल्याने विद्यार्थी शिक्षकांवर ताण येतो. अंतर्गत परीक्षेची पुरेशी तयारी होत नाही. म्हणून एकच अंतर्गत परीक्षा वार्षिक पाठपरीक्षेनंतर लगेच घेणे शैक्षणिक दृष्ट्या अयोग्य आहे.

म्हणून ज्या महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षाघेतलीजाते, त्या परीक्षेचे आयोजन द्वितीय समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर करावी.

प्राचार्य व विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी घेतल्यास, थोड्याच घटकांवर आधारित प्रश्नपत्रिका काढली जाते. दुसऱ्या सत्रातील घटकांचा परीक्षेसाठी विचार होत नाही. वार्षिक पाठ परीक्षेनंतर लगेच अंतर्गत परीक्षा घेतल्यामुळे पाठ परीक्षेचा ताण विद्यार्थी शिक्षकांवर असतो. म्हणून अंतर्गत परीक्षेचा हेतू साध्य होत नाही. एकच अंतर्गत परीक्षा द्वितीय सत्र समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर घेतल्यास अभ्यासक्रमातील बहुतांशी घटक शिकवलेले असतात. त्यामुळे प्रश्नपत्रिकेत सर्व घटकांचा समावेश करता येतो. म्हणून ज्या महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा घेतली जाते, तेथे द्वितीय सत्राच्या समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर परीक्षेचे नियोजन करावे.

## ५.५१ एकाच अंतर्गत परीक्षेचे आयोजन

बी.एड्. महाविद्यालयात विद्यापीठ नियमानुसार अंतर्गत परीक्षा घेतली जाते. काही महाविद्यालये एकच अंतर्गत परीक्षा घेतात. महाविद्यालय अंतर्गत परीक्षांचे नियोजन करतात. त्यानुसार परीक्षेची अंमलबजावणी करतात.

महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा केव्हा घेतलीजाते याबाबत माहिती गोळा केली. ती माहिती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ५१

## एकाच अंतर्गत परीक्षेचे आयोजन

| अ.नं. | एकच अंतर्गत परीक्षा केव्हा घेतली जाते? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रथम सत्राच्या शेवटी | १८ | ३२.८० |
| २ | द्वितीय सत्र समाप्तीपूर्वी एक महिना | २४ | ४३.६० |
| ३ | वार्षिक पाठ परीक्षेनंतर लगेच | १४ | २३.६० |
| | एकूण | ५६ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी घेतली जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३२.८० आहे. अंतर्गत परीक्षा द्वितीय सत्र समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर घेतली जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४३.६० आहे. अंतर्गत परीक्षा वार्षिक पाठ परीक्षेनंतर लगेच घेतली जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण २३.६० आहे.

महाविद्यालयामध्ये एकच अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी घेतल्यास त्याच सत्रात झालेल्या घटकांवर आधारित असते. द्वितीय सत्रात होणाऱ्या घटकांवर परीक्षा होत नाही. प्रथम सत्रात अभ्यासक्रमातील थोडेच घटक शिकवले जातात. त्यामुळे प्रश्नपत्रिकेत घटक व प्रश्न यांच्यानुसार गुणविभागणी योग्य होत नाही. घटकांची पुनरावृत्ती होते व दुसऱ्या सत्रातील घटकांकडे दुर्लक्ष होते. म्हणून एकच अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी घेणे शैक्षणिक दृष्ट्या अयोग्य आहे असे प्रमाण ३२.७८ आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे.

एकच अंतर्गत परीक्षा द्वितीय सत्र समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर घेतल्याने अभ्यासक्रमातील बहुतांशी घटक शिकवलेले असतात. म्हणून शिकवलेल्या सर्व घटकांवर आधारित प्रश्नपत्रिका काढता येते. घटकांच्या भारांशा प्रमाणे प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी होते. शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रम पुस्तिकेत दोन अंतर्गत परीक्षा ध्याव्यात असे सूचित केले आहे. अंतर्गत परीक्षेमुळे विद्यार्थी तात्विक विषयाची तयारी करतात. परीक्षेसाठी शिक्षकांचे तात्विक विषयाची तयारी करतात. परीक्षेसाठी असणाऱ्या घटकावर टिपणे काढतात. अंतर्गत परीक्षेमुळे लेखनाचा सराव होतो. दोन अंतर्गत परीक्षा घेतल्यास परीक्षेच्या वातावरणात लेखनाचा सराव होतो. पहिल्या सत्राच्या शेवटी पहिली ववार्षिक पाठ परीक्षेनंतर दुसरी अंतर्गत परीक्षा घेतल्यास शिक्षकांच्या दृष्टीने सोयीचे ठरते. परीक्षांचे पेपर तपासून प्रत्याभरण दिले जाते. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांना पेपर लेखनाविषयी मार्गदर्शन मिळते. सदर बाबींचा महाविद्यालयाच्या निकालावर चांगला परिणाम होतो. दोन अंतर्गत परीक्षा घेतल्या जातात असा प्रतिसाद ६९.०० इतके आहे हे प्रमाण शैक्षणिकदृष्ट्या चांगले आहे.

एक अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी किवा दूसऱ्या सत्रात घेतली जाते सदर महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षाअसल्याने विद्यार्थ्यांचा लेखन सराव पूरेसा होत नाही. एकाच परीक्षेमुळे शिकवलेल्या घटकावरच आधारित प्रश्नपत्रिका काढता येते. त्यामूळे काही घटकांचा समावेश प्रश्नपत्रिकेत होत नाही. हे शैक्षणिकदृष्ट्या अयोग्य आहे.

म्हूणन ज्या महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा घेतली जाते. अशा महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा घेण्याची व्यवस्था करावी.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले, दोन अंतर्गत परीक्षेमुळे अभ्यास क्रमातील सर्व घटकांवर प्रश्नपत्रिका काढता येते. विद्यार्थ्यांना लेखनाचा सराव होतो. दोन्ही अंतर्गत परीक्षेनंतर प्रत्याभरण दिले जाते. त्यामुळे अभ्यास करण्यासाठी व

उत्तर सादरीकरणाचे मार्गदर्शन मिळते. याचा महाविद्यालयाच्या निकालावर चांगला परिणाम झाल्याचे आढळले. म्हणून अंतर्गत परीक्षणा घेण्याचीसोय सर्व महाविद्यालयांनी करावी.

एकच अंतर्गत परीक्षा घेतल्याने अभ्यासक्रमातील सर्व घटकांवर प्रश्नपत्रिका काढली जाते. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांना तुलनेने कमी लेखन सराव मिळतो. म्हणून परीक्षा घेण्याऐवजी दोन अंतर्गत परीक्षा अधिक सोयीस्कर आहे.

## ५.५२ दोन अंतर्गत परीक्षेबाबत नियोजन :-

बी.एड्. अभ्यासक्रमात दोन अंतर्गत परीक्षा महाविद्यालंनी घ्याव्यात असे नमूद केले आहे. विद्यापीठाच्या नियमानुसार काही महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा घेतल्या जातात. महाविद्यालये दोन अंतर्गत परीक्षा शैक्षणिक वर्षात सोयीनुसार घेतात.

महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा केव्हा घेतल्या जातात याबाबत माहिती गोळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ५२

## दोन अंतर्गत परीक्षाचे नियोजन

| अ.नं. | दोन अंतर्गत परीक्षा केव्हा घेतल्या जातात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रथम सत्राच्या शेवटी व वार्षिक पाठ परीक्षेनंतर लगेच | २५ | ३५.७० |
| २ | प्रथम सत्राच्या शेवटी व वार्षिक पाठ परीक्षेअगोदर | १३ | १८.६० |
| ३ | प्रथम सत्राच्या शेवटी व द्वितीयसत्र समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर. | ३१ | ४५.७० |
| | एकूण | ६९ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी व वार्षिक पाठ परीक्षेनंतर लगेच घेतल्या जातात अशा प्रतिसादाकांचे प्रमाण ३५.७० आहे, प्रथम सत्राच्या शेवटी व वार्षिक पाठ परीक्षेअगोदर अंतर्गत परीक्षा घेतल्या जातात अशा प्रतिसादकांचे प्रमाण १८.६० आहे. प्रथम सत्राच्या शेवटी व द्वितीय सत्र समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर अंतर्गत परीक्षा घेतल्या जातात अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४५. ७० आहे.

काही महाविद्यालयात नियमानुसारदोन अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी व वार्षिक पाठ परीक्षेनंतर लगेच होतात. प्रथम सत्र झालेल्या घटकांवर आधारित पहिली

अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी होते. द्वितीय सत्रामध्ये वार्षिक पाठ परीक्षेपूर्वी सर्व घटक शिकवले जात नाहीत. त्यामुळे द्वितीय सत्रात वार्षिक पाठ परीक्षेपर्वी शिकवलेल्या घटकांवर आधारित परीक्षा घेतली जाते. तसेच वार्षिक पाठ परीक्षेच्या अगोदर विद्यार्थी शिक्षक पाठ परीक्षेची तयारी करतात. पाठ परीक्षेनंतर लगेच परीक्षा घेतल्यास अभ्यासास पूरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे अंतर्गत परीक्षेचा हेतू साध्य होत नाही. सदर दोन अंतर्गत परीक्षांचे नियोजन करणाऱ्यांचे प्रमाण ३५.७० आहे हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे.

काही महाविद्यालयात पहिली अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी घेतली जाते. त्या परीक्षेसाठी प्रथम सत्रात शिकवलेल्या घटकांवर प्रश्नपत्रिका काढली जाते. दूसरी अंतर्गत परीक्षा वार्षिक पाठ परीक्षे अगोदर आयोजित केली जाते. वार्षिक पाठ परीक्षेअगोदर द्वितीय सत्रातील उरलेले सर्व घटक शिकवून होत नाहीत. म्हणून द्वितीय सत्रात शिकवलेल्या काही घटकांवर आधारित प्रश्नपत्रिका काढली जाते. त्यानंतर शिकवलेल्या घटकांचा विचार होत नाही. विद्यार्थी शिक्षकांना वार्षिक पाठ परीक्षेची तयारी करण्यासाठी पूरेसा वेळ मिळत नाही. म्हणून दूसरी अंतर्गत परीक्षा वार्षिक पाठ परीक्षेअगोदर घेणे शैक्षणिकदृष्ट्या अयोग्य आहे. याचे प्रमाण १८.६० आहे. हे प्रमाण अल्प असले तरी विचारात घेण्यासारखे आहे.

काही महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षापैकी पहिली परीक्षाप्रथम सत्राच्या शेवटी होते. प्रथम सत्रात शिकवलल्या घटकांवर आधारित प्रश्नपत्रिका काढली जाते. दूसरी अंतर्गत परीक्षा द्वितीय सत्र समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर घेतल्यास द्वितीय सत्रातील बहुतांशी घटक शिकवलेले असतात. त्यामूळे सर्व घटकांवर आधारित परीक्षा घेता येते. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांना फायदा होतो. याचे प्रमाण ४५.७० आहे. म्हणून दोन अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी व द्वितीय सत्र समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर घेणे शैक्षणिक दृष्ट्या योग्य आहे.

काही महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षापैकी पहिली परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी होते. प्रथम सत्रात शिकवलेल्या घटकांवर आधारित प्रश्नपत्रिका काढली जाते. दूसरी अंतर्गत परीक्षा द्वितीय सत्र समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर घेतल्यास द्वितीय सत्रातील बहुतांशी घटक शिकवलेले असतात. त्यामूळे सर्व घटकांवर आधारित परीक्षा घेता येते. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांना फायदा होतो. याचे प्रमाण ४५.७० आहे. म्हणून दोन अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी व द्वितीयसत्र समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर घेणे शैक्षणिक दृष्ट्या योग्य आहे.

प्राचार्य व विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, दोनअंतर्गत परीक्षेपैकी प्रथम अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी घेतल्यास प्रथम सत्रात शिकवलेल्या घटकांवर आधारित होते. दूसरी अंतर्गत परीक्षा वार्षिक पाठ परीक्षेनंतर लगेच घेतल्यास पाठ परीक्षेचा ताण विद्यार्थी शिक्षकांवर असतो. तसेच अभ्यासास वेळ मिळत नाही. दूसरी अंतर्गत परीक्षा वार्षिक पाठ परीक्षेअगोदर घेतल्यास, पाठ परीक्षेसाठी वेळ द्यावा लातो त्यामुळे अंतर्गत परीक्षेकडे दुर्लक्ष होते म्हणून दुसरी अंतर्गत परीक्षा द्वितीय सत्राच्या समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर घेतल्यास द्वितीय सत्रातील बहुतांशी घटकांवर परीक्षा घेता येते. विद्यार्थी शिक्षकांना परीक्षेची तयारी करण्यास पूरेसा वेळ मिळतो. म्हणून महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षांचे आयोजन प्रथम सत्र समाप्तीपूर्वी व द्वितीय सत्र समाप्तीच्या एक महिना अगोदर करावे.

### ५.५३ एकाच अंतर्गत परीक्षेचे गुण :-

महाविद्यालयात शैक्षणिक वर्षात तात्विक विषयांची अंतर्गत परीक्षा घेतली जाते. अंतर्गत परीक्षेचे वीस गूणांपैकी मूल्यमापन केले जाते. महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा केव्हा घ्यायची याचे नियोजन केले जाते. तसेच अंतर्गत परीक्षा किती गुणांची घ्यायची हे महाविद्यालय ठरवते.

महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा किती गुणांची घेतली जाते. याविषयी

माहिती गोळा केली. ती खालील प्रमाणे आहे.

### कोष्टक क्र. ५३

### एकाच अंतर्गत परीक्षेचे गुण

| अ.नं. | महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा किती गुणांची घेतली जाते? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ५० | १९ | ३४.६० |
| २ | ६० | २२ | ४०.०० |
| ३ | १०० | १५ | २५.४० |
| | एकूण | ५६ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, एकच अंतर्गत परीक्षा पन्नास गुणांची घेतली जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३४.६० आहे. साठ गुणांची अंतर्गत परीक्षा घेतली जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४०.०० आहे. शंभर गुणांची अंतर्गत परीक्षा घेतली जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण २५.४० आहे.

काही महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा पन्नास गुणांची घेतली जाते. प्रत्येक पेपरच्या प्रत्येक विभागास २५ गुण असतात. २५ गूणांमध्य निबंध वजा प्रश्न व लघुत्तरी किंवा टीपा लिहा या प्रश्नांसाठी गूणविभागणी अपेक्षित उत्तरानुसार करता येत नाही. तसेच ५० गूणांच्या परीक्षेसाठी २ तास वेळ दिला जातो अशांचे प्रमाण ३४.६० आहे. गुणांची एक अंतर्गत परीक्षा घेणे शैक्षणिकदृष्ट्या अयोग्य आहे.

काही महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा ६० गूणांची घेतली जाते. प्रत्येक विभाग तीस गूणांचा असतो व एकूण ३०० गुणांची परीक्षा घेतल्याने २० पैकी गुण

काढणे सोपे जाते. ६० गुणांची परीक्षा दोन तासात घेता येते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४०.०० आहे. बी.एड्. अभ्यासक्रम पूस्तिकेत ही ६० गूणांची परीक्षा घ्यावी असे सूचित केले आहे.

महाविद्यालयात एकचअंतर्गत परीक्षा १०० गुणांची घेतली जाते, जेव्हा १०० गुणांची झालेल्या घटकांवर आधारित प्रश्नपत्रिका काढावी लागते. प्रथम सत्राच्या शेवटी किंवा वार्षिक पाठापूर्वी किंवा वार्षिक पाठ झाल्यानंतर लगेच अंतर्गत परीक्षा घेतल्यास, अंतर्गत परीक्षा घेतल्यास, शिकवून झालेल्या घटकांवर १०० गुणांची प्रश्नपत्रिका काढावी लागते त्यामुळे घटक व प्रश्नांची पुनरावृत्ती होते हे शैक्षणिक दृष्ट्या अयोग्य आहे.

म्हणून महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा घ्यावयाची असल्यास ती ६० गुणांचीच घेण्याची व्यवस्था करावी.

प्राचार्य व विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, एकच अंतर्गत परीक्षा ४० गुणांची घेतल्यास घटकानुसार व प्रश्नांचे अपेक्षित उत्तराच्या प्रमाणात गुणा विभागणी योग्य होत नाही. तसेच १०० गुणांची प्रश्नपत्रिका काढल्यास घटक व प्रश्नांची पुनरावृत्ती होते. घटकानुसार योग्य प्रमाणात गुणविभागणी होत नाही. जर ६० गुणांची अंतर्गत परीक्षा घेतल्यास प्रत्येक विभागासाठी घटक, प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी करता येते. ६० पैकी परीक्षा घेवून त्याचे २० पैकी गुणदान करणे सोपे जाते. म्हणून महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा घ्यावयाची असलयास ४० किंवा १०० गुणांची न घेता साठ गुणांचीच घ्यावी.

५.५४ <u>दोन अंतर्गत परीक्षेसाठी गुण :-</u>

बी.एड्. महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा घेण्याचे नियोजन केले जाते. प्रत्येक सत्रात महाविद्यालयाच्यानि योजनानुसार अंतर्गत परीक्षा घेतली जाते. तसेच अंतर्गत परीक्षा किती गुणांची घ्यायची याविषयी महाविद्यालय निर्णय घेते.

महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी किती गुणांसाठी घेतली जाते, याविषयी माहिती गोळा केली. ती खालील प्रमाणे आहे.

**कोष्टक क्र. ५४**

**दोन अंतर्गत परीक्षांचे गुण**

| अ.नं. | महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा किती गुणांची घेतली जाते? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ४० | १७ | २४.३० |
| २ | ५० | ३४ | ५०.५० |
| ३ | ६० | १८ | २५.२० |
| | एकूण | ६९ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी ४० गुणांची घेतलीजाते, अशा प्रतिसादाकांचे प्रमाण २४.३० आहे. दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी ५० गुणांची घेतली जाते, अशा प्रतिसादकांचेप्रमाण ५०.५० आहे. दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी ६० गुणांची घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २५.२० आहे.

दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी चाळीस गुणांची घेतल्यास प्रत्येकी परीक्षेपूर्वी झालेल्या घटकांवर प्रश्नपत्रिका तयार करावी लागते. चाळीस गुणांची विभागणी दोन विभागात केल्याने प्रत्येक विभागावर वीस गुणांचे प्रश्न काढावे लागतात. घटकांवर आधारित प्रश्नपत्रिकेसाठी प्रश्न काढून वीस गुणांची प्रश्नपत्रिका विभागणी करणे शैक्षणिक

दृष्ट्या अयोग्य होते. प्रश्नाचे उत्तर गुण यांचे योग्य प्रमाण रहात नाही. म्हणून प्रत्येक अंतर्गत परीक्षा चाळीस गुणांची घेणे शैक्षणिक अयोग्य आहे. प्रमाण २४.५० आहे.

दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी पन्नास गुणांची घेतल्यास प्रत्येक विभागसाठी पंचवीस गुणाचे प्रश्न काढावे लागतात. प्रत्येक परीक्षेपूर्वी झालेल्या घटकांवर आधारित पंचवीस गुणांसाठी प्रश्न काढल्यास गुणविभागणी योग्य प्रमाणात करता येते.

प्रत्येक विभाग पंचवीस गुणांचा असल्याने १३+१२ अशी विभागणी निबंधवजा, लघुत्तरी, वस्तुनिष्ठ प्रश्नांसाठी करता येते. प्रश्नांच्या अपेक्षित उत्तरानुसार गुणविभागणी करता येते. तसेचदोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी पन्नास गुणांची घेतल्यास त्याचे वीस पैकी गुणांमध्ये रुपांतर करणे सोपे जाते. म्हणून दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी पन्नास गुणांची घेणे शैक्षणिक दृष्ट्या योग्य आहे. अशांचे प्रमाण ५०.५० आहे. हे प्रमाण चांगले आहे.

महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा ६० गुणांची घेतल्यास प्रत्येक विभागासाठी तीस गुणांसाठी प्रश्नपत्रिका तयार करावी लागते. परीक्षेचे घटक, प्रश्नप्रकार व गुणविभागणीच्या दृष्टीकोनातून प्रत्येक विभागसाठी तीस गुणांची प्रश्नपत्रिका काढताताना प्रश्नांची पुनरावृत्ती होते. तसेच घटकानुसार गुणविभागणी योग्य होत नाही हे शैक्षणिक दृष्ट्या अयोग्य आहे. दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी ६० गुणापैकी घेतल्यास २० पैकी गुणदान करणे क्लिष्ट वाटते अशांचे प्रमाण २५.२० आहे.

महाविद्यालयात प्रत्येक अंतर्गत परीक्षा ४० किंवा ६० गुणांची घेण्याचे प्रमाण (२४.३ + २५.२) इतके ४९.५० आहे. ज्या महाविद्यालयात ४० किंवा ६० गुणांची अंतर्गत परीक्षा घेतली जाते त्या महाविद्यालयात परीक्षा ५० गुणांची घेण्याची व्यवस्था करावी.

प्राचार्य व विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, महाविद्यालयात

दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी पन्नास गुणांची घेतल्यास प्रश्नपत्रिकातयार करणे सुलभ होते. घटक व प्रश्नप्रकारानुसार (१३+१२) असे गूणदान करता येते. तसेच अंतर्गत परीक्षांचे वीसपैकी गूणदान करणे सोपे जाते. त्यामानाने ४० किंवा ६० गुणांची प्रत्येक अंतर्गत परीक्षा घेतल्यास प्रत्येक विभागासाठी २० किंवा ३० गुणांची प्रश्न काढावे लागतात. घटक व प्रश्नप्रकारानुसार २० किंवा ३० गुणांचे विभागणी प्रमाणानुसार करता येत नाही. तसेच २० पैकी अंतर्गत परीक्षांचे गूणदान करताना आकडेमोड वाढते. म्हणून माविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी पन्नास गुणांच्या घेतल्या जातात.

## ५.५५ अंतर्गत परीक्षांचे प्रत्याभरण :-

महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्षातील कामाच्या नियोजनानुसार एक किंवा दोन अंतर्गत परीक्षा घेवून उत्तरपत्रिका तपासल्या जातात. विद्यार्थी शिक्षकांचे उत्तरातील मूद्दे त्यांचा क्रम, सादरीकरण, लेखनशैली इ. चे मूल्यमापन केले जाते.

मूल्यमापन झाल्यानंतर विद्यार्थी शिक्षकांना प्रत्याभरण दिल्यास उत्तरपत्रिकेतील लेखनाबाबत, उत्तर सादरीकरणाबाबतच्या त्रूटी सुधारण्यासाठी वाव मिळतो. म्हणून अंतर्गत परीक्षांचे मूल्यमापन झाल्यावर त्याचे प्रत्याभरण केले जाणे आवश्यक आहे.

महाविद्यालयात अंतर्गत परीक्षांचे मूल्यमापन झाल्यानंतर प्रत्याभरण केले जाते की नाही याबाबत गोळा केलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ५५

### अंतर्गत परीक्षांचे मूल्यमापन

| अ.नं. | अंतर्गत परीक्षांचे मूल्यमापन झाल्यावर प्रत्याभरण केले जाते? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १२५ | १००.०० |
| २ | नाही | - | - |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की अंतर्गत परीखांचे मूल्यमापन झाल्यानंतर प्रत्याभरण केले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १००.०० आहे.

अंतर्गत परीक्षा झाल्यानंतर पत्रिका तपासून विद्यार्थी शिक्षकांना अपेक्षित मूद्दे, त्यांचे सादरीकरण, लेखन कौशल्ये, लेखन गती इ. बाबत प्रत्याभरण दिल्यास वार्षिक परीक्षेतील तात्विक विषयांचे पेपर्स लिहिण्यासाठी मार्गदर्शन मिळते. विद्यार्थी शिक्षक त्रूटी सुधारण्याच्या दृष्टीने सुधारणा करतात.

प्राचार्य व प्राध्यापकांच्या मुलाखतीवरुनअसे दिसून आले की, महाविद्यालयात अंतर्गत परीक्षा मूल्यमापन झाल्यावर प्रत्याभरण केले जाते. यामुळे विद्यार्थी शिखकांना अभ्यास करण्यासाठी, उत्तर लेखन, उत्तरांचे मूद्दे, सादरीकरण याबाबत मार्गदर्शन मिळते प्रत्याभरणामुळे विद्यार्थी शिखकांच्या उत्तरपत्रिका लेखनातील उणिवा समजतात. उणीवा सुधारण्याच्या दृष्टीने विद्यार्थी शिक्षक प्रयत्न करतात. अंतर्गत परीक्षेच्या प्रत्याभरणामुळे महाविद्यालयाच्या निकालावर चांगला परिणाम होतो. असा अनुभव आला आहे.

५.५६ **४. समाजसेवा, कार्यानुभव, सांस्कृतिक कार्यक्रम, शै. निबंध (प्रपाठ) शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिक :-**

"बी.एड्. अभ्यासक्रमात समाजसेवा प्रात्यक्षिकांसाठी चोवीस तासांचा कालावधी दिलेला आहे. वर्षभर सातत्याने समाजसेवा उपक्रम महाविद्यालयाकडून अपेक्षित आहेत.समाजसेवा प्रात्यक्षिकापूर्वी पेपर क्र. एक मधील संबंधित तात्विक भाग विद्यार्थी शिक्षकांना शिकवला पाहिजे. समाजसेवा संबोध, शिक्षण ही समाजाधारित प्रक्रिया शिक्षण संस्थांचे समाज विकासातील योगदान, परस्पर विकास संबंध, शिक्षक व समाज, समाजासमवेत कामाची पद्धती इ. वर आधारित व्याख्याने आयोजित करावी लागतात." ७

महाविद्यालयात समाजसेवेच्या प्रात्यक्षिक कार्याची सुरुवात करण्यापूर्वी किती व्याख्याने दिली जातात याविषयी माहिती गोळा केली. ती खालीप्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ५६

समाजसेवा प्रात्यक्षिकाबाबत व्याख्याने

| अ.नं. | महाविद्यालयात समाजसेवेच्या प्रात्यक्षिकापूर्वी किती व्याख्याने दिली जातात | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ३ | ३६ | २९.६ |
| २ | ४ | ०८ | ५.६ |
| ३ | ५ | ८१ | ६४.८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

७- कित्ता पान नं. १२५

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, महाविद्यालयात समाजसेवेच्या प्रात्यक्षिकापूर्वी तीन व्याख्याने दिली जातात अशा प्रतिसादाकांचे प्रमाण २९.६ आहे. चार व्याख्याने दिली जातात अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५.६ आहे. पाच ~~वाक्य~~ व्याख्याने दिली जातात अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६४.८ आहे.

समाजसेवा प्रात्यक्षिकाच्या अंमलबजावणीपूर्वी पाच व्याख्याने दिल्यास विद्यार्थी शिक्षकांना समाजसेवा-संबोध, समाजसेवेचे महत्व, समाजसेवांतर्गत उपक्रमांविषयी माहिती, भावी शिक्षक म्हणून समाजसेवा कार्यातील सहभाग याबाबत मार्गदर्शन मिळते. विद्यार्थी शिक्षकांना समाजसेवा प्रात्यक्षिकाचे महत्व लक्षात येते, व सहभागी होतात. समाजसेवा विषयी आवश्यक माहिती देण्यासाठी तीन किंवा चार व्याख्याने अपूरी वाटतात. परिसरातील समाज सेवक व शाळमध्ये समाजसेवा विषय शिकविण्याऱ्य शिक्षकांची व्याख्याने आयोजित करावी. म्हणून प्रात्यक्षिकापूर्वी पाच व्याख्यानांचे नियोजन करणे विद्यापीठाच्या नियमानुसार योग्य आहे. म्हणून प्रत्येक महाविद्यालयांनी समाजसेवा प्रात्यक्षिकांपूर्वी पाच व्याख्याने आयोजित करावीत.

प्राचार्य व समाजसेवा विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, समाजसेवा विषयाचे प्रात्यक्षिक घेण्यापूर्वी पाच व्याख्यानांचे आयोजन करावे असे विद्यापीठाच्या अभ्यासक्रम पूस्तिकेत सूचित केले आहे म्हणून तीन किंवा चार व्याख्याने न ठेवता पाच व्याख्याने आयोजित करावीत. परिसरातील समाजसेवक व शाळेमध्ये समाजसेवा विषय शिकवणाऱ्या शिक्षकांची व्याख्याने आयोजित केली जातात. समाजसेवा विषयावर तीनकिंवा चार व्याख्याने आयोजित करणे हे विद्यापीठाच्या नियमानुसार अयोग्य आहे म्हणून सर्व महाविद्यालयांनी पाच व्याख्याने आयोजित करावीत. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांना समाजातील समाजसेवक व विषयतज्ञांचे विचार व अनुभव ऐकण्याची संधी प्राप्त होते.

## ५.५७ समाजसेवेच्या व्याख्यानाची व्यवस्था :-

महाविद्यालयात समाजसेवा प्रात्यक्षिक कार्यापूर्वी पाच व्याख्याने द्यावी लागतात. समाजसेवा विषयी व्याख्याने देण्यासाठी नियोजन व त्यानुसार व्यवस्था करण्यात येते.

महाविद्यालयात समाजसेवा विषयाचे व्याख्यान देण्यासाठी खालीपैकी कोणती व्यवस्था केली जाते याविषयी माहिती गोळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

### समाजसेवेच्या व्याख्यानाची व्यवस्था :-

१) महाविद्यालयातील प्राध्यापक व्याख्यान देतात.

२) परिसरातील समाजसेवकांना व्याख्यानासाठी बोलावले जाते.

३) शाळेत समाजसेवा विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचे व्याख्यान आयोजित केले जाते.

कोष्टक क्र. ५७

समाजसेवेच्या व्याख्यानाची व्यवस्था

| अ.नं. | समाजसेवेच्या व्याख्यानाची व्यवस्था | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पर्याय एक | ६८ | ५४.४ |
| २ | पर्याय एक व दोन | २२ | १७.६ |
| ३ | पर्याय एक व तीन | १७ | १३.६ |
| ४ | तिनही पर्याय | १७ | १३.६ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, प्रश्नावलीत विचारलेल्या एक पर्यायाबाबत प्रतिसादकांचे प्रमाण ५४.४ आहे. पर्याय एक व दोन बाबत प्रतिसादकांचे प्रमाण १७.६ आहे. पर्याय एक व तीन बाबत प्रतिसादकांचे प्रमाण १२.६ आहे. तिनही पर्याय बाबत प्रतिसादकांचे प्रमाण १३.६ आहे.

महाविद्यालयात समाजसेवा विषयावर पाच व्याख्याने प्राध्यापक देतात. प्राध्यापकांव्यतिरिक्त सामाजिक स्तरावर समाजसेवा करणारे समाजसेवक व शालेयस्तरावर समाजसेवा विषयांतर्गत उपक्रम राबवणाऱ्या शिक्षकांचेही व्याख्यान आयोजित करावे. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांना सामाजिक व शालेय स्तरावरील समाजसेवेतील उपक्रमांची माहिती व मार्गदर्शन मिळते. समाजसेवक व विषयतज्ञांचे विचार व अनुभव ऐकण्याची संधी मिळते.

प्राचार्य व समाजसेवा विभाग प्रमुखांच्या मुलाखती वरुन असे दिसून आले की, समाजसेवा प्रात्यक्षिकापूर्वी पाच व्याख्याने महाविद्यालयातील प्राध्यापक, परिसरातील समाजसेवक व शाळेमध्ये समाजसेवा विषय शिकविणाऱ्या शिक्षकांची आयोजित करावीत. यामुळे विद्यार्थी शिक्षकांना तज्ञ, अनुभवी व्यक्तींकडून मार्गदर्शन मिळते.

## ५.५८ समाजसेवा उपक्रम सातत्य :-

महाविद्यालयात समाजसेवा विषयासाठी शैक्षणिक वर्षातील २४ तास देवून वर्षभर सातत्याने घ्यावयाच्या कार्यक्रमासाठी गट करुन आठवड्यातून एक दिवस समाजसेवेसाठी द्यावा असे शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रम पुस्तिकेत देण्यात आले आहे. म्हणजे महाविद्यालयातही वर्षापासून एकदा ठराविक दिवस समाजसेवेसाठी न देता वर्ष भर सातत्याने समाजसेवेचे उपक्रम हाती घेतले पाहिजेत.

महाविद्यालयात शैक्षणिक वर्षात सातत्याने समाजसेवेचे उपक्रम घेतले जातात का याविषयी गोळा केलेली माहिती खालीप्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ५८

समाजसेवा उपक्रम सातत्य

| अ.नं. | महाविद्यालयात शै.वर्षात सातत्याने समाजसेवेचे उपक्रम घेतले जातात का? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८९ | ७१.२ |
| २. | नाही | ३६ | २८.८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की महाविद्यालयात शैक्षणिक वर्षात सातत्याने समाजसेवेचे उपक्रम घेतले जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७१.२ आहे तर महाविद्यालयात शैक्षणिक वर्षात सातत्याने समाजसेवेचे उपक्रम घेतले जात नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २८.८ आहे.

प्राचार्य व सामाजसेवा विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, समाजसेवा विषयांतर्गत विविध उपक्रम वर्षभर सातत्याने घेतल्यास विद्यार्थी शिक्षकही उपक्रमात सहभागी होतात.

## ५.५९ समाजसेवा शिबिर :-

" 'समाजसेवा' विषयांवर वर्षभर सातत्याने गट तयार करुन विविधकार्यक्रमांचे आयोजन करावे तसेच डिसेंबर महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात दोन किंवा तीन दिवसांचे शिबिर आयोजित करावे असे बी.एड्. अभ्यासक्रमात पूस्तिकेत सूचित केले आहे." ६

६ कित्ता - पान नं. १२५

समाजसेवांतर्गत शिबिर आँयोजित करुन त्याचा अहवाल तयार केला जातो.

महाविद्यालयात समाजसेवा शिबिर किती दिवसांचे घेतले जाते याविषयी गोळा केलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ५९

समाजसेवा शिबिर

| अ.नं. | महाविद्यालयात समाजसेवा शिबिर किती दिवसांचे घेतले जाते | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एक दिवसाचे | ९० | ७२.०० |
| २ | दोन दिवसाचे | १४ | ११.२ |
| ३ | तीन दिवसाचे | ७ | ५.६ |
| ४ | शिबिर घेतले जात नाही | १४ | ११.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की महाविद्यालयात एक दिवसाचे शिबिर घेतले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७२.०० आहे, महाविद्यालयात दोन दिवसाचे शिबिर घेतले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ११.२ आहे, तीन दिवसाचे शिबिर घेतले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५.६ आहे तर महाविद्यालयात समाजसेवा शिबिर घेतले जात नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ११.२ आहे.

विद्यार्थी शिक्षकांना ग्रामीण जीवनाचा अनुभव मिळावा, समानतेचे तत्व, मूल्ये रुजविणे व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन यासाठी समाजसेवेचे दोन ते तीन दिवसांचे निवासी शिबिर आयोजित केले जाते अशा प्रतिसादाकंचे प्रमाण (११.२+५.६) १६.८ इतके आहे. हे प्रमाण अत्यल्प आहे.

ग्रामीण दिवसाच्या शिबिरामुळे जाणे-येणे यात वेळ जातो. समाजसेवेच्या प्रात्यक्षिकासाठी पूरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे समाजसेवेचे उद्दिष्ट्य साध्य होत नाही म्हणून एक दिवसाचे शिबिर घेणे अयोग्य आहे. असे प्रमाण ७२.०० इतके आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे. अशा महाविद्यालयांनी दोन ते तीन दिवसाचे निवासी शिबिर आयोजित करावे.

महाविद्यालयात शिबिर घेतले जात नाही, अशा विद्यार्थी शिक्षकांना वरील बाबींचा अनुभव मिळत नाही असे प्रमाण ११.२ आहे. हे प्रमाण अल्प असले तरी विचारात घेण्यासारखे आहे. अशा महाविद्यालयांनी निवासी शिबिर आयोजित करावे यामुळे विद्यार्थी शिक्षकांमध्ये मूल्यनिर्मिती होईल.

प्राचार्य व समाजसेवा विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, एक दिवसाच्या शिबिरामुळे समाजसेवेच्या प्रत्यक्ष कामासाठी पूरेसा वेळ मिळत नाही. विद्यार्थी शिक्षकांनी ग्रामीण जीवनाचा अनुभव घेण्यासाठी व समाजसेवेची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी दोनते तीन दिवसांचे निवासी शिबिर महाविद्यालयांनी आयोजित करावे.

## ५.६० समाजसवेचे स्तर :-

" समाजसेवा विषयांतर्गत उपक्रम १) महाविद्यालयीन स्तर २) शालेय स्तर ३) सामाजिकस्तर अशा तिन्ही स्तरावर घ्यावेत. दर आठवड्यात काही ठराविक काळ असे वीस आठवडे सातत्याने किंवा दोन ते तीन दिवसाचे शिबिर घेवून तिन्ही

स्तरावर उपक्रम घ्यावेत'' असे बी.एड्. अभ्यासक्रम पूस्तिकेत सूचित केले आहे. - ९

महाविद्यालयात समाजसेवा कोणकोणत्या स्तरावर केली जाते याविषयी माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे आहे.

समाजसेवेचे स्तर

१) महाविद्यालयीन स्तर

२) शालेय स्तर

३) सामाजिक स्तर

कोष्टक क्र. ६०

समाजसेवेचे स्तर

| अ.नं. | महाविद्यालयात समाजसेवा कोणकोणत्या स्तरावर केली जाते? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | तीन पर्याय | ६४ | ५१.२ |
| २ | एक व दोन पर्याय | २८ | २२.४ |
| ३ | एक व तीन पर्याय | ३३ | २६.४ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, प्रश्नावलीत दिलेल्या तिन्ही पर्यायाबाबत प्रतिसादकांचे प्रमाण ५१.२ आहे. पर्याय एक व दोन बाबत प्रतिसादकांचे प्रमाण

९ कित्ता - पान नं. १२३

२२.४ आहे. पर्याय एक व तीन बाबत प्रतिसादकांचे प्रमाण २६.४ आहे.

विद्यापीठाच्या नियमानुसार महाविद्यालयीन, शालेय व सामाजिक स्तरावर समाजसेवा उपक्रम घेतले पाहिजे. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांना तिन्ही स्तरावर समाजसेवा करण्याची संधी मिळते, अनुभव मिळतात व समाजसेवेची उद्दिष्टचे साध्यहोतात. असे प्रमाण ५१.२ आहे हे प्रमाण चांगले आहे.

समाजसेवा महाविद्यालयीन स्तर व शालेय स्तरकिंवा सामाजिक स्तरावर घेतलेस विद्यार्थी शिक्षकांना सर्व स्तरावरसमाजसेवा करण्याची संधी व अनुभव मिळत नाही. म्हणूनदोन ते दिवसांचे शिबिर घेवून अथवा दर आठवड्यात काही ठराविक काळात तिन्ही स्तरावर उपक्रम आयोजित करावेत.

प्राचार्य व समाजसेवा विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, दोन किंवा तीन दिवसाचे निवासी शिबिर आयोजित करुन त्या परिसरात शालेय, व सामाजिक स्तरावर समाजसेवा केली जाते. व इतर वेळी महाविद्यालयीन स्तरावर समाजसेवेचे उपक्रम घेतले जातात.

## ५.६१ समाजसेवांतर्गत शिबिरातील उपक्रम

समाजसेवा शिबिरात शालेय, सामाजिक व महाविद्यालयीन स्तरावर कोणकोणते उपक्रम राबवावेत याविषयी मार्गदर्शनपर उपक्रमांची यादी बी.एड्. अभ्यासक्रम पूस्तिकेत दिली आहे. त्यानुसार महाविद्यालयांना शिबिरात वेगवेगळ्या स्तरावरील उपक्रमांचे आयोजन-करण्यास मदत होते.

महाविद्यालयात समाजसेवांतर्गत शिबिरात कोणकोणते उपक्रम घेतले जातात याविषयी माहिती गोळा केली. ती खालील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र.६१

समाजसेवांतर्गत शिबिरातील उपक्रम

| अ. नं. | महाविद्यालयात समाजसेवांतर्गत कोणकोणते उपक्रम राबवले जातात? | प्रतिसादक एकूण संख्या | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | वृक्षारोपण | १२५ | ६२ | ४९.६ |
| २ | परिसर स्वच्छता | १२५ | ११६ | ९२.८ |
| ३ | प्रौढांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे उद्बोधन | १२५ | ७४ | ५९.२ |
| ४ | शिबिर परिसरातील विद्यार्थ्यांना काही तास शिकवणे | १२५ | ३५ | २८.०० |
| ५ | हळदीकुंकू कार्यक्रम | १२५ | ७ | ५.६ |
| ६ | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विशेष दिनात सहभाग | १२५ | ६३ | ५०.४ |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, महाविद्याकडून समाजसवांतर्गत वृक्षारोपण केले जाते अशी प्रतिसादकांचे प्रमाण ४९६ आहे. परिसर स्वच्छता केली जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण ९२.८ आहे. प्रौढांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे परिसरातील विद्यार्थ्यांना काही तास आयोजन करणे अशा प्रतिसादकांचे प्रमाण २८.०० आहे. हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करणे अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५.६ आहे तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विशेष दिनात सहभाग घेणे अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५०.४

आहे. शिबिर परिसरातील विद्यार्थ्यांना काही तास शिकविणे अशा प्रतिसादकांचे प्रमाण २८.०० आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रमात दहा गाभाभूत घटकांचा समावेश आहे. प्रत्येक शालेय विषयात गाभाभूत घटक अंतर्भूत केले जातात. समाजसेवांतर्गत पर्यावरण संरक्षण व संवर्धन यासाठी वृक्षारोपण हा उपक्रम घेतला जातो. शिबिराच्या परिसरात वृक्षारोपण केले जाते. तसेच परिसर स्वच्छता हा उपक्रम घेतला जातो. शिक्षणाने समाजविकास होतो. म्हणून अनौपचारिक शिक्षणांतर्गत सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे प्रौढाचे उद्बोधन केल जाते. नाटिका, पथनाट्य, लोकगीते, भारुडे, नकला इ. कार्यक्रमांमधून सामाजिक अडसरांचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच शिबिर परिसरातील शाळांमध्ये जावून नवीन शैक्षणिक तंत्र, क्लृप्त्या व शैक्षणिक साधनांचा वापर करुन विद्यार्थ्यांना काही तास शिकवले जाते.

शिबिर परिसरातील महिलांचाही सहभाग घेण्यासाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विशेष दिन उदा. पल्स पोलिओ मोहिम, पर्यावरण दिन, लोकसंख्या दिन, धूम्रपान निषेध दिन, वाहतूक सूरक्षा सप्ताह इ. उपक्रमांत विद्यार्थी शिक्षक सहभागी हातात. विशेष दिनानिमित्त निघणाऱ्या दिंड्या, व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे यामध्ये सहभागी होतात. तसेच स्वयंसेवक म्हणून काम करतात.

प्राचार्य व समाजसेवा विभाग प्रमुखाच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, समाजसेवांतर्गत उपक्रमापैकी वृक्षारोपण, सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे प्रौढांचे उद्बोधन व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विशेष दिनांत विद्यार्थी शिक्षक आवडीने सहभागी होतात. परिसर स्वच्छता, शिबिर परिसरातील विद्यार्थ्यांना काही तास शिकवणे याबाबत विद्यार्थी शिक्षक उदासिन असतात. काही विद्यार्थी वीस गूणांसाठी समाजसेवेतील उपक्रमात भाग घेतात. अशा विद्यार्थी शिक्षकांमधील समाजसेवेबाबत उदासिनता घालविण्यासाठी उपक्रमांमध्ये विविधता आणावी.

## ५.६२ समाजसेवा उपक्रमात विद्यार्थी शिक्षकांचा सहभाग

बी.एड्. अभ्यासक्रमात समाजसेवा विषयाच्या प्रात्यक्षिकांतर्गत विविध उपक्रम सातत्याने आयोजित करुन किंवा शिबिर आयोजितकरुन त्यातील उपक्रमांवर आधारित अहवाल तयार करावा लागतो. विद्यार्थी शिक्षकांना अभ्यासक्रमातील विषय म्हणून व भावी शिक्षकाच्या दृष्टीने समाजसेवा उपक्रमात सहभागी व्हावे लागते. विद्यार्थी शिक्षकाच्या सहभागावरुन मूल्यमापन केले जाते.

महाविद्यालयातील समाजसेवेच्या उपक्रमात विद्यार्थी शिक्षक सहभागी होतात काय? याबाबत गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ६२

समाजसेवा उपक्रमात विद्यार्थी शिक्षकांचा सहभाग

| अ.नं. | समाजसेवेच्या उपक्रमात विद्यार्थी शिक्षक सहभागी होतात का? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १२५ | १००.०० |
| २ | नाही | - | - |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की महाविद्यालयात समाजसवेच्या उपक्रमात विद्यार्थी शिक्षक सहभागी होतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रसिादकांचे प्रमाण १००.०० आहे.

बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिकात समाजसेवा विषयाचा समावेश आहे तसेच

शालेय अभ्यासक्रमातही समाजसेवा विषय इ. ८ वी पासून आहे. समाजसेवा विषयांतर्गत उपक्रमातील विद्यार्थी शिक्षकांचा सहभाग, अहवाल लेखन यावरुन मूल्यमापनकेले जाते म्हणून विद्यार्थी शिक्षक समाजसेवेच्या उपक्रमात सहभागी होतात.

प्राचार्य वसमाजसेवा विभागप्रमुख यांच्या मुलाखतीवरुनअसे दिसून येते की, विद्यार्थी शिक्षक समाजसेवेच्या उपक्रमात भाग घेतात तसेच शिबिरातील उपक्रमात स्वयंस्फूर्तीने सहभागी होतात.

## ५-६३ समाजसेवांतर्गत उपक्रम घेताना येणाऱ्या अडचणी :-

बी.एड्. अभ्यासक्रमातील समाजसेवा उपक्रमात विद्यार्थी शिक्षकांना सहभाग घ्यावा लागतो. वीस गुणांपैकी गूणदान केले जाते. समाजसेवेचे उपक्रम सातत्याने घेतले जातात. शिबिरातही अनेक उपक्रम घेतले जातात. उपक्रमांत विद्यार्थी शिक्षकांच्या सक्रिय सहभागावार उपक्रमाची यशस्वीता अवलंबून असते. बऱ्याचदा समाजसेवेतील उपक्रम कृत्रिमपणे राबवले जातात यामूळे समाजसेवांतर्गत उपक्रम घेताना अडचणी येतात.

महाविद्यालयात समाजसेवांतर्गत उपक्रम घेताना कोणकोणत्या अडचणी येतात याबाबत माहिती गोळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

### समाजसेवांतर्गत उपक्रम घेताना येणाऱ्या अडचणी :-

१) विद्यार्थी शिक्षक अहवाललेखन व्यवस्थित करत नाहीत.

२) विद्यार्थी शिक्षक समाजसेवा उपक्रमात स्वेच्छेने सहभागी होत नाही.

३) अनुभवी समाजसेवक व तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा अभाव.

## कोष्टक क्र. ६३

### समाजसेवांतर्गत उपक्रम घेताना येणाऱ्या अडचणी

| अ.नं. | समाजसेवांतर्गत उपक्रम घेताना येणाऱ्या अडचणी. | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एक व तीन अडचणी येतात | १९ | १५.२ |
| २ | दोन व तीन अडचणी येतात | ६९ | ५५.२ |
| ३ | तीनही अडचणी येतात | ३७ | २९.६ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकारुन असे दिसून येते की, प्रश्नावलीत विचारलेल्या एक व तीन अडचणी येणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १५.२ आहे. समाजसेवेत दोन व तीन अडचणी येणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५५.२ आहे. समाजसेवेत तीन ही अडचणी येणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २९.६ आहे.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, विद्यार्थी शिक्षक वीस पैकी गूण मिळविण्यासाठी समाजसेवा उपक्रमात भाग घेतात. स्वेच्छेने सहभागी होत नाहीत. महाविद्यालयातील प्राध्यापक समाजसेवेची व्याख्याने देतात त्यामुळे अनुभवी समाजसेवक व तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा अभाव आढळतो. त्यामुळे समाजसेवा उपक्रम कृत्रिमपणे राबवले जातात. वरील अडचणी येणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५५.२ आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे.

विद्यार्थी शिक्षक समाजसेवा प्रात्यक्षिकाचे अहवाल लेखन व्यवस्थित करत नाहीत. अनुभवी समाजसेवा व तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या अभावामुळे अडचणी येणाऱ्या

प्रतिसादकांचे प्रमाण १५.२ आहे. हे प्रमाण अत्यल्प असले तरी विचाराधीन आहे.

वरील तिन्ही अडचणी येणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३९.२ आहे.

प्राचार्य व समाजसेवा विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, विद्यार्थी शिक्षक प्रात्यक्षिकाचे वीस पैकी गूण मिळविण्यासाठी उपक्रमात सहभागी होतात. अहवाल लेखन करतात. स्वेच्छेने सहभागी होत नाहीत. त्यामुळे समाजसेवा उपक्रमात कृत्रिमता येते व समाजसेवेची उद्दिष्ट्ये साध्य होत नाहीत. म्हणून परिसरातील समाजसेवक व तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन मिळण्याची संधी द्यावी.

## ५.६४ कार्यानुभव प्रात्यक्षिक :-

शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रम भाग दोन मध्ये कार्यानुभव विषयाच्या प्रात्यक्षिकाचा समावेश केला आहे.

"बी.एड्. शैक्षणिक वर्षामध्ये डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात दहा तास कार्यानुभवासाठी देण्यात यावेत असे बी.एड्. अभ्यासक्रम पुस्तिकेत सूचित केले आहे"-१०

कार्यानुभव प्रात्यक्षिकांतर्गत तात्विक विषयाची व्याख्याने, कार्यानुभाची दिग्दर्शित माहिती, गटवार काम, प्रत्यक्ष वस्तू निर्मिती इ. बाबींचा अंतर्भाव आहे. यासाठी माहाविद्यालयाकडून नियोजन केले जाते.

महाविद्यालयात कार्यानुभव प्रात्यक्षिक किती दिवसांचे घेतले जाते, याबाबत माहिती गोळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

---

१० कित्ता - पान नं. १३२

## कोष्टक क्र. ६४

## कार्यानुभव प्रात्यक्षिकांसाठी कालावधी

| अ.नं. | महाविद्यालयात कार्यानुभवाचे प्रात्यक्षिक किती दिवसाचे घेतले जाते? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ६२ | ४९.६ |
| २ | ३ | ३९ | ३१.२ |
| ३ | ४ | २४ | १९.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, महाविद्यालयात कार्यानुभवाचे प्रात्यक्षिक दोन दिवस घेतले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४९.६ आहे, तीन दिवस कार्यानुभव प्रात्यक्षिक घेतले जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३१.२ आहे, चार दिवस कार्यानुभव प्रात्यक्षिक घेतले जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण १९.२ आहे.

कार्यानुभव हा विषय शालेय स्तरावर शिकविला जातो. आठवड्यात एक तासिका कार्यानुभवासाठी असते. म्हणून विद्यार्थी शिक्षकांना कार्यानुभवाची तात्विक माहिती, उपक्रम, नियोजन, कार्यवाही, वस्तूनिर्मिती इ. साठी दोन दिवसाचा कालावधी कमी आहे. दोन दिवस कार्यानुभव प्रात्यक्षिक कार्य घेतल्याने प्रात्यक्षिकास पूरेसा वेळ मिळत नाही. याचा परिणाम प्रात्यक्षिकाच्या गुणवत्तेवर होतो, असे प्रमाण ४९.६ आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे.

तीन दिवस कार्यानुभव प्रात्यक्षिक घेतले जाते, असे प्रमाण ३१.२ आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे.

चार दिवसाचे कार्यानुभव प्रात्यक्षिक घेतल्याने प्रात्यक्षिक कामाची माहिती व मार्गदर्शनास पूरेसा वेळ मिळतो. प्रात्यक्षिक कार्य व्यवस्थितरित्या घेता येते. कार्यानुभव प्रात्यक्षिक घेण्यामागील उद्देश साध्य होतात, असे प्रमाण १९.२ आहे. हे प्रमाण अल्प आहे. म्हणून महाविद्यालयात दोन किंवा तीन दिवसाऐवजी कार्यानुभव प्रात्यक्षिक कमीत कमी चार दिवस घ्यावे.

प्राचार्य व कार्यानुभव विभाग प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, बी.एड्. वर्षात अनेक उपक्रम घेत असताना कार्यानुभव प्रात्यक्षिकासाठी पूरेसा वेळ मिळत नाही. त्याचा परिणाम प्रात्यक्षिकाच्या गुणवत्तेवर होतो. म्हणून कार्यानुभव विषयाचे प्रात्यक्षिक कमीत कमी चार दिवस घ्यावे.

## ५.६५ कार्यानुभव साठी तात्विक व्याख्याने :-

बी.एड्. अभ्यासक्रमात कार्यानुभव प्रात्यक्षिकासाठी तात्विक माहिती ही द्यावी लागते.

" कार्यानुभव विषयाची तात्विक माहिती देताना कार्यानुभव संबोध, कार्यानुभवाची गरज, महत्व, विविध प्रकारचे कार्यानुभव, कार्यानुभव निवडीची तत्वे, नियोजन व संघटन, शिक्षक, विद्यार्थी, समाज यांची कार्यानुभवातील भूमिका, कार्यानुभवाची दिग्दर्शित माहिती यासाठी ५ व्याख्याने आयोजित करावीत असे बी.एड्. अभ्यासक्रम पुस्तिकेत सूचित केले आहे"-१९

महाविद्यालयात कार्यानुभव प्रात्यक्षिक घेण्यापूर्वी तात्विक माहिती देण्यासाठी किती व्याख्याने दिली (याबाबत गोष्ट) केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

---

१९ कित्ता पान नं. १२६

## कोष्टक क्र. ६५

## कार्यानुभवासाठी तात्विक व्याख्याने

| अ.नं. | कार्यानुभव तात्विक माहितीसाठी किती व्याख्याने दिली जातात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २ | १० | ८.० |
| २ | ३ | ७ | ५.६ |
| ३ | ४ | ८ | ६.४ |
| ४ | ५ | १०० | ८०.०० |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की महाविद्यालयात कार्यानुभव तात्विक माहितीसाठी दोन व्याख्याने दिली जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ८.० आहे, कार्यानुभवाची तात्विक माहितीसाठी तीन व्याख्याने दिली जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५.६ आहे, कार्यानुभवाच्या तात्विक माहितीसाठी चार व्याख्याने दिली जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५.६ आहे, कार्यानुभवाच्या तात्विक माहितीसाठी चार व्याख्याने दिली जातात असा प्रतिदसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ६.४ आहे तर कार्यानुभव तात्विक माहितीसाठी पाच व्याख्याने दिली जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ८०.०० आहे.

कार्यानुभवाचे प्रात्यक्षिक घेण्यापूर्वी कार्यानुभव विषयाची तात्विक माहिति विद्यार्थी शिक्षकांना दिल्यास कार्यानुभव विषयाची उद्दिष्ट्ये, गरज, महत्व, अभ्यासक्रमात विषयाचे स्थान, विविध व्यवसायाविषयी प्राथमिक माहिती समजते. यामुळे कार्यानुभव विषयाविषयी योग्य दृष्टीकोन निर्माण होतो. विद्यार्थी शिक्षकही कौशल्यपूर्ण कामात

सहभागी होतात म्हणून कार्यानुभव प्रात्यक्षिकापूर्वी तात्विक माहिती देण्यासाठी पाच व्याख्याने देण्यात यावीत. महाविद्यालयात पाच व्याख्याने आयोजित करणाऱ्यांचे प्रमाण ८०.०० आहे हे प्रमाण चांगले आहे.

प्राचार्य व कार्यानुभव विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की कार्यानुभव विषयाच्या तात्विक माहितीची आवश्यकता, व्यापकता लक्षात घेतल्यास तात्विक विषयासाठी पाच व्याख्याने आयोजित केरणे आवश्यक आहे.

५·६६ **कार्यानुभव उपक्रम :-**

कार्यानुभव प्रात्यक्षिकातील विविध उपक्रम अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, संस्कृती, मनोरंजन, सुधारित उपकरणे व साधने दुरुस्ती, इ. वर आधारित असावेत. व बी.एड्. अभ्यासक्रम पुस्तिकेत कार्यानुभव विषयांतर्गत मानवाच्या मलभूभत गरजा व विकसनाच्या दृष्टीने आवश्यक उपक्रमांची यादी दिली आहे त्यापैकी उपक्रम निवडून महाविद्यालयात त्याची कार्यवाही करण्यात येते.

महाविद्यालयात कार्यानुभवासाठी कोणते उपक्रम घेतले जातात याबाबत गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ६६

## कार्यानुभवासाठी उपक्रम

| अ.नं. | महाविद्यालयात कार्यानुभवांसाठी कोणते उपक्रम घेतले जातात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ब्रेड बिस्किट तयार करणे | १४ | ११.२ |
| २ | परसबाग (कुंडीतील लागवड) | ३९ | ३१.२ |
| ३ | कुक्कुटपालन | - | - |
| ४ | मिठाई तयार करणे | १५ | १२.०० |
| ५ | फाईल, लिफाफे तयार करणे | ९८ | ७८.४ |
| ६ | पुस्तक बांधणी | २६ | २०.८ |
| ७ | गुंडाळ फलक तयार करणे | ५१ | ४०.८ |
| ८ | विद्युत उपकरण दुरुस्ती | १८ | १४.४ |
| ९ | खडू तयार करणे | ३८ | ३०.४ |
| १० | ग्रिटिंग कार्डस् तयार करणे | ९२ | ७३.६ |
| ११ | मेणबत्त्या तयार करणे | ३ | ०.५५ |
| १२ | भरतकाम/विणकाम | १५ | १२.०० |
| १३ | शै. साहित्य निर्मिती | ९ | ७.२ |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की महाविद्यालयात कार्यानुभवासाठी ब्रेड,

बिस्कीट तयार केले जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ११.२ आहे, परसबाग उपक्रम राबवला जातो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३१.२ आहे. कुक्कुट पालन उपक्रम घेतला जातो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ०.० आहे, मिठाई तयार केली जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १२.० आहे, फाईल लिफाफे तयार करुन घेतली जातात असा प्रतिसादे देणाऱ्या प्रतिसादकाचे प्रमाण ७८.४ आहे. पुस्तकबांधणी करण्यात येते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांच प्रमाण २०.८ आहे, गुंडाळ फलक तयार करुन घेणे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे प्रमाण ४०.८ आहे, विद्युत उपकरण दुरुस्ती घेण्यात येते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १४.४ आहे, खडू तयार करणे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३०.४ आहे, ग्रिटिंग्ज कार्डस् तयार करुन घेणे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांच प्रमाण ७३.६ आहे, मेणबत्या तयार करुन घेतल्या जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ०.५५ आहे, भरतकाम/विणकाम घेतले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १२.०० आहे तर शै. साहित्य निर्मिती केली जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७.२ आहे.

महाविद्यालयात कार्यानुभव विषयाचे प्रात्यक्षिक घेण्यासाठी उपलब्ध साहित्य सामुग्री व तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन यानुसार उपक्रमांची निवड केली जाते. म्हणून कार्यानुभव उपक्रमांमध्ये विविधता दिसून येते. कमी कालावधीत वस्तू निर्मिती, बांधणी, दुरुस्ती होत असेल तर अधिक उपक्रमांची राबवले जातात. व दीर्घ काळ चालणाऱ्या प्रात्यक्षिक आयोजित करतात. विद्यापीठाच्या नियमानुसार एकच प्रात्यक्षिक नियोजन करण्यास सांगितले आहे. परंतू काही महाविद्यालये एकापेक्षा अधिक प्रात्यक्षिक घेत असतात.

प्राचार्य व कार्यानुभव विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, कार्यानुभव साहित्य निर्मितीसाठी व प्रात्यक्षिकासाठी उपलब्ध सामुग्री व त्या उपक्रमाविषयी मार्गदर्शन करु शकणारे प्राध्यापक यावरुन कार्यानुभव उपक्रमाची निवड

करुन प्रात्यक्षिक घेतले जाते.

## ५.६७ कार्यानुभव प्रात्यक्षिक पद्धती :-

कार्यानुभव प्रात्यक्षिकापूर्वी तात्विक माहिती सांगण्यासाठी पाच व्याख्याने वर्गात एकत्रित दिली जात तसेच कार्यानुभव दिग्दर्शित माहिती सांगितली जाते व प्रत्येक २० विद्यार्थ्यांचे चार गट करुन गटावार प्रात्यक्षिक करुन घ्यावे असे अभ्यासक्रम पूस्तिकेत सूचित केले आहे.

कार्यानुभवासाठी निवडलेल्या प्रात्यक्षिकाच्या स्वरुपानुसार विद्यार्थी शिक्षकांकडून गटवार किंवा वैयक्तिक रित्या प्रात्यक्षिक करुन घेतले जाते.

महाविद्यालयात कार्यानुभव व विषयाचे प्रात्यक्षिक कोणत्या पद्धतीने घेतले जाते याबाबत गोळा केलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ६७

कार्यानुभव प्रात्यक्षिक पद्धती

| अ.नं. | कार्यानुभव विषयाचे प्रात्यक्षिक कोणत्या पद्धतीने घेतले जाते? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक | ४८ | ३८.४ |
| २ | गटवार | ६९ | ५५.२ |
| ३ | काही प्रात्यक्षिक वैयक्तिक व गटवार | २८ | १६.४ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की महाविद्यालयात कार्यानुभव विषयाचे प्रात्यक्षिक वैयक्तिक घेतले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३८.४ आहे, कार्यानुभव प्रात्यक्षिक गटवार घेतले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५५.२ आहे तर काही प्रात्यक्षिके वैयक्तिक व गटवार घेतले जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ६.४ आहे.

कार्यानुभव प्रात्यक्षिका विषयी मार्गदर्शक उपक्रम अभ्यासक्रम पूस्तिकेत दिले आहे. महाविद्यालयात त्या उपक्रमांपैकीच प्रात्यक्षिक करुन घेतले जाते. प्रात्यक्षिकासाठी लागणारा वेळ, खर्च यावर प्रात्यक्षिक स्वरूप वैयक्तिक किंवा गटवार ठरवले जाते. वस्तूनिर्मिती साठी जर प्रात्यक्षिक खर्च अधिक येत असेल तर गट करुन वस्तू निर्मिती केली जाते.

प्राचार्य कार्यानुभव विभाग प्रमुख यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, कुंडीतील लागवड, गुंडाळ फलक, विद्युत उपकरण दुरुस्ती, मिठाई तयार करणे इ. प्रात्यक्षिके गटवार घेतली जातात.

फाईल, लिफाफे तयार करणे, पुस्तकबांधणी, ग्रिटिंग्ज तयार करणे, खडू तयार करणे, शै. साहित्य निर्मिती इ. प्रात्यक्षिके वैयक्तिक घेतली जातात.

## ५·६८ कार्यानुभव व्याख्यान व प्रात्यक्षिक कार्यवाहीत येणाऱ्या अडचणी :-

महाविद्यालयात कार्यानुभव प्रात्यक्षिक घेण्यापूर्वी पाच व्याख्याने देण्यासाठी संदर्भसाहित्य लागते. प्रात्यक्षिकासाठी आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध पाहिजे. कार्यानुभव प्रात्यक्षिकाचे दिग्दर्शन व मार्गदर्शनासाठी तज्ञ प्राध्यापक असल्यास शास्त्रशुद्ध माहिती मिळते. वरील बाबींपैकी अभाव असेल तर कार्यानुभव, व्याख्यान व प्रात्यक्षिक कार्यवाहीत अडचणी येतात.

महाविद्यालयात कार्यानुभव व्याख्यान व प्रात्यक्षिक कार्यवाहीत कोणकोणत्या

अडचणी येतात याविषयी माहिती गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

कार्यानुभव व्याख्यान व प्रात्यक्षिकातील अडचणी :-

१) कार्यानुभव विषयाच्या व्याख्यानासाठी संदर्भ साहित्य उपलब्ध नसते.

२) कार्यानुभव विषयाच्या प्रात्यक्षिक कार्याच्या मार्गदर्शनासाठी प्रशिक्षित प्राध्यापक उपलब्ध नसतात.

३) कार्यानुभव प्रात्यक्षिकासाठी लागणारे साहित्य उपलब्ध नसते.

कोष्टक क्र ६८

कार्यानुभव प्रात्यक्षिक कार्यवाहीत येणाऱ्या अडचणी

| अ.नं. | कार्यानुभव व्याख्यान व प्रात्यक्षिक | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | तीनही अडचणी येतात | ६४ | ५१.२ |
| २) | एक व दोन अडचणी येतात | ३५ | २८.० |
| ३) | दोन व तीन अडचणी येतात | २६ | २०.८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुनअसे दिसून येते की, प्रश्नावलीत विचारलेल्या तीनही अडचणी येणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५१.२ आहे. कार्यानुभव प्रात्यक्षिकात एकवदोन अडच्णी येणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २८.० आहे. कार्यानुभव प्रात्यक्षिकात दोन व तीन अडचणी येणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २०.८ आहे.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की कार्यानुभव विषयाची तात्विक माहिती देण्यासाठी संदर्भ साहित्य उपलब्ध नसते. कार्यानुभव प्रात्यक्षिकाचे मार्गदर्शन महाविद्यालयातील प्राध्यापक करतात. प्राध्यापकांना कार्यानुभव विषयक मार्गदर्शन प्रशिक्षण नसतो. कार्यानुभव प्रात्यक्षिकासाठी लागणारे साहित्य विद्यार्थी शिक्षक संख्येच्या प्रमाणात उपलब्ध नसते. यामुळे तीनही अडचणी येणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण जास्त आहे. हे प्रमाण ५१.२ आहे.

प्राचार्य व कार्यानुभव विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, महाविद्यालयातील एका प्राध्यापकास कार्यानुभवाचे प्रशिक्षण द्यावे. हे प्रशिक्षण देण्यासाठी एस्.सी. इ.आर.टी.ने. कृतिसत्र आयोजित करावे. कार्यानुभव विषयासाठी आवश्यक संदर्भ साहित्य व प्रात्यक्षिकासाठी लागणारे साहित्य उपलब्ध करण्यासाठी विशष अनुदान द्यावे.

## सांस्कृतिक कार्यक्रम :-

### ५.६९ सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन :-

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी तात्विक विषयाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमाचे ायोजनकेले जाते. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत विधिध उपक्रमांची कार्यवाही कशी करावी, त्या विषयक उद्दिष्टचे, सांस्कृतिक कार्यक्रमाची गरज, महत्व व सांस्कृतिक कार्यक्रमाची तत्वे विद्यार्थी-शिक्षकांना समजावीत म्हणन बी.एड्. अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक कार्यात सांस्कृतिक कार्यक्रमाचे संघटन करुन त्यामध्ये विद्यार्थी- शिक्षकांना सहभाग अपेक्षित आहे. म्हणन शैक्षणिक वर्षात सातत्याने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे व यासाठी २० तासांचा कालावधी असे बी.एड्. अभ्यासक्रम पूस्तिकेत सूचित केले आहे.

महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम केव्हा घेतले जातात याविषयी गोळा केलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ६९

## सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन

| अ.नं. | महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम केव्हा घेतले जातात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आठवड्यातून एकदा | ५० | ४०.०० |
| २ | दोन आठवड्यातून एकदा | १० | ८.०० |
| ३ | महिन्यात एकदा | ६५ | ५२.०० |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम आठवड्यातून एकदा घेतला जातो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४०.०० आहे, सांस्कृतिक कार्यक्रम दोन आठवड्यातून एकदा घेतला जातो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ८.०० आहे तर महिन्यातून एकदा सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे प्रमाण ५२.०० आहे.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शैक्षणिक वर्षात सातत्याने केले जाते. वैयक्तिक उपक्रम, वारंवार उपक्रम व प्रासंगिक उपक्रम आयोजित केले जातात. त्यामुळे विद्यार्थी-शिक्षक प्रासंगीक, वैयक्तिकरित्या किंवा गटात सहभागी होतात. विद्यार्थ्यांची शिक्षकांना सहभागी होण्याची संधी मिळण्यासाठी आठवड्यातून एकदा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावा. आठवड्यातून एकदा सांस्कृतिक कार्यक्रम घेतल्यास विविधता येते. विद्यार्थी आपल्या आवडीप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होतो. तज्ञांची व्याख्याने, सांघिक स्पर्धा, वैयक्तिक स्पर्धा इ. कार्यक्रम आयोजित करण्याची संधी मिळते. त्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यामागील उद्देश सफल होतात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४०.०० आहे.

दोन आठवड्यातून एकदा सांस्कृतिक कार्यक्रम घेतल्यास विविध उपक्रम राबवता येत नाहीत. त्यामुळे सर्व विद्यार्थी शिक्षकांना त्यांच्या आवडीनुसार कार्यक्रमात भाग घेण्याची संधी मिळत नाही. परंतु सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग यासाठी वीस गुण राखून ठेवल्याने, गुणांसाठी विद्यार्थी-शिक्षक कार्यक्रमात सहभागी होतात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८-०० आहे.

महिन्यातून एकदा सांस्कृतिक कार्यक्रम घेतल्यास कमी उपक्रम राबविले जातात. विद्यार्थी-शिक्षकांना कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी कमी प्रमाणात मिळते. त्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यामागील उद्देश सफल होत नाही. अशा प्रतिसारकांचे प्रमाण ५२-०० आहे. हे प्रमाणात विचारात घेण्यासारखे आहे.

म्हणून महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम दोन आठवड्यातून एकदा किंवा महिन्यातून एकदा घेण्याऐवजी आठवड्यातून एकदा घेण्याची व्यवस्था करावी.

प्राचार्य व विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरून असे दिसून येते की, विद्यार्थी शिक्षक जेव्हा शिक्षकी व्यवसाय करतील, तेव्हा शाळांमधून सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करावे लागेल. म्हणून महाविद्यालयात आठवड्यातून एकदा सांस्कृतिक कार्यक्रम घेतल्यास त्यामध्ये विविधता येते. विद्यार्थी-शिक्षकांनाही कार्यक्रमांचे आयोजन, संघटन करण्याची संधी मिळते, तसेच आवडीनुसार सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होता येते.

## ५.८० सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विद्यार्थी-शिक्षक प्रतिसाद :

सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक वर्षाच्या आरंभी विद्यार्थी-शिक्षकांमधील प्रज्ञाशोध घेण्यासाठी मुलाखतीचा अवलंब केला जातो. विद्यार्थी-शिक्षक त्यांच्या आवडी, छंद व प्रासंगीक निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सहभागी होवून प्रतिसाद देतात. काही विद्यार्थी-शिक्षक संकोचामुळे, आत्मविश्वासाच्या अभावामुळेही

सांस्कृतिक कार्यक्रमात प्रत्यक्षरित्या सहभागी होत नाही. त्यांनाही प्रबलन व प्रोत्साहन देवून त्यांचाही प्रतिसाद मिळवता येतो.

महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद मिळतो की, नाही याविषयी गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक ७०

सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थी-शिक्षक प्रतिसाद

| अ.नं. | सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विद्यार्थी शिक्षकांचा प्रतिसाद मिळतो काय? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १२५ | १००.०० |
| २ | नाही | - | - |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद मिळतो, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसारकांचे प्रमाण १००-०० आहे.

बी. एड्. अभ्यासक्रमात सांस्कृतिक कार्यक्रमाचा समावेश प्रात्यक्षिक कार्यात केला आहे व उपक्रमांतील सहभागावरून विद्यार्थी-शिक्षकांचे मूल्यमापन केले जाते. विद्यार्थी-शिक्षकांचा सातत्याने उपक्रमात सहभाग, वैयक्तिक, प्रासंगिक व गटवार उपक्रम, स्पर्धा व स्नेहसंमेलनात सहभाग यावरून गुणदान केले जाते व शैक्षणिक

वर्षात प्रासंगिक, गटवार उपक्रम, स्पर्धा आयोजित केल्याने वर्षभरात सर्व विद्यार्थी-शिक्षकांना त्यांच्या आवडीनुसार उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळते म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद मिळतो.

प्राचार्य व सांस्कृतिक कार्यक्रम विभागप्रमुख यांच्या मुलाखतीवरून असे दिसून आले की, विद्यार्थी शिक्षक सांस्कृतिक कार्यक्रमात स्वेच्छेने सहभागी होवून कार्यक्रमासाठी प्रतिसाद देतात.

## ५.७१ कुलपद्धतीनुसार सांस्कृतिक कार्यक्रम

"सांस्कृतिक कार्यक्रम कुलपद्धतीने घेण्यात यावेत, प्रत्येकी वीस विद्यार्थी शिक्षकांचे चार गट करावेत. चार गटप्रमुख, उपगटप्रमुख येथून कार्यवाही करावी. प्रत्येक गटास स्वतंत्र मार्गदर्शक प्राध्यापक असून चारही गटाचे संयोजन करणारे कार्याध्यक्ष म्हणून एका प्राध्यापकाची नेमणूक करावी." -१२

प्रत्येकी चार कुल तयार करून कुलपद्धतीने कार्यक्रम घेतले जातात.

महाविद्यालयामध्ये कुलपद्धतीनुसार सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात की नाही याविषयी गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

---

१२ कित्ता पान नं. - ७२६

## कोष्टक क्रमांक ७१

## कुलपद्धतीनुसार सांस्कृतिक कार्यक्रम

| अ.नं. | महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम कुलपद्धतीनुसार घेतले जातात काय? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ११४ | ८८.८ |
| २ | नाही | १४ | ११.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम कुलपद्धतीनुसार घेतले जातात, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसारकांचे प्रमाण ८८.८ आहे, तर महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम कुलपद्धतीनुसार घेतले जात नाहीत, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसारकांचे प्रमाण ११.२ आहे.

महाविद्यालयात कुलपद्धतीनुसार सांस्कृतिक कार्यक्रम घेतल्यास प्रत्येक गटाला कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळते. प्रत्येक गटातील प्रत्येक विद्यार्थी-शिक्षकाला सांस्कृतिक कार्यक्रमात वैयक्तिक गटात सहभागी होता येते, तसेच त्या कुलास मार्गदर्शक प्राध्यापकांचे मार्गदर्शन होतात. त्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमाची कार्यवाही चांगली होते. सांस्कृतिक कार्यक्रम कुलपद्धतीनुसार घेतले नाही, तर सर्वच विद्यार्थी-शिक्षक स्वेच्छेने सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होत नाहीत. त्यामुळे काही विद्यार्थी व शिक्षक स्वेच्छेने सहभागी होतात, काही विद्यार्थी वर्षभर एकाही सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होत नाहीत. कुलपद्धतीने सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरणाबाबत स्पर्धा निर्माण होते. त्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमाचा दर्जा वाढतो. त्यामुळे महाविद्यालयातील सर्वच विद्यार्थ्यांना सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्याची संधी प्राप्त होते.

प्राचार्य, सांस्कृतिक विभागप्रमुख यांच्या मुलाखतीवरून असे दिसून आले की, कुलपद्धतीने कार्यक्रम केल्यास प्रत्येक महिन्यात एका कुलास कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळते. स्पर्धेमुळे चांगले सांस्कृतिक कार्यक्रमाची कार्यवाही होते. त्यामुळे कुलातील सर्व विद्यार्थी-शिक्षक वैयक्तिक व सांघिक कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होतात.

## ५.८२ कुलातील विद्यार्थी संख्या :

कुलपद्धतीने सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना विद्यार्थी शिक्षकांचे गट तयार करावे लागतात. एकूण ८० विद्यार्थी-शिक्षकांचे सोयीसाठी प्रत्येकी वीस विद्यार्थी शिक्षकांचे चार कुल तयार करावे लागतात. काहीवेळेस महाविद्यालयाच्या नियोजन व सोयीनुसार कुलास वीसपेक्षा कमी-अधिक विद्यार्थी संख्या असते.

महाविद्यालयात प्रत्येक कुलात किती विद्यार्थी असतात, याबाबत गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक ७२

कुलातील विद्यार्थी संख्या

| अ.नं. | महाविद्यालयात प्रत्येक कुलात किती विद्यार्थी असतात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १० | ३२ | २५.५ |
| २ | २० | ९० | ७२.० |
| ३ | ३० | ३ | २.४ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयात प्रत्येक कुलात १० विद्यार्थी-शिक्षक असतात. असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या २५.६ आहे. प्रत्येक कुलात २० विद्यार्थी-शिक्षक असतात. असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७२-० आहे, तर प्रत्येक कुलात ३० विद्यार्थी-शिक्षक असतात. असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २.४ आहे.

महाविद्यालयामध्ये दहा विद्यार्थी-शिक्षकांमागे एक प्राध्यापक हे प्रमाण लक्षात घेतल्यास प्रत्येक दहा विद्यार्थी-शिक्षकांचे एकूण आठ कुल होतात, परंतु प्रत्येक कुलास दहा विद्यार्थी-शिक्षक आहेत, असा प्रतिसाद देणाऱ्यांचें प्रमाण २५.६ आहे. हे प्रमाण फारच कमी आहे.

प्रत्येक कुलात वीस विद्यार्थी-शिक्षक अशी विभागणी केल्यास कुल चार तयार होतात. एका कुलास वीस विद्यार्थी-शिक्षक असल्याने प्रत्येक कुलाला कार्यक्रम सादरीकरणास अडचणी येतात. प्रत्येक कुलाच्या कार्यक्रमा सादरीकरणाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षक संख्या अधिक असल्याने कार्यक्रमांची संख्या वाढते व नियोजित वेळेत कार्यक्रम पूर्ण होत नाही. अशा प्रतिसादाचे प्रमाण ७२.० आहे.

प्रत्येक कुलात तीस विद्यार्थी-शिक्षक अशी विभागणी केल्यास असमान गट तयार होतात. कार्यक्रम सादरीकरण करतानाही अडचणी येतात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण २.८ आहे. हे प्रमाण अत्यल्प आहे.

म्हणून दहा विद्यार्थी-शिक्षकांचे कुल करणे अधिक योग्य आहे.

प्राचार्य व विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरून असे दिसून आले की, प्रत्येकी दहा विद्यार्थी-शिक्षकांचे कुल तयार केल्यास प्रत्येक कुलातील विद्यार्थी-शिक्षकांना कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळते. सांस्कृतिक कार्यक्रम नियोजित वेळेत पूर्ण होतात. म्हणून दहा विद्यार्थी-शिक्षकांचे आठ कुल करावेत.

## ५.७२ सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत उपक्रम

सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत वर्षभर सातत्याने प्रासंगिक गटवार उपक्रम घेतले जातात, तसेच दर महिन्यात शनिवारी स्पर्धा घेण्यात याव्यात व सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत कोणते उपक्रम घ्यावेत, याबाबत मार्गदर्शक उपक्रमांची यादी बी.एड्. अभ्यासक्रम पुस्तिकेत आहे. त्यानुसार कुलपद्धतीने सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत कोण-कोणते उपक्रम घेतले जातात, याबाबत गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक ७३

सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत उपक्रम

| अ.नं. | महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत कोणकोणते उपक्रम घेतले जातात? | एकूण प्रतिसादक संख्या | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | सुविचार लेखन | १२५ | ९६ | ७६.०० |
| २ | बातमीपत्र | १२५ | ६४ | ५१.२ |
| ३ | भित्तिपत्रिका | १२५ | ८९ | ७१.२ |
| ४ | विविध उत्सव, सण साजरे करणे | १२५ | ११४ | ९१.२ |
| ५ | जयंती-पुण्यतिथी साजरी करणे | १२५ | १२० | ९६.०० |
| ६ | परिसंवाद, चर्चा | १२५ | १२० | ९६.०० |
| ७ | व्याख्याने | १२५ | १२५ | १००.०० |
| ८ | विविध स्पर्धा | १२५ | ८४ | ६७.२ |
| ९ | एकांकिका | १२५ | ७६ | ६०.८ |
| १० | सांघिक खेळ | १२५ | ७७ | ६१.६ |
| ११ | विविध गुणदर्शन | १२५ | १९ | १५.२ |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत सुविचार लेखन केले जाते, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रमाण ७६.०० आहे. बातमीपत्र तयार केले जाते. असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५१.२ आहे. भित्तीपत्रिका तयार करणे. असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७१.२

आहे. महाविद्यालयात विविध उत्सव, सण साजरे केले जातात. असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ९१.२ आहे. थोर नेत्यांची जयंती-पुण्यतिथी साजरी केली जाते. असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ९६.०० आहे. महाविद्यालयात परिसंवाद, चर्चा आयोजित केले जातात. असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण९६.०० आहे.व्याख्याने आयोजित केली जातात, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १००.०० आहे. महाविद्यालयात विविध स्पर्धा घेतल्या जातात, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ६७.२ आहे. नाटक, एकांकिका सादर केले जातात, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ६०.८ आहे. सांघिक खेळ घेतले जातात, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ६१.६ आहे. विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम घेतला जातो, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण १५.२ आहे.

सांस्कृतिक कार्यक्रमानतर्गत विद्यार्थी-शिक्षकांना उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जातात. त्याबरोबरच विद्यार्थ्यांना तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळावे, चांगले विचार ऐकायला मिळावेत म्हणून व्याख्याने आयोजित केली जातात. लेखनकौशल्य विकसित होण्यासाठी बातमीपत्र, भित्तीपत्रिका तयार करून घेतली जाते. संस्कृतिचा परिचय व संवर्धनासाठी उत्सव, सण साजरे केले जातात. सांघिकवृत्ती विकसित व्हावी, त्याचे महत्त्व पटण्यासाठी सांघिक खेळ व स्पर्धा घेतल्या जातात.

प्राचार्य व सांस्कृतिक कार्यक्रम विभागप्रमुख यांच्या मुलाखतीवरून असे दिसून येते की, महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत जास्तीत-जास्त विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग घेता येईल, असे विविध उपक्रम घेतले जातात. प्रासंगिक कार्यक्रमात विविध व्याख्याने आयोजित केली जातात.

## ४.७४ वार्षिक स्नेसहंमेलन आयोजन

सांस्कृतिक कार्यक्रमात प्रासंगिक उपक्रम, गटवार उपक्रम, वैयक्तिक उपक्रम घेतले

जातात. त्याचप्रमाणे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करणे अपेक्षित आहे. शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजित केले जाते. त्याच धर्तीवर महाविद्यालयात वार्षिक स्नेसहंमेलन साजरा करून विद्यार्थी-शिक्षकांना कार्यक्रम नियोजनाचा अनुभव देण्यासाठी व बी.एड्. शैक्षणिक वर्षात विविध उपक्रम, प्रात्यक्षिकांत यश मिळवलेल्या विद्यार्थी-शिक्षकांना अधिक प्रेरणा मिळण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलनांतर्गत विविध गुणदर्शन व पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रम घेता येतो.

महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन होते की नाही, याबाबत गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ७४

वार्षिक स्नेहसंमेलन आयोजन

| अ.नं. | महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन होते का? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८६ | ६८.८ |
| २ | नाही | ३९ | ३१.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन होते, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ६८.८ आहे, तर महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन होत नाही, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३१.२ आहे.

महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केल्यास स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे नियोजन, अध्यक्ष, निवड, कार्यक्रमाची जबाबदारी, कार्यवाही व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महत्त्वाच्या बाबी याविषयीची विद्यार्थी-शिक्षकांना माहिती मिळते व वार्षिक स्नेहसंमेलनांतर्गत विविध गुणदर्शन कार्यक्रमात सहभाग घेण्याची संधी मिळते, असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ६८.८ आहे. हे प्रमाण चांगले आहे. त्यामुळे स्नेहसंमेलन घेण्याचे अनेक उद्देश सफल होतात.

प्राचार्य व सांस्कृतिक विभागप्रमुख यांच्या मुलाखतीवरून असे दिसून येते की, महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन घेतले जाते. यामुळे विद्यार्थी-शिक्षकांना वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्याची संधी मिळते. याचा फायदा शिक्षकी पेशा स्वीकारल्यानंतर होतो.

## ५.७५ सांस्कृतिक कार्यक्रमाच्या कार्यवाहीतील अडचणी

बी.एड्. शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रमांतर्गत विषय, प्रात्यक्षिक कार्य, सराव पाठ घेणे, अभ्यासेतर विषयांचे उपक्रम, कृतिसत्र इ. बाबींमुळे अभ्यासेतर विषयांच्या प्रात्यक्षिक व उपक्रमांना तात्विक विषय सराव पाठ, तात्विक विषयाशी निगडीत प्रात्यक्षिकांइतके महत्व दिले जात नाही. त्यामुळे विद्यार्थी-शिक्षक सांस्कृतिक कार्यक्रमास प्रतिसाद देतात. तरीही सांस्कृतिक कार्यक्रमाच्या कार्यवाहीत अडचणी येतात.

महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमाची कार्यवाही करताना कोण-कोणत्या अडचणी येतात, याबाबत गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्रमांक ७५

## सांस्कृतिक कार्यक्रम कार्यवाहीत येणाऱ्या अडचणी

| अ.नं. | सांस्कृतिक कार्यक्रमाच्या कार्यवाहीत कोणत्या अडचणी येतात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पाठ, लेखन कार्य व सातत्याने असलेल्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थी शिक्षक सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्यास उत्सूक नसतात | ५० | ४०.०० |
| २ | सांस्कृतिक कार्यक्रमाच्या साचेबंद उपक्रमांमुळे सर्वच विद्यार्थी शिक्षकांच्या कलागुणांना वाव मिळत नाही | ४० | ३२.०० |
| ३ | काही विद्यार्थी शिक्षक संकोचामुळे सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेत नाहीत | ५८ | ४६.४ |
| ४ | सांस्कृतिक कार्यक्रमास आवश्यक वाद्ये व इतर साहित्य उपलब्ध नसल्यामुळे वातावरण निर्मिती होत नाही. | ६२ | ४९.६० |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमात पाठ, लेखन कार्य व सातत्याने असलेल्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थी-शिक्षक

सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्यास उत्सुक नसतात, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४०.०० आहे. सांस्कृतिक कार्यक्रमातील साचेबंद उपक्रमांमुळे सर्वच विद्यार्थी-शिक्षकांच्या कलागुणांना वाव मिळत नाही, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ३२.०० आहे. काही विद्यार्थी-शिक्षक संकोचामुळे सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेत नाहीत, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४६.४ आहे, तर सांस्कृतिक कार्यक्रमास आवश्यक वाद्ये व इतर साहित्य उपलब्ध नसल्यामुळे वातावरण निर्मिती होत नाही, असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ४९.६० आहे.

विद्यार्थी-शिक्षक सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होतात, परंतु पाठ, कृतिसत्रांचे अहवाल लेखन, मानसशास्त्रीय प्रयोग वही लेखन, प्रपाठ इ. मुळे त्या दरम्यान होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होण्यास उत्सुक नसतात. काही विद्यार्थी-शिक्षक संकोचामुळे सांस्कृतिक कार्यक्रमात सातत्याने सहभागी होत नाहीत, परंतु कार्यक्रमातील सहभागास वीस गुण असल्याने यांत्रिकपणे कार्यक्रमात सहभागी होतात. काहीवेळा सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकांची संख्या प्रमाणापेक्षा अधिक असल्यास सांस्कृतिक कार्यक्रमाच्या कार्यवाहीत अडचणी येतात.

प्राचार्य व सांस्कृतिक कार्यक्रम विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरून असे दिसून येते की, सांस्कृतिक कार्यक्रमात सुरुवातीच्या काळात अधिक नसतो, परंतु नंतरच्या (दुसऱ्या) सत्रामध्ये विद्यार्थी-शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी होतात. त्यावेळी कार्यक्रम मर्यादित वेळेत पूर्ण करताना अडचणी येतात. विद्यार्थ्यांचा सहभाग संकोचनामुळे कमी असते. कार्यक्रमाचे निरीक्षण व अनुभवामुळे पुढील सत्रात कार्यक्रम भाग घेणाऱ्यांचे प्रमाण वाढत जाते.

## ५.७६ प्रपाठ प्रश्न : शैक्षणिक निबंध (प्रपाठ लेखन)

बी.एड्. भाग दोनच्या प्रात्यक्षिकांत तात्त्विक विषयावर आधारित शैक्षणिक निबंध

(प्रपाठ) लेखनाचा समावेश आहे. शैक्षणिक वर्षात १५ ऑगस्टपासून पुढे प्रत्येक महिन्यास दोन किंवा तीन याप्रमाणे जानेवारी अखेरपर्यंत प्रपाठ घ्यावेत, असे बी.एड्. अभ्यासक्रम पुस्तिकेत सूचित केले आहे.

प्रत्येक पेपरसाठी दोन याप्रमाणे एकूण दहा प्रपाठ घेतले जातात. प्रत्येक तात्त्विक पेपरचे प्रपाठ घेण्याअगोदर प्रपाठचे तीन प्रश्न विद्यार्थी शिक्षकांना दिले जातात.

महाविद्यालयात प्रपाठाचे प्रश्न विद्यार्थी शिक्षकांना किती दिवस अगोदर दिले जातात, याविषयी माहिती गोळा केली, ती खालीलप्रमाणे आहे.

<u>कोष्टक क्र. ७६</u>

<u>प्रपाठ प्रश्न</u>

| अ.नं. | महाविद्यालयात प्रपाठाचे प्रश्न किती दिवस अगोदर दिले जातात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एक आठवडा अगोदर | ६० | ४८.०० |
| २ | दोन आठवडे | ६५ | ५२.०० |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयात प्रपाठाचे प्रश्न विद्यार्थी शिक्षकांना एक आवठडा अगोदर दिले जातात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४८.०० आहे. महाविद्यालयात प्रपाठाचे प्रश्न दोन आठवडे अगोदर दिले जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५२.०० आहे.

एक आठवडाअगोदर जर प्रपाठाचे तीन प्रश्न दिल्यास त्या प्रश्नांची तयारी व लेखन यासंदर्भात पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामळे त्या प्रश्नांची उत्तरे सविस्तर न लिहिता थोडक्यात लिहिण्याचा प्रयत्न करतात, तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांचे तीन प्रश्न याप्रमाणे ऐंशी विद्यार्थ्यांचा विचार करता, संबंधित प्राध्यापकास तपासण्यास पुरेसा वेळ मिळत नाही व मार्गदर्शनही करता येत नाही. म्हणून एक आठवडा अगोदर प्रपाठाचे प्रश्न देणे शैक्षणिकदृष्ट्या अयोग्य आहे. म्हणून दोन आठवडे अगोदर प्रपाठाचे प्रश्न देण्यात यावेत, त्यामुळे वरील अडचणी निर्माण होणार नाहीत.

दोन आठवडे अगोदर प्रपाठाचे प्रश्न दिल्यामुळे वरील समस्या निर्माण होणार नाहीत. विद्यार्थी व प्राध्यापकांना लेखन तपासणी व मर्यादित या संदर्भात पुरेसा वेळ मिळेल. त्यामुळे प्रपाठ लेखनाची उद्दिष्ट्य सफल होण्यास मदत होते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५२.०० आहे. हे प्रमाण सुमारे निम्मे आहे. याचबाच अर्थ निम्म्या महाविद्यालयांमध्ये आठवड्यापेक्षा कमी वेळ दिला जातो. म्हणून अशा महाविद्यालयांनी प्रपाठाचे प्रश्न कमीत-कमी दोन आठवडे अगोदर देण्याची व्यवस्था करावी.

प्राचार्य व विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरून असे दिसून आले की, एक आठवडा अगोदर प्रश्न दिल्यास वरील बाबींची पूर्तता करण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे प्रपाठ ठेवण्याचे उद्देश सफल होत नाहीत. म्हणून प्रपाठाचे प्रश्न दोन आठवडे अगोदर देण्याची व्यवस्था करावी.

## ५.७७ प्रपाठ प्रश्नोत्तरे तपासणी

महाविद्यालयात प्रत्येक तात्त्विक विषयाच्या प्रपाठ लेखनापूर्वी झालेल्या घटकांवर आधारित तीन प्रश्न दिले जातात. प्रपाठासाठी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थी-शिक्षकांनी लिहून तपासून घेतात. प्रश्नांच्या उत्तरांमध्ये योग्य सुधारणा संबंधित प्राध्यापक सूचवितात. त्यानंतर प्रपाठ लेखनाचा दिवस निश्चित करून तीनपैकी कोणताही एक प्रश्न परीक्षेच्या वातावरणात लिहून घेतला जातो.

महाविद्यालयात विद्यार्थी-शिक्षक प्रपाठाच्या प्रश्नांची उत्तरे प्रपाठ लेखनापूर्वी घेतात काय? याबाबत माहिती गोळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

### कोष्टक क्र. ७७

### प्रपाठ प्रश्नोत्तरे तपासणी

| अ.नं. | विद्यार्थी शिक्षक प्रपाठाच्या प्रश्नांची उत्तरे प्रपाठ लेखनापूर्वी तपासून घेतात का? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ११५ | ९२ |
| २ | नाही | १० | ८ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, विद्यार्थी-शिक्षक प्रपाठाच्या प्रश्नांची उत्तरे प्रपाठ लेखनापूर्वी तपासून घेतात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ९२.०० आहे. विद्यार्थी-शिक्षक प्रपाठाच्या प्रश्नांची उत्तरे प्रपाठ लेखनापूर्वी तपासून घेत नाहीत. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८.०० आहे.

प्रपाठाच्या प्रश्नांची उत्तरे प्रपाठ लेखनापूर्वी तपासून घेतात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ९२.०० आहे. हे प्रमाण फारच चांगले आहे. त्यामुळे प्रपाठासाठी प्रश्न देण्याचे व लेखनाचे उद्देश सफल होतात.

प्रपाठाच्या प्रश्नांची उत्तरे प्रपाठ लेखनापूर्वी तपासून घेत नाही. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८-०० आहे. हे प्रमाण जरी अत्यल्प असले, तरी प्रपाठाचे प्रश्न देण्याचे व लेखनाचे उद्देश सफल होण्यासाठी अशा महाविद्यालयांना प्रपाठ लेखनापूर्वी प्रश्न

तपासणी संदर्भात येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात.

मुलाखतीवरून असे दिसून आले की, एक आठवडा अगोदर प्रश्न दिल्यामुळे विद्यार्थ्यांना लेखन करण्यास व प्रपाठातून घेण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे काही विद्यार्थी प्रपाठ लेखनापूर्वी प्रश्न तपासून घेत नाहीत. दोन आठवडे अगोदर प्रश्न दिल्यामुळे ह्या अडचणी निर्माण होत नाहीत.

## ५.७८ प्रपाठ प्रश्नांची मूल्यमापन व परवानगी

महाविद्यालयात प्रत्येक तात्त्विक विषयाच्या प्रपाठापूर्वी तीन प्रश्नांची आहे. विद्यार्थी-शिक्षक तपासून घेतात. प्रत्यक्ष प्रपाठ लेखनापूर्वी संबंधित प्राध्यापक प्रपाठाच्या प्रश्नांच्या लेखनाबाबत मार्गदर्शन करतात. प्रपाठापूर्वी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याशिवाय विद्यार्थी-शिक्षकांना प्रपाठास बसण्याची परवानगी देण्याबाबत महाविद्यालय निर्णय घेतात.

महाविद्यालयात प्रपाठापूर्वी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याशिवाय विद्यार्थी-शिक्षकांना प्रपाठास बसण्यास परवानगी दिली जाते काय? याबाबत माहिती गोळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्रमांक ७८

### प्रपाठ प्रश्नांचा मूल्यमापन व परवानगी

| अ.नं. | प्रपाठापूर्वी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याशिवाय विद्यार्थी शिक्षकांना प्रपाठास बसण्याची परवानगी दिली जाते काय? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २८.०० | २२.४ |
| २ | नाही | ९७.०० | ७७.६ |
| | एकूण | १२५.०० | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, प्रपाठापूर्वी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याशिवाय विद्यार्थी-शिक्षकांना प्रपाठास बसण्यास परवानगी दिली जाते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण २२.४ आहे. प्रपाठापूर्वी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याशिवाय विद्यार्थी-शिक्षकांना प्रपाठास बसण्याची परवानगी दिली जात नाही. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७७.६ आहे.

प्रपाठापूर्वी प्रश्न तपासून घेतल्याशिवाय विद्यार्थी-शिक्षकांना प्रपाठास बसण्याची परवानगी दिली जात नाही. असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ७७.६ आहे. हे प्रमाण शैक्षणिकदृष्ट्या अतिशय चांगले आहे. त्यामुळे विद्यार्थी प्रपाठापूर्वी तीनही प्रश्नांचे सविस्तर लेखन करून वेळीस तपासून घेतात व त्याचा फायदा प्रपाठ लेखनास चांगला होतो.

प्रपाठ लेखनापूर्वी प्रपाठाचे प्रश्न तपासून न घेताही प्रपाठ लेखनास परवानगी दिली जाते. असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण २२.४ आहे. हे प्रमाणात विचारात

घेण्यासारखे आहे. कारण प्रश्नांची उत्तरे न लिहिताही प्रपाठास बसण्याची परवानगी दिल्याने इतरही विद्यार्थी त्यांचे अनुकरण करतात व त्याचा परिणाम पुढील प्रपाठाच्या प्रश्न लेखनावर अनिष्ट होत असतो. म्हणून प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याशिवाय प्रपाठ लेखनास परवानगी देवू नये.

प्राचार्यांच्या मुलाखतीवरून असे दिसून आले की, प्रपाठापूर्वी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याशिवाय काही विद्यार्थी-शिक्षकांना प्रपाठास बसण्याची परवानगी दिल्यास, तर विद्यार्थी-शिक्षकही सवलत मागतात. म्हणून प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याशिवाय विद्यार्थी-शिक्षकांना प्रपाठास बसण्याची परवानगी दिली जात नाही.

## ५.८९ प्रपाठच्या प्रश्नांची उत्तरे तपासताना येणाऱ्या अडचणी

विद्यार्थी-शिक्षक प्रपाठ लेखनापूर्वी प्रपाठाचे प्रश्न संबंधित प्राध्यापकांकडून तपासून घेतात. विद्यार्थी-शिक्षकांच्या प्रपाठाच्या प्रश्न तपासणीबाबत प्राध्यापक नोंद ठेवतात. विद्यार्थी-शिक्षकांच्या प्रपाठ लेखनाअगोदर प्रश्नोत्तर तपासताना प्राध्यापकांना अडचणी येतात.

महाविद्यालयात प्रपाठापूर्वी प्राध्यापकास प्रश्नांची उत्तरे तपासताना कोण-कोणत्या अडचणी येतात. याबाबत माहिती गोळा केली, ती खालीलप्रमाणे आहे.

### कोष्टक क्रमांक ७९

### प्रपाठाची प्रश्नोत्तरे तपासताना प्राध्यापकांना येणाऱ्या अडचणी

| अ.नं. | प्रपाठापूर्वी प्राध्यापकास प्रश्नांची उत्तरे तपासण्यास येणाऱ्या अडचणी | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्राध्यापकांना प्रपाठाचे प्रश्न तपासण्यास व मार्गदर्शनास स्वंतत्र वेळ द्यावा लागतो. | ७२ | ५७.६० |
| २ | सर्वच विद्यार्थी शिक्षक प्रपाठाचे प्रश्न तपासून घेत नाहीत | १० | ८.०० |
| ३ | विद्यार्थी शिक्षकांनी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्यास स्वतंत्र नोंद ठेवावी लागते. | ४३ | ३४.४ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, प्राध्यापकांना प्रपाठाचे प्रश्न तपासण्यास व मार्गदर्शनास स्वतंत्र वेळ द्यावा लागतो. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५७.६ आहे. सर्वच विद्यार्थी-शिक्षक प्रपाठाचे प्रश्न तपासून घेत नाहीत. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८.०० आहे. विद्यार्थी-शिक्षकांनी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याची स्वतंत्र नोंद ठेवावी लागते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३४.४ आहे.

विद्यार्थी-शिक्षक प्रपाठ लेखनापूर्वी प्रपाठासाठी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तपासून घेतात. विद्यार्थी-शिक्षकांना प्रश्नोत्तर लेखनातील त्रुटीबाबत मार्गदर्शन करावे लागत म्हणून प्राध्यापकांना प्रपाठाचे प्रश्न तपासण्यास व मार्गदर्शनास स्वतंत्र वेळ द्यावा लागतो, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५७.६० आहे.

प्रपाठ लेखनापूर्वी प्रपाठाचे प्रश्न जर एक आठवडा अगोदर लावले, तर सर्वच विद्यार्थी-शिक्षक प्रपाठाच्या प्रश्नांची उत्तरे तपासून घेत नाहीत. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८.०० आहे.

प्रपाठापूर्वी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याशिवाय विद्यार्थी-शिक्षकांना प्रपाठास बसू दिले नाही. यासाठी प्राध्यापकांना विद्यार्थी-शिक्षकांनी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याची स्वतंत्र नोंद ठेवावी लागते व या नोंदी प्रपाठ पर्यवेक्षक व प्राचार्यांना द्यावी लागते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३४.४ आहे.

## ५.८० प्रपाठ तपासणीनंतर प्रत्याभरण

महाविद्यालयात प्रत्यक्ष प्रपाठ लेखनापूर्वी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थी-शिक्षक लिहितात. प्राध्यापक प्रपाठाच्या प्रश्नांची उत्तरे तपासतात. प्रपाठ तपासणीनंतर संबंधित विद्यार्थी-शिक्षकाला प्रत्याभरण देतात.

महाविद्यालयात प्रपाठ घेतल्यानंतर विद्यार्थी-शिक्षकांना प्रत्याभरण कशाप्रकारे दिले जाते, याबाबत माहिती गोळा केली, ती खालीलप्रमाणे आहे.

### कोष्टक क्र. ८०

### प्रपाठ तपासणीनंतर प्रत्याभरण

| अ.नं. | प्रपाठ तपासल्यानंतर विद्यार्थी शिक्षकांना प्रत्याभरण कश्याप्रकारे देतात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येकाला वैयक्तिक | २४ | १९.२ |
| २ | वर्गात समान त्रूटींचा उल्लेख करुन | ८७ | ६९.६ |
| ३ | प्रश्नासी आवश्यक मूद्दे सांगून | १४ | ११.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, प्रपाठ तपासल्यानंतर विद्यार्थी-शिक्षकांना वैयक्तिक प्रत्याभरण दिले जाते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण १९.२ आहे. प्रपाठ तपासल्यानंतर वर्गात समान त्रूटींचा उल्लेख करून विद्यार्थी-शिक्षकांना प्रत्याभरण दिले जाते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६९.६ आहे. प्रश्नासाठी आवश्यक मुद्दे सांगून प्रत्याभरण दिले जाते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ११.२ आहे.

महाविद्यालयात प्रपाठ तपासणीनंतर प्रत्येक विद्यार्थी-शिक्षकाला वैयक्तिक मार्गदर्शन देणे वेळेअभावी शक्य होत नाही. अशा प्रतिसादकांचे प्रमाण १९.२ आहे.

प्रपाठ तपासणीनंतर अपेक्षित उत्तरे, उत्तरातील मूद्यांचे सादरीकरण, लेखनशैली याबाबत वर्गात समान त्रुटींचा उल्लेख करून प्रत्याभरण केले जाते. त्यामुळे प्रत्याभरणाचा फायदा सर्व विद्यार्थी-शिक्षकांना होतो. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६९.६ आहे. हे प्रमाण शैक्षणिकदृष्ट्या योग्य व विद्यार्थी-शिक्षकांच्या दृष्टीने फायदेशीर आहे.

प्राध्यापक संबंधित घटक शिकवत असताना व प्रपाठाचे प्रश्न दिल्यानंतर आवश्यक मुद्दे सांगतात. त्यामुळे प्रपाठ प्रश्नासाठी आवश्यक मुद्द्यांची चर्चा अगोदर झालेली असते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ११.२ आहे.

म्हणून प्रपाठ तपासणीनंतर प्रत्येकाला वैयक्तिक किंवा प्रश्नासाठी आवश्यक मुद्दे सांगण्याऐवजी वर्गात समान त्रुटींचा उल्लेख करून प्रत्याभरण द्यावे.

## ५.८१ शारीरिक शिक्षणाचे उपक्रम

शारीरिक शिक्षण हा सामान्य शिक्षणाचा भाग आहे. म्हणून बी.एड्. भाग दोनच्या अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षणाच्या प्रात्यक्षिक कार्याचा समावेश करण्यात आला आहे. शारीरिक शिक्षणातून व्यक्तीच्या भावी जीवनाची तयारी केली जाते. व्यक्तीची शारीरिक वाढ, मानसिक तत्परता, नैतिक मूल्यांची जोपासना, सामाजिक जबाबदारीची ओळख शारीरिक शिक्षणाद्वारे होते. म्हणून विद्यार्थी-शिक्षकांना शाळेत नोकरी करताना

विविध खेळांचे संघटन व उपक्रमांची अंमलबजावणी कशी करावी, याबाबत शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिकांतून मार्गदर्शन दिले जाते.

महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाचे प्रात्यक्षिक कार्य वर्षभर चालते काय? याबाबत माहिती गोळा केली, ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्रमांक ८१

## शारीरिक शिक्षणाचे उपक्रम

| अ.नं. | महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाचे प्रात्यक्षिक कार्य वर्षभर सातत्याने चालते काय? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३१ | २४.८ |
| २ | नाही | ९४ | ७५.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाचे उपक्रम वर्षभर सातत्याने चालते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण २४.८ आहे. महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाचे उपक्रम वर्षभर सातत्याने चालत नाही. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७५.२ आहे.

शारीरिक शिक्षणाचे उपक्रम वर्षभर सातत्याने घेतले जाते. असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण २४.८ आहे. हे प्रमाण अपेक्षेपेक्षा फारच कमी आहे. त्यामुळे शारीरिक शिक्षणाचे उपक्रम ठेवण्याचे उद्देश फारच कमी महाविद्यालयांमध्ये सफल होतात.

शारीरिक शिक्षणाचे उपक्रम वर्षभर सातत्याने घेतले जात नाहीत. असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ७५.२ आहे. हे प्रमाण फारच जास्त आहे. त्यामुळे सदर उपक्रम ठेवण्याचे उद्देश सफल होत नाहीत. म्हणून अशा महाविद्यालयांनी शारीरिक शिक्षणाचे उपक्रम वर्षभर सातत्याने आयोजित करून वरील उद्देश साध्य करावेत.

शा. शि. विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरून असे दिसून आले की, व्याख्याने, प्रात्यक्षिके याबाबतीच विद्यार्थी अधिक लक्ष केंद्रीत करतात. बी.एड्. अभ्यासक्रमासाठी येणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकांना खेळण्याची आवड नसल्याने अशा उपक्रमांकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाचे उपक्रम वर्षभर सातत्याने राबवण्यास अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही.

### ५.८२ क्रीडांगण

शारीरिक शिक्षक अभ्यासक्रमात व्यायाम, संचलन, कवायत, लेझिम, मैदानी व मर्दानी शर्यती, मोठे व छोटे खेळ, कसरती, संरक्षणात्मक व्यायामप्रकार इत्यादींचा समावेश होते. म्हणून शारीरिक शिक्षणाचे प्रात्यक्षिकासाठी क्रीडांगणाची आवश्यकता असते. क्रीडांगणावर मैदानी व मर्दानी शर्यतींची आखणी व नियोजन करता येते. महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र क्रीडांगणाची सोय केली जाते.

महाविद्यालयात स्वतंत्र क्रीडांगण आहे काय? याबाबत माहिती गोळा केली, ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्रमांक ८२

## स्वतंत्र क्रीडांगण उपलब्धता

| अ.नं. | महाविद्यालयास स्वतत्र क्रिडांगण उपलब्ध आहे काय? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १०९ | ८४.८ |
| २ | नाही | १६ | १५.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयास स्वतंत्र क्रीडांगण आहे. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८४.८ आहे. महाविद्यालयास स्वतंत्र क्रीडांगण नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १५.२ आहे. महाविद्यलायास स्वतंत्र क्रीडांगण असल्यामुळे शारीरिक शिक्षगाचे विविध उपक्रम घेण्यास पुरेशी संधी आहे. परंतु विद्यार्थी-शिक्षकांना आवड नसल्याने अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे क्रीडांगण असूनही त्याचा वापर होत नाही.

### ५.८३ खेळांच्या साहित्यांची उपलब्धता

बी.एड्. अभ्यासक्रमातील भाग-२ मध्ये शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिक कार्यात कबड्डी, खो-खो, बॅडमिंटन, टेनिस, व्हॉलिबॉल या खेळांसाठी आवश्यक क्रीडांगणाची मापे व विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी शारीरिक क्षमता चाचणीसाठी हे कृती यांचा समावेश आहे. यासाठी संबंधित खेळाच्या साहित्याची उपलब्धता महाविद्यालयात असावी.

महाविद्यालयात विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात नमूद खेळांचे साहित्य उपलब्ध आहे काय? याबाबत माहिती गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्रमांक ८३

<u>खेळाच्या साहित्यांची उपलब्धता</u>

| अ.नं. | महाविद्यालयात अभ्यासक्रमात नमूद सर्व खेळांचे साहित्य | प्रतिसादक संख्या उपलब्ध आहे काय? | शेकडा प्रमाण संख्या |
|---|---|---|---|
| १ | होय | ६७ | ५३.६ |
| २ | नाही | ५८ | ४६.४ |
| | एकूण | ~~१००.००~~ १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयात अभ्यासक्रमात नमूद सर्व खेळांचे साहित्य उपलब्ध आहे. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५३.६ आहे. महाविद्यालयात अभ्यासक्रमात नमूद सर्व खेळांचे साहित्य उपलब्ध नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४६.४ आहे.

विद्यापीठाच्या अभ्यासक्रम पुस्तिकेत नमूद केलेल्या खेळांसाठी क्रीडांगण आखणी करून त्यासाठी लागणाऱ्या साहित्याची उपलब्धता असल्यास विद्यार्थी-शिक्षकांना खेळाचे नियम, पद्धती याबाबत अनुभव व मार्गदर्शन मिळते, तसेच विद्यार्थी-शिक्षकांची शारीरिक क्षमता पाहण्यासाठी पाच प्रकारच्या कृतीवर आधारित वैयक्तिक चाचणी घेतली जाते व वीस गुणांपैकी गुणदान केले जाते. म्हणून वरील दोन्ही बाबींसाठी महाविद्यालयात अभ्यासक्रमात नमूद सर्व खेळांचे साहित्य उपलब्ध आहे, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५३.६ आहे. हे प्रमाण चांगले आहे.

अभ्यासक्रमात नमूद सर्व खेळांचे साहित्य खर्चिक असल्याने उपलब्ध होत नाही. म्हणून काही खेळांचे साहित्य महाविद्यालयात असते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४६.४ आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे.

शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिकांतर्गत विद्यार्थ्यांची हजेरी, विविध खेळांचे संघटन व सहभाग यावरून मूल्यमापन केले जाते. विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता चाचणी व अभ्यासक्रमात नमूद खेळांचे क्रीडांगण मापे व नियम अभ्यासण्यासाठी खेळांचे साहित्य उपलब्ध असणे गरजेचे आहे.

५.८४ महाविद्यालयातील उपलब्ध खेळ साहित्य

महाविद्यालयात कोण-कोणत्या खेळांचे साहित्य उपलब्ध आहे, याबाबत माहिती गोळा केली, ती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक ८४

महाविद्यालयात खेळांच्या साहित्याची उपलब्धता

| अ.नं. | महाविद्यालयात कोणकोणत्या खेळांचे साहित्य उपलब्ध आहे? | एकूण प्रतिसादक संख्या | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | क्रिकेट | १२५ | ७६ | ६०.८ |
| २ | व्हॉलीबॉल | १२५ | १०६ | ८४.८ |
| ३ | टेनिस | १२५ | ४७ | ३७.६ |
| ४ | बॅडमिंटन | १२५ | ७८ | ६२.४ |
| ५ | शॉर्ट पूट (गोळा फेक) | १२५ | ५० | ४०.०० |
| ६ | उड्याच्या दोऱ्या | १२५ | १२३ | ९८.४ |
| ७ | फुटबॉल | १२५ | ८० | ६४.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयात क्रिकेटचे साहित्य उपलब्ध आहे, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६०.८ आहे. व्हॉलिबॉलचे साहित्य उपलब्ध, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८४.८ आहे. टेनिसचे साहित्य उपलब्ध आहे. अशा प्रतिसादकांचे

प्रमाण ३७.६ आहे. बॅडमिंटनचे साहित्य आहे, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६२.४ आहे. शॉर्टपूट (गोळाफेक) साहित्य उपलब्ध आहे, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४०.०० आहे. उड्याच्या दोऱ्या उपलब्ध आहे, अशा प्रतिसादकाचे प्रमाण ९८.४ आहे. फुटबॉल उपलब्ध आहे, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६४.०० आहे.

क्रिकेट, व्हॉलिबॉल, टेनिस, बॅडमिंटन इ. विदेशी खेळांसाठी लागणारे साहित्य खर्चिक आहे. परंतु या खेळाद्वारे सांघिक वृत्ती निर्माण होण्यास मदत होते. व्यायाम होतो म्हणून वरील खेळांपैकी काही खेळांचे साहित्य महाविद्यालयात उपलब्ध आहे. क्रिकेट खेळ लोकप्रिय आहे. त्यामुळे महाविद्यालयात क्रिकेटचे साहित्य उपलब्ध असते.

व्हॉलिबॉल खेळासाठी लहान मैदान व व्हॉलिबॉल व जाळी इतके साहित्य लागते. हे साहित्य खर्चिक असले, तरी टिकावू असते. यामुळे महाविद्यालयात व्हॉलिबॉलसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध आहे. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८४.८ आहे. हे प्रमाण चांगले आहे.

टेनिस व बॅडमिंटनसाठी लागणारे साहित्य खर्चिक आहे. या खेळांसाठी बॅडमिंटन शटल (फूल) व टेनिसचे बॉल वारंवार खरेदी करावी लागतात. महाविद्यालयात टेनिस व बॅडमिंटन खेळाचे साहित्य उपलब्ध आहे. अशा प्रतिसादकांचे प्रमाण अनुक्रमे ३७.६ व ६२.४ आहे, हे प्रमाण चांगले आहे.

विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता चाचणी घेण्यासाठी शॉर्ट पुटे (गोळाफेक) साहित्य आवश्यक आहे. या खेळाचे साहित्य टिकावू असले, तरीही महाविद्यालयात शॉर्ट पूटचे साहित्य उपलब्ध असण्याचे प्रमाण ४०.०० आहे. हे प्रमाण कमी आहे.

उड्याच्या दोऱ्या विद्यार्थिनींची शारीरिक क्षमता चाचणी घेण्यासाठी आवश्यक आहेत. हे साहित्य खर्चिक नाही. त्यामुळे महाविद्यालयात उड्याच्या दोऱ्या उपलब्ध असतात. याचे प्रमाण ९८.४ आहे. हे प्रमाण चांगले आहे. ~~गोल कसम्याची~~ फुटबॉल

खेळासाठी फुटबॉल, नेट यांची आवश्यकता असते. या खेळाचे साहित्य खर्चिक असले, तरी टिकावू आहे. यामुळे महाविद्यालयात फुटबॉलचे साहित्याचे उपलब्ध असते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६४.०० आहे. हे प्रमाण चांगले आहे.

प्राचार्य व विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरून असे दिसून आले की, क्रिकेट, व्हॉलिबॉल, टेनिस, बॅडमिंटन इ. खेळांचे साहित्य खर्चिक असते. त्यामुळे सदर खेळांचे साहित्य महाविद्यालयात उपलब्ध असते. परंतु विद्यार्थी-शिक्षकांच्या संख्येच्या प्रमाणात उपलब्धता नसते. गोळाफेक व दोऱ्याच्या उड्या विद्यार्थी-शिक्षकांची चाचणी घेण्यासाठी आवश्यक असल्याने या खेळाचे साहित्य महाविद्यालयातील उपलब्ध असते. परंतु विद्यापीठाच्या नियमानुसार सर्वच खेळांचे साहित्य खर्चिक असल्याने पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसते. म्हणून खेळांचे साहित्य घेण्यासाठी अनुदान द्यावे.

## ५.८५ शारीरिक शिक्षणाची तात्त्विक माहिती

बी.एड्. अभ्यासक्रम भाग-२ मध्ये शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिक विद्यार्थी-शिक्षकांकडून करून घेतली जातात. शारीरिक शिक्षण विभागप्रमुखांनी शारीरिक शिक्षणाची तत्त्वे व संघटन याविषयी पाच व्याख्याने द्यावीत, अशी अपेक्षा अभ्यासक्रम पुस्तिकेत व्यक्त केली आहे. त्यानुसार महाविद्यालयात शारीरिक शिक्षणावर आधारित व्याख्याने दिली जातात.

महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाची तात्त्विक माहिती कोण देतात, यावर आधारित माहिती गोळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्रमांक ८५

### शारीरिक शिक्षणाची तात्विक माहिती

| अ.नं. | महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाची तात्विक माहिती कोण देतात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | महाविद्यालयातील प्राध्यापक | ९८ | ७८.४ |
| २ | शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापक | १७ | १३.६ |
| ३ | बी.पी.एड्. झालेले विद्यार्थी शिक्षक | १० | ८.० |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाची तात्विक माहिती महाविद्यालयातील प्राध्यापक देतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७८.४ महाविद्यालयात शारीरिक महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापक तात्विक माहिती देतात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण १३.६ आहे. बी.पी.एड्. झालेले विद्यार्थी-शिक्षक शारीरिक शिक्षणाची तात्विक माहिती देतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८.०० आहे.

शारीरिक शिक्षणावर आधारित पाच व्याख्याने महाविद्यालयातील प्राध्यापक देतात. महाविद्यालयातील प्राध्यापक प्रत्यक्ष खेळाडू किंवा शारीरिक शिक्षणाचे पदवीधर नसतात. त्यामुळे संदर्भ पुस्तकांच्या आधारे तयारी करून व्याख्याने देतात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७८.४ आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे.

शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापकांनी शारीरिक शिक्षणाची व्याख्याने दिल्यास, विद्यार्थी-शिक्षकांना शास्त्रोक्त माहिती दिसते. तज्ञ प्राध्यापकांच्या

अनुभवाचा फायदा विद्यार्थी शिक्षकांना मिळतो. खेळांचे नियम, मैदानाची आखणी याबद्दल मार्गदर्शन व तात्विक माहिती मिळते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण १३.६ आहे.

बी.एड्. महाविद्यालयात बी.पी.एड्. झालेले विद्यार्थी-शिक्षकही प्रवेश घेतात. बी.पी.एड्. झालेले विद्यार्थी शिक्षक खेळाडू असतात. त्यांना शारीरिक शिक्षणाची शास्त्रोक्त माहिती असते. बी.पी.एड्. झालेल्या विद्यार्थी शिक्षकांच्या अनुभवाचा व माहितीचा फायदा बी.एड्. महाविद्यालयातील इतर विद्यार्थी-शिक्षकांना मिळतो. म्हणून महाविद्यालयात बी.पी.एड्. झालेल्या विद्यार्थी शिक्षकांना शारीरिक शिक्षणाची व्याख्याने देण्याची संधी दिली जाते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८.० आहे.

म्हणून महाविद्यालयातील प्राध्यापकांनी शारीरिक शिक्षणावर व्याख्याने देण्याऐवजी परिसरातील बी.पी.एड्. महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापक किंवा महाविद्यालयातील बी.पी.एड्. झालेले विद्यार्थी शिक्षक व्याख्याने आयोजित करावीत.

प्राचार्य व विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख खेळाडू नसतात. तसेच शारीरिक शिक्षण व खेळांची शास्त्रोक्त माहिती प्राध्यापकांना नसते. म्हणून परिसरातील बी.एड्. कॉलेज मधील तज्ञ प्राध्यापक व महाविद्यालयातील बी.पी.एड्. झालेले विद्यार्थी शिक्षक यांची शारीरिक शिक्षणावर व्याख्याने आयोजित करावीत. त्यामुळे अनुभवी व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन इतर विद्यार्थी शिक्षकांना मिळते.

## ५.८६ शारीरिक शिक्षणाच्या प्रात्यक्षिक कार्यवाहीत येणाऱ्या अडचणी :-

बी.एड्.भाग दोन च्या प्रात्यक्षिक कार्यात शारीरिक शिक्षणांतर्गत पाच खेळांच्या मैदानाची आखणी, समजावून दिली जाते. तसेच विद्यार्थी शिक्षकांकडून शारीरिक क्षमता अजमावण्यासाठी पाच कृती करुन घेतल्या जाता. त्यवरुन वीस गूणांपैकी

मूल्यमापन केले जाते. शारीरिक शिक्षणाच्या प्रात्यक्षिकासाठी लागणारे साहित्य, क्रिडांगण, मार्गदर्शक व्यक्ती यांचा अभाव असल्याने अडचणी येतात.

महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाच्या प्रात्यक्षिक कार्यवाहीत कोणत्या अडचणी येतात याविषयी माहिती गोळा केली. ती खालील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ८६

| अ.नं. | शारीरिक शिक्षणाच्या प्रात्यक्षिक कार्यवाहीत कोणत्या अडचणी येतात? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | खेळात भाग घेण्यास विद्यार्थी शिक्षक तयार नसतात | २९ | २१.४८ |
| २ | महाविद्यालयात खेळांचे पुरेसे साहित्य उपलब्ध नाही. | १७ | १६.३० |
| ३ | खेळाचा सराव नसल्याने विद्यार्थी शिक्षक केवळ परीक्षेससाठी भाग घेतात | ३१ | २४.८० |
| ४ | खेळांचे प्रात्यक्षिक दाखविण्यास तज्ञ व्यक्ती उपलब्ध होत नाहीत. | २६ | २०.८० |
| ५ | खेळांच्या माहितीविषयक संदर्भ साहित्य उपलब्ध नाही | २२ | १७.६२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की खेळात भाग घेण्यास विद्यार्थी शिक्षक

तयार नसतात अशा प्रतिसादकांचे प्रमाण २१.४८ आहे. महाविद्यालयात पूरेसे साहित्य उपलब्ध नाही अशा प्रतिसादकांचे प्रमाण १६.३० आहे. खेळाचा सराव नसल्याने विद्यार्थी शिक्षक केवळ परीक्षसाठी भाग घेतात अशा प्रतिसादकांचे प्रमाण २४.८० आहे. खेळांचे प्रात्यक्षिक दाखविल्यास तज्ञ व्यक्ती उपलब्ध होत नाहीत. अशा प्रतिसादकांचे प्रमाण २०.८ आहे. खेळांचे माहिती विषयक संदर्भ साहित्य उपलब्ध नाही अशा प्रतिसादकांचे प्रमाण १७.६२ आहे. बी.एड्. अभ्यासक्रमात तात्विक विषयाबरोबर इतर प्रात्यक्षिकांची पूर्तता करावी लागते. बी.एड्. अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेले विद्यार्थी खेळाडू नसतात. वर्षभर चालणाऱ्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थी शिक्षक खेळात भाग घेण्यास तयार नसतात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण २१.४८ आहे.

बी.एड्. महाविद्यालयात स्वतंत्र क्रिडांगण व सर्व खेळांचे पुरेसे साहित्य उपलब्ध नसते. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांना त्यांच्या आवडीनुसार खेळाचे साहित्य मिळत नाही. काही खेळांचे साहित्य खर्चिक असते उदा. क्रिकेट, बॅडमिंटन, टेनिस, त्यामुळे विद्यार्थी शिक्षक संख्येच्या प्रमाणात खेळाचे साहित्य उपलब्ध नसते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण १६.३० आहे.

बी.एड्. भाग दोनच्या अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिकात सहभागासाठी वीस पैकी गूण आहेत. विद्यार्थी शिक्षकांचा वर्षभरात चालणाऱ्या इतर उपक्रमांमुळे खेळांचा सराव नसतो. तसेच सर्व विद्यार्थी शिक्षक खेळाडू नसतात. त्यामूळे खेळाचा सराव नसल्याने विद्यार्थी शिक्षक केवळ परीक्षेसाठी भाग घेतात प्रतिसादाकांचे २४.८० आहे.

शारीरिक शिक्षणाची तात्विक माहिती व अभ्यासक्रमात नमूद केलेल्या खेळांच्या क्रिडांगणाचे माप व खेळांचे नियम सांगण्यासाठी तज्ञ व्यक्ती उपलब्ध होत नाहीत तसेच खेळांचे प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळत नाही अशा प्रतिसादकांचे प्रमाण २०.८० आहे.

महाविद्यालयातील ग्रंथालयात खेळांच्या माहिती विषयी संदर्भ साहित्य उपलब्ध नसते. त्यामुळे महाविद्यालयातील प्राध्यापकांना व्याख्यानाची तयारी करताना संदर्भ साहित्याची कमतरता जाणवते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण १७.६२ आहे.

प्राचार्य व विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून आले की, बी.एड्. अभ्यासक्रमात प्रवेश घेणारे सर्व विद्यार्थी. शिक्षक खेळाडू नसतात. वर्षभर चालणाऱ्या तात्विक विषय व प्रात्यक्षिक कार्याच्या अभ्यासामुळे खेळात भाग घेण्यासाठी विद्यार्थी शिक्षक तयार नसतात. महाविद्यालयात स्वतंत्र क्रिडांगण असले तरी विद्यार्थी शिक्षकांच्या आवडीच्या खेळांचे साहित्य उपलब्ध नसते. विद्यार्थी शिक्षक शारीरिक शिक्षणात सहभाग, अहवाल लेखन व शारीरिक क्षमता चाचणी यासाठी २० गूण असल्याने केवळ परीक्षेसाठी व गूण मिळविण्यासाठी विद्यार्थी शिक्षक भाग घेतात.

## ५.८७५. वार्षिक पाठ परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक उपलब्धता

बी.एड्. भाग दोन च्या प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत वार्षिक पाठ परीक्षा (प्रात्यक्षिक परीक्षा) घेतली जाते. प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन दोन टप्प्यात विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या प्रात्यक्षिक कार्याचे मूल्यमापन व दूसऱ्या टप्प्यात वार्षिक पाठ घेतले जातात. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी माध्यमिक शाळेत वार्षिक पाठ आयोजि केले आहेत, त्या शाळेतील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक किंवा अनुभवी शिक्षक यापैकी गुणवत्ता पात्र व्यक्तींचीच परीक्षक म्हणून निवड करावी असे बी.एड्. अभ्यासक्रमात पूस्तिकेत नमूद केले आहे. किमान दहा वर्षांचा अनुभव असणारे प्रशिक्षित पदव्युत्तर अर्हता प्राप्त शिक्षकांची नेमणूक करता येते.

माविद्यालयांना वार्षिक पाठ परीक्षेसाठी गुणवत्ता प्राप्त पुरेसे बहिस्थ परीक्षक उपलब्ध होतात काय या बाबत माहिती गोळा केली. ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ८७

### वार्षिक पाठ परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक उपलब्धता

| अ.नं. | महाविद्यालयाच्या वार्षिक पाठ परीक्षेसाठी पुरेसे बहिस्थ परीक्षक उपलब्ध होतात काय? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८८ | ७०.४ |
| २ | नाही | ३७ | २९.६ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की महाविद्यालयचा वार्षिक पाठ परीक्षेसाठी पुरेसे बहिस्थ परीक्षक उपलब्ध होतात अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७०.४ आहे. महाविद्यालयाच्या वार्षिक पाठ परीक्षेसाठी पुरेसे बहिस्थ परीक्षक उपलब्ध होत नाहीत अशा प्रतिसादकांचे प्रमाण २९.६ आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकाची वार्षिक पाठ परीक्षा घेवून वर्षभर केलेल्या प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन व त्यावर घेवून वर्षभर केलेल्या प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन व त्यावर आधारित मुलाखत वजा तोंडी प्रश्न विचारुन मूल्यमापन शंभर गुणापैकी केले जाते यासाठी गुणवत्ता पात्र व्यक्ती बहिस्थ परीक्षक म्हणून काम करतात. महाविद्यालयाच्या वार्षिक पाठ परीक्षेसाठी पूरेसे बहिस्थ परीक्षक उपलब्ध होतात असे प्रमाण ७०.४ आहे. हे प्रमाण शैक्षणिकदृष्ट्या चांगले आहे. यामूळे विद्यार्थी शिक्षकांचे योग्य मूल्यमापन होते.

महाविद्यलयीन परिसरामध्ये माध्यमिक शाळा पूरेशा प्रमाणात उपलब्ध नसतात. तसेच विद्यापीठाच्या नियमानुसार गुणवत्ता प्राप्त परीक्षा उपलब्ध नसतात. त्यामुळे वार्षिक पाठ परीक्षेस पुरेसे बहिस्थ परीक्षक उपलब्ध होत नहीत. याचे प्रमाण २९.६

असले तरी विचारात घेण्यासारखे आहे. गुणवत्ता प्राप्त बाह्य परीक्षक उपलब्ध नसल्याने वार्षिक पाठ परीक्षा घेण्यास अडचणी येतात.

प्राचार्य व परीक्षा विभाग प्रमुखांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, वार्षिक पाठ परीक्षेसाठी पुरेसे बहिस्थ परीक्षक उपलब्ध नसल्यास अन्य व्यवस्था महाविद्यालयाला करावी लागते. याचा परिणाम विद्यार्थी शिक्षकांच्या वार्षिक पाठ व प्रात्यक्षिक परीक्षेच्या मूल्यमापनावर होतो.

### ५.८८ पूरेसे परीक्षक उपलब्ध न झाल्यास अन्य व्यवस्था :-

बी.एड्. भाग दोन च्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बाह्य परीक्षकांची निवड व नेमणूक करावी लागते. बाह्यपरीक्षकांच्या निवडीपूर्वी त्यांची नावे विद्यापीठ परीक्षक यादीत असली पाहिजेत अशी काळजी घ्यावी लागते. काही वेळेस महाविद्यालयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पुरेसे परीक्षक उपलब्ध होवू न शकल्याने अन्य व्यवस्था करण्याचा निर्णय महाविद्यालयाला घ्यावा लागतो.

महाविद्यालयाच्या वार्षिक पाठ परीक्षा (प्रात्यक्षिक परीक्षा) घेण्यासाठी पूरेसे परीक्षक उपलब्ध न झाल्यास कोणती अन्य व्यवस्था केली जाते, याविषयी माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे आहे.

## <u>कोष्टक क्र. ८८</u>

### <u>पुरेसे परीक्षक उपलब्ध न झाल्यास अन्य व्यवस्था :-</u>

| अ.नं. | पुरेसे परीक्षक उपलब्ध नसल्यास कोणती व्यवस्था केली जाते? | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | उपलब्ध परीक्षकांची नेमणूक केले जाते | १५ | ३७.५ |
| २ | कमी शैक्षणिक अनुभव असणाऱ्या परीक्षकांची नेमणूक केली जाते | ३ | १५.० |
| ३ | महाविद्यालयातील प्राध्यापक, अंतर्गत परीक्षक म्हणून उपलब्ध नसतील तर बहिस्थ परीक्षकांची नेमणूक केली जाते. | १९ | ४७.५ |
| | एकूण | ३७ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की पुरेसे परीक्षक उपलब्ध नसल्यास उपलब्ध परीक्षकांची नेमणूक केली जाते अशा प्रतिसादकांचे नेमणूक केली जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३७.५० आहे. महाविद्यालातील प्राध्यापक, अंतर्गत परीक्षक म्हणून उपलब्ध नसतील तर बहिस्थ परीक्षकांची नेमणूक केली जात अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४७.५ आहे. कमी शैक्षणीक अनुभव असणाऱ्या परीक्षकांची नेमणूक केली जाते अशा प्रतिसादकांचे प्रमाण १५.०० आहे.

वार्षिक पाठ परीक्षेसाठी पूरेसे बहिस्थ परीक्षक उपलब्ध न झाल्याने परिसरातील माध्यमिक शाळांमधून वार्षिक पाठासाठी उपलब्ध होणाऱ्या परीक्षकाची नेमणूक केली जाते. उपलब्ध झालेले परीक्षक विद्यापीठाच्या नियमानुसार गुणवत्ता पात्र नसतात.

त्याचा शैक्षणिक अनुभव कमी असतो याचा परिणाम विद्यार्थी शिक्षकाच्या पाठाच्या मूल्यमापनावर होतो.

महाविद्यालयातील प्राध्यापक अंतर्गत परीक्षक असतात. काही वेळा महाविद्यालयातील प्राध्यापक उद्बोधन वर्ग, किंवा रिफ्रेशर कोर्सला जातात त्यामुळे अंतर्गत परीक्षक म्हणून उपलब्ध होत नाहीत अशा वेळी जादा बहिस्थ परीक्षकाची नेमणूक करवी लागते.

## ५.८९ वार्षिक पाठ परीक्षेबाबत बहिस्थ परीक्षकांविषयी अडचणी:-

बी.एड्. भाग दोनच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बाह्य परीक्षकांच्या निवडीपूर्वी त्यांची नांवे विद्यापीठ परीक्षक यादीत असावीत. असे बी.एड्. अभ्यासक्रमात सूचित केले आहे. काही वेळा वार्षिक पाठ परीक्षेबाबत बहिस्थ परीक्षकांविषयी अडचणी निर्माण होतात.

महाविद्यालयात वार्षिक पाठ परीक्षेबाबत बहिस्थ परीक्षकांविषयी कोणत्या अडचणी येतात याविषयी माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्र. ८९

## वार्षिक पाठ परीक्षेबाबत बहिस्थ परिक्षकांविषयी येणाऱ्या अडचणी:-

| अ.नं. | वार्षिक पाठ परीक्षेबाबत बहिस्थ परीक्षकां विषयी येणाऱ्या अडचणी | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | विद्यापीठाने नेमलेले बहिस्थ परीक्षक सलग रजेमूळे काम नाकारतात | २४ | १९.२ |
| २ | परीक्षेसाठी मानधन कमी व उशिरा मिळत असल्याने बहिस्थ परीक्षक काम करण्यास उत्सूक नसतात | ७७ | ६१.६ |
| ३ | बहिस्थ परीक्षक ऐनवेळी नकार कळवितात | २४ | १९.२ |
| | एकूण | १२५ | १००.०० |

वरील कोष्टकारुन असे दिसून येते की, वार्षिक पाठ परीक्षेच्या वेळी विद्यापीठाने नेमलेले बहिस्थ परीक्षक सलग रजेमूळे काम नाकारतात असा प्रतिसादकांचे प्रमाण १९.२ आहे परीक्षेसाठी मानधन कमी व उशिरा मिळत असल्याने बहिस्थ परीखक काम करण्यास उत्सूक नसतात अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६१.६ आहे. बहिस्थ परीक्षक् ऐनवेळी नकार कळवितात आ प्रतिसादकांचे प्रमाण १९.२ आहे.

वार्षिक पठासाठी विद्यापीठाने नेमलेले बहिस्थ परीक्षक सलग रजेमूळे काम नाकारतात. परीक्षक म्हणून काम करताना त्यांना रजेबाबत सवलत नसते. त्यामूळे रजा शिललक नसलयास परीक्षक काम नाकारतात.

परीक्षेसाठी विद्यापीठाकडून मिळणारे मानधन तूलनेने कमी व परीक्षा झाल्यानंतर बऱ्याच दिवसाने मिळते त्यामूळे बहिस्थ परीक्षक काम करण्यास उत्सूक नसतात. त्यामूळे गुणवत्ता प्राप्त परीक्षक ऐनवेळी नकारही कळवतात.

परिसरातील माध्यमिक शाळांतील दहावीच्या शास्त्र विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा वार्षिक पाठ परीक्षेदरम्यान येतात त्यामुळे गणित-शास्त्राचे गुणवत्ता प्राप्त परीक्षक वार्षिक पाठ परीक्षेस उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे बहिस्थ परीक्षकांबाबत अडचणी येतात.